म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय वा० वा०
दा. क्र. ३९६३

# जीवनकलह

अर्थात्

## 'श्याम'–खंड दुसरा

साने गुरुजी

मूल्य दोन रुपये

IRBK-0103163
IRBK-0103163

# जीवनकलह

अर्थात्

## 'श्याम'—खंड दुसरा


लेखक

साने गुरुजी



मराठी ग्रंथ संग्रहालय,
२८८८०
अनुक्रम
ग्रा. वा.
९०६२
नों. दि. ३।९।३८
ग्रंथालय शाखा



टक प्रकाशन संस्था, मुंबई ४

मूल्य दोन रुपये

प्रथमावृत्ति : १९३८
पुनर्मुद्रण : १९४३, १९४८

Printed by B. G. DHAWALE, at the Karnatak Printing Press, 103, Sion (East), Bombay 22, and published by him for the Karnatak Publishing House, Shri Samarth Sadan, Benham Hall Lane, Girgaon, Bombay 4.

# प्रकरणसूचि


| | | |
|---|---|---|
| २७ | औंधांत सुतक्यासारखा प्रवेश | १ |
| २८ | सारी फजीति | १४ |
| २९ | मधुकरी | ३३ |
| ३० | प्रेमळ आजी | ४६ |
| ३१ | विचित्र घटना | ७१ |
| ३२ | मावशीला पत्र | ९१ |
| ३३ | तो दिवस | ९७ |
| ३४ | दुसरे कांहीं अनुभव | १०३ |
| ३५ | वाचन व प्रदर्शन | ११५ |
| ३६ | शाळेंतील रात्रींचा आश्रम | १२२ |
| ३७ | औंधला रामराम | १२८ |
| ३८ | कांहीं दिवस घरीं | १३४ |
| ३९ | मुंबई | १४१ |
| ४० | देवा, मला निर्दोष कर | १४९ |
| ४१ | अज्ञात श्याम | १५६ |
| ४२ | वारकरी | १६५ |
| ४३ | प्रेमळ सेवेकरी | १७१ |
| ४४ | भिकारी | १८१ |
| ४५ | वारकरी असून वर्गणीदार | १८६ |
| ४६ | आई गेली | १९५ |



म. ग्रं. सं. ठाणे, ग्रन्थालय शाखा.
ग्रा. क्र....3963 नों दि ............
वि. ....०११९१ ...

विभाग ... क्रमांक ... नों. दि. 3/9/3/18

# औंधांत सुतक्यासारखा प्रवेश

## २७

मी रहिमतपूर स्टेशनवर उतरलों. अगदीं सकाळची वेळ होती. औंध गांव स्टेशनपासून सात कोस होता. दापोलीस असतांना सहा कोस चालून माझ्या पालगडला मी शनिवार रविवारीं जात असें. चालण्याची मला संवय होती. परंतु माझ्याबरोबर सामान होतें. पुस्तकांनीं व वह्यांनीं भरलेली ट्रंक होती, वळकटी होती, करंडी होती. एवढें सामान घेऊन मी थोडाच कांहीं चालत गेलों असतों ?

त्यावेळेस मोटार, लॉऱ्यांचा फारसा सुळसुळाट झाला नव्हता. टपालासाठीं औंधसरकारनें घोड्याची व्हिक्टोरिया ठेवलेली होती. ती रोज येत असे, जात असे. वाटेंत घोडे बदलीत असावेत असें आठवतें. स्टेशनवर टांगेहि फारसे नव्हते, बैलगाड्या होत्या. शेवटीं मीं एक बैलगाडी ठरविली. गाडींत सामान ठेवलें. बैलगाडी निघाली.

माझ्या मनांत कितीतरी विचार येत होते. औंधला माझें कसें काय जमेल याची चिंता राहून राहून मनाला कष्टी करीत होती. माझ्या घरच्या सर्व मंडळींची आठवण येऊन डोळे भरून येत होते. गाडीवानानें मध्येंच गाडी थांबवून निंबाचें दांतण तोडून घेतलें. तो प्रकार मला अपरिचित होता. राखुंडीनें दांत घासण्याचा एकच प्रकार मला कोंकणांत माहीत होता. मीं त्या गाडीवानास विचारलें, " हें काय करतां तुम्ही ? "

तो म्हणाला, " दांतण करीत आहें. निंबाची काडी, बाभळीची काडी, आंब्याची काडी, तरवडाची काडी—कसलीहि चालते. सगळ्यांत बाभळीचें दांतण उत्तम. निंबाच्या दांतणानें दांत स्वच्छ होतातच, शिवाय घसा स्वच्छ राहातो. "

मीं म्हटलें, " कडू नाहीं का लागत ? "

तो म्हणाला, " आम्हांला संवय आहे. इकडे खेड्यापाड्यांत तुम्हांला हा प्रकार सर्वत्र आढळेल. "

मीं म्हटलें, " आमच्या कोंकणांत हीं झाडें होतच नाहींत. समुद्राची हवा ह्या झाडांना मानवत नसेल. गुढीपाडव्याच्या दिवशीं निंबाचीं चार पानें दुरून दुरून आणावीं लागतात. एखाद्याच्या बागेंत मुद्दाम तें झाड लावलेलें असतें. परंतु तें फार वाढत नाहीं. इकडे कसे त्याचे प्रचंड वृक्ष झाले आहेत ! "

तो गाडीवान म्हणाला, " तुम्ही कोंकणांत राहातां वाटतें ? इकडे कोठें जातां ? "

मीं म्हटलें, " औंधाला शिकण्यासाठींच जात आहें. "

गाडीवानानें विचारलें, " तुमचें गांव कोठें आहे ? "

मीं सांगितलें, " खेड–चिपळूणच्या बाजूस. चिपळूणपासून बारा कोस आहे. "

गाडीवान म्हणाला, " साताऱ्याहून चिपळूणला माल घेऊन शेंकडों गाड्या जातात. तुम्ही मुंबईहून आलांत वाटतें ? "

मीं म्हटलें, " हो. "

गाडीवानानें विचारलें, " औंधाला तुमचा सगासोयरा असेल ? "

मीं म्हटलें, " माझ्याच बरोबरीचा एक मित्र आहे. त्याच्या आधारानें मी जात आहें. "

गाडीवान म्हणाला, " तुमचे आईबाप इतके लांब तुम्हाला कसे पाठवतात ? तुम्हीं बामणांनींच राजांनो विद्या करावी. "

मीं म्हटलें, " जरूर पडली म्हणजे सर्वांना सर्व कांहीं करतां येतें. "

गाडीवानानें विचारलें, " तुम्हांला देऊं कां दांतण काढून ? "

मीं म्हटलें, " दे. "

गाडीवानानें गाडी थांबविली. एक सुंदरसें दांतण त्यानें मला आणून दिलें. मीं त्याला म्हटलें, " गाडी चालू दे. मी दांतण करीत पायींच येतों. पायहि मोकळे होतील. " गाडी पुढें निघाली. मी रस्त्यानें चाललों. आजूबाजूची सृष्टि पाहात होतों. देशावरची हवा खात होतों. सकाळचा वारा उत्साहप्रद होता. कोठेंतरी पाऊस पडलेला असावा. मृगनक्षत्र सुरू झालें होतें. वारा थंडगार होता. माझ्या पायांतील वाहाणा कुरकुर वाजत होत्या. आमच्या पालगड गांवांतील पंड्या चांभारानें त्या दिल्या होत्या.

## ३ औंधांत सुतक्यासारखा प्रवेश

पंड्या चांभाराचा व आमचा फार घरोबा. आमच्या घराण्यांतील अनेकांचे पाय पंड्या चांभारानें सांभाळले. परंतु आम्हीं त्याला काय दिलें होतें? आमचे पाय कृतज्ञ होते का कृतघ्न होते?

त्या निंबाच्या काडीनें मला नीट दांतण करणें जमेना. शेवटीं तें मीं टाकून दिलें. मी तसाच निघालों. उतार होता. गाडी दूर गेली होती. माझ्या मनांत शंका येऊं लागल्या. मल्हारपेठ वगैरे इकडेच कऱ्हाडच्या बाजूला आहे असें आम्हीं लहानपणीं ऐकलें होतें. दापोलीच्या शाळेंत एखादे वेळेस एखादे शिक्षक एखाद्या खोडकर मुलास म्हणावयाचे, "तुम्ही मल्हार-पेठेंत पाठवण्यालायक आहांत!" त्याची मला आठवण झाली. माझें सामान घेऊन गाडीवान पळून तर नाहीं जाणार असें मनांत आलें. परंतु सामान तरी असें काय होतें? ट्रंकेंत पुस्तकें व वह्या. एक करंडी होती. तिच्यांत फळें व फराळाचा डबा आणि घोंगडीगोधडीची वळकटी. ट्रंकेंत पैसे थोडेच होते!

मी झपझप पावलें टाकीत चाललों. उताराच्या शेवटीं गाडीवानानें गाडी थांबविली होती. "बसा आतां गाडींत," तो म्हणाला. मी गाडींत बसलों. मला झोंप येऊं लागली. शेवटीं मी निजलों. गाढ झोंप मला लागली. अत्यंत झोंपेच्या वेळीं कसलाहि अडथळा माणसास होत नाहीं. वाटेल त्या परिस्थितींत जी झोंप येते, तीच खरीखुरी झोंप.

दहा वाजून गेले असतील. गाडींत ऊन येत होतें. तथापि मी निद्रितच होतों. एके ठिकाणीं गाडी थांबली. तेथें विहीर होती. गाडीवानानें मला हांक मारली. मी जागा झालों.

"फराळ करा, दशमी भाकर खा," तो म्हणाला.

मी खालीं उतरलों. माझा तांब्या बाहेर काढला. चूळ भरली. पाय धुतले. झाडाच्या छायेंत मी दशमी खाऊं लागलों. त्या गाडीवानानेंहि भाकर सोडली. माझ्यांतील बटाट्याची भाजी मीं त्याला दिली.

"तुम्हांला कांदा हवा का? लसणाची चटणीहि घ्या हवी तर. तुम्हाला चालत असेल तर घ्या," तो म्हणाला.

मला लहानपणची बरच्या शिक्षेची आठवण झाली. आमच्या बंगल्यांत अमृतशेट मारवाडी राहात असत. त्यांच्या पत्नीचें नांव रामप्यारी. रामप्यारीकडे एकदां मीं डाळरोटी खाल्ली होती. रामप्यारीनें मला प्रेमानें

दिली. पांचसहा वर्षांचा मी होतों. परंतु मला त्याबद्दल अडुळशाच्या काठीचा खरपूस मार खावा लागला होता !

माझा गाडीवान तर कुणबी होता. त्याच्याजवळची का चटणी घेऊं? परंतु मीं घेतली. त्याच्याजवळचा कांदाहि घेतला. माझ्याजवळ हा भेदभाव जन्मजातच नाहीं. भाजीभाकर कोणीहि मला देवो, मला ती पवित्रच वाटते. मांसमच्छर नसलें म्हणजे झालें. माझी ही पूर्वजन्माची पुण्याई आहे. निरनिराळ्या जातींबद्दल, निरनिराळ्या धर्मांबद्दल सहानुभूति व प्रेम या जन्मांत मी शिकलों नाहीं. माझ्या रक्तांतच तो गुण आहे. हा माझा गुणच कांहींना दोष वाटतो. ही माझी पुण्याई त्यांना पापाची शिदोरी वाटते. परंतु माझी ही कमाई मी गमावणार नाहीं. मी तिची वाढच करीन. सर्वांबद्दल सहानुभूति मला ज्या दिवशीं वाटेल त्या दिवशीं मी कृतार्थ होईन.

प्रत्येकाच्या मनांत कृतज्ञता असते. गाडीवानानें माझी भाजी घेतली. त्यालाहि मग मला द्यावें असें नाहीं का वाटणार? मीं त्याच्याजवळून घेण्यासारखी वस्तूहि जर घेतली नसती तर त्याच्या हृदयाला नसतें का दुःख झालें? त्यानें माझी भाजी नाकारली असती तर मला नसतें का वाईट वाटलें?

आपल्या खानदेशांत एदलाबाद पेट्यांत अंतुर्ली वगैरे गांवें आहेत. त्या अंतुर्लीला मी एकदां गेलों होतों. त्या गांवांत जे वडार वगैरे लोक आहेत ते ब्राह्मणाकडचें खात नाहींत. ते ब्राह्मणाला कमी मानतात! तें ऐकून मला आश्चर्य वाटलें. परंतु आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. जो स्वतःला श्रेष्ठ समजून दुसऱ्यास तुच्छ लेखतो त्याला त्याचा मोबदला आज ना उद्यां मिळाल्याशिवाय कसा राहील? जें आपण पेरतों, त्याचीं फळें भोगल्यावांचून सुटका नाहीं.

ती लसणाची चटणी तिखट लागत होती. तिच्यांत भरपूर खोबरें वगैरे थोडेंच घातलेलें होतें? ती गरिबाकडची चटणी होती. ती तिखट होती. परंतु मी गोड मानून खात होतों. हाय-हुयसुद्धां मीं केलें नाहीं.

मीं शेवटीं करंडींतील अंजीर खाल्ले. गाडीवानासहि दोन दिले. हात वगैरे धुऊन आम्ही निघालों. गाडी जोरांत सुरू झाली, मोठा घाट होता. उतार होता. दोहोंकडे दाट झाडी होती. जरा भीषण व गंभीर देखावा होता.

"येथें दरोडे पडतात. रात्रींच्या वेळीं गाड्या लुटतात," गाडीवान म्हणाला.

"जागा भयंकरच आहे," मीं म्हटलें.

"दिवसां तसें कांहीं भय नसतें," तो म्हणाला.

मी चोहोंबाजूंस पहात होतों. घाट संपला. पुढें एके ठिकाणीं पीर होता.

"येथें भुताटकी होते," तो गाडीवान म्हणाला.

"खोटें आहे," मीं म्हटलें.

"लोक सांगतात," तो म्हणाला.

"आपण औंधाला कधीं पोंचूं?" मीं विचारलें.

"दोन वाजतील," तो म्हणाला.

"मला अगदीं गांवांत घेऊन जा. मी नवीन आहें," मीं म्हटलें.

"तुम्ही काळजी नका करूं. तुमच्या घराचा शोध लावूं," तो म्हणाला.

मी पुन्हां जरा झोंपलों. औंध जवळजवळ येत होतें. औंधची टेकडी दिसूं लागली. टेकडीवरचें यमाईचें देवालय दिसूं लागलें.

"उठा. औंध आलें," गाडीवान म्हणाला.

मी एकदम उठलों.

"कोठें आहे?" मीं विचारलें.

"ती पाहा टेंकडी. तेथें यमाईचें देवळ आहे. आलेंच आतां औंध. औंधच्या महाराजांचें हें दैवत आहे," तो म्हणाला.

गाडीवानानें यमाईला हात जोडले. मींहि वंदन केलें.

मीं वंदन केलें. परंतु माझ्या डोक्याला टोपी नव्हती. मी माझी टोपी पाहूं लागलों. माझी टोपी सांपडेना. कोठें गेली माझी टोपी? सारी गाडी शोधली. परंतु ती गाडींत नव्हतीच तर कोठून दिसणार?

"पडली वाटेंत बहुधा," गाडीवान दुःखानें म्हणाला.

"माझ्या हातांत होती! झोंपेंत हातामध्यें थोडीच राहाणार? गेली, पडली," मीं म्हटलें.

माझें तोंड एकदम उतरलें. तो मला अपशकून वाटला. गाडीवानासहि जरा बरें वाटलें नाहीं. औंधला मी प्रथमच आलेला. सर्व आप्तेष्टांस सोडून दूर आलेला. मोठ्या आशेनें, आकांक्षेनें आलेला. परंतु आरंभीच जणूं

नाट लागला! डोक्यावर टोपी असणें म्हणजे मंगल, व डोक्यावर टोपी नसणें म्हणजे अमंगल! काय हे संस्कार! आपल्या जीवनावर असल्या सारहीन वस्तूंचा व चिन्हांचा केवढा परिणाम होत असतो! मांगल्य, अमांगल्य टोपींत का आहे? तें आपल्या हृदयांत आहे, विचारांत आहे, कृतींत आहे.

इंग्लंडवर स्वारी करणारा वुइल्यम किनाऱ्यावर उतरतांना पडला. त्याच्या सैनिकांस तो अपशकून वाटला. परंतु वुइल्यम काय म्हणाला? "हें पाहा इंग्लंड माझ्या हातांत आलें आहे. हें मी आतां कधीं तरी सोडीन का?" असे वीरोचित उद्गार त्याच्या तोंडांतून बाहेर पडले.

बाहेरची सारी सृष्टि मनुष्याच्या हृदयावर, बुद्धीवर पदोपदीं परिणाम करूं पाहात असते. आकाशांत ढग येतात, मनुष्यहि खिन्न होतो. "आज दुर्दिन आहे" असें तो आंबट तोंड करून म्हणतो. उकाडा फार होत असला म्हणजे माणसाचा जीवहि गुदमरतो. बाहेरचीं वादळें पाहून त्याच्या मनांतहि वादळें उत्पन्न होत असतात. बाहेरचें हास्य पाहून तो हंसतो. बाहेरचें रडें पाहून तो रडतो. डोक्यावर पागोटें असलें म्हणजे त्याला शुभ वाटतें. कोणी बोडका आला तर त्याला अशुभ वाटतें. केवढी ही गुलामगिरी आहे! बाहेर कसलीहि परिस्थिति असो; तिच्यावर स्वार होण्यासाठीं धडपडणें, हें मानवी आत्म्याचें जन्मसिद्ध कर्म आहे. कसलें शुभ नि कसलें अशुभ! शुभाशुभांचा जन्मदाता मी आहें. मीं मानलें तर हें शुभ आहे, मीं मानलें तर हें अशुभ आहे. मीं मानलें तर हें दुःख आहे, नाहीं तर हें सुख आहे. पाव्हरीबाबांना साप चावला. ते म्हणाले, "प्रियकर चुंबून गेला!" राणाजीनें दिलेला विषाचा पेला मीरेला अमृताप्रमाणें वाटला!

परिस्थिति कीं माझी चिच्छक्ति? शेवटीं माझी चिच्छक्तीच विजयी झाली पाहिजे. मी मृत्यूंतून अमृतत्व निर्माण करीन. मातींतून अमरावती घडवीन. अंधकारांतून प्रकाश प्रकटवीन. जगांतील सर्व महान् विभूतींनीं हें महान् सत्य जीवनांत अनुभविलें आहे. त्यांचा आत्मा कधींहि कशानेंहि चिरडला गेला नाहीं. कृष्णाच्या अंगावर भगदत्तानें जोरानें रागारागानें अंकुश फेंकून मारला. परंतु त्या अंकुशाचें काय झालें? श्रीकृष्णाच्या वक्षःस्थळावर त्या अंकुशाची वैजयंती माळ झाली!

याचा अर्थ काय? श्रीकृष्णाला का लागलें नाहीं? त्याच्या छातींतून का भळभळा रक्त बाहेर आलें नाहीं? रक्त बाहेर आलें. प्रहार झाला. परंतु तो प्रहार श्रीकृष्णांना फुलाप्रमाणें सुखस्पर्शद झाला! ध्येयासाठीं धडपडणाऱ्या जीवाला सारे आघात, सारे प्रहार, सारे कटु अनुभव म्हणजे मंगलमधुर पूजाच वाटत असते. ती महादेवाची महापूजा असते.

लोकमान्यांना आठ सालीं अटक झाली. त्यांच्या स्नेह्यांना अपरंपार दुःख झालें. त्यांना चैन पडेना. परंतु रात्रींच्या वेळीं त्यांना भेटण्यासाठीं गेलेल्या स्नेह्याला लोकमान्य कोणत्या स्थितींत दिसले? तो महापुरुष शांत झोंपला होता. "शांताकारं भुजगशयनं". महापुरुष सहस्रफणांच्या सर्पावरहि शांत पहुडतो. बाणांच्या शय्येवर भीष्म सुखसंवाद करीत पडून राहातात! महात्माजींना पूज्य विनोबाजींच्या बंधूंनीं एकदां विचारलें, "लोक तुमच्यावर वाटेल ती टीका करतात. तुम्हांला काय वाटतें?" ते म्हणाले, "हृदयांत तंबोरा लागलेलाच असतो!" थोरमहात्म्याचे उद्गार! हृदयांत जिवाशिवाचें संगीत अखंड सुरूच आहे. लेशहि शांति अंतरींची ढळत नाहीं. वरतीं हजारों लाटा उसळत असतात. परंतु खालीं, आंत, अंतरीं अनंत सागर शांत, गंभीर असतो. आकाशांत वादळें येतात जातात; कधीं पौर्णिमा तर कधीं अमावास्या असते; परंतु आकाश निळें–निळें पाठीमागें अभंग निर्लेप असें असतें.

अशी ही आत्म्याची स्वयंभू महान् शक्ति आहे. परंतु संस्कारांनीं, भ्रामक कल्पनांनीं ही दिव्य शक्ति आपण मारीत असतों. अमुक पक्षी ओरडला, अमुक पशु रडला, अमुक प्राणी आडवा गेला कीं आमच्या आत्म्याचें सामर्थ्य लगेच खची होतें. कोणाची रिकामी घागर पाहिली कीं आमचें सामर्थ्य रितें होतें! भरलेला उदककुंभ पाहिला म्हणजे आत्म्यांत सामर्थ्य भरतें! असल्या बाहेरच्या रिकाम्या व भरलेल्या मडक्यांवर का माझें सामर्थ्य अवलंबून आहे? मग मीहि एक मडकेंच आहें म्हणायचें!

मित्रांनो! आपल्या समाजांतून हा सारा प्रकार झाडून फेंकून दिला पाहिजे. स्वतःचें सामर्थ्य, स्वतःचा आशावाद, स्वतःची दिव्यता, स्वतःचा ध्येयवाद, स्वतःच्या आकांक्षा यांना आपण आपल्याच भ्रामक कल्पनांनीं पुरून टाकूं नये. आपण ध्येयनिष्ठेनें झगडत राहिलें पाहिजे. मरणाला शरण

न जातां जरी मरण आलें तरी तें मरण नव्हे. तें जीवनच होय. मरण तेव्हांच मारतें, जेव्हां तें मला रडवतें, मला विवश करतें, मला दुबळें करतें. ज्या मरणाला मीं हंसत मिठी मारली, त्या मरणानें मला न मारतां तें मरणच मीं मारिलें असा स्वच्छ अर्थ आहे!

परंतु हा विचार त्यावेळेस मजजवळ होता का? डोक्यांत टोपी नाहीं एवढ्यानें का माझें डोकें अमंगल झालें? मी लहान होतों. मला रडूं आलें. माझी अशी कां फजिती व्हावी, देवानें असा दावा कां साधावा, असें मला वाटलें.

गाडी गांवांतून जात होती. गाडींत बोडकें बसण्याची मला लाज वाटूं लागली. मी एक पंचा डोक्याला बावळटासारखा गुंडाळला. माझ्या तोंडावर ना हास्य, ना जिज्ञासा, ना कांहीं. एके ठिकाणीं पत्ता नीट विचारला. हळूहळू विचारीत आमच्या मुक्कामीं गाडी आली.

माझा दापोलीचा स्नेही बाहेर आला. मीं गाडीवानास पैसे दिले. रामराम करून तो निघून गेला. माझें सामान आंत नेण्यांत आलें. ती एक मोठीशी खोली होती. तीनचार विद्यार्थी तेथें होते. सर्वांचें सामान तेथें पडलें होतें. भिंतीशीं वळकटी ठेवून मी बसलों.

"श्याम! तोंड अगदीं उतरलेलें दिसतें," सखाराम म्हणाला.

"माझी वाटेंत टोपी हरवली. मला आधीं एक टोपी विकत घेऊन ये," मीं म्हटलें.

"बरें, आणूं कीं तिसरे प्रहरीं. आतां तळ्यावर चल आंघोळीला. भाकर ठेवली आहे ती खा. मग बोलूं," सखाराम म्हणाला.

आम्ही दोघे तळ्यावर आंघोळीस गेलों. मला चांगलेंसें पोहतां येत नव्हतें. मीं पायऱ्यांवर उभें राहून स्नान केलें. धोतर धुऊन घरीं आलों. भात-भाकर खाल्ली. भूक नव्हती. माझी भूक सारी उडून गेली होती. ताट वगैरे घासून मी वळकटी सोडून पडलों. मला झोंप लागली!

तिसरे प्रहरीं मी जागा झालों. तेथील एका मुलाची टोपी घालून मी बाजारांत गेलों. टोपी विकत घेतली. घरीं आलों.

"चल, फिरायला जाऊं," सखाराम म्हणाला.

"चला," मीं म्हटलें.

आम्ही दोघे गांवाबाहेर फिरावयास गेलों. नागफण मीं प्रथमच जिकडे तिकडे पाहिली. बाभळीच्या वडांगी पाहिल्या.

"देशावर सुद्धां कांटे आहेत?" मीं विचारलें.

"अरे, कांटे कोठें नाहींत! सर्वत्र कांटे आहेत. कांट्याशिवाय चालावयाचें नाहीं. जेथें कांटे नसतील तेथें कांटेरी तारा आणतील. कांट्याशिवाय माणसास चैन पडत नाहीं," सखाराम हंसत हंसत म्हणाला.

"कांटा सांभाळहि करतो, परंतु पायांतहि बोचतो," मीं म्हटलें.

"वस्तूचा उपयोग करण्यावर आहे. तुम्ही पायांत न घालाल तर कांटा काय करील? वडांगीला कांट्याचा उपयोग आहे. परंतु ते जर रस्त्यांत टाकाल तर तुमच्याच पायांत ते घुसतील," सखाराम म्हणाला.

"प्रत्येक वस्तूंत चांगुलपणा आहे. तो पाहिला पाहिजे, त्याचा उपयोग करून घेतला पाहिजे," मीं म्हटलें.

"श्याम! विष्ठा रस्त्यावर पडली तर तें विष आहे. परंतु तीच जर शेतांत पडेल तर तिचें सोनें होतें!" सखाराम म्हणाला.

"सर्वत्र मंगल आहे असें साधुसंत म्हणतात तें याच अर्थानें नाहीं का?" मीं विचारलें.

"श्याम! तें बघ कवठाचें झाड," सखारामानें दाखविलें.

"कवठ म्हणजे का फळ? आपण कोंकणांत कोंबडीच्या अंड्याला कवठ म्हणतों. दुपारीं जेवतांना त्या समोरच्या मुलानें कवठाची चटणी हवी का असें मला विचारलें. मीं त्याला नको म्हटलें," मी हंसत म्हणालों.

"याला कवीट म्हणतात. आंबट असतें फळ. पाडायचें का आपण?" सखारामानें माझा सल्ला विचारला.

"माझा नेम चांगला आहे. मी मारतों दगड," असें म्हणून मीं दगड मारला व कवठ पाडलें. आम्हीं तें फोडलें व वानरांप्रमाणें खात निघालों.

"अरे मोर! झाडावर मोर!" मीं आश्चर्यानें म्हटलें.

"हं, इकडे पुष्कळ आहेत मोर," तो म्हणाला.

मी त्या मोरांकडे पाहात राहिलों. त्याचे पिसारे पसरलेले नव्हते. ते खालीं पडलेले होते. भावनांनीं अंतरंग भरल्यावरच खालीं पडलेले पिसारे

उभारले जात असतील. मनुष्याचें मन पडलेलें असतें. परंतु भावना संचरतांच हें मन विश्वाला भारी होतें.

मोर हें सरस्वतीचें वाहन ! किती योग्य व सहृदय कल्पना ! मानवी मनांचे हजारों नाच दाखविणारी देवी सरस्वती ! ती दिव्य, भव्य पसारा पसरणाऱ्या मयूरावर नाहीं बसणार तर कोठें बसणार? मोराच्या पिसाऱ्यांत ते हजारों डोळे लखलखत असतात. सरस्वतीहि सहस्र नयनांनीं मानवाच्या अंतःसृष्टींत पाहात असते. आणि तेथील पाहिलेलें सहस्र रंगांनीं व रसांनीं बाहेर ओतीत असते.

मीं लहानपणीं मामांकडे पुण्यास असतांना तो बेल बागेंतील पिंजऱ्यांतील दीन, दुःखी मोर पाहिला होता. परंतु असे झाडांवर बसून केकारव करणारे स्वच्छंद मोर कधींच पाहिले नव्हते. मित्रांनो! काठेवाडांत सर्वांत अधिक मोर आहेत. काठेवाडांतील रेल्वेनें जात असतांना आजूबाजूच्या झाडांवरून मोरच मोर दिसतात ! काठेवाडी कवींच्या काव्यांतसुद्धां मोरांचे वारंवार उल्लेख येतात. थोर कवि कलापी याचें नांवच मयूरभक्ति दाखवीत आहे. कलापी म्हणजे मोर !

आपल्या भारतीय संस्कृतींत मला हा एक विशेष दिसून येतो. मानवेतर सृष्टींतील नांवें आपण आपल्या मुलांबाळांस ठेवीत असतों. फुलांचीं नांवें इतर संस्कृतींतील माणसांनींहि घेतलीं आहेत. परंतु फुलेंच नाहीं तर झाडांचीं नांवें, पक्ष्यांचीं नांवें, पशूंचीं नांवें, नद्यांचीं नांवें, डोंगरांचीं नांवें आपण माणसांस ठेवीत असतों; स्वर्गांतील रवि, शशी, तारे व पाताळांतील नाग यांचींहि नांवें आपणांस मोह पाडीत असतात. तुम्ही हसूं नका. मी तुम्हांला उदाहरणें देतों.

जाई, शेवंती, अशोक, गुलाब, कमळ, कर्ण, चमेली, निशिगंध, सरोज, चंपक वगैरे फुलांचीं नांवें मोठ्या प्रेमानें आपण ठेवीत असतों.

चंदन, बकुल, डाळिंब, तुळस वगैरे वृक्षवनस्पतींचीं नांवें आपण माणसांस ठेवतों.

कोकिळा, हंसा, चिमणी, मैना, पोपट, राघू, वगैरे पक्ष्यांचीं नांवें आपणांस प्रिय वाटतात.

हरणी, रोहिणी, मनी, गजी, मातंग, वगैरे प्राण्यांचीं नांवें आपण घेतलीं आहेत. गौतम, वृषपर्वा वगैरे प्राचीन काळीं प्रिय नांवें होतीं.

गंगा, यमुना, सिंधु, सरस्वती, कालिंदी, कावेरी, कृष्णा, गोदावरी, भीमा, चंद्रभागा, वारणा, शरयू, शरावती, सावित्री, वगैरे नद्यांचीं नांवें आपण शेंकडों वर्षें मुलींना ठेवीत आलों आहोंत. नद्याच केवळ नाहीं तर केवळ पाण्याला जीं नांवें आहेत, तींहि आपण ठेवीत असतों. अंबु, वारी, जीवन, हीं नांवें ठेवलेलीं आपणांस आढळून येतात.

काशी, द्वारका, माया, मथुरा, अयोध्या, वाराणशी वगैरे थोर, पवित्र नगरांचीं नांवें आपण मुलींना देत असतों.

चपला, चंचला, सौदामिनी, तारा, इंदु, शशिकला, चंद्री, भास्कर, प्रभाकर, दिवाकर वगैरे आकाशस्थ वस्तूंचीं नांवें आपण घेतलीं आहेत.

नागेश, शेषराय, अनंत हीं सर्पांचीं नांवें माणसांत आहेत.

आजूबाजूच्या सृष्टीचें हें अपार प्रेम आहे. सारी सृष्टि आपण आपल्या संसारांत आणली आहे. हा संसार केवळ मानवांचा नाहीं. मानवाच्या संसारांत साऱ्या सृष्टींतील सुंदरता व मंगलता येईल.

मी त्या मोरांकडे पाहात होतों. हिरव्या–हिरव्या झाडांवर हिरवे–हिरवे मोर !

" श्याम ! किती वेळ उभा राहणार, " सखारामानें विचारलें. परंतु पुन्हां तोच म्हणाला,

" बघ बघ, तूं कवि आहेस हें मी विसरलों. "

" हें देवाचें जिवंत काव्य आहे, " मीं म्हटलें.

" श्याम ! तुझ्या कांहीं कविता तूं बरोबर आणिल्या आहेस का ? " सखारामानें प्रश्न केला.

" कां बरें ? " मीं सचिंत होऊन विचारलें.

" त्यांतील कांहीं निवडक कविता महाराजांना दाखवूं. महाराजे प्रत्यहीं पहांटे डोंगरावरील यमाईस जातात. ते खालीं उतरतांच त्यांच्या हातांत आपण देऊं, " सखाराम म्हणाला.

" कोणत्या हेतूनें ! " मीं म्हटलें.

संग्रहालय, अनुक्रम २८८५ विभाग क्रमांक

" त्यांना आवडल्या तर ते उत्तेजन देतील. महाराज स्वतः कीर्तनें रचतात. गुणी मनुष्य गुण ओळखतो. तुझा पुढचा मार्ग सुखकर होईल. अडचणी जातील, " तो म्हणाला.

" परंतु मी गरीब आहें, मला येथील बोर्डिंगांतून शिदोरी मिळावी, असा अर्ज केला तर नाहीं का काम होणार ? " मीं विचारलें.

" श्याम ! तूं एकदम आलास. परंतु येथें एक नवीन नियम झाला आहे त्यामुळें मोठी चिंता उत्पन्न झाली आहे, " तो म्हणाला.

" कोणता नियम ? " मीं खेदानें म्हटलें.

" संस्थानाबाहेरच्या मुलांना अतःपर बोर्डिंग बंद करण्यांत आलें आहे. या वर्षापासून हा नियम अंमलांत येणार आहे. त्यामुळें तुझ्या अर्जाचा विचार होणार नाहीं, " सखारामानें सांगितलें.

मी कांहीं बोललों नाहीं. मी गंभीर झालों. मी मध्येंच कोठें तरी शून्य दृष्टीनें बघें, पुन्हां खालीं पाहीं. माझ्या डोळ्यासमोर एक प्रकारचा अंधार दिसूं लागला. उद्यांपासून कोठें जेवावयाचें हा प्रश्न होता. अन्नब्रह्माशिवाय मी जगणार कसा ? ब्रह्माच्या अनंत व्याख्या आहेत. परंतु अन्नब्रह्माइतकी हरघडीं अनुभवास येणारी दुसरी कोणती व्याख्या आहे ? सारी चराचर दुनिया या ब्रह्माची निःसीम उपासक आहे.

" श्याम ! बोलत कां नाहींस ? " सखारामानें विचारलें.

" काय बोलूं सखाराम ? " मीं कष्टानें म्हटलें.

" मला मिळणारी शिदोरी आपण दोघे मिळून खाऊं, " तो म्हणाला.

" परंतु असें किती दिवस चालणार ? माझ्यासाठीं तूं का नेहमीं उपाशी राहणार ? दोन भाकरी व दोन मुदा एवढें अन्न मिळणार ! आपलें दोघांचें तेवढ्यांत कसें भागणार ? " मीं म्हटलें.

" कविता दाखवावयाच्या का ? " त्यानें पुन्हां विचारलें.

" नको, " मीं म्हटलें.

" कां बरें ? " त्यानें विचारलें.

" मला तें आवडत नाहीं. माझा भिडस्थ स्वभाव आहे, " मीं म्हटलें.

"भीड भिकेची बहीण. जगांत लाजून भागत नसतें," सखाराम म्हणाला. 'कार्यपरें सर्वथा न लाजावें,' असा मोरोपंतांचा एक चरण आहे आणि तुकारामाच्या एका अभंगांत आहे कीं,

**'मेली लाज धीट केलों देवा.'**

"लाज मेली म्हणजेच मनुष्य धीट होतो," मीं म्हटलें.

"तूं कवितांतील चरण म्हणून दाखवतोस, परंतु प्रत्यक्ष काय करणार आहेस? पोपटपंची काय कामाची?" व्यवहारी सखाराम म्हणाला.

"मला त्याप्रमाणें वागण्याचें धैर्य नाहीं हें खरें आहे. माझ्या कविता महाराजांकडे पाठवाव्या, असें मला कांहीं वाटत नाहीं. आणि खरें सांगूं का सखाराम, अरे मी मुलांमधला कवि आहें. तुम्ही माझे मित्र म्हणून माझें कौतुक करतां. परंतु पोक्त मंडळी, विद्वान् मंडळी माझ्या कवितांना हंसतील. तें हंसणें मला कसें सहन होईल? माझ्या वेड्यावांकड्या कविता माझ्या टंकेंतच असूं देत. माझ्या हृदयांत, माझ्या ओंठांतच असूं देत," मीं म्हटलें.

"श्याम! तूं वेडाच आहेस. अशानें जगांत पुढें कसा येशील?" सखाराम म्हणाला.

"कोण एवढा उतावीळ आहे जगाच्या पुढें यायला? मी कोंपऱ्यांत कोकिळेप्रमाणें बसेन व 'कुऽऊ' करीन," मीं म्हटलें.

"कोकिळेला सारें जग धुंडीत येईल," तो म्हणाला.

"परंतु कोकिळा दिसणार नाहीं. माणसांची व्यवहारी चाहूल लागतांच ती उडून जाईल, गर्द झाडींत लपून बसेल," मीं म्हटलें.

"चल माघारें जाऊं. काळोख पडत चालला," सखाराम म्हणाला.

"इकडे साप असतात का रे? कोंकणांत रात्रींच्या थंड वेळीं धुळीवर येऊन बसतात," मीं म्हटलें.

"देशावर साप कमी आहेत," सखाराम म्हणाला.

आम्ही दोघे खोलींत आलों. माझ्याजवळ कांहीं फराळाचें होतें तें आम्हीं दोघांनीं खाल्लें. रात्रीं अंथरुणें पसरून आम्ही निजलों. मला वाऱ्यावर निजण्याची संवय. परंतु तेथें त्या खोलींत आम्ही सारे मुशाफर पडलों होतों. वारा बिलकूल नव्हता. जीव गुदमरत होता. मला झोंप

येईना. मी विचार करीत होतों. माझें घरीं कसें होणार याचा मी विचार करीत होतों. घरीं माघारें जाण्याचा विचार मनाला शिवत नव्हता. मी उपाशी मरेन, परंतु परत जाणार नाहीं असें स्वतःशीं मी ठरवीत होतों. मधुकरी मागावी का, वार लावावे का, वगैरे विचार मनांत येत होते. परंतु येथें ना कोणाची ओळख, ना कोणी प्रेमाचा. कोठें तोंड उघडा-वयाचें ? कोणापुढें शब्द टाकायचा ?

त्वमेव माता पिता त्वमेव
त्वमेव बंधुः सखा त्वमेव

असें मी मनांत म्हणूं लागलों. मला रडूं आलें. माझ्या रडण्यानें मुलें जागीं होतील अशी मला भीति वाटूं लागली. रडत रडत व दुसऱ्या दिवसाची काळजी करीत करीत एकदांची केव्हां तरी मला झोंप लागली !

# सारी फजीति

## २८

रात्रीं मी अंथरुणांत पाऊस पाडीत होतों, आणि बाहेर मृगाचा पाऊस पडत होता. जिकडे तिकडे पाणीच पाणी होऊन गेलें होतें.

" श्याम ! चल तळ्यावर आंघोळीला, " सखाराम म्हणाला.

" परसाकडणें, तोंड धुणें कोठें करायचें ? " मीं विचारलें.

" तिकडेच सारें करूं, " तो म्हणाला.

आम्ही तळ्यावर आलों.

" त्या शेतांत कोठेंहि शौचास जा, " सखाराम म्हणाला.

मीं लोटी घेतली व निघालों. काळींभोर शेतें दिसत होतीं. पावसानें भिजलेलीं होतीं. मीं शेतांत पाऊल टाकलें तों एकदम ढोंपरभर खोल गेलें. देशावरची मऊ मऊ जमीन ! मला तिचा अनुभव नव्हता. मी त्या मातींत

गाडला जातों कीं काय असें मला वाटूं लागलें. तेथें जवळच शौचास बसण्यास मला धीर होईना. लोक तेथेंच बसत होते. मला लोकांची चीड आली. परंतु लांब जाण्याला माझा जीवहि कांकूं करीत होता. त्या चिखलांतून कसा तरी मी थोडासा दूर गेलों. सारें धोतर चिखलानें भरून गेलें.

मी तळ्यावर आलों. मला नीट पोहतां येत नव्हतें. लहानपणीं आई मारून मारून मला पोहावयास पाठवी. परंतु तरीहि माझें पोहणें अर्धवट राहिलें होतें. तळ्यावर शेंकडों लोक आले होते. दंड वाजवीत होते. दंडांचा आवाज घुमत होता. देशावरील तरुणांचीं तीं तालीमबाज शरीरें पाहून मला त्यांचा हेवा वाटला. मला स्वतःची लाज वाटली. माझे दंड असे वाजतील का? माझ्या दंडांकडे मी बघूं लागलों. ते वाजवण्याचा मला धीर होईना.

मी तळ्यांत उतरलों. कमरभर पाण्यांत उभा राहिलों. परंतु पायरीवरचा माझा पाय एकदम घसरला व मी खोल पाण्यांत पडलों. मी घाबरलों. डुबुक डुबुक करीत मीं पुन्हां पायरी कशी तरी पकडली. प्राण जावयाची ती वेळ होती. प्राणावरच्या अनेक संकटांतून मी वांचलों आहें. एकदां बोटींत चढतांना असाच मी समुद्रांत पडत होतों. परंतु आश्चर्यकारक रीतीनें वांचलों. एकदां लहानपणीं कोठें तरी मी लग्नासाठीं गेलों होतों. त्या लग्नगांवीं नदी होती. दुपारच्या वेळीं मुलें नदींत डुंबावयास निघालीं. मीहि गेलों. नदींत पाणी किती आहे तें कोणासच माहीत नव्हतें. मुलें बाजूबाजूनें पाण्यांत खेळत होतीं. परंतु मी जरा पुढें गेलों तों एकदम मोठा खळगा. कसातरी हात मारीत मी माघारीं आलों. तें लहानपणचें अर्धवट शिकविलेलें पोहणेंहि उपयोगीं पडलें. एकदां सुरतहून मी अमळनेरला येत होतों. मी दाराला टेंकून उभा होतों. बी. बी. सी. आय. च्या गाड्यांचीं दारें बाहेरच्या बाजूनें बंद असतात. दार एकदम जोरानें उघडलें! मी एकदम पुढें बांकावर वांकलों! त्या वेळेस मी बाहेरच फेंकला जावयाचा व मरावयाचा. परंतु वांचलों. पुन्हां पुन्हां मी कां वांचलों हें मला समजत नाहीं. देवानें या दुःखी दुनियेंत मला कां राखलें?

श्याम थांबला. त्याच्यानें बोलवेना. ईश्वराचे अतर्क्य हेतु त्याला कोठून कळणार?

नामदेव म्हणाला, " श्याम! तुझी व आमची गांठ पडायची होती म्हणून देवानें तुला वांचविलें. या खानदेशांतील शेंकडों मुलांशीं प्रेमाचे, सहानुभूतीचे संबंध जोडण्यासाठीं त्यानें तुला वांचविलें."

गोविंदा म्हणाला, " गोष्टी सांगून मुलांचीं मनें मोहून घेण्यासाठीं तूं राहिला आहेस."

रघुनाथ म्हणाला, " ओंठावरचें अपरंपार बोलणें थोडेंतरी कृतींत आणण्यांत कृतार्थता आहे हें तुला दाखवावयाचें होतें."

श्याम म्हणाला, " माझें जीवन मला निरर्थक दिसत आहे. जीवनाची निःसारता पटविण्यासाठींच जणूं देवानें मला सांभाळलें. माझे सारे अहंकार धुळींत मिळवून मला केवळ शून्य करण्यासाठीं देवानें मला वांचवलें. माझें जीवन फोल आहे. गेल्या चाळीस वर्षांत मीं काय केलें? या चाळीस वर्षांचा मी कोणता हिशोब देऊं? या चाळीस वर्षांतील चाळीस दिवस, चाळीस घटका, चाळीस क्षण तरी सार्थकीं लागले असतील का?

" शेतकरी शेत नांगरतो, जगाला पोसतो. गुराखी गाईगुरें राखतो, विणकर विणतो, कुंभार मडकीं भाजतो, भंगी स्वच्छता देतो, झाडूवाला झाडतो, डॉक्टर औषध देतो, इंजीनिअर गटार बांधतो, संघटनाकुशल संघटना निर्माण करतो; कोणी मजुरांच्या संघटना करतात, कोणी शेतकऱ्यांच्या. कोणी विद्यार्थी संघ काढतात, कोणी युवक चळवळ चालवितात, कोणी ग्रामसुधारणा मंडळें काढतात, कोणी साक्षरताप्रसारक संघ काढतात. कोणी खादी संघ चालवितात, कोणी हरिजन सेवाश्रम सुरू करतात. कोणी नवविचार देतात, जगाला स्फूर्ति देतात. कोणी स्त्रियांचे प्रश्न हातीं घेतात, कोणी शिक्षण सुधारूं पाहातात. कोणी इतिहाससंशोधन करतात, कोणी आर्थिक पाहाणी करतात. कोणी सामाजिक अन्यायाविरुद्ध बंड पुकारतात, कोणी सरकारी जुलमाविरुद्ध झेंडा उभारतात. परंतु मी काय करीत आहें? कोणत्या एका ध्येयाला मीं वाहून घेतलें आहे? चार दिवस मी कॉंग्रेसचा प्रचार करतों, चार दिवस आश्रम काढून राहातों. चार दिवस लेखन करतों, चार दिवस रडत बसतों. ज्याच्यासाठीं मी जगेन व ज्याच्यासाठीं मरेन असें मजजवळ काय आहे? केवळ लिहिणें मला आवडत नाहीं. मीं पुष्कळसें लिहिलें तेंहि तुरुंगांत. परंतु लोकांना

वाटतें कीं मला लिहिण्याचें वेड आहे. मी मागें पुण्याला होतों ना, तेव्हां मला कोणीहि भेटलें कीं प्रथम विचारीत, 'काय सध्यां लेखनांत दंग ना?' त्यांचा तो प्रश्न सुरीप्रमाणें माझ्या छातींत घुसे! मला इतर कांहीं सुचेना म्हणून तुरुंगांतील लिहिलेलें मी त्यावेळेस पुन्हां नीट लिहून ठेवीत होतों. लिहीत बसणें म्हणजे मला मरणप्राय दुःख आहे. परंतु दुसरें कांहीं करतां येत नाहीं. येऊन जाऊन खेड्यांतून व्याख्यानें देत हिंडणें. परंतु नुसत्या व्याख्यानांचा काय उपयोग? संघटना करितां आली पाहिजे. खेड्यांतील लोकांजवळ बोललें पाहिजे. त्यांच्या शंका फेडल्या पाहिजेत. मी तर माणसांस पाहून घाबरतों. शंका उत्पन्न झाल्या कीं पळावें असें वाटतें! खेड्यांतील लोकांची आर्थिक स्थिति जर सुधारतां येत नसेल तर नुसत्या पोपटपंचीचा काय फायदा? परंतु ती स्थिति मी कशी सुधारणार? तें मला कांहीं एक जमत नाहीं. खेड्यांतील घाण दूर करणें एवढें एक काम आहे. त्यांतहि शास्त्राभ्यास हवा. खेड्यांत कशा प्रकारचे संडास हवेत, तेथें गटारें कशीं बांधावीं या सर्व गोष्टींचा विचार येतोच.

"माझें स्थान मला कोठेंच दिसत नाहीं. मला वर्णच नाहीं. नवीन तेजस्वी सर्वोदयकर विचार देणारा मी ब्राह्मण नाहीं. अन्यायाविरुद्ध तडफेनें उठून बंडाचा झेंडा उभारून मारण-मरण करणारा मी क्षत्रिय नाहीं. देशांतील उद्योगधंदे कस वाढतील, कृषिगोरक्ष्य कसें सुधारेल, ग्रामोद्योग कसे तगतील, मधुसंवर्धन विद्या, कागदाचा धंदा वगैरे कसे पुनरुज्जीवित होतील यांसंबंधीं मला कांहींहि येत नाहीं. मी केवळ मजुरी करणारा शूद्रहि नाहीं. कारण मजुरीची संवय नसल्यामुळें तासन्तास मी शारीरश्रम करूं शकत नाहीं.

"मग माझा उपयोग काय? रात्रंदिवस हा प्रश्न मला टोंचीत आहे. मला खाणें विषसम वाटतें! जगणें असह्य होतें! मीं कां खावें प्यावें? मला अधिकार काय? ज्याला प्रामाणिकपणें वाटेल कीं आपण केवळ भूभार आहोंत, त्यानें खुशाल आत्महत्त्या करावी. मी केवळ तुमच्या आसक्तीमुळें जगत आहें. माझी निरर्थकता तुम्हांला समजून तुम्ही मला आनंदानें या जगांतून निघून जावयास जर संमति द्याल तर किती छान होईल! एखादा निरोगी भिकारी भीक मागतांना आपण जर पाहिला तर

त्याच्यावर आपण रागावतों. तुम्हीं त्याप्रमाणेंच मजवर रागावलें पाहिजे. जो नियम आपण इतरांस लागू करतों, तो आधीं स्वतःच्या जीवनांत व आपल्या प्रियजनांच्या जीवनांतहि आपण लाविला पाहिजे. परंतु त्यावेळेस आपण मृदु मवाळ असतों. आपण परक्याच्या बाबतींत तत्त्वनिष्ठ असतों व स्वतःच्या बाबतींत तत्त्वहानि निःशंकपणें करूं देत असतों. म्हणून ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरींत एके ठिकाणीं लिहिलें कीं; 'अरे बाबा! तूं दुसऱ्याला स्वच्छ करावयास फार धांवतोस, परंतु थोडी स्वतःवर दया कर ना. दुसऱ्याचे दोष फार बघतोस, थोडे स्वतःचे पाहून ते दूर करूं लाग ना.'

"नामदेव, खरेंच माझ्या जीवनाचा मला वीट आला आहे. माझ्यांतील रात्रंदिवस वडवानळाप्रमाणें मला जाळणारी माझी अशांति तुम्हांस दिसत नाहीं. माझ्या जगण्यामुळें तुम्हांला आनंद होतो, म्हणून मी जगत आहें. परंतु हा तुमचा आनंद आसक्तिमय आहे. माझें दुःख तुम्ही कां पाहात नाहीं? तुम्ही सारे स्वार्थी आहांत. तुम्ही तुमच्या सुखासाठीं माझ्या जीवनाची होळी मला विझवूं देत नाहीं. विझवूं का हें जीवन? होऊं दे निर्वाण! या माझ्या भिकारड्या जीवनाच्या दिव्याला देतां का निरोप?"

नामदेव म्हणाला, "जगण्याचें दुःख होत असतांहि आमच्या सुखासाठीं तूं जगतोस म्हणून तर तूं आम्हांला हवास. दुसऱ्यासाठीं इतके मानसिक क्लेश जो वर्षानुवर्ष सहन करीत आहे, त्याचे पाय जन्मोजन्मीं धरावे असें मला वाटतें. आणि श्याम, एक गोष्ट तूंच मागें सांगितली होतीस कीं स्वतःची खरी योग्यता स्वतःलाच समजते असें नाहीं. चित्रकार चित्र जवळ धरतो. दूर धरतो. दोन्ही रीतीनें धरूनच चित्राचें खरें स्वरूप समजतें. तूं स्वतःला जवळून पाहिलेंस. आतां स्वतःला दुरून पाहा. म्हणजे आमच्या दृष्टीनें पाहा. जगाच्या दूरच्या दृष्टीनें पाहा. आम्ही जर म्हणत असूं कीं तुझें नुसतें जगणेंच आम्हांला उपयुक्त आहे, तुझा श्वासोच्छ्वास, तुझें हंसणें, तुझें रडणें, तुझा एखादा शब्द आम्हांला उपयुक्त आहे, तर तें म्हणणें का खोटें? स्वतःच्या दृष्टीनें तूं नालायक ठरलास, परंतु जगाच्या दृष्टीनें कोठें ठरला आहेस? स्वतःच्या दृष्टीनें व जगाच्या दृष्टीनेंहि आपण नालायक ठरलों, तरीहि कदाचित् देवाच्या दृष्टीनें आपण नालायक ठरले नसूं. ज्या क्षणीं देवाच्या दृष्टीनें आपण नालायक ठरूं,

त्याच क्षणीं आपला श्वासोच्छ्वास बंद होईल. एक क्षणभरहि अधिक जगूं म्हटलें तरी जगतां येणार नाहीं. आणि सृष्टींत तुमचा उपयोग आहे असें जोंपर्यंत विश्वशक्तीला वाटत आहे, त्याच्या आधीं तुम्हीं कितीहि मरूं म्हटलेंत तरी तुम्ही मरणार नाहीं. श्याम ! जगांत कोणाला ना कोणाला तरी आपला उपयोग थोडा फार होत असतोच असतो. जगांत आपण केवळ निरुपयोगी आहोंत असें म्हणणें म्हणजे जगच्चालकाचा तो अपमान आहे. साध्या किड्याचेंहि या विश्वयंत्रांत काम आहे. शेवटीं सहनशीलता गुणांची परीक्षा करते; तूं लौकर वैतागतोस, निराश होतोस आणि त्यामुळें आम्हांस किती वाईट वाटतें !"

श्याम म्हणाला, "तुम्हांला वाईट वाटतें म्हणूनच माझा अस्त मला करूं दे. माझ्यासारखे निराशा पसरविणारे प्लेगचे जंतु तुमच्यांत कशाला ? इतरांना उत्साह देतां आला नाहीं तर निदान त्यांना स्वतःच्या दुबळ्या व भिकार विचारसरणीमुळें निरुत्साह तरी करूं नये. माझ्या मनांत हा विचार नेहमीं येतो. घुबडानें दूरच राहावें; रानांत निघून जावें. त्याचा भीषण घूत्कार इतरांच्या कानावर त्यानें कां घालावा ?"

राम म्हणाला, "श्याम ! कोठलें काढलेंस हें सारें ? हें बंद कर. तुझी गोष्ट तूं सांग. असल्या चर्चा नकोत गड्या."

"खरेंच ! मरणाचे विचार कधींहि काढूं नयेत !" रघुनाथ म्हणाला.

श्याम म्हणाला, "बरें तर. मी तळ्यांतून जिवंत बाहेर आलों. स्नानें झालीं, कपडे धुऊन झाले. मी व माझा मित्र घरीं जावयास निघालों. आम्हीं कपडे वगैरे वाळत घातले. नंतर मी बसलों. शाळेंत नांव दाखल करावयाचें होतें. दाखला वगैरे काढून पाहिला. दापोलीच्या शाळेंतील शिक्षकांनीं शेरा चांगला दिला होता.

मीं माझ्या खिशांत तो दाखला ठेवून दिला. पाकिटांत पैसे वगैरे आहेत कीं नाहीं तें पाहूं लागलों. पाकीट उघडलें. परंतु ! पाकिटांतील एक दहा रुपयांची नोट नाहींशी झालेली ! मीं कोटाच्या खिशांत पुन्हां पुन्हां पाहिलें. त्या पाकिटांत सात–सातदां पाहिलें. त्या पाकिटांत पांचाची एक नोट होती. दहाची नोट गेली ! त्या पाकिटांत आणखी एक नोट होती. ती अमोल होती ! तिची किंमत कोणालाहि करतां आली नसती. ती नोट

कोठेंहि जगाच्या बाजारांत वटवतां आली नसती! ती कसली होती नोट? तें रामचें श्यामला आलेलें पत्र होतें. दापोली सोडतांना रामनें जी दोन ओळींची चिठ्ठी मला दिली होती, ती होती ती. ती सुरक्षित होती. ती माझी जीवनदायी नोट कोणीं नेली नव्हती. मी तें लहान पत्रच कितीदां वाचीत बसलों. दहा रुपयांची नोट हरवली तें विसरून गेलों. तें रामचें पत्र मी पुन्हां पुन्हां हृदयाशीं धरीत होतों. पुण्यास रामला माझी आठवण येत असेल का? माझीं जुनीं पत्रें त्यानें ठेवलीं असतील का? त्यानें फाडून टाकलीं असतील? अमोल माणिकमोत्यांप्रमाणें हीं पत्रें त्याला वाटत असतील का? तो माझीं पत्रें अशीं प्रेमानें हृदयाशीं धरून त्यांवर अश्रूंचा अभिषेक करीत असेल का?

राम कांहींहि करो. श्याम क्षणभर सारें विसरला. परंतु पुन्हां स्वर्गांतून पृथ्वीवर आला. दहा रुपये कसे हरवले? दहा रुपये मला हजारांच्या बरोबर होते. विचारायचें कोणाला? कोणावर आळ घेणार? आरोप घेणार? आपलीच चूक. मी कोटाच्या खिशांत पाकीट ठेवून तसाच गेलों कां? तें पाकीट ट्रंकेंत कुलूप लावून कां ठेवलें नाहीं? नाहीं तर अंगांत कोट घालून मी तळ्यावर कां गेलों नाहीं?

खोलींत दोघे तिघे इतर विद्यार्थी होते. माझी कावरीबावरी चर्या त्यांनीं पाहिली. मी कांहीं तरी हरवलेलें शोधीत आहें असें त्यांच्या ध्यानांत आलें.

"काय शोधतां हो?" एकानें विचारलें.

"पैसे वगैरे नाहींना हरवले?" दुसऱ्यानें प्रश्न विचारला.

"जगांत पैशांशिवाय दुसरें काय हरवायचें आहे? सर्वत्र पैशाची वाण आहे. पैसा म्हणजे विष आहे!" तिसरा म्हणाला.

"खरेंच का हो पैसे गेले?" पहिला म्हणाला.

"हो!" मीं उत्तर दिलें.

"किती?" दुसऱ्यानें विचारलें.

"दहाची नोट गेली, पांचाची राहिली," मी म्हणालों.

"सारे नाहीं गेले. दयाळू दिसतो! चोर" तिसरा म्हणाला.

"केव्हां होते?" पहिल्यानें विचारिलें.

" तें मला आठवत नाहीं," मीं म्हटलें.

" काल टोपी आणली होती तेव्हां होते ना ?" दुसऱ्यानें विचारलें.

" असें वाटतें. त्या वेळेस नोट मोडावी लागली नाहीं. सुटा रुपया होता. नोटा मीं पाहिल्या नाहीं," मीं म्हटलें.

" त्या गाडीवानानेंहि काढून घेतली असेल," तिसरा म्हणाला.

" तो भला माणूस होता. गोड बोले, गोड वागे. त्यानें मला दांतण काढून दिलें. फराळ करतांना स्वतःजवळची चटणीसुद्धां त्यानें मला दिली. मोठा प्रेमळ माणूस," मीं म्हटलें.

" त्याच्याजवळची चटणी !" पहिला आश्चर्यानें व दोन पावलें मागें सरकून म्हणाला.

" ती खाल्लीत ? भाकरहि घेतलीत कीं काय ?" दुसऱ्यानें विचारलें.

" नाहीं. मजजवळ भरपूर होती. त्यानें प्रेमानें दिली असती तर मीं नाकारली नसती. चटणी-भाकर खायला काय हरकत ? त्यांत मांसमच्छर थोडेंच आहे ?" मीं सहज म्हटलें.

" तुम्ही सुधारक दिसतां ? हें संस्थान पुराणमतवादी आहे. येथें शाळेंत सर्वांना संध्या वगैरे येते कीं नाहीं याचीहि परीक्षा घेतात. बोर्डिंगांत शिदोरी आणावयास जातांना सोंवळें नेसून उघड्यानें जावें लागतें. तुम्हाला जपून वागलें पाहिजे," तिसरा म्हणाला.

" परंतु मला बोर्डिंग मिळणारच नाहीं. मी संस्थानाबाहेरचा आहें. नवीन नियम झाला आहे," मीं म्हटलें.

" मग येथें कसे राहाणार ? हातानें करणार कीं काय ?" पहिल्यानें विचारलें.

" तें आतां ठरवीन," मीं खिन्नपणें म्हटलें.

" दहा रुपये गेले. वाईट झालें. नीट पाहा," दुसरा म्हणाला.

" आमची झडती घ्यावयाची असेल तरीहि घ्या," तिसरा म्हणाला.

" तुम्ही कशाला घ्याल ?" मीं म्हटलें.

" अहो, मनांत तुमच्या संशय यायचा ?" पहिला म्हणाला.

" गाडीवानाबद्दलहि जर माझ्या मनांत संशय नाहीं, तर तुमच्या-बद्दल कां येईल ? गाडीवान तर अडाणी, तुम्ही तर शाळेंतील सुशिक्षित

विद्यार्थी, तुमच्याबद्दल संशय घेणें म्हणजे विद्येचा अपमान करण्यासारखें आहे." मीं म्हटलें.

"किती तुमचें मन चांगलें आहे!" दुसरा म्हणाला.

"बोलतां किती छान!" तिसरा म्हणाला.

इतक्यांत सखाराम आला.

"श्याम, दहा वाजले. मी बोर्डिंग घेऊन येतों," तो म्हणाला.

"तुमच्या मित्राचे दहा रुपये चोरीस गेले," एकजण म्हणाला.

"होयरे श्याम?" सखानें विचारिलें.

"हो," मीं म्हटलें.

"केव्हां होते, केव्हां गेले?" त्यानें विचारलें.

"केव्हां गेले हें मला काय माहीत! आतां पाहतों तों नाहींत. जाऊं देत. ते आपले नव्हते. तूं जा बोर्डिंग आणायला. शाळेला उशीर होईल," मीं शांतपणें म्हटलें.

"श्याम!" सखारामनें हांक मारली.

"काय?" मीं विचारलें.

"दुर्दैवी आहेस तूं," तो म्हणाला.

"देवावर श्रद्धा ठेवणारा दुर्दैवी कसा असूं शकेल? देव करतो तें बऱ्यासाठीं. त्याला माझी परीक्षा घ्यावयाची आहे. येथें आलों तर बोर्डिंग संस्थानच्याबाहेरच्यांस बंद. येथें आलों तर दहा रुपये गेले. येतांना टोपी गेली. जें जें होईल तें थोडेंच आहे. सखाराम, दहा रुपये गेले. परंतु पांच तर राहिले ना! नांव तर दाखल करतां येईल? तेवढी फजीति तर वांचली? सारेच गेले असते तर फीलाच पंचाईत पडली असती. जाऊं दे. तूं कष्टी नको होऊं. जा तूं," मीं म्हटलें.

सखाराम सोंवळें नेसून भांडीं घेऊन गेला. तीं दुसरीं मुलेंहि गेलीं. मी खोलींत एकटाच होतों. माझा आशावाद मी एकटा बसलों असतां टिकला नाहीं. खरोखरच आपण दुर्दैवी आहोंत असें मला वाटलें. दहा रुपये मला हातानें स्वयंपाक करावयास दोन महिने पुरले असते. दादानें येतांना पांच रुपये दिले होते. मी नको नको म्हणत असतां त्यानें माझ्या खिशांत ठेवले होते.

" श्याम, घे हो. माझ्याजवळ जास्त नाहींत. एकटा दूर जात आहेस. असूं देत जवळ. मी घरीं भाऊंना पांच रुपये पाठवतों, " असें म्हणून दादानें ते दिले होते. मावशीनेंहि पांच दिले होते. मावशीनें दिलेल्या पांचांतून मी तिकीट वगैरे काढलें. घरचे वडिलांनीं दिलेले दहा रुपये शिल्लक होते, परंतु ते गेले. आतां मी कोणाकडे पैसे मागूं ? जेवावयाचें कोठें ? खोलीचें भाडें ? मी सचिंत बसलों होतों.

सखाराम आला. त्यानें ताकहि आणलें होतें.

" आज ताकहि आहे, " मीं म्हटलें.

" जरा लौकर गेलें म्हणजे मिळतें. उशीरां गेलें म्हणजे संपतें, " तो म्हणाला.

" तेथें सारें प्रमाणांत असतें ना ? " मीं विचारलें.

" ताक बेताचें असतें. तें एखादवेळेस खुटतें. परंतु मी कोंकणांतला म्हणून माझ्यावर जरा कींव करून मला अधिक देतात. माझी आठवण ठेवून काढूनहि एखादे वेळेस ठेवतात, " सखाराम म्हणाला.

" आजची आमटीहि बरी दिसत आहे, " मीं चव घेऊन म्हटलें.

" तेथें आमटीसाठीं कोण धडपड ? जे आधीं येतात ते वरची फोडणी-फोडणी घेऊन जातात ! ढवळून घ्या, ढवळून घ्या असें कोणी सांगत असतात. भाकरी भाजून तेथें जमिनीवर टाकलेल्या असतात. चांगल्या चांगल्या भाजलेल्या लौकर जाणारे घेऊन जातात. उशीरां जाणाऱ्यांस गाळसाळ मिळतो, " सखाराम म्हणाला.

" उशीरां जाणाऱ्यांस जास्तहि मिळत असेल. उरलेंसुरलें त्याला मिळत असेल, " मीं विचारलें.

" आचारी घेऊन जात असेल, त्याच्या घरीं उपयोगास येत असेल, " सखाराम म्हणाला.

" फुकट घ्यायचें आणि पुन्हां निंदायचें हें पाप आहे. जाऊं दे. सखा, आपण दुसरीकडे खोली घ्यायची ना ? येथें नको, " मीं म्हटलें.

" संध्याकाळीं पाहूं, " तो म्हणाला.

" त्या मशिदीच्या तिकडे आहे म्हणत होतास ना ? " मीं विचारलें.

" एक खोली आहे. तिला फक्त दार आहे. आंत खिडकी वगैरे कांहीं नाहीं. महिना आठ आणे भाडें आहे. लहानशी खोली आहे. दोघांना ती कशी पुरेल ? " सखाराम म्हणाला.

" मी तिच्यांत राहीन. स्वस्त आहे. स्वस्त भाडें व चांगली खोली असें सारें कसें जमणार ? " मीं म्हटलें.

" त्या खोलीच्या शेजारीं दुसरें एक घर आहे. तेथेंहि एक खोली आहे. तिच्यांत उजेड आहे. बारा आणे आहे तिचें भाडें. परंतु दोघांना पुरणार नाहीं, " सखाराम म्हणाला.

" त्यांत तूं राहा. आठ आण्याचींत मी राहीन. चार आण्याची कोठें असेल तर तीहि मला चालेल. आपण शेजारीं शेजारीं राहूं. आपण संध्याकाळीं पाहूं हो, " मीं म्हटलें.

आम्ही दोन्ही मुदा व सर्व भाकऱ्या संपविल्या.

" सखाराम ! संध्याकाळीं काय करावयाचें ? " मीं म्हटलें.

" थंडा फराळ ! नाहींतर आणा दोन आण्याचे आणूं आंबे व करूं फलाहार, " तो म्हणाला.

" सखाराम, मी तुझ्यावर भार घालतां कामा नये. माझें मन मला खातें, " मीं म्हटलें.

" तूं उपाशी आहेस असें माहीत असतां मला तरी एकट्याला खाववेल का ? किती झालें तरी दापोलीच्या शाळेंतील आपण वर्गबंधु. एवढें मनाला लावून घेऊं नकोस, " सखाराम म्हणाला.

अकरा वाजून गेले. आम्ही शाळेंत गेलों. त्या शाळेंतील माझा पहिलाच दिवस होता. दुमजली शाळा होती. खालीं कचेरी होती. मी माझें नांव दाखल केलें. मुख्याध्यापकांचें दर्शन झालें. मी सहाव्या इयत्तेच्या वर्गांत जाऊन बसलों. सखाराम व मी जवळ जवळ बसलों होतों. वर्गांतील मुलें माझ्याकडे पाहून हंसत होतीं. मला 'बावळ्या' का तीं म्हणत होतीं ? माझ्या नेसू पंचा होता. त्या माझ्या पंच्याचा का ते उपहास करीत होते ?

वर्गांत कांहीं मुलें फेटे बांधून आलीं होतीं. कांहींनीं पाठीवर शेंगे सोडले होते. कांहीं मुलें वयानें बरींच मोठीं होतीं. पुष्कळांचे विवाह

झालेले होते. कांहींना तर मुलेंहि होतीं. संसारांत पडूनहि शिकण्याची त्यांना हिंमत होती. मी कोणाजवळ फारसें बोललों नाहीं.

हेडमास्तर गणित शिकवीत. आमच्या वर्गाचा गणिताचा अभ्यास बराच झालेला होता. भराभर ते गणितें सोडवीत. बीजगणिताचा तास होता. मुलें भराभर तोंडीं उत्तरें देत. मी नुसता टकमक पाहात होतों. मी हा अभ्यास कसा भरून काढणार? इकडच्या मुलें गणितांत हुषार दिसतात, किंवा हुषार मुलांसाठींच फक्त हे शिक्षक असतील, असें मनांत आलें. मी मनांत खचून गेलों. गणित नाहीं म्हणजे कांहीं नाहीं. ज्याचें गणित चांगलें असतें त्याला मान देतात. परंतु माझी मान येथें खालींच राहाणार असें मला वाटलें. मी खट्टू झालों. गणिताच्या तासाला मी रडवेला झालों. मी बाहेर गेलों व गॅलरींत भिंतीला टेंकून उभा राहिलों. शून्य दृष्टीनें मी समोर पाहात होतों. माझे डोळे भरून आले. या परक्या प्रांतांत माझें कसें होणार? मी श्रीमंत नाहीं, धीमंत नाहीं. मी फार चळवळ्या नाहीं, सर्वांशीं मिसळणारा नाहीं. मी येथें कोणाजवळ मनचें बोलूं? कोणावर रागवूं, कोणावर लोभवूं? कोणाजवळ रडूं, कोणाजवळ हसूं? कोणाजवळ मागूं, कोणाचें हक्कानें घेऊं? सखाराम होता, परंतु त्याच्याशीं मी एकरूप होऊं शकलों नसतों.

माझ्या स्वभावांत मधली स्थिति नाहीं. केवळ परिचय मला रुचत नाहीं. एकतर माझे जिवाभावाचे संबंध जडतील, नाहींतर मी दूर राहीन. दुसऱ्यासाठीं सर्वस्व देईन, नाहींतर कधीं तेथें जाणारहि नाहीं. ज्याला मी धरीन त्याला कायमचें धरीन. त्या क्षणापुरतें, त्या त्या काळापुरतें तरी त्या त्या व्यक्तीशिवाय मला अन्य दिसत नाहीं. त्या त्या वेळचे ते ते मित्र माझे पंचप्राण होतात. त्यांच्या मी आठवणी करीत बसतों. ते जरा दूर गेले तर खिन्न होतों. परंतु जवळ असले म्हणजे फार बोलतोंच असेंहि नाहीं. कधीं बोलूं लागलें, म्हणजे वेळ पुरत नाहीं. कधीं सबंध दिवसांत मित्राजवळ एक शब्दहि बोलणार नाहीं. नुसतें प्रेमानें बघेन, हसेन. असा मी विचित्र प्राणी आहें.

मी तेथें बाहेर उभा होतों. निराधार उभा होतों. इतक्यांत घंटा झाली.

गणिताचा तास संपला. मी हळूच ते शिक्षक बाहेर जातांच वर्गांत जाऊन बसलों. माझें तोंड उतरलें होतें.

" तुम्हाला गणित समजेना वाटतें ? " शेजारचा मुलगा मला म्हणाला.

" हो, " मीं म्हटलें.

" येथें असेंच घाईघाईनें शिकवितात. माझीसुद्धां तुमच्यासारखीच स्थिति आहे. चार दोन मुलें भराभर उत्तरें देतात. त्यांच्यावर ते शिक्षक प्रसन्न असतात. इतर मुलें बसतात चित्रें काढीत, कोडीं सोडवींत, " तो म्हणाला.

" मी कोंकणांत ज्या शाळेंत होतों, तेथें इतका भाग झाला नाहीं. तेथें पुस्तकहि निराळें होतें, " मीं म्हटलें.

" पुस्तक कोणतेंहि असलें तरी उदाहरणें एकाच स्वरूपाचीं असणार. समजलेलें असलें म्हणजे कोणतेंहि पुस्तक असेना, नडत नाहीं, " तो मुलगा म्हणाला.

" खरें आहे तुमचें म्हणणें. माझा गणित विषय कच्चाच आहे. मी त्याकडे कधींहि लक्ष दिलें नाहीं. सर्व विषय सारखे हवेत. आतां मला पश्चात्ताप करावा लागेल, " मीं म्हटलें.

" तो पलीकडे मुलगा आहे ना, तो अष्टावधानी आहे. त्यानें मागें तसे प्रयोग केले होते. हेडमास्तरांचें त्याच्यावर प्रेम आहे; खरोखरच हुषार आहे तो. त्याला मामा म्हणतात. आणि ते पलीकडे आहेत त्यांचें नांव आहे काळे. त्यांचेंहि गणित चांगलें आहे. हीं सारीं मुलें मराठी सात इयत्ता होऊन हायस्कुलांत आलेलीं आहेत. स्वाभाविकच त्यांचें गणित चांगलें असतें, " तो म्हणाला.

" अजून शिक्षक कसे येत नाहींत ? " मीं म्हटलें.

परंतु इतक्यांत कसली तरी नोटीस आली. शाळेला लौकरच सुट्टी मिळाली. वर्गनायकानें नोटीस वाचली. मुलांना खूप आनंद झाला. झोंपलेलीं मोठीं मोठीं मुलें जांभया देत उठलीं. सखाराम व मी घरीं आलों.

" सखाराम, येतोस खोली पाहायाला ? " मीं अधीर होऊन म्हटलें.

" चल, " तो म्हणाला.

आम्ही दोघे खोली पाहावयास गेलों. जवळ जवळ गांवाचें तें टोंकच होतें. परंतु शाळेपासून जवळ होती जागा. तुरुंगाच्या पलिकडेच खोली होती. समोर मशीद होती. मीं खोली पाहिली. एका मराठा बाईची ती खोली होती. खोलींत अंधार होता. परंतु मीं पसंत केली. मला एकटें राहावयास पाहिजे होतें. एकटें असलें म्हणजे कोणाची भीड नाहीं. माझे अश्रु, माझें सुकलेलें तोंड, माझें खाणें वा न खाणें, कोणी पाहावयास येता ना. चारचौघांत असलें म्हणजे रडण्याचीहि चोरी. आणि रडणें हें तर माझ्या जीवनतरूचें आवश्यक खत ! मला पोटभर रडायला मिळेना म्हणून मी सुकून जात होतों.

" सखाराम, मी येथें राहावयास येतों, " मीं म्हटलें.

" त्या पलिकडच्या खोलींत मी येतों, " सखाराम म्हणाला.

" सखा जवळ असला म्हणजे बरें, " मीं प्रेमानें म्हटलें.

" येथें आजूबाजूस आपल्या वर्गातील पुष्कळ मुलें राहातात, " सखाराम म्हणाला.

" मग तर छानच. तुरुंगांतील ठोके ऐकायला मिळतील. घड्याळाची जरूर नाहीं, " मीं म्हटलें.

" चोराची भीति नाहीं, " सखाराम म्हणाला.

इतक्यांत आमच्या वर्गातील आजूबाजूला राहाणारीं मुलें तेथें आलीं.

" काय मुजावर ! " सखारामानें हांक मारली.

" येथें राहायला येणार का ? " त्यानें विचारलें.

" हो, " तो म्हणाला.

" तुम्ही कोठें राहातां ? " मीं विचारलें.

" या समोरच्या मशिदींत, " मुजावर म्हणाला.

" तुम्हाला राहूं दिलें ? " मीं विचारलें.

" हो. मी व दुसरा एक मुसलमान विद्यार्थी तेथें राहातों," तो म्हणाला.

" तुम्ही भाग्यवान् आहांत. देवाच्याजवळ तुम्ही आहांत," मीं म्हटलें.

" देव नाहीं कोठें ? या तुमच्या खोलींतहि तो आहे. जेथें आपण प्रार्थना करूं तेथें देव आहे. जेथें प्रार्थना करूं तेथें मशीदच आहे, " मुजावर म्हणाला.

" माझा एक लहानपणीं मुसलमान मित्र होता. त्याचें नांव अहमद. दहा वर्षें झालीं त्या गोष्टीला, " मीं म्हटलें.

" कोठल्या गांवीं ?" मुजावरनें विचारलें.

" मुंबईला, " मीं म्हटलें.

आम्ही दोघे एकमेकांशीं बोलत होतों. सखाराम दुसऱ्या दोघांशीं बोलत होता.

" याचें नांव वामन व याचें नांव एकनाथ, " सखाराम म्हणाला.

" दोघे भाऊ आहेत, " मुजावर म्हणाला.

" परंतु एकनाथ लहान आहे, " सखाराम म्हणाला.

" दिसतो मोठा, " मीं म्हटलें.

" हाडापेरानें मोठा दिसतो. परंतु तोंडावरून दिसत नाहीं, " मुजावर म्हणाला.

एकनाथ खरोखरच उमदा दिसे. त्याच्या तोंडावर अद्याप कोंवळीक होती. तो पिवळा रुमाल बांधी व पाठीवर लांब सोडून देई. त्याला पाहून मराठ्या वीराची आठवण होई. एकनाथाकडे मी पाहात होतों. तो उंच होता, त्याचें शरीर कसलेलें होतें. छाती रुंद होती आणि पुन्हां बालसदृश मोकळेपणा !

" तुमच्या शेजारीं आम्ही आलों, " मीं म्हटलें.

" सकाळीं आंघोळीला बरोबर जाऊं, " एकनाथ म्हणाला.

" कोठें ? " मीं भीतभीत विचारलें. कारण तळ्यावर आंघोळीस जावयाची मला भीति वाटत होती.

" झऱ्यावर ! " तो म्हणाला.

" कोठें आहे झरा ? " मीं आनंदानें विचारलें.

" जवळच आहे. तेथें धुवायला वगैरे आसपास दगड आहेत, " एकनाथ म्हणाला.

" वा, छान. मी येईन, " मीं म्हटलें.

" श्याम, चला. आपण सामान आणूं, " सखाराम म्हणाला.

आम्ही सर्व मुलांस नमस्कार करून गेलों. आम्ही आमचें सामान घेऊन आलों. ट्रंक व वळकटी. जास्त सामान होतें कोठें ? दोन फेऱ्या कराव्या लागल्या.

माझी खोली मीं झाडली. मी पुण्याहून येतांना सुंदर हिरव्या स्टँडचा दिवा आणला होता. तेल आणलें, दिवा लावला. त्या अंधाऱ्या खोलींत माझा दिवा सुंदर दिसत होता. मीं माझें सामान नीट लावलें. खालीं शिंदीच्या दोन चटया विकत आणल्या होत्या, त्या पसरल्या. त्यांच्यावर वळकटी ठेवली. बादली, तांब्या, भांडें, ताट वगैरे बाजूस ठेवलें. ट्रंकेवर पुस्तकें, वह्या नीट ठेवल्या. भिंतीवर रामाचें सुंदर चित्र टांगलें. तुळशी-बागेंत लहानपणीं विकत घेतलेलें तें चित्र होतें! त्या खोलींत राम होता. भिंतीवरून राम माझ्याकडे पाहात होता. रामाच्या मुक्या अध्यक्षतेखालीं माझी औंधची यात्रा सुरू झाली.

" श्याम! चल, मीं आंबे आणले आहेत," सखाराम म्हणाला.

" चल," मीं म्हटलें.

सखारामानें खोली व्यवस्थित लाविली होती. खोलींत एक दोरी बांधून तिच्यावर त्यानें कपडे ठेवले होते. सखाराम जास्त शास्त्रीय बुद्धीचा होता.

" गोड आहेत आंबे," मीं म्हटलें.

" मी फसायचा नाहीं. तुझ्यासारखा मी बावळट नाहीं," सखाराम म्हणाला.

" सखाराम, मला बावळट नको म्हणूं," मीं म्हटलें.

" खिशांत पाकीट ठेवून जाणारा बावळट नाहीं तर काय?" तो हंसत म्हणाला.

" अरे, मला काय माहीत कीं कोणी नेईल म्हणून," मीं म्हटलें.

" तुला पुष्कळ गोष्टी माहीत होतील. देशावर कांटे असतात. देशावर चिखलांत माणसें रुततात. देशावर चोरहि असतात. सारें तुला अनुभवानें शिकावें लागेल," तो म्हणाला.

" मी दाराला नुसती कडी लावून आलों आहें," मीं म्हटलें.

" उरलेले पैसे जातील. उगीच जवळ अडगळ कशाला?" सखाराम उपहासानें म्हणाला.

" परंतु गरीब, अडाणी माणसें चोरणार नाहींत," मीं म्हटलें.

" पोट सर्वांना चोरी करायला लावतें," सखाराम म्हणाला.

" जगावर विश्वास शक्यतों टाकावा," मीं म्हटलें.

" टाका विश्वास. जग तुमचा गळा कापील. मग बसा बोंबा मारीत, " तो म्हणाला.

" गळा कापल्यावर बोंब तरी कशी मारूं ? " मीं हंसत म्हटलें.

" घे आणखी एक आंबा, " सखाराम म्हणाला.

" पुरे, " मीं म्हटलें.

" मी एकदां सांगेन. आग्रह करणार नाहीं. संकोच किती दिवस राखायचा ? " तो म्हणाला.

मीं आणखी एक आंबा घेतला. शेवटीं आम्ही हात धुतले. तों शेजारीं संगीत ऐकूं आलें. कोणीतरी सतार वाजवीत होतें. संगीतानें मी वेडा होतों. मला त्यांतलें शास्त्र समजत नाहीं. परंतु माझें हृदय खालीं वर होतें. संगीत म्हणजे खरोखरच दिव्य, दैवी कला आहे!

' संगीतसे उद्धार होगा आपका अरु लोकका '

संगीतानें स्वतःचा व इतरांचा उद्धार होतो. क्षणभर सांसारिक बरबटींतून जीव उंच जातो. वर कोठें तरी विहरतो.

मी तेथें उभा राहिलों. एकनाथहि तेथें आला.

" यांचें नांव दाजीबा, " एकनाथ म्हणाला.

" आंधळे दिसतात, " मीं म्हटलें.

" हो. परंतु त्यांच्यासारखा सतार वाजविणारा, तबला वाजविणारा साऱ्या सातारा जिल्ह्यांत नाहीं. ते महाराजांकडे मुलींस शिकवावयास जातात. महाराजांच्या पंक्तीचें त्यांना ताट मिळतें. महाराज कीर्तन करितात तेव्हां दाजीबा मृदंग वाजवतात. फार बहार येते. दाजीबा मोठे कलावान् आहेत. ते नकला करतात. निरनिराळे आवाज काढतात, " एकनाथ सारें सांगत होता.

" एकनाथ! चल अभ्यास कर, " वामननें हांक मारली.

" तूं कर तुझा अभ्यास. माझी नको काळजी, " एकनाथ म्हणाला.

" अभ्यासापेक्षां संगीतच गोड आहे, " मीं म्हटलें.

" माझें अभ्यासांत मुळींच लक्ष लागत नाहीं, " एकनाथ म्हणाला.

" मी आतां जातों, " मीं म्हटलें.

" सकाळीं आंघोळीला हांक मारीन, " एकनाथानें सांगितलें.

मी माझ्या खोलींत आलों. ती सतार सोडून मी कां आलों? मला का एकनाथाच्या वडील भावाप्रमाणें अभ्यास करावयाचा होता? नाहीं. मी प्रसन्न होण्याऐवजीं खिन्न होऊन खोलींत आलों. आपल्याजवळ एकहि कला नाहीं असें माझ्या मनांत आलें. माझा राम उत्कृष्ट चित्रकार होता. उत्कृष्ट बांसरी वाजविणारा होता. राम कलावान् होता. माझ्याजवळ कांहीं नाहीं. मला गातां येत नाहीं, वाजवतां येत नाहीं, अभिनय करतां येत नाहीं, चित्र काढतां येत नाहीं. सायकलवर बसतां येत नाहीं, घोडा दौडवतां येत नाहीं, कुस्ती येत नाहीं, पोहतां येत नाहीं, क्रिकेट येत नाहीं, मल्लखांब येत नाहीं, खोखो येत नाहीं, जमाखर्च येत नाहीं, व्यवहार येत नाहीं. मला देवानें असें कां निर्माण केलें? बरें, फार थोर बुद्धि तरी असती, तर तीहि नाहीं. शेवटीं जगांत दुसऱ्याजवळ आहे यांतच आनंद मानावयास आपण शिकलें पाहिजे. गांधींना रवींद्रनाथ होतां येणार नाहीं, रवींद्रनाथांना रामन् होतां येणार नाहीं. आपण रडून काय होणार? शेवटीं अद्वैतांतच आसरा आहे. जगांत खाण्यापिण्याचें वैषम्य दूर करितां येईल. परंतु चित्रकाराला गाणाऱ्याचा जर हेवा वाटला, तर त्याच्यासाठीं कोणता साम्यवाद आणावयाचा? झेंडूला जर गुलाबाचा हेवा वाटू लागला तर काय करावयाचें? झेंडूला पूर्ण फुलावयास अवसर देतां येईल, गुलाबालाहि वाव मिळेल. परंतु झेंडूचें वैशिष्ट्य गुलाबाला लाभणार नाहीं, आणि झेंडूला गुलाब होतां येणार नाहीं. गुलाबानें झेंडूला म्हणावें, "तूं किती छान आहेस?" "तूंहि किती गोड आहेस?" असें झेंडूनें म्हणावें. रामराम म्हणून एकमेकांस नमस्कार करावा. रामराम म्हणजे तूंहि राम व मीहि राम. तूंहि गोड व मीहि गोड.

आपणांजवळ कांहींहि नसलें, तरी दुसऱ्यांच्या गुणांचा गौरव करतां येणें हा तरी गुण असेल का? परंतु मला त्या वेळेस माझ्या उणीवा दिसत होत्या. मी रिकामें मडकें आहें, निरुपयोगी वस्तु आहें असें मला वाटलें. माझ्या खोलीचें दार मीं लावलें. माझ्या खोलीचा मीं तुरुंग केला. वाऱ्यासाठीं वेडा होणारा श्याम, दारें सताड उघडीं ठेवून झोंपू पाहाणारा श्याम त्या कोंदट खोलींत दार लावून बसला. तेथें तेवत असलेला दिवा मला सहन झाला नाहीं. माझ्या निराशेनें दाटलेल्या हृदयाला त्या

दिव्याच्या तेजाचा मत्सर वाटला. मीं रागारागानें दिवा मालवला. खोलींत पूर्ण अंधार होता.

एक काजवा खोलींत केव्हां आला होता कोणास माहीत? दिवा मालवतांच तो आपली विजली दाखवूं लागला, चमचम करूं लागला. तो काजवा मला चिडवतो आहे असें मला वाटलें. त्या काजव्याला धरून चिरडावें असें मला वाटलें. मी त्याच्याकडे त्या अंधारांत रागानें पाहात होतों.

परंतु माझा क्रोध अकस्मात् गेला. मी प्रेमानें त्या काजव्याकडे पाहूं लागलों.

'अरे श्याम! माझा प्रकाश बघ किती थोडा. परंतु तेवढाच जगाला मी देत आहें. स्वतःजवळ आहे तें द्यावें. उगीच आदळआपट कां करावी! स्वतःला जें कांहीं देतां येईल तें मात्र दिल्याशिवाय राहूं नकोस. वरतीं ईश्वराचे अनंत तारे चमकत असतात, परंतु आम्हीहि आनंदानें झाडांवर दिवाळी करीत असतों. एकदम आमचे दिवे लावतों, एकदम लपवतों. जणूं आम्ही मशालींची कवाईतच करीत असतों. खिन्न नको होऊं. स्वतःजवळ जे गुणधर्म असतील ते वाढव. जें स्वतःजवळ नसेल त्याच्या-साठीं प्रयत्न करावा; परंतु कष्टी होऊं नये.'

कितीतरी विचार माझ्या मनांत आले. तो काजवा जणूं माझा गुरु झाला. त्याला मारावयासाठीं तडफडणारे माझे हात त्याला प्रणाम करूं लागले. मी प्रेमानें त्या काजव्याजवळ गेलों. मीं त्याला पकडलें. माझ्या हातांत त्याला धरलें. माझ्या अंगांतील सदऱ्यावर त्याला सोडलें. माझ्या हृदयावर तो चमकूं लागला. माझ्या अंतरंगांत तो दिवा लावूं लागला.

मीं माझें दार उघडलें. खोलींत बाहेरचा वारा आला. माझ्या हृदयांत नवजीवन आलें. माझी सारी फजीतीच नाहीं होणार. जगण्यासारखें माझ्यांतहि कांहीं असेल. कांहीं नसणें हीसुद्धां एक महान् वस्तु आहे. मुरलींत कांहीं नसतें, म्हणूनच कोणीतरी तिच्यांतून सुंदर सूर काढतो. भांडें रिकामें असेल तरच भरेल. फक्त त्या रिकाम्या भांड्यानें वांकलें पाहिजे. खरें रिकामें भांडें वांकेलच. मी जर रिता असेन तर मला नम्र होऊं दे. नम्रता हा ज्ञानाचा आरंभ आहे. मी नम्र होईन तर थोडें फार तरी कांहीं माझ्या जीवनाच्या भांड्यांत शिरेल.

माझी फजीति गेली. मी आशावंत झालों. मी अंथरुणावर पडलों. तो काजवा भिंतीवर गेला. त्याच्याकडे पाहात पाहात मी झोंपी गेलों.

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

## मधुकरी

### २९

मी झऱ्यावर रोज आंघोळीस जाऊं लागलों. त्या बाजूला टेकड्या होत्या. टेकड्यांवर शौचासहि जातां येत असे. स्वच्छ पाण्याचा झरा वाहात होता. झरा म्हणण्याऐवजीं तो एक ओढा होता. पाणी फार नव्हतें. परंतु निर्मळ होतें. एके ठिकाणीं धार पडत असे. तेथें जरा बरेंच म्हणजे कमरभर पाणी असे. मी नेहमींच एकनाथ, वामन यांच्याबरोबर जात असें असें नाहीं. एकदां माहीत झाल्यावर मी वाटेल तेव्हां जात असें. सर्वांबरोबर गेलें म्हणजे सर्वांबरोबर आटोपावें लागे. परंतु पाण्यांत डुंबत बसावयास मला आवडत असे. शिवाय वामन, मुजावर वगैरे मुलें फार नियमित होतीं. ते धोतर धुतांना मोजून घाव घालावयाचे. अंगावर मोजून तांब्ये ओतावयाचे. स्वतःचें आटोपलें कीं ते निघावयाचे. माझें अशा कर्मठांशीं कसें जमावयाचें ? लहानपणापासून नियम मला माहीत नाहीं. अनियमितपणा हाच माझा नियम आहे. लहरीपणा हा माझा धर्म आहे. चार दिवस मी पहांटे आंघोळ करावयाचें ठरवीत असें. परंतु पांचव्या दिवशीं माझें मन बंड पुकारी. हें काय यंत्रमय जीवन असें माझें मन म्हणे. माझे सारे नियम चार दिवस टिकतात. एकहि माझें व्रत नाहीं, एकहि नियम नाहीं. मला माझी लाज वाटते. परंतु असें आहे खरें. तुकाराममहाराजांनीं व्रतहीनास गाढव म्हटलें आहे. माझें या दुबळेपणामुळें अपरंपार नुकसान झालें आहे. परंतु केवळ स्वतःचें नुकसान झालें असतें तरी त्याचें एवढें वाईट वाटलें नसतें. परंतु जगांत आपल्या दुर्गुणामुळें जगाचेंहि नुकसान होतें. आपण नियमित न वागलों तर दुसऱ्यांनाहि आपण फशीं पाडतों.

मी पुष्कळवेळां एखाद्या गांवच्या मित्रांना त्यांच्या आग्रहामुळें व्याख्यानास येण्याचें कबूल करतों. भिडेमुळें मी कबूल करतों. एकदम नकार माझ्या तोंडांत येत नाहीं. परंतु पहिला होकार गेल्यावर माझें मन बंड पुकारतें. शेवटीं मी पत्र पाठवतों, तार करतों. मी आजारी आहें वगैरे कळवितों. त्यांची फजीति व स्वतःची फजीति !

आंघोळीचें वगैरे सारें नीट जमलें. परंतु पोटोबाचें काय करावयाचें हा प्रश्न होता. सखाराम व मी कसेतरी दिवस ढकलीत होतों. आमच्या शेजारीं एक लहानशी खाणावळ होती. रात्रीं एक भाकरी व थोडी भाजी त्याच्याकडून आणण्याचें मीं ठरविलें. त्याबद्दल त्याला महिना दीड रुपया देण्याचें कबूल केलें होतें. आम्ही सकाळची एक भाकर ठेवीत असूं. ती भाकर व ही रात्रींची भाजीभाकर असें आम्हीं चालविलें होतें. परंतु दुपारीं तरी पोटभर कोठें जेवण होत होतें ?

वर्गांत एका नवीन मुलाशीं माझी ओळख झाली. तो माझ्याच आडनांवाचा होता. साधारण माझ्याच वयाचा तो होता. त्याला बोर्डिंग-मध्यें शिदोरी मिळत असे. त्यानें आपला धाकटा भाऊ बरोबर आणला होता. परंतु धाकट्या भावाला मोफत भाजीभाकर मिळेना. माझ्यासारखीच त्याची स्थिति झाली. भावाची कशी व्यवस्था लावावयाची या फिकीरींत तो मोठा भाऊ होता. त्या मोठ्या भावाचें नांव होतें गोविंदा. लहान्याचें बंड्या.

एके दिवशीं तो व मी फिरावयास गेलों.

" श्याम, मावशीस कळवलेंस का ? " गोविंदानें विचारलें.

" मला अद्याप धीर होत नाहीं. आपलें दुःख होतां होईतों कोणास कळवूं नये असें मला वाटतें. माझें इकडे ठीक चाललें आहे असेंच मीं सर्वांना लिहिलें आहे, " मीं म्हटलें.

" माझ्या मनांत एक विचार आला आहे. तुला सांगूं ? " गोविंदा म्हणाला.

" सांग, " मीं म्हटलें.

"आपण मधुकरी मागूं या. मला एकट्याला मधुकरी मागायला लाज वाटेल. तुलाहि एकट्याला लाज वाटेल. आपण दोघे बरोबर असलों म्हणजे लाज वाटणार नाहीं, " गोविंदा म्हणाला.

मी कांहींच बोललों नाहीं. माझा चेहरा खरकन् उतरला. गोविंदा माझ्याकडे पाहात होता.

"श्याम ! तुला वाईट का वाटलें ?" त्यानें विचारलें.

"गोविंदा, वाईट कां वाटेल ? त्यांत चोरी, चहाडी थोडीच आहे ? मुंज करतांना 'भिक्षां देहि'चाहि मंत्र देतात. श्रीमंत असो, गरीब असो, सर्वांनीं भिक्षा मागून शिकावें. शिकतांना सारे समान, सारे दरिद्री. परंतु आतां सोंग राहिलें आहे. माझी मुंज झाली, तेव्हां रोज सोडमुंज होईतों मला कोरडी भिक्षा मागावयास पाठवीत. मी रडत असें. एके दिवशीं वडील खूप रागें भरले. मीं म्हटलें, 'आपण गृहस्थ, आपण का भिक्षा मागायची ?' गोविंदा ! कोठें आहे ती पेट ? उपाशीं राहावें, परंतु भिकेपण नको, असें मला वाटतें. मधुकरी तरी लोकांवर भारच," मीं म्हटलें.

"आणि सरकारी मोफत अन्न म्हणजे तरी भिकेपणाच नव्हे का ? तें मिळेल या आशेनें ना तूं आला होतास ? त्याच्यापेक्षां मधुकरी शतपटीनें बरी. कोणावर जबरी नाहीं. तुकडा वाढा, वाढूं नका." गोविं...

"गोविंदा ! तुझी मात्र धन्य आहे," मीं म्हट...

IRBK-0103163
IRBK-0103163

"धन्य कसली आहे ?" तो म्हणाला.

"अरे, तूं आपल्या लहान भावासाठीं मधुकरी म... अन्न मिळत आहेच. परंतु भावासाठीं फिरून फिरून मधुकरी मागणार. लहान भावाला मधुकरी मागावयास पाठविण्याऐवजीं स्वतः जावयास तूं तयार होत आहेस ! भावाबद्दल किती ही चिंता, किती प्रेम," मीं म्हटलें.

"भावावर प्रेम करणें यांत जगाविरहित असें काय आहे ? श्याम ! तूं नाहीं का आपल्या भावावर प्रेम करीत ?" त्यानें विचारलें.

माझ्या डोळ्यासमोर माझे भाऊ आले. मावशीजवळ असलेला सर्वांत धाकटा भाऊ सदानंद आठवला. त्याच्याहून मोठा पुरुषोत्तम आठवला. त्याला मीं कोट कसा करून नेला होता, तें आठवलें. आईनें मला वाढलेलें दहीं मी भावांच्या भातावर कसा वाढावयाचा, तें मला आठवलें. माझ्यावर प्रेम करणारा मोठा भाऊ आठवला. होय. मीहि माझ्या भावांवर प्रेम करीत होतों. ते माझ्यावर करीत होते. आणि हा प्रेमाचा

घडा शिकवणारी प्रेममूर्ति, कारुण्यमूर्ति आई आठवली. आईची स्मृति होतांच मी सद्गदित झालों. मीं एकदम हात जोडले.

"श्याम! सद्गदित होऊन कोणाला हात जोडलेस?" गोविंदानें प्रेमानें विचारिलें.

"माझ्या आईला. एकमेकांवर प्रेम करा, जगावर प्रेम करा, गाई-गुरांवर, झाडांमाडांवर, कुत्र्यामांजरांवर, पशुपक्ष्यांवर प्रेम करा असें मला शिकविणाऱ्या माझ्या आईला मीं प्रणाम केला. गोविंदा, माझी आई म्हणजे देवता आहे," मीं सकंप स्वरानें म्हटलें.

"तशीच माझीहि आहे. आईहून थोर कोण आहे?" गोविंदा म्हणाला.

"कोणी नाहीं," मीं म्हटलें.

"आईची सेवा करणें म्हणजे भावंडांची सेवा करणें," तो म्हणाला.

"किती यथार्थ बोललास!" मीं म्हटलें.

मित्रांनो! मागें एकदां रवींद्रनाथ ठाकूर म्हणाले होते, "'वंदे मातरम्' म्हणण्याऐवजीं 'वंदे भ्रातरम्' आतां म्हणा." आपण 'वंदे मातरम्' म्हणतों परंतु सर्वांचा हेवादावा करतों. भारताला प्रणाम करूं पाहातों परंतु परप्रांतीयांस झिडकारीत असतों. आपण सगळे पोटाचे भक्त आहोंत. मोठमोठ्यांसहि ही प्रांतीयता टाळतां येत नाहीं. तुरुंगांत नेहमीं गुजराथी व महाराष्ट्रीय यांचीं भांडणें असावयाचीं. महाराष्ट्रीय वाढणारा असला म्हणजे तो महाराष्ट्रीयांस भाजी थोडी जास्त वाढावयाचा, गुजराथी असला तर गुजराथ्यांस! त्या तुरुंगांतील ती क्षुद्रता पाहिली कीं मी रडकुंडीस येत असें! कसलें राष्ट्रीय ऐक्य आणि कसलें काय? जोंपर्यंत आर्थिक विषमता आहे तोंपर्यंत जगांत द्वेष राहाणार, परस्पर मत्सर राहाणार. जगांतील भेदाभेद, हीं क्षुद्र जातीयतेचीं, प्रांतीयतेचीं भांडणें नष्ट करावयाचीं असतील तर साम्यवाद हा एकच उपाय आहे. भावंडांवर प्रेम करा. भावंडांवर आपण प्रेम करावयास जोंपर्यंत शिकत नाहीं, तोंपर्यंत माता रडणार. मातेची पूजा म्हणजे भावंडांची पूजा. देवाची पूजा म्हणजे प्राणिमात्रांवर आत्मीय भावनेनें खरेंखुरें प्रेम करणें.

श्याम एकदम थांबला.

'खरा तो एकची धर्म
जगाला प्रेम अर्पावें
जयाला धर्म तो प्यारा
जयाला देव तो प्यारा
तयानें प्रेममय व्हावें
जगाला प्रेम अर्पावें ॥'

गोविंदानें एकदम वरील कडवें म्हटलें. सारे टाळ्या वाजवूं लागले.

होय. प्रेमधर्म हाच खरा धर्म आहे. माझा तो नवीन मित्र गोविंदा त्या प्रेमधर्माचाच वारकरी होता. गोविंदाजवळ प्रेमापेक्षां कर्तव्य जास्त होतें. गोविंदा कर्तव्य ओळखी. कुटुंबांतील मंडळीसाठीं असा कष्ट करणारा मित्र मीं पाहिला नाहीं. शेवटीं मंगल होईल या श्रद्धेनें तो सदैव वागत असतो. तो अजूनहि तसाच धडपडत आहे. त्या वेळेस गोविंदा लहान होता. परंतु तेव्हांहि त्याची कर्तव्यबुद्धि प्रखर होती. गोविंदा व मी थोडा वेळ कांहींच बोललों नाहीं. दोघे मुक्यानें चाललों होतों.

"मग श्याम, काय?" गोविंदानें विचारलें.

"माझी तयारी आहे. केव्हांपासून प्रारंभ करावयाचा?" मीं प्रश्न केला.

"येत्या रविवारपासून," तो म्हणाला.

"मी एक स्वच्छ रुमाल धुऊन ठेवतों," मीं म्हटलें.

"तूं माझ्या खोलींत ये. तेथूनच दोघे आपण निघत जाऊं," गोविंदा म्हणाला.

"बरें," मीं म्हटलें.

आम्ही मधुकरीचा निश्चय ठरवून माघारे वळलों. मी माझ्या खोलींत आलों. रात्रीं सखारामला मीं माझा निश्चय कळविला. त्याला वाईट वाटलें.

"श्याम! मी गरीब आहें. नाहीं तर तुला मीं मदत केली असती," तो म्हणाला.

"तूं मुळींच वाईट वाटून नको घेऊं," मीं म्हटलें.

गोविंदाची खोली मीं पाहिली. त्या खोलींत ओल होती, वरून गळत होतें. नुकत्याच पडलेल्या पावसाचे वेळीं चांगलेंच तळें तेथें सांचलें असावें. परंतु खोलींत उजेड होता.

" गोविंदा ! खोलींत ओल आहे, " मीं म्हटलें.

" मग काय करावयाचें ? " तो म्हणाला.

" शेजारची राख वगैरे आणून यावर पसरली तर ओल जरा कमी होईल, " मीं म्हटलें.

" खोलीच मिळत नव्हती. ही मोठ्या मुष्किलीनें मिळाली, " तो म्हणाला.

" माझ्या खोलींत गळत नाहीं, ओल नाहीं. परंतु अंधार आहे. खोलीच्या समोरच्या पडवींत गाय असते. तिच्या शेणामुताची घाण येतच असते, " मीं म्हटलें.

" गोमूत्राची घाण आरोग्यदायकच असेल. गाईचें शेण–मूत पवित्र आहे, " गोविंदा म्हणाला.

" वेडाच आहेस तूं गोविंदा, " मीं म्हटलें.

गोविंदा हंसला.

तो रविवारचा दिवस मी कधींहि विसरणार नाहीं. मी गोविंदाकडे माझा मुकटा, ताट व एक रुमाल घेऊन गेलों. गोविंदा आधीं रसोड्यांतून स्वतःची सरकारी शिदोरी घेऊन आला. नंतर मी मुकटा नेसलों. खांद्यावर एक ओलें फडकें टाकलें. हातांत झोळी घेतली. खोलींतून मला बाहेर पडवेना. माझे हातपाय थरथरत होते. डोळे भरून आले.

" श्याम ! असें घुटमळून कसें चालेल ? " गोविंदा म्हणाला.

" गोविंदा, वाईट वाटतें, " मीं म्हटलें.

" तूंच त्या दिवशीं म्हणालास कीं यांत वाईट वाटण्यासारखें काय आहे ? मग आज कां असें ? एकदां ठरलें तें ठरलें, " तो म्हणाला.

मी बाहेर पडलों. गोविंदा व मी दोघे 'ॐ भवति भिक्षां देहि' म्हणत घरोघर जाऊं लागलों.

" अवकाश आहे रे अजून, " कोठें उत्तर मिळालें.

" आमचीं जेवणें झालीं नाहींत, तों या मधुकऱ्यांचाच सुळसुळाट. उद्योग नाहीं मेल्यांना दुसरा. रिकामटेकडे. घेतली झोळी कीं निघाले, " एक म्हातारी बाई म्हणाली.

सारें सहन करीत आम्ही जात होतों. मधुकरी मिळण्याऐवजीं शिव्याशाप मिळत होते. कांहीं घरीं मधुकरी मिळत होती. कोंकणांत माझ्या

गांवीं जशी मधुकरी वाढीत तशी येथेंहि वाढीत असतील अशी माझी कल्पना होती. परंतु उलट अनुभव आला. लहानपणीं आमच्या घरीं मधुकऱ्यांसाठीं निरनिराळ्या मुदा करून भिंतीजवळ ठेवलेल्या असत. मधुकरी येत व एकेक घेऊन जात. तशा मुदा दहा घरीं मिळाल्या असल्या तर सहज एका दोघांचें पोट भरलें असतें. देश तर कोंकणापेक्षां सुखी, श्रीमंत. येथें भात नसेल तर भाकरी चतकोर चतकोर वाढतील, अशी माझी कल्पना होती. परंतु सत्य व कल्पना यांत नेहमींच अंतर असतें. चतकोराचेहि चार तुकडे करून त्यांतील एक आम्हांस मिळे. असे तुकडे किती ठिकाणीं गोळा करावयाचे ? किती घरें हिंडावयाचीं ?

" श्याम, तें एक घर घेऊं, " गोविंदा म्हणाला.

" पुरे आतां, " मीं म्हटलें.

" त्या घरीं आपल्या वर्गांतील मुक्ताबाई राहातात, " तो म्हणाला.

" तेथें जरा सहानुभूतिपूर्वक मधुकरी मिळेल म्हणतोस ? " मीं विचारलें.

" हो, " तो म्हणाला.

आम्हीं त्याहि घरांत गेलों. गोविंदाची अपेक्षा खरी ठरली.

" ताकाला भांडें आहे का ? " मुक्ताबाईंनीं विचारलें.

" नाहीं, " गोविंदा म्हणाला.

" उद्यां आणा, " त्या म्हणाल्या.

एके ठिकाणीं तरी अनुकंपा दिसली. आपल्या वर्गांतील वर्गबंधूवर अशी मधुकरी मागण्याची पाळी कां यावी असा विचारहि कदाचित् मुक्ताबाईच्या मनांत येऊन गेला असेल. कारण आमच्या हातांत झोळ्या पाहून त्या खिन्न झाल्या होत्या. भिकाऱ्यांना पाहून समाजाची चीड आली पाहिजे. सरकारची चीड आली पाहिजे. ज्या देशांत भिकारी आहेत तेथील सरकार नालायक आहे व समाज त्याहून नालायक आहे. कारण समाजाच्या लायकीवरच तेथील सरकार अवलंबून असतें. देशांतील सरकारच्या स्वरूपावरून समाजाचीहि किंमत जगांत होत असते. भावा-भावांवर जुलूम व अन्याय करणाऱ्या समाजाला गुलामगिरी लादणारेंच सरकार लाभावयाचें.

गोविंदा व मी घरीं खोलींत आलों. आम्ही तिघे जेवावयास बसलों होतों.

"भिक्षान्न पवित्र असतें. त्याची चर्चा करूं नये," मीं म्हटलें.

"परंतु तें पवित्र भावनेनें वाढलेलें असेल तर," गोविंदा म्हणाला.

"परंतु आपल्या झोळींत येतांच तें पवित्र होईल," मीं म्हटलें.

"बाजरीचे तुकडे मी घेतों. मला बाजरीची भाकर आवडते," बंडू म्हणाला.

"श्याम ! तूं भात घे. तूं आहेस कोंकणांतला," गोविंदा म्हणाला.

"मला प्रथम येथील भाकर मुळींच सोसेना. आमांशहि झाला. परंतु मी कोणाजवळ बोललों नाहीं," मीं म्हटलें.

"औषध ?" गोविंदानें विचारलें.

"खिशांत शेपा ठेवल्या होत्या. येतां जातां खात होतों. त्यामुळें रोग हटला. आतां प्रकृति बरी आहे," मीं म्हटलें.

"तुला औषधेंहि माहीत आहेत," गोविंदा हंसत म्हणाला.

"आईनें हा उपाय मुद्दाम सांगितला होता," मीं म्हटलें.

"आई किती दूरवरचें पाहाते. तिला सारी काळजी," गोविंदा म्हणाला.

दुपारीं मी गोविंदाकडेच बसलों होतों. गोविंदाचें हस्ताक्षर फारच सुंदर होतें. मोत्यासारखें दिसे.

"किती रे गोड तुझें अक्षर. पाहात राहावेंसें वाटतें," मीं त्याची एक वही हातांत घेऊन म्हटलें.

"गोदूबाचें ड्रॉइंगसुद्धां चांगलें आहे," धाकटा बंड्या म्हणाला.

"परंतु गणिताची मला विशेष गोडी आहे," गोविंदा म्हणाला.

"म्हणजे तूं माझ्या जातीचा नाहींस एकूण ? मला जे जे मित्र भेटतात ते कलावान् व गणिती. मला कलेचा गंध नाहीं व गणित समजत नाहीं," मीं म्हटलें.

"तुझ्याजवळ दुसरी कांहीं कला असेल. त्या दिवशीं आपण फिरावयास गेलों होतों, तूं सारखा आकाशांतील रंगाकडे बघत होतास. मला वाटलें कीं श्याम कवि आहे. तूं कवि असशील," गोविंदा म्हणाला.

"होय. मी कवि आहें. मी घरून आलों त्या वेळच्या प्रसंगावर एक कविता केली आहे. छान आहे," मीं म्हटलें.

"म्हण. आम्हांलाहि ऐकूं दे," गोविंदा म्हणाला.

मी कविता म्हणूं लागलों. दिंडी वृत्त होतें.

दूर शिकण्यातें श्याम निघे जाया
रडे माता तिज आवरे न माया।
पुशी लोचन ती धरुन मनीं धीर
धैर्य लोपे येऊन पुन्हां नीर ॥ १ ॥
प्रकृतीला तूं जपत सदा जाई
असें सांगे स्फुंदून मला आई।
आठ दिवसांनीं पत्र लिही बाळ
असे करणारा प्रभुवर सांभाळ ॥ २ ॥
चुलीमधली आणून लावि तीट
वदे सत्यानें वाग सदा नीट।
श्याम अश्रूंनीं भिजवि मातृपाय
दृश्य कविला तें वर्णवेल काय?॥ ३ ॥
श्याम पोटाशीं धरी सान बंधू
येत हेलावुन अंतरंगसिंधू।
हात पाठीवर फिरवि सानुरागें
अश्रुधारा डोळ्यांस तदा लागे ॥ ४ ॥
वडिल गेले गाडीस आणण्यातें
माय बंधू सारेहि उभे होते।
येत गाडी दारांत उभी राही
श्याम पोटाशीं घट्ट धरी आई ॥ ५ ॥
पित्या वंदी साष्टांग श्याम भावें
पिता आशीर्वच देत मूक भावें।
गाडिमध्यें सामान सर्व गेलें
वियोगाचें पळ शेवटील आलें ॥ ६ ॥
श्याम जप हो, तूं धाड शीघ्र पत्र
वदे गहिंवरुनी माय भरे नेत्र।
बैल हांकी जोरांत गाडिवान
कवाडींत उभे मायबाप दीन ॥ ७ ॥

मायबापांचा विरह तो नसावा
बहिणभावांचा विरह तो नसावा ।
परी विद्येचा भक्त बघे होऊं
त्यास कुठले ते मायबाप भाऊ ।। ८ ।।

कविता म्हणतां म्हणतां माझा गळा दाटून येत होता. ऐकतां ऐकतां गोविंदाचे डोळेहि भरून आले. आम्ही तिघे शांत बसलों होतों.

" किती साधी सरळ कविता, " गोविंदा म्हणाला.

" मला सुद्धां समजली, " बंड्या म्हणाला.

" परंतु समजली असें दिसलें नाहीं, " मीं म्हटलें.

" मी अर्थ सांगू ? " बंड्यानें विचारलें.

" तुला रडूं नाहीं आलें, " मीं म्हटलें.

" गोंदूबाच्या डोळ्यांना लौकर पाणी येतें. माझ्या नाहीं येत, " बंड्या म्हणाला.

" सर्वांचे डोळे सारखेच नसतात, " गोविंदा म्हणाला.

" सर्वांचीं हृदयेंहि सारखीं नसतात. हृदयें हलल्याशिवाय डोळे भरत नाहींत. हृदयें पेटल्याशिवाय डोळे लाल होत नाहींत. सारें हृदयावर आहे. सारी जीवनाची किल्ली तेथें आहे, " मीं म्हटलें.

मी तिसरे प्रहरीं घरीं गेलों. सखारामाला माझे मधुकरीचे अनुभव सांगितले. मुजावर, एकनाथ, हमजेखान सारे तेथें जमले.

" तुम तो फकीर बन गये, " मुजावर म्हणाला.

" शिकण्यासाठीं सारें करावें लागतें, " मीं म्हटलें.

" आम्ही दोघे भाऊ हातानें करतों. श्याम ! तूं आमच्यांतच ये ना जेवावयास, " एकनाथ म्हणाला.

" परंतु पैसे कोठून देऊं ? " मीं विचारलें.

" पैसे काय करावयाचे ? आमचे वडील आणखी थोडी ज्वारी पाठवितील. आम्ही भाकरी व पिठलें करतों. सुटसुटीत काम ! " एकनाथ म्हणाला.

" एकनाथ ! तूं वेडाच आहेस. असें कसें चालेल ? " मीं म्हटलें.

मी एकदम माझ्या खोलींत गेलों. लहानपणीं मला आगगाडींत भेटलेल्या माधवाचें स्मरण झालें. माधवाचे ते दोन चरण आठवले.

'प्रेमाचें भरलें वारें ।
भाऊ हे झाले सारे ॥'

हा एकनाथ त्याच वृत्तीचा दिसला. ना फार परिचय, ना ओळख. परंतु एकदम म्हणाला, 'आमच्याकडे येत जा!' एकनाथाच्या त्या सहज प्रेमानें व बंधुभावानें मी भांबावलों. देवाच्या जगाची गंमत वाटली. हृदय कृतज्ञतेनें भरून आलें. जगांत कांहीं सारा कचराच नाहीं. त्या कचऱ्याच्या राशींत टपोरीं मोतीं आहेत. परंतु हीं टपोरीं मोतीं कोण पाहील? कोण पूजील? कबिराच्या एका पदाची मला नेहमीं स्मृति येत असते,

'नजर न आवे आत्मज्योति
तैल न वत्ती बुझ नही जाती
जैसे निर्मळ मोती ॥ नजर० ॥
कहत कबीर सुनो भाई साधू घर घर वाचत पोथी ॥ नजर० ॥'

प्रत्येक घरांत गीतेचें अध्ययन आहे. गाथा, ज्ञानेश्वरी, मनाचे श्लोक घोकले जात आहेत. परंतु मनुष्याचा निर्मळ आत्मा कोणाच्याहि डोळ्यांना दिसत नाहीं. सारे जगावर रुसतात, रागावतात. सारे जगाला छळतात, जाळतात, पोळतात. सर्वांच्या अंतरंगांतील दिव्यता दिसण्याचें दूर राहिलें. परंतु एकनाथासारख्यांचीं हीं घडणारीं दर्शनें तरी आपल्या मनास उन्नत कां करूं नयेत? या जगाबद्दल अशा दर्शनांमुळें प्रेम कां वाटूं नये?

मी कधीं कधीं या जगाचा तिटकारा करीत असतों. या जगाचा निषेध करून मरावें, असें मला वाटतें. परंतु त्या वेळेस मी कृतघ्न होत असतों. खरोखरच या जगांत मला अपरंपार सहानुभूति व प्रेम लाभलीं आहेत. इतके प्रेमाचे पाऊस पाडणारे मित्र दुसऱ्या कोणाला लाभले असतील असें मला वाटत नाहीं. असें असूनहि या जगाचा मला कंटाळा कां येतो? एकाच गोष्टीमुळें. जगानें दिलेल्या अपरंपार प्रेमाचा मी कसा उतराई होऊं याच एका विचारानें मी कष्टी होतों. माझ्यासारख्या कर्महीनास जग इतकें प्रेम कां देतें, तें मला समजत नाहीं. त्या प्रेमानें मी गुदमरतों. हें प्रेमच मला मर असें सांगतें.

ते पावसाळ्याचे दिवस होते. कधीं कधीं मधुकरी मागतांना पाऊस आम्हांस पुन्हां स्नानें घाली. आमच्या झोळींत पाणी भरे. भाकरी मऊ

होई. श्रावण महिन्यांत सोमवारीं सायंकाळीं चार वाजतां मधुकरी मागावयास जावें लागे. कारण सकाळीं उपवास असतो. असे ते दिवस चालले होते.

एके दिवशीं एका घरीं मला कोणीं विचारलें, "उद्यां आमच्याकडें ब्राह्मण येशील का रे?"

"येईन," मीं म्हटलें.

"उद्यां तूं मधुकरी मागायला येऊं नकोस," गोविंदा म्हणाला.

"कां? तूं एकटा जाणें बरें नाहीं. मी तुझ्याबरोबर येईन. थोडींच घरें घेऊं," मीं म्हटलें.

दुसऱ्या दिवशीं मी त्या घरीं जेवायला गेलों. त्या घरांत अत्यंत घाण होती. मी जेवावयास बसलों. मला सर्वत्र ओंगळपणा दिसत होता. माझ्यानें तेथें जववेना. केव्हां एकदां उठेन असें मला झालें.

"मी उठतों. मला बरें नाहीं वाटत," मीं म्हटलें.

"बरें उठा," यजमान म्हणाला.

मीं हात धुतले. तेथें शेंबडाचे बरके पडले होते. नाकें सर्वत्र शिंकरलेलीं होतीं. लहानपणापासून शेंबडाची व खांकरण्याची मला अपार चीड आहे. कोणी नाक शिंकरूं लागला किंवा तोंड धुतांना बोटें घालून घालून ओकाऱ्या काढूं लागला कीं मी तेथून पळून जातों. घाणीची फारच संवय आपल्या लोकांना. पाणी ओतून शेंबूड दूर करणार नाहींत. त्याच्यावर माती टाकणार नाहींत. भूमातेला काय वाटत असेल!

मी दक्षिणा घेऊन निघालों. मी गोविंदाकडे आलों. गोविंदा व बंड्या जेवत होते.

"श्याम! काय होतें जेवायला? बोंडें होतीं कीं नाहीं?" बंड्यानें विचारिलें.

"लौकरसा आलास?" गोविंदा म्हणाला.

"मी अर्धपोटींच उठलों. माझ्यानें तेथें जववेना," मीं म्हटलें.

"कां?"

"तेथें सारें घामट व घाणेरडें होतें. मी पळून आलों," मीं म्हटलें.

"पळपुटा बाजीराव," गोविंदा म्हणाला.

" बाजीराव जेवणापासून पळत नसे. लढाईपासून पळत असे, " मीं म्हटलें.

" तूं ब्राह्मण शोभत नाहींस, " गोविंदा म्हणाला.

" मी नाहींच आहें ब्राह्मण, " मीं म्हटलें.

" जानवें तर आहे, " बंड्या म्हणाला.

" जानवें मराठेहि घालतात, " मीं म्हटलें.

" संध्या करतोस, " गोविंदा म्हणाला.

" मी संध्येंतील मंत्र म्हणतों. ते मला आवडतात. मी अस्त्रायफट वगैरे कांहीं करीत नाहीं. तंत्र मला आवडत नाहीं, " मीं म्हटलें.

" तूं आंघोळ तर दोनदां करतोस. संध्याकाळींहि जातोस झऱ्यावर, " गोविंदानें विचारलें.

" सायंकाळीं स्नान केलें म्हणजे सुंदर झोंप येते. सकाळचें स्नान नसलें तरी चालेल, परंतु सायंस्नान मला हवेंच, " मीं म्हटलें.

" मग तुम्ही ब्राह्मण कसे नाहीं ? " बंडूनें विचारलें.

" मी वाटेल त्याच्याकडे जेवीन, " मीं म्हटलें.

" काय म्हणतां ? " बंडूनें आश्चर्यानें विचारलें.

" खरेंच. मी औंधला येतांना गाडीवानाजवळची चटणीहि घेतली. मारवाड्यांकडे मी जेवलों आहें. महार, मांग, मुसलमान कोणीहि असो. भाकर मला कोणीहि देवो. ती मला प्रिय आहे, " मीं म्हटलें.

" तुला कोणीं शिकविलें ? " गोविंदानें विचारलें.

" शिकवायला कशाला हवें ? आपण सारीं माणसें. कोणाचा विटाळ कां धरावा ? मांसमच्छर नसलें म्हणजे झालें. एकनाथसुद्धां जेवले होते ना ? " मीं म्हटलें.

" परंतु ते एकनाथ होते, " गोविंदा म्हणाला.

" आपणहि त्यांच्या मागोमाग जाऊं, " मीं म्हटलें.

" बरें आधीं जेव, " गोविंदा म्हणाला.

" खरेंच का तुम्हांला भूक आहे ? " बंडूनें विचारलें.

" हो. तुला संशयांत ठेवीत नाहीं. जेवूनच दाखवतों, " मीं म्हटलें.

मी पुन्हां जेवलों. अशा रीतीनें मधुकरीमार्ग आम्ही चोखाळीत होतों. परंतु त्या मार्गाचा मला कंटाळा आला, वीटहि आला. एके दिवशीं मीं गोविंदास म्हटलें, " गोविंदा ! आपण ही मधुकरी पुरे करूं. तुकडे मागूनहि पोट नीट भरत नाहीं. "

" मीहि कंटाळलों आहें. आम्ही संध्याकाळीं हातानें करूं म्हणतों, " गोविंदा म्हणाला.

" मीहि असेंच कांहीं करीन, " मीं म्हटलें.

आमचा निश्चय ठरला. मधुकरी आम्हीं बंद केली. मी दुसरा प्रयोग करण्याचें ठरविलें. परंतु हातानें स्वयंपाक करावयाचा म्हटलें तरी काय नको ! महिना तीन चार रुपये तरी हवेत. ते कोणाकडे मागावयाचे ? मी तर सर्वांना कळविलें होतें कीं माझें येथें नीट चाललें आहे. काय करावें या चिंतेंत मी होतों. रुपया दीड रुपया जवळ होता. सुरवात करण्याचें तर मीं ठरविलें. मग काय व्हायचें तें होवो.

# प्रेमळ आजी

## ३०

मीं हातानें स्वयंपाक करावयाचें ठरविलें. माझ्याजवळ ताट होतें. पुण्याहून येतांना मीं तवाहि आणला होता. बाजारांत एकदोन चमचे घेतले. एक उलथणें घेतलें. माझ्या खोलींत पूर्वीची चूल होतीच. औंधला कोळसे विकत मिळत ना. शेगडीवर स्वयंपाक करणें बरें असतें. कोळशांचा फार धूरहि होत नाहीं. थोडा खर्च मात्र जास्त येतो. परंतु तो बेत मला दूर ठेवावा लागला. जळण आणलें. मीं पीठ दळून आणलें. तांदूळ महाग. त्यापेक्षां बेसनभाकर हा कार्यक्रम बरा असें मीं योजिलें होतें.

मी कोंकणांत पुष्कळवेळां आईला स्वयंपाकांत मदत करीत असें. आयतें, आंबोळ्या वगैरे मला घालतां येत असत. भात, भाजी येत असे. परंतु कोंकणांत भाकरीचा फारसा रिवाज नाहीं. मीं अद्यापपावेतों भाकरी भाजली नव्हती. मला भाकरी सहज साधेल असें वाटत होतें. मीं चूल तर पेटविली. ज्वारीच्या पिठाला आधणाचें पाणी असलें म्हणजे पीठ वळतें, तेवढें मला माहीत होतें. मीं तव्यावरच पाणी तापवलें व तें पिठावर ओतलें. मीं पीठ मळलें. भाकरी थापूं लागलों. परंतु ती खालीं ताटाला चिकटे. भाकरी मोकळ्या रीतीनें ताटांत फिरेना. मी पुन्हां पुन्हां भाकरी मोडीत होतों. खालीं सारण घालून पुन्हां पुन्हां थापीत होतों. परंतु भाकरी फिरेना. मी कंटाळलों, मी चिडलों. मीं ताट जोरानें आपटलें. परंतु अशी आदळ-आपट करून माझी अक्कल का वाढणार होती? पीठ फुकट गेलें असतें.

शेवटीं मीं तवा खालीं उतरला. तव्यावरच तें पीठ भरभरा थापलें. परंतु आधीं तेल वगैरे लावलें पाहिजे होतें. तवा चुलीवर ठेवला. भाकरी सुटेना. ती तव्याला घट्ट चिकटून बसली होती. मी तवा जोरानें कोंपऱ्यांत भिरकावून दिला. माझी सहनशीलता मला कळली. बरें झालें, त्यावेळेस तेथें कोणी नव्हतें म्हणून. त्यावेळेस जर तेथें कोणी असतें व मला हंसतें, तर त्याला मी कच्चें खाऊन टाकलें असतें.

लहानपणापासून मी फार रागीट होतों. मी माझा क्रोध कितीहि संयत केला असला तरी अजूनहि मी भयंकर रागावतों. आतां मी फार रागावत नाहीं. परंतु एखादे वेळेस रागावलों व चिडलों, तर मी वाघाहून क्रूर होतों व लांडग्याहून भयंकर होतों. मला एकदांची एक गोष्ट आठवते आहे. त्यावेळेस मी १९–२० वर्षांचा असेन. मुंबईस मोठ्या भावाकडे सुट्टींत आम्ही सारे भाऊ जमलों होतों. माझे कांहीं मित्रहि तेथें आले होते. रात्रीं आम्ही पत्त्यांनीं खेळत होतों. माझ्यावर सारखी पिशी होती. माझा भाऊ पुरुषोत्तम हंसूं लागला. तो जसजसा हंसूं लागला, तसतसा मी खिजूं लागलों. शेवटीं राग अनावर होऊन मी एकदम उठलों व धाकट्या भावास वर उचललें. त्याला मी जमिनीवर आपटणार होतों. त्यावेळेस माझ्या डोळ्यांत जणूं सूडाचें रक्त होतें. जमिनीवर आपटण्या-ऐवजीं त्याला मीं फेंकलें. कदाचित् त्याला लाथहि मारली असेल. तो

प्रसंग आठवला म्हणजे मला अपार लज्जा वाटते. तो प्रसंग आठवला म्हणजे माझे डोळे अद्याप भरून येतात. तो माझा लहान भाऊ! त्याच्यावर मी किती प्रेम करीत होतों. त्यावेळेस तो फार मोठा नव्हता; १२–१३ वर्षांचा होता. आईवेगळ्या त्या लहान भावाला मी पशूप्रमाणें जणूं त्यावेळेस वागविलें. त्यावेळीं मी मनुष्य नव्हतोंच, मी पशूच होतों. अजूनहि असें माझें कधीं कधीं होतें. एकदां आम्ही प्रचार करावयास गेलों होतों. बरोबर सात आठ स्वयंसेवक होते. रस्त्यांत आम्ही चर्चा करीत चाललों होतों. साम्यवादावर चर्चा होती. वाद वाढतां वाढतां मीं खवळलों आणि एका स्वयंसेवकाला एकदम धरून गदगदां हालविलें! इतर स्वयंसेवकांना भीति वाटली. त्या नदीच्या वाळवंटांत त्या स्वयंसेवकाच्या छातीवर मी बसतों कीं काय असें त्यांना वाटलें. श्यामचा प्रेमळ अवतार सर्वांनीं पाहिला होता; परंतु हा क्रोधी नारसिंह अवतार त्यांनीं पाहिला नव्हता. आपण पाहतों तें स्वप्न कीं सत्य असें त्यांना वाटलें. तुरुंगांतहि एकदां एका मित्रावर मी असाच रागावलों होतों. तो मित्र माझ्या चौपट होता; पण मी संतापानें त्याच्या तंगड्या धरून त्याला ओढूं लागलें. त्यानें एका बुक्कीनें मला धुळींत मिळविलें असतें. परंतु श्यामला कसें मारावयाचें असें त्याला वाटलें. तो हंसत होता. श्यामची खोडकी त्यानें जिरवली पाहिजे होती.

असे अनेक माणुसकीस लाजविणारे प्रसंग मला आठवतात. माझी मान त्यामुळें खालीं होते. परंतु माझा क्रोध मीं किती कमी केला आहे हें पाहून मला थोडें बरें वाटतें.

## ‘ विवेकें क्रिया आपुली पालटीजे ’

विवेक हा मानवाचा विशेष आहे. आपण काय स्वीकारतों व काय टाकतों याच्यावर आपली किंमत आहे. आपण वासनांचे गुलाम झालों तर आपण पशू ठरूं; आपण वासनांचे स्वामी झालों, तर मनुष्य ठरूं. इंग्रजींत टेनिसन म्हणून एक कवि झाला. त्यानें एके ठिकाणीं म्हटलें आहे, ‘आपणांत माकडाचे व वाघाचे पुष्कळसे गुण आहेत. ते प्रयत्नानें दूर करणें हें आपलें कर्तव्य आहे.’ किती यथार्थ आहे. आपण माकडांपासून जन्मलों असें शास्त्रज्ञ डार्विन सांगतो. आपण आपल्या माकड-

चेष्टांनीं डार्विनचें म्हणणें आपल्या कृतीनें रोज सिद्ध करीत आहोंत. जगाला बोंचकारायला आपली सदैव तयारी असते. जगाला फाडून खावयाला आपण मागेंपुढें पाहात नाहीं. खरें म्हटलें तर जग अद्याप माणसाळलेंच नाहीं. ॲमिल या थोर पाश्चिमात्य ग्रंथकारानें म्हटलें आहे, ' आपण मानवजातीची परीक्षा द्यावयास आलेले सारे उमेदवार आहोंत. ' या परीक्षेंत शेंकडा किती निकाल लागेल देव जाणे. मॅट्रिकच्या परीक्षेंत कत्तल होते म्हणून आम्ही सारे ओरडतों. परंतु मानव्याच्या परीक्षेंत बहुतेक शेंकडा शून्य निकाल लागत आहे, याची ओरड कोणीं करावयाची ? जे खरे मानव असतील तेच करतील. मानव होण्यासाठीं ज्यांना तळमळ असेल, तेच त्यासाठीं धडपडतील.

जगांतील राष्ट्रें एकमेकांस जोंपर्यंत गुलाम करीत आहेत, तोंपर्यंत माणसांचीं राष्ट्रें जगांत आहेत असें म्हणतां येणार नाहीं. गुलाम करणारे व गुलाम होणारे दोघे पशूच. जर्मनी, जपान, इटली, इंग्लंड हीं माणसांचीं राष्ट्रें आहेत असें कोण म्हणेल ? आणि हिंदुस्थानसारखीं गुलाम होणारीं राष्ट्रें तरी माणसांचीं कशीं ? अमेरिकेंतील मागचा एक प्रेसिडेंट थिऑडर रूझवेल्ट एकदां म्हणाला होता, ' हिंदुस्थानांतील लोक उंदराप्रमाणें पळतात व मरतात. ' आम्ही उंदीर आहोंत. नीग्रोंना जाळणारी अमेरिका लांडग्यांची आहे. कोठें मानवी आकाराचे उंदीर, तर कोठें मानवी आकाराचीं मांजरें. हेंच जगाचें स्वरूप आहे. कोट्यवधि या मानवी पशूंत एखादा खरा नर दिसतो, एखादा खरा मानव दिसतो. आणि नराचा नारायण होणारा तर हजारों वर्षांत एखादा दिसतो !

इंग्रजी लेखक स्विफ्ट म्हणत असे, ' मनुष्य नांवाचा जो पशु आहे त्याची मला चीड येते. ' माझे इतर भाऊ पशू आहेत असें म्हणण्याचें धाडस स्विफ्टनें केलें, तरी मीं करतां कामा नये. पण मी पशु आहें हें पदोपदीं माझ्या अनुभवास आलें आहे. कधीं मी बेडूक धरणारा साप होतों, कधीं मी दुबळा बेडूक होतों. कधीं मी गोगलगाय बनतों, तर कधीं वृकव्याघ्र बनतों. काय हें जीवन ! परंतु अशा ह्या जीवनांतूनच भलें निर्माण करावयाचें आहे. या मातीचीच कस्तुरी करावयाची आहे. आपल्याला जें पाहिजे असेल तें ह्या जीवनांतून मिळेल.

मुला-शाळेंत जावयाचें होतें. भाकरी केव्हां होणार ! चुलींत लांकडें धडधड पेटत होतीं. माझ्या डोळ्यांतून क्रोधाचे, अगतिकत्वाचे अश्रू घळघळ वाहात होते. मी शेवटीं उठलों. तो फेंकलेला तवा परत आणला.

" श्याम ! काय आहे आदळ–आपट ? चूल पाहा पेटून चालली, " म्हातारी आजी प्रेमानें बोलली.

मी रडत होतों. मी कांहीं बोललों नाहीं. म्हातारी आजी खोलींत आली. तिनें सारा प्रकार पाहिला. चटकन् तिच्या सारें ध्यानांत आलें.

" भाकर जमत नाहीं वाटतें ? " तिनें पुन्हां विचारलें.

" हो, एक तास झाला. परंतु भाकर कांहीं होत नाहीं, " मीं म्हटलें.

" मी देऊं का भाजून ? " तिनें सहज प्रेमानें व दयेनें विचारलें.

" चालेल. द्या, " मीं म्हटलें.

प्रेमळ म्हातारी चुलीजवळ बसली. तिनें तवा नीट खरडून काढला. तवा चुलीवर चढला. म्हातारीनें भाकर थापली. भाकर तव्यावर गेली. मी पाहात होतों. पांचदहा मिनिटांत दोन भाकरी झाल्या.

" पुरेत दोन, " मीं म्हटलें.

" कालवण काय आहे ? " तिनें विचारलें.

" तेलमिटाशीं खाईन, " मीं म्हटलें.

" द्रुपदीच्या आईकडचें वरण देऊं आणून ? " तिनें विचारलें.

" हं, " मीं म्हटलें.

म्हातारी गेली. द्रुपदीच्या आईकडून तिनें कालवण आणलें.

" घे. खा याशीं. नीट जेव, " म्हातारी म्हणाली.

मी जेवून शाळेंत गेलों. शाळेंत जावयास थोडा उशीर झाला होता. परंतु उशीर झाल्याचें मला वाईट वाटलें नाहीं. मला खूप आनंद झाला होता. मला कांहींतरी नवीन मिळालें होतें. मला दोन भाकऱ्याच नाहीं मिळाल्या, त्या भाकऱ्या भाजणाऱ्या आजीबाईचें वात्सल्यप्रेम मला मिळालें होतें. आईपासून दूर असलेल्या श्यामला प्रेम मिळालें होतें.

द्रुपदीची आई म्हणजे माझ्या घराची मालकीण. ती एक गतधवा पोक्त, पावन, कष्टाळु माउली होती. तिचा सर्वांत वडील मुलगा लष्करांत होता. तो वानवडीस पलटणींत होता. तिच्या त्या मुलाचीं पत्रें येत, तीं

ग्रं. क्र. 3283
वि. ...


मीच वाचून दाखवीत असें. घरीं दोन तीन मुलें होतीं. घरांत गाय होती. द्रुपदीची आई मुलांस भाकर वगैरे देऊन मग कामाला जात असे. त्या द्रुपदीच्या आईकडे ती म्हातारी आजी व तिचा तो म्हातारा नवरा दोघें पाहुणीं म्हणून आलीं होतीं. म्हातारी रोज तेथें माझ्या खोलीच्या दाराबाहेर बसत असे. परंतु मी कधीं बोलत नसें. हायस्कुलांतील मी विद्यार्थी. त्या गांवढळ म्हाताऱ्या मराठणीजवळ कसा बोलणार ?

परंतु माझें दुःख पाहून ती म्हातारी विरघळली. माझी फजीति तिला पाहवली नाहीं. ती परकेपणा विसरली. तिनें मला भाकर भाजून दिली. मला कालवण आणून दिलें. मी ब्राह्मण व तीं सारीं ब्राह्मणेतर. परंतु तें सारें मी विसरलों व ती म्हातारीहि विसरली. आम्ही मानव्याच्या समुद्रांत डुंबत होतों. श्याम मनुष्य होता. म्हातारी मनुष्य होती. माणुसकीच्या धर्माचीं आम्ही उपासक होतों. 'आणूं का कालवण ?' किती सहज निघाले शब्द ! श्याम खाईल कीं नाहीं वगैरे शंकाहि त्या माउलीच्या चित्तास शिवली नाहीं. ती का चर्चेची वेळ होती ? सहानुभूतीच्या सिंधूंत सारे भेद बुडून गेले होते.

शाळेंत मी वर्गांत बसलों होतों. परंतु माझें लक्ष तेथें नव्हतें. मधली सुट्टी होतांच खोलींत जाण्यासाठीं माझें हृदय अधीर झालें होतें. आजी-जवळ जाऊं, दोन शब्द बोलूं असें मी मनांत म्हणत होतों.

दोन तास झाल्यावर छोटी सुट्टी असे.

"काय श्याम ! स्वयंपाकाचा प्रयोग कसा काय झाला ?" गोविंदानें विचारलें.

"फारच उत्कृष्ट," मीं म्हटलें.

"भाकरी जमली का ?" त्यानें विचारलें.

"देवानें जमविली," मीं म्हटलें.

"म्हणजे ?" त्यानें जिज्ञासेनें विचारलें.

"शेजारच्या आजीनें माझी फजीति पाहून दिली भाजून," मीं म्हटलें.

"तुला सारें चालतें. तुझें आपलें बरें आहे. तूं आहेस अवलिया," गोविंदा म्हणाला.

"गोविंदा, ब्राह्मण अब्राह्मण माझ्या मनांतहि नसतें. मनांत आलें तर ना त्याची विचारणा? परंतु हे भेद माझ्या जीवनांतच नाहींत," मीं म्हटलें.

वर्ग पुन्हां सुरू झाले. संपले एकदांचे दुसरे दोन तास. मोठी मधली सुट्टी झाली. मी पळतच घरीं गेलों. जवळच होतें माझें घर. ती माझी अंधारी खोली. परंतु त्या अंधारांत आतां प्रकाश आला होता. ती खोली म्हणजे माझें मंदिर झालें. म्हातारी बाहेर बसली होती. तिचा म्हातारा नवराहि तेथें होता.

"श्याम! आज आतांसा आलास?" तिनेंच प्रथम विचारलें.

"मधली सुट्टी आहे," मीं म्हटलें.

"रोजच असते ना?" तिनें विचारलें.

"हो," मी हंसत म्हणालों.

"मग रोज येत नाहींस? आज वहिनिही राहिली वाटतं घरीं?" तिनें प्रश्न केला.

"नाहीं."

"मग कां बरें आलास उगीच वेड्यासारखा?" गोड हंसत ती बोलली.

"आलों आईला पाहाण्यासाठीं," मीं म्हटलें.

"कुठं आहे आई?" तिनें विचारलें.

"ही येथें बसली आहे," मीं म्हटलें.

म्हातारी गहिंवरून म्हणाली, "श्याम! आई ती आई. मला आईचें प्रेम कसें देतां येईल?"

"आज तुम्हीं नाहीं का दिलें? तुम्ही किती प्रेमानें माझ्याकडे बघतां, किती प्रेमानें बोलतां! तुम्ही मला श्याम हांक मारतां, ती गोड लागते. माझी आई येथें असती तर नसतों का मी घरीं आलों मधल्या सुट्टींत?" मीं म्हटलें.

"परंतु आईनें मधल्या सुट्टींत कांहीं खायला दिलें असतें," म्हातारी म्हणाली.

"गरीब आई काय देणार? गरीब आई पाठीवरून हात फिरवते, प्रेमानें पाहाते, गोड बोलते. त्यांतच सारें येऊन जातें," मीं म्हटलें.

"कोणी रे तुला शिकवलं असं बोलायला?" तिनें विचारलें.

" देवानें, " मीं म्हटलें.

" श्याम कसा बोलतो बघा, " ती आपल्या पतीला म्हणाली.

" आपला तुकाराम आहे का त्याला ठावा ? " म्हातारा म्हणाला.

" त्याला काय असेल माहीत ? " ती म्हणाली.

" कोण तुकाराम ? " मीं विचारलें.

" आमचा भाचा आहे तुकाराम. त्याला भेटायला आम्ही आलों आहोंत. आम्हांला तो भेटायला येऊं शकत नाहीं, म्हणून आम्ही त्याला भेटायला येत असतों, " म्हातारी म्हणाली.

" ते तुम्हांला भेटायला कां येत नाहींत ? " मी उत्सुकतेनें पुसलें.

" माझ्या तुकारामावर चोरीचा वहीम आला होता. त्याला शिक्षा झाली. पांच वर्षांची सजा झाली. त्याचा गुन्हा नव्हता. खरोखर नव्हता. परंतु देवाघरीं न्याय असतो. श्याम, दुनियेंत कोठली न्यायनीत ? तो इथल्या तुरुंगांत आला. परंतु तो प्रामाणिक व हुषार होता. येथल्या सरकारी छापखान्यांत काम शिकला. पुढें तो इंजिन वगैरे चालवायला शिकला. येथें सरकारी पिठाची गिरणी आहे ना ? ती तुकारामच चाल-वतो. हल्लीं तुकाराम तसा तुरुंगांत नाहीं. परंतु औंध सोडून त्यानें जायचें नाहीं. सजा संपेपर्यंत तो येथेंच राहाणार. त्याला बरीच माफी भेटेल. मग येईल घरीं. तुझी त्याची देईन हो ओळख करून. तो रात्रीं कदाचित् येईल, " म्हातारी म्हणाली.

" तुमचें गांव कोणतें ? " मीं विचारलें.

" विटें. पंढरपूरच्या रस्त्यावर आहे, " म्हातारी म्हणाली.

" देवाच्या रस्त्यावर तुम्ही आहांत. हजारों वारकरी दिंड्या घेऊन अभंग म्हणत तुमच्या घरावरून जात असतील, " मीं म्हटलें.

" खरें बोललास. आमच्या घरीं कितीतरी वारकरी उतरतात. भजन करतात. आम्हीहि दोघें वारीला जातों. वारी आजपर्यंत कधींहि चुकली नाहीं. आतां आम्ही दोघें थकलों तरीहि आम्ही जातों. हातांत टाळ घेतला, खांद्यावर दिंडी घेतली व मुखानें 'ग्यानबा तुकाराम' सुरू झालें कीं, श्याम, थकलेल्या पायांतसुद्धां बळ येतें. हंसतोस काय ? " म्हातारी म्हणाली.

"मी कांहीं थट्टेनें हंसत नाहीं. माझें हें भावभक्तीचें हंसणें आहे. तुमचें बोलणें ऐकून माझें हृदय भरून येत आहे. भरलेल्या हृदयाचें हें हंसणें आहे. मी आतां जातों हां. शाळा सुरू होईल," मीं म्हटलें.

"माझ्या बटवींत खडीसाखरेचे दोन खडे आहेत, ते त्याला दे," म्हातारा म्हणाला.

"थांब रे, श्याम," म्हातारी बोलली.

"थांबलों आहें," मीं हंसून म्हटलें.

म्हाताऱ्या आजीनें खडीसाखरेचे खडे आणून दिले. श्यामनें ते तोंडांत टाकले. श्यामचें तोंड गोड झालें. श्याम हंसत हंसत शाळेंत गेला.

"सखाराम, हा घे तुला खडा," मीं म्हटलें.

"कसली रे खडीसाखर?" त्यानें विचारलें.

"हातानें स्वयंपाक करूं लागल्याबद्दलची," मीं म्हटलें.

एक प्रकारचा नवीन उत्साह माझ्यांत संचारला. वर्गांतील गणितें त्या दिवशीं नीट समजलीं. मधल्या सुट्टीनंतरचे तास मोठ्या आनंदांत गेले. माझें तोंड सारखें हंसत होतें. माझे डोळे आनंदानें नाचत होते. माझें हृदय आंत नाचत होतें. शाळा सुटल्यावर मी एकटाच फिरावयास गेलों. दूर फिरावयास गेलों. सर्वत्र हिरवें हिरवें दिसत होतें. मन प्रसन्न होतें, सृष्टि प्रसन्न होती. मी गाणीं गुणगुणत होतों. मला माझ्या कविता आठवल्या. दापोली आठवली. राम आठवला. रामचें बरेच दिवसांत पत्र आलें नव्हतें. रामला म्हाताऱ्या आजीची सारी हकीगत लिहिण्याचें मीं ठरविलें.

मला प्रेम द्यावयास देव कोणी ना कोणी तरी पाठवतोच. परंतु मीहि प्रेम पिणारा आहें. प्रेमाला झिडकारणारा मी नाहीं. अहंकारानें प्रेमाचा हात मी दूर लोटणारा नाहीं. प्रेम कोणीहि देवो. मला तें प्रियच वाटतें. प्रेमाचा पेला माझ्या ओंठाला कोणीहि लावो. मी तो आनंदानें पिऊन टाकीन. मला जात नाहीं, गोत नाहीं. प्रेम सदैव सोंवळेंच आहे. प्रेमाला दूर करणारें तेंच ओंवळें.

मी हिरव्या हिरव्या गवतावर बसलों होतों. माझ्या अंगावर मुंगळे चढत होते. त्यांना मी चढूं देत होतों. मध्येंच हलक्या हातानें त्यांना दूर करीत

क्रमांक ९०५५२ नों. दि.

होतों. परंतु मी उगीच त्यांना लकटीत होतों. त्या दिवशीं तरी तें फळ चावले नसतें.

इतक्यांत मोराच्या ओरडण्याचा उत्कट आवाज माझ्या कानावर आला. तो केकारव कानीं पडतांच मी उठलों. कोठें आहे मोर? मी पाहूं लागलों. मी बघत बघत निघालों. मोर पाहाण्यासाठीं डोळे अधीर झाले. मी भिरीभिरी हिंडत होतों. तों माझ्या डोळ्यांसमोर किती सुंदर दृश्य! हिरव्या हिरव्या रानांत तेथें मोर होते. मोरांनीं पिसारे उभारले होते. भव्य दिव्य देखावा! कांहीं मोर खालीं होते. कांहीं झाडांवर होते. मी दुरून पाहात होतों.

माझ्या हृदयाचा पिसाराहि आज उभारलेला होता. माझें मन आज पडलेलें नव्हतें. प्रेमाचे मेघ येऊन त्यांनीं माझ्या मनोमयूराला मत्त बनविलें होतें. आकाशांतहि मेघ जमा होत होते. जरी अगदीं पश्चिमेकडे सूर्याच्या किरणांनीं मेघ थोडे थोडे रंगले होते, तरी दुसऱ्या बाजूला पावसाळी मेघ जमा होत होते.

एकदम मेघगर्जना झाली. जरा बिजलीहि चमकली. मोर तन्मय होऊन नाचूं लागले. सृष्टींतील तें सहजसुंदर नृत्य होतें. मेघांचे वर मृदंग वाजत होते. खालीं मोर नाचत होते. हा श्याम समोर उभा राहून पाहात होता. पाहातां पाहातां मीहि नाचूं लागलों. टिपऱ्यांतील गाणीं मी म्हणूं लागलों.

‘ शालू नेसून अंजिरी । कृष्ण वाजवी खंजिरी ’

किंवा

‘ हरिगुण गातां अनंत रे । लिहावया धरणी न पुरे ।।
धिन्ना धिन्नक धिन्ना धिन् । गोफ गुंफुं या धिन्ना धिन् ।। ’

वगैरे चरण मी गुणगुणूं लागलों.

आकाश चांगलेंच भरून आलें. पाऊस पडणार असें वाटलें. परंतु माझ्यानें तेथून जाववेना. तसा रोमहर्षण देखावा मीं पुन्हां कधींहि पाहिला नाहीं. पुढें पुष्कळ वर्षांनीं मी एकदां उज्जयनीस गेलों होतों. त्यावेळेस तेथील क्षिप्रा नदीच्या तीरावर मोर नाचतांना मीं पाहिले होते. तेहि श्रावणाचे दिवस होते. परंतु औंधचा देखावा अधिक भव्य होता. मी तन्मय झालों होतों. सारें भान विसरलों होतों. आतां पाऊस पडूं लागला.

मोत्यांसारखे थेंब पडूं लागले. मी तोंड उघडून चातकाप्रमाणें पर्जन्यबिंदु पिऊं लागलों. मी मोर झालों होतों, चातक झालों होतों. वर आ करून हातांत टोपी धरून मी नाचत होतों.

पाऊस जोरानें येऊं लागला. शेवटीं ते मत्त मोर सोडून मी निघालों. मी बराच लांब आलों होतों. रस्त्यांत चिखल झाला होता. मीं चपला हातांत काढून घेतल्या. परंतु एके ठिकाणीं पायांत कांटा मोडला. अत्यंत वेदना झाल्या. पाय जड झाला. मोठा कांटा असावा. मी कसातरी चालत होतों. मध्येंच एखादा खडा त्या कांटा बोंचलेल्या जागेला लागे व मरणांतिक वेदना होत. मी सारा ओलाचिंब झालों होतों. डोक्यावरील केंसांचें पाणी सारखें गळत होतें. मधून मधून मी पाणी निपटीत होतों. शेवटीं एकदांचा मी घरीं आलों. मी माझी खोली उघडली. दिवा लावला.

" काय रे हें श्याम ! सारा भिजलास कीं," म्हातारी आजी म्हणाली.

" आज तुम्हीं प्रेमानें भिजवलेंत, आतां पावसानें पाण्यानें भिजविलें," मीं म्हटलें.

" कोरडें नेस आधीं. मग बोल, " ती म्हणाली.

मीं कपडे बदलले. भिजलेले कपडे पिळून दोरीवर टाकले. मी घोंगडीवर बसलों.

" स्वयंपाक नाहीं का करायचा ?" आजीनें विचारलें.

" आज भूकच नाहीं. दुपारीं भाकर जास्त झाली. अजून भाकर मला पचत नाहीं, " मीं म्हटलें.

" खोटें कांहीं तरी. आळस करीत असशील. परंतु मी भाकर भाजून ठेवली आहे, " म्हातारी म्हणाली.

" म्हणजे !" मीं आश्चर्यानें म्हटलें.

" म्हणजे काय ? ती घे व खा. द्रुपदीच्या आईनें चवळ्या केल्या आहेत त्याशीं खा, " ती म्हणाली.

एका ताटांत भाकर, पळीवाढ्या चवळ्या वाढून म्हातारी घेऊन आली. मला काय करावें तें समजेना.

" बघतोस काय ?" म्हातारी म्हणाली.

" एखादे वेळेस कालवण घेणें निराळें. परंतु असें सारखें घेणें चांगलें नाहीं. मीं पीठ दिलें नव्हतें, " मीं म्हटलें.

" परंतु मीं दिलें आहे. द्रुपदीची आई गरीब आहे मला माहीत आहे, " आजी म्हणाली.

" आणि तुम्ही का श्रीमंत आहांत ? " मीं विचारलें.

" आम्ही खाऊन पिऊन सुखी आहोंत, श्याम, " ती सहृदयतेनें म्हणाली.

माझ्यानें नाहीं म्हणवेना. माझा पाय दुखत होता. ठणकत होता. मीं भाकर खाल्ली. मी ताट उचलून नेऊं लागलों. परंतु मी लंगडत जात होतों.

" श्याम, पायाला काय झालें ? " कनवाळूपणानें म्हातारबायनें विचारलें.

" पायांत मोठा कांटा गेला आहे. पाय फार दुखत आहे, " मीं म्हटलें.

" कोठें गेला होतास रानावनांत ? "

" मीं नाचणारे मोर पाहिले. नाचणारा मोर मीं पूर्वी कधींहि पाहिला नव्हता. त्यामुळें उशीर झाला. पाऊस पडूं लागला. रस्त्यांत चिखल. पायतण काढून घेतलें, तर कांटा बोंचला, " मीं इतिहास सांगितला.

" आतां रात्रींचा काढायला दिसणारहि नाहीं. तेलघडी बांधून ठेव, म्हणजे फुगेल. मग सकाळीं चांगला दिसेल. आण, तें ताट मी नेतें, " असें म्हणून तिनें माझ्या हातांतील तें ताट घेतलें.

मी घोंगडीवर पांघरूण घेऊन बसलों होतों. हवेंत गारवा आला होता. म्हातारी माझ्या खोलींत येऊन बसली.

" आज वाचायचं नाहीं वाटतं, श्याम ? " तिनें विचारलें.

" आज तुमचीच हकीकत सांगा. विटेगांवच्या गोष्टी सांगा, " मीं म्हटलें.

" काय सांगूं ? तूं येशील विटेगांवला ? " तिनें प्रेमानें विचारलें.

" तेथें काय आहे ? " मीं विचारलें.

" तेथें आम्हीं दोन पिकलेलीं पानें आहोंत. आमच्याकडे ये. तेथून पंढरीला जा. आमच्या घरीं, श्याम, एक मिठू आहे. तो 'विठ्ठल–विठ्ठल' बोलतो. वारकरी दिसले कीं, आमच्या मिठूचें भजन सुरू होतें. पहांट होतांच 'विठ्ठल–विठ्ठल' असा विठूच्या नामाचा गजर मिठू सुरू करतो.

आतां मिठू म्हातारा झाला आहे. आम्ही म्हातारीं, मिठूहि म्हातारा, " ती म्हणाली.

" परंतु त्याची तिकडे कोण काळजी घेत असेल ? कोण चण्याची डाळ देईल ? कोण पेरू देईल ? " मीं विचारलें.

" तो शेजारच्या भलेदादांकडे ठेवला आहे. ते त्याची आमच्यापेक्षांहि काळजी घेतील. भलेदादांच्या मुलाबाळांना आमच्या मिठूचें फार वेड. लाल-लाल मिरची आणतील व मिठूच्या लाल-लाल चोंचींत देतील. मी त्यांना मग रागावतें व म्हणतें ' मिठूला इतक्या मिरच्या नका रे देऊं, ' " म्हातारी सांगूं लागली.

" तुमचा मिठू येऊन पाहिला पाहिजे, " मी म्हणालों.

" आज तुकाराम येणार होता; परंतु आतां कांहीं येत नाहीं असें दिसतें, " म्हातारी म्हणाली.

" दहा वाजायला आले, " मीं म्हटलें.

" नीज तूं. परंतु पायावर पट्टी बांध, " तिनें पुन्हा मला स्मरण दिलें.

मीं एक चिंधी घेतली. ती गोड्या तेलांत बुडवून तळपायावर बांधली. मी झोंपीं गेलों.

सकाळीं मी माझा कांटा काढीत होतों. परंतु कांटा फारच खोल गेला होता. कांटा कांहीं केल्या निघेना.

" द्रुपदीची आई काढील. श्याम, थांब, " म्हातारी म्हणाली.

द्रुपदीची आई बाहेर आली. तिनें माझा पाय मांडीवर घेतला व ती कांटा काढूं लागली. परंतु इतक्यांत तिचा गुराखी मुलगा आपलें कांट-कोरणें घेऊन आला.

" आई, हा चिमटा व हें कांटकोरणें घे, " तो म्हणाला.

" खरंच कीं. आण बघूं, " ती म्हणाली.

द्रुपदीच्या आईनें चिमट्याचें तोंड आंत घुसवून कांटा ओढून घेतला.

" केवढा आहे ! " म्हातारी म्हणाली.

" याच्यापरीस मोठे आमच्या पायांत जातात, " द्रुपदीचा भाऊ म्हणाला.

" याच्यावर मी बिब्बा घालतों म्हणजे पाणी आंत शिरणारच नाहीं, " मीं म्हटलें.

" आहे का मिलावा ? " द्रुपदीच्या आईनें विचारलें.

" हो. येतांना माझ्या आईनें बरोबर दिले आहेत, " मीं म्हटलें.

इतक्यांत तुकाराम आला. मीं अंदाजानें ओळखला कीं तुकाराम म्हणून.

" काल रातचा येणार होतास ना ? " म्हातारीनें विचारलें.

" कांहीं जमलें नाहीं, " तुकाराम म्हणाला.

म्हातारीजवळ तुकाराम बसला होता. म्हातारीनें त्याच्या तोंडावरून हात फिरविले. तुकारामाला रडूं आलें.

म्हातारीनें विचारलें, " आज सकाळीं कसा आलास तूं ? "

" आज चक्की बंद आहे, " तो म्हणाला.

" तुकाराम, हा श्याम हो. हा कोंकणांतला दूरचा आहे. विद्येसाठीं येथें आला. हातानें स्वयंपाक करतो, " ती म्हणाली.

" कितव्या यत्तेंत आहांत ? " त्यानें विचारलें.

" सहावींत, " मीं उत्तर दिलें.

" श्याम, आज काय स्वयंपाक करणार ? " म्हातारीनें विचारलें.

" अद्याप ठरविलें नाहीं, " मीं म्हटलें.

" पीठ आहे का ? " तिनें फेरतपासणी चालविली.

" नाहीं, " मीं म्हटलें.

" मग ? " ती म्हणाली.

" बघूं, " मी बोललों.

" तुकाराम ! तूं या श्यामला देत जा ना रे दोनचार भाकरीचें रोज पीठ. तुझ्याकडे तर गाड्यावारीं दळायला येतें. पोतींच्या पोतीं येतात. चार मुठी काढलें तर काय कळणार आहे ? " आजीबाई सांगत होती.

" सहज देत जाईन. श्याम, एखादें फडकें देऊन ठेवा. त्यांत बांधून ठेवीत जाईन, " तुकाराम म्हणाला.

" आजी, असें चांगलें नाहीं. लोकांचें कां घ्यावें ? "

" अहो ! फार का घ्यावयाचें आहे ? आजूबाजूला किती तरी पीठ उडतें. नुसतें तें गोळा केलें तर दहाजणांचें पोट भरेल. आणि व्यापारी पोतींच्या पोतीं दळून नेतात. चार मुठींनीं काय होणार ? " तुकाराम म्हणाला.

इतक्यांत सखाराम हांक मारीत आला.

" श्याम ! तें इंग्रजी जरा वाचूं ये. येतोस का ? " तो म्हणाला.

" येतों, " मीं म्हटलें.

मी तुकारामांना जातों म्हणून सांगून सखारामाच्या खोलींत वाचावयास गेलों.

आम्ही इंग्रजी वाचलें. भाषांतरहि केलें. सायन्सचा एक प्रयोग मीं सखारामपासून समजावून घेतला. सखारामाची शास्त्रीय दृष्टि होती. त्याला सायन्स भराभर समजे. दहा वाजायला आले होते. मी माझ्या खोलींत परत आलों. द्रुपदीची आई कामाला गेली होती. म्हातारा–म्हातारीहि बाहेर गेलीं होतीं. कदाचित् तुकारामाबरोबर गेलीं असतील. माझ्या खिशांत सात आठ आणेच शिल्लक होते. मी बाजारांत गेलों. गवार स्वस्त होती. मीं दिडकीची गवार घेतली. कितीतरी आली. मी घरीं आलों. भराभरा गवऱ्या निवडल्या, चूल पेटवून त्या शिजत ठेवल्या.

मी वाचीत बसलों. पुण्याहून येतांना मामांकडचें न्यायमूर्ति रानड्यांचें ' मराठ्यांच्या सत्तेचा उदय ' हें इंग्रजी पुस्तक मीं आणलें होतें. तें मी वाचीत होतों. मला तें पुस्तक फार आवडे. किती सुंदर इंग्रजी भाषा ते लिहीत ! गवार शिजली. मीं उतरली. मी गवारीची भाजी खाऊं लागलों. एकीकडे वाचीत होतों, एकीकडे खात होतों. लहानपणापासून मला भाजी पुष्कळ लागते. माझ्या वडिलांनाहि भाजी फार हवी असे. ते म्हणत, " भात थोडा असला तरी चालेल, परंतु भाजी भरपूर हवी. " पुष्कळ भाजीपाला खाल्ल्यामुळेंच वडिलांच्या त्या किरकोळ शरीरांत पुष्कळ उत्साह असे. बारा-बारा कोस ते सहज चालून जात. विशेषतः पालेभाज्यांत उत्साहप्रद सत्त्व बरेंच असतें. चपळाई त्यांच्यामुळें मिळते, असें म्हणतात.

" काय जेवण चाललें आहे, श्याम ? " आजीनें विचारलें.

" भात, भाजी, भाकर सारें आहे, " मीं म्हटलें.

" कोठें आहे भात ? कोठें आहे भाकर ? " तिनें विचारलें.

" खाऊन झालें. आतां भाजी राहिली आहे, " मीं म्हटलें.

" खोटें सांगतोस का रे श्याम ? भाताचें भांडें नाहीं, तवा तर तेथें उपडा घातलेला आहे, " म्हातारी म्हणाली.

"आजी, आज गवारीचीच भाकर, गवारीचाच भात, गवारीचीच भाजी, सारें गवारीचें केलें होतें. एका ब्रह्माचा जसा हा सारा पसारा, तसें एका गवारीचें सारें कांहीं," मीं म्हटलें.

"जनाबाईच्या अभंगांत आहे, 'देवचि खावा, देवचि प्यावा.' सारें देवच," म्हातारी म्हणाली.

मित्रांनो! त्या म्हाताऱ्या आजीनें जनाबाईचा जो अभंग सांगितला तो प्रसिद्ध आहे, परंतु त्या अभंगांतील थोर विचार कोणाला कळणार? एकदां पुणें शहरांत एक मिशनरी आला होता. तो आपल्या व्याख्यानांत म्हणाला, "हिंदुधर्मांत देवाबद्दल आदर नाहीं, देवाबद्दल भयभीति नाहीं. संत देवाबद्दल वाटेल तें लिहितात, वाटेल तें बोलतात. तुमची जनाबाई म्हणते, 'मी देवाला खाईन, देवाला पिईन.' देव म्हणजे का बिस्कीट, का चहाचा पेला! त्या थोर परमेश्वराचा असा उपमर्द खिस्ती धर्मांत नाहीं."

परंतु एका सहृदय व विचारवंत वक्त्यानें त्या अभंगांतील परम गोडी जेव्हां विशद करून सांगितली, तेव्हां तो मिशनरी डोलूं लागला. त्यानें आपली चूक कबूल केली. परमेश्वराशीं तन्मय झाल्याची ती खूण आहे, हें त्यानें कबूल केलें. जेथें भीति आहे तेथें भक्ति नाहीं. ईश्वर कांहीं वृक–व्याघ्र नाहीं, तो परम दयाळु आहे. तो मानवाला कांहीं कमी पडूं देत नाहीं. तुम्ही कसेहि वागा. त्याचा पाऊस, त्याचे वारे, त्याचे तारे, त्याचे चंद्र–सूर्य सारें तुमच्यासाठीं आहे. तुम्ही एक दिवस चांगले व्हाल या आशेनें परमेश्वर तुम्हांस सदैव प्रेम देत असतो. परमेश्वराचें प्रेम बांधणारें नाहीं, तें स्वातंत्र्य देणारें आहे.

परमेश्वर निष्ठुर नाहीं. नरकांतील यमयातनांचीं वर्णनें वाचून परमेश्वर इतका का कठोर असेल असें वाटतें. एकदां एक शेतकरी रशियांतील महर्षि टॉलस्टॉय यांच्याकडे आला व म्हणाला, "महाराज! देव खरेंच का असे हाल हाल करीत असेल?"

टॉलस्टॉय म्हणाले, "तुझ्या मुलानें अगदीं भयंकर गुन्हा केला समज, तर तूं त्याला आगींत टाकशील का?"

तो शेतकरी म्हणाला, "नाहीं. असें कसें करीन महाराज?"

टॉलस्टॉय म्हणाले, "मग देव तुझ्यापेक्षां का कमी दयाळू आहे? आपण सारीं त्याचीं लेंकरें." मनुष्यानें इतरांस छळण्याच्या अपरंपार युक्त्या शोधल्या आहेत, त्याला वाटतें देवहि असाच असेल. देव म्हणजे सर्वांत मोठा छळणारा, अधिक कठोर शिक्षा देणारा!

भक्त देवाला भीत नाहीं. तो त्याच्या पायांना मिठी मारील. खऱ्या भक्ताला देवाशिवाय दुसरें तिसरें रुचत नाहीं, सुचत नाहीं. न्यूटनचें खातांना गणिताकडे लक्ष असे. केरूनाना छत्रे जेवतांना ताटांत ग्रहांच्या आकृती काढीत! ध्येय म्हणजेच महात्म्यांचें सर्वस्व असतें.

मीं त्या म्हाताऱ्या आजीस म्हटलें, "जनाबाईचा अभंग किती गोड आहे!"

"श्याम! तुझ्याजवळ पैसे नाहींत होय?" तिनें एकाएकीं विचारलें.

"आजी, मी गरीब आहें. येथें सरकारी बोर्डिंग आहे. तेथें मोफत जेवण मिळतें असें ऐकून मी येथें आलों. परंतु या वर्षापासून निराळा नियम येथें झाला आहे. संस्थानाबाहेरच्या सर्वांस तें बंद करण्यांत आलें आहे. घरीं तरी पैसे कसे मागूं? घरीं गरिबी आहे. वडील तर नोकरी कर असें सांगतात. मला तर शिकायचें आहे. कष्ट करून मी शिकेन," मीं म्हटलें.

"तुकाराम तुला पीठ देईल. तुला मग चिंता नाहीं. तें पीठ घेत जा. नको म्हणूं नकोस. तें पीठ व्यापाऱ्यांचें असतें; गोरगरिबांचें थोडेंच असतें? कांहीं पाप नाहीं," ती म्हणाली.

माझी भाजी संपली. मी शाळेंत जावयास निघालों.

सायंकाळीं शाळा सुटल्यावर मी घरीं आलों. म्हातारबाय घरीं होती.

"आजोबा कोठें गेले?" मीं विचारलें.

"ते कामाला गेले आहेत," म्हातारी म्हणाली.

"तुम्ही येथें किती दिवस राहाणार?" मीं विचारलें.

"येत्या बुधवारीं किंवा शुक्रवारीं जाऊं," ती म्हणाली.

"लौकरच जाणार तर," मीं खिन्नपणें म्हटलें.

"येथें किती दिवस राहावयाचें? जाऊं आपल्या घरीं. श्याम! तुकारामानें ही पुरचुंडी आणून दिली आहे. मी भाकर भाजून देतें. दुपारचा तूं जेवला नाहींस," ती म्हणाली.

" परंतु मला फिरायला जायचें आहे, " मीं म्हटलें.

" उपाशी पोटीं नको जाऊं कुठें. तिन्हीसांजची वेळ आहे, " ती म्हणाली.

शेवटीं मी उठलों. मीं चूल पेटविली. आजीबाई चुलीजवळ गेली. तिनें मला दोन भाकऱ्या भाजून दिल्या. बेसनाचें थोडें पीठ होतें, तें तिनें कालवून तव्यावर ओतलें. स्वयंपाक तयार झाला.

मी जेवायला बसलों.

" श्याम, काय झालें ? " म्हातारीनें विचारलें.

मी कांहीं बोललों नाहीं. भाकरीचा तुकडा माझ्या हातांत होता. एकाएकीं माझे डोळे भरून आले. पानांत टपटप पाणी पडलें. म्हातारी जवळ आली.

" श्याम, काय झालें ? तिन्हीसांजा असें रडूं नये. जेव. " ती म्हणाली.

" तुम्ही खरोखर माझ्या कोण ? मी कोण, तुम्ही कोण ? मी कोठला, तुम्ही कोठल्या ? मी त्या दरिद्री कोंकणांतील भिकारडा पोरगा. माझ्यासाठीं तुम्हीं एवढें सारें कां करावें ? मी ब्राह्मण. तुम्ही माझ्या ना जातीच्या ना गांवच्या. माझ्याबद्दल एवढें प्रेम तुम्हांला कां वाटतें ? कां वाटावें ? कोणीं ओतलें हें प्रेम तुमच्या हृदयांत ? माझी आई का येऊन बसली आहे तुमच्या डोळ्यांत ? माझी आई का आली आहे तुमच्या या मायाळू हातांत ? आपली का पूर्वजन्मींची ओळख आहे ? काय आहे हें सारें ? कां तुम्हीं माझ्यासाठीं हें सारें करतां ? "

असें म्हणून मीं म्हातारीच्या वक्षःस्थळावर डोकें ठेवलें. तो भाकरीचा तुकडा तसाच हातांत होता. तिनें माझे डोळे पुसले. मी शांत झालों. तसेंच डोकें ठेवून मी होतों. पुन्हां मीं माझें डोकें उचललें. आजीबाईच्या डोळ्यांकडे पाहिलें. किती सात्त्विक होती तिची मुद्रा ! किती साधेपणा, सरळपणा, सौम्यता, स्निग्धता, मधुरता तेथें होती ! खरें निर्हेतुक पिकलेलें प्रेम तेथें दिसत होतें.

" जेव आतां. मी दिवा लावतें. कुठें आहे काडीपेटी ? " तिनें विचारलें. त्या खोलींत दिवा लागला. मी जेवलों. मीं माझीं सारीं खरकटीं भांडीं बादलींत घातलीं. झऱ्यावर जाऊन घासून आणावीं असें मनांत

आलें. मी उठलों. अंगांत सदरा घातला. बादली हातांत घेतली. पायांत पायतण घातलें व निघालों.

समोरच्या मशिदींत दिवे लागले होते. आकाश निरभ्र असल्यामुळें तारे चमकत होते. मी झऱ्यावर गेलों. शांतपणें तो कर्मयोगी झरा तेथें झुळझुळ वाहात होता. त्याला दिवस ना रात्र. त्याचें अखंड नामसंकीर्तन सुरूच असे. त्याचें हृदय सारखें उचंबळून भरून येऊन वाहातच असे. ती पवित्र वेळ होती. प्रार्थनेची वेळ होती. संध्येची वेळ होती. नमाजाची वेळ होती. मीं बादली तेथेंच ठेवली. झऱ्याच्या कांठच्या खडकावर मी मांडी घालून बसलों. मीं माझे डोळे मिटले.

शेवटीं मी उठलों. भांडीं घासलीं. तीं मातीनें घांसलेलीं भांडीं त्या स्वच्छ झऱ्यांत त्यावेळेस बुडवावयास मला धीर होईना. अशा प्रशांत वेळीं तो झरा का मी अमंगळ करूं? त्याची समाधी का भंगूं? त्याच्या प्रार्थनेंत का खंड पाडूं? मी अलगत बादली बुडवून भरून बाहेर आणली. बाहेरच भांडीं विसळलीं. नंतर सारीं भांडीं बादलींत भरलीं. मला तेथून जावेंसें वाटेना. त्या झऱ्याची मंजुळ खळखळ मला मोह पाडीत होती.

परंतु मला एकदम भीति वाटूं लागली. भीतीची कल्पना मनांत येतांच मी उठलों. त्या बाजूस रात्रीं लांडगे येतात असें मीं ऐकलें होतें, त्याची आठवण झाली. मी निघालों. सांचलेल्या डबक्यांतून बेडूक ओरडत होते. क्वचित् काजवे दिसत होते. काजवे आतां कमी झाले होते. नाहींतर पावसाच्या आरंभीं झाडें पेटल्याप्रमाणें दिसत.

"श्याम, आतां का आंघोळ करून आलास?" मुजावरनें विचारलें.

"नाहीं. भांडीं घांसून आलों," मीं म्हटलें.

"सकाळीं घासलीं असतीस! काल रात्रीं तिकडे मोठा साप मारण्यांत आला," मुजावर म्हणाला.

"वाटलें भांड्यांना तिष्ठत कशाला ठेवा? आपल्यासाठीं तीं घाणेरडीं झालीं. त्यांना स्वच्छ करून ठेवलें तर तीं आशीर्वाद देतील," मीं म्हटलें.

"असें रात्रींचें जाणें धोक्याचें असतें," तो म्हणाला.

"देव तारी त्याला कोण मारी?" मीं म्हटलें.

" सुखाचा जीव मुद्दाम दुःखांतहि घालूं नये, " तो म्हणाला.

" खरें आहे तुझें म्हणणें. मला भीति वाटूं लागली म्हणूनच मी उठून आलों. 'देव तारी त्या कोण मारी' यावर माझी तरी कोठें आहे एवढी श्रद्धा? शेवटीं श्रद्धा स्वतःच्या हातापायांवरच, " मीं म्हटलें.

" श्रद्धा म्हणजे मरण असें एक इंग्रजी वाक्य आहे," मुजावर म्हणाला.

" किती यथार्थ आहे तें, " मीं म्हटलें.

मुजावर गेला. मी माझ्या खोलींत आलों. मी वाचीत पडलों होतों. वाचतां वाचतां मला केव्हां झोंप लागली तें समजलेंहि नाहीं. दिवा तसाच जळत होता. दार मी उघडेंच ठेवीत असें.

" रात्रीं दिवा तुम्हीं का मालवलांत ? " मीं आजीस विचारलें.

" हो आणि तुझ्यावर पांघरूण घातलें. दिव्याला झोंपेंत हात लागता तर भाजता. दिवा पडता व पेटता, " ती म्हणाली.

" आजी जवळ असली म्हणजे काळजी नाहीं. 'निकटे जागर्ति जान्हवी जननी,' " मीं म्हटलें.

" श्याम ! जवळच्या महादेवाला आज आम्ही जाणार आहोंत. बैलगाडी केली आहे. सांज होतांच परत येऊं, " आजी म्हणाली.

" माझी शाळा आहे, नाहींतर मी आलों असतों, " मीं म्हटलें.

" म्हणूनच मी आग्रह करीत नाहीं, " ती म्हणाली.

ती निघून गेली.

द्रुपदीची आई म्हणाली, " श्याम ! अरे पीठ असलें म्हणजे ताटांत घालून माझ्याकडे ठेवीत जा. आमच्या भाकरीबरोबर तुझी भाजून ठेवीत जाईन. तवा तापलेलाच असतो."

मीं उरलेलें पीठ त्यांच्याजवळ दिलें. मी अभ्यास करीत बसलों. दोन भाकरी भाजलेल्या आल्या. मीं त्या ठेवून दिल्या. द्रुपदीची आई कामाला गेली. दहा वाजतां मी भाकर कोरडीच खात होतों.

इतक्यांत मुजावर आला.

" श्याम ! तुझी भाषांतराची जरा वही दे बघूं, " तो म्हणाला.

" मी जेवतों आहें. तेथील घे, " मीं म्हटलें.

" कोरडीच भाकर ? " त्यानें विचारलें.

"कोरडें खाल्ल्यानें लाळ जास्त सुटते. पचतें चांगलें व थोडें पुरतें," मीं म्हटलें.

"मी थोडी आमटी आणून देऊं? आतांच बोर्डिंग घेऊन आलों," तो म्हणाला.

मी कांहीं बोललों नाहीं. मुजावर वही घेऊन गेला. तो आमटी घेऊन आला. मीं माझें ताट पुढें केलें. त्यानें ओतली.

"श्याम, एखादे वेळेस रोटी नसेल तर मागत जा. तूं कधीं कधीं जेवत नाहींस असें एकनाथ सांगत होता," मुजावर म्हणाला.

"ज्या दिवशीं जरूर वाटेल त्या दिवशीं मागेन," मीं म्हटलें.

"संकोच नको करूं. आपण एका वर्गांतील मुलें," तो म्हणाला.

"आणि सारीं देवाचीं लेंकरें," मीं म्हटलें.

"श्याम! तुझ्याजवळ पुष्कळ बोलावेंसें वाटतें. परंतु तुझ्याजवळ येतांच काय बोलावें तें समजत नाहीं. बरें मी जातों," असें म्हणून मुजावर निघून गेला.

मुजावर ठेंगणा होता. वाटोळा होता. तो खूप अभ्यासी होता. सारें ठरलेल्या वेळीं ठरलेलें त्याचें काम. वर्गांत कधीं फार बोलायचा नाहीं. अभ्यास बरा कीं आपण बरें. मुजावरबद्दल मला आदर वाटे. एकनाथा-प्रमाणेंच तो पाठीवर सोडलेला रुमाल बांधी. एकनाथाचा रुमाल हळदी रंगाचा होता, मुजावरचा स्वच्छ पांढरा असे, एवढाच फरक.

अशा रीतीनें दिवस चालले होते. पीठ संपलें म्हणजे मी तुकारामाकडे जात असें. गिरणींत पोतींच्या पोतीं पडलेलीं असत. तुकाराम माझी पोटली बांधून देई. तेथून पीठ आणण्याची मला संवयच जडली. प्रथम पाप वाटलें, नंतर संकोच वाटला, नंतर संवय झाली. हळूहळू आपण विष पचवीत असतों. तुकारामाजवळून पीठ घेण्याची माझी जणूं वतनदारीच मीं स्थापन केली. मला त्याबद्दल कांहींहि वाटतनासें झालें.

शेवटीं आजी आजोबा जाण्याचा दिवस उजाडला. तीं दोघें पायींच मुक्काम करीत करीत जाणार होतीं. जेवून खाऊन निघणार होतीं.

"श्याम! आमच्याबरोबर ये भाकर खायला," म्हातारी म्हणाली. द्रुपदीची आई, तिचीं मुलें, मी, सारीं भाकर खात होतों.

" श्यामला भाकर भाजून देत जा. कधीं कालवण द्यावें, बरें का द्रुपदीच्या आई, " म्हातारी म्हणाली.

" मीं मागेंच त्याला तसें सांगितलें आहे, " ती म्हणाली.

" तुकाराम तुला भेटत जाईल, " म्हातारी म्हणाली.

" मीहि त्यांना भेटत जाईन, " मीं म्हटलें.

जेवणें झालीं. त्यांनीं आपलीं गांठोडीं बांधलीं. दोन गांठोडीं होतीं. मीं माझा कोट घातला. एक गांठोडें मीं उचललें.

" तूं कोठें येतोस ? " म्हातारीनें विचारलें.

" मी तुम्हांला गांवाबाहेरपर्यंत पोंचवतों, " मीं म्हटलें.

" शाळेला उशीर होईल, " म्हातारदादा म्हणाले.

" होऊं दे. शाळा रोजचीच आहे. तुम्ही आतां पुन्हां केव्हां भेटाल ? " मीं सद्गदित होऊन म्हटलें.

" आमच्याबरोबर आपला तूं नुसता ये. गांठोडें घेऊं नकोस, " म्हातारी म्हणाली.

" कां बरें ? मी का परका आहें ? तुकाराम येता तर त्यानें नसतें का उचललें ? मी माझ्या आईचें नसतें का घेतलें ? तुम्ही माझ्यासाठीं काय काय केलें, मी का गांठोडेंसुद्धां नको घेऊं ? " मीं केविलवाणें विचारलें.

मी गांठोडें घेऊन निघालों. द्रुपदीच्या आईला विचारून तीं दोन पिकलीं पानें निघालीं. मी बाहेर रस्त्यावर थांबलों होतों. आम्ही तिघें चालूं लागलों. शाळा भरूं लागली होती. मुलें शाळेंत येत होतीं. डोक्यावर गांठोडें घेऊन मी जात होतों. मुलें माझ्याकडे बघत होतीं. कांहीं माझा अवतार पाहून हंसत होतीं. मला बिलकुल लाज वाटत नव्हती. त्या वेळेस मला माझा अभिमान वाटत होता. माझ्यांत माणुसकी आहे असें मनांत येऊन मला कृतार्थता वाटत होती. तें डोक्यावर गांठोडें नव्हतें. ती प्रेमाची शिदोरी होती. प्रेमाला डोक्यावर घेऊन मी जात होतों. लोकांना तें गोधड्यांचें–लुगड्यांचें गांठोडें दिसत होतें. परंतु त्या गोधडींत, त्या चिंध्यांत, त्या वस्त्रांत अहेतुक अपार प्रेमाचे भरजरी पितांबर होते. त्यांना ते कसे दिसणार ? ज्याचें त्याला ठावें.

मी भरभर जात नव्हतों. म्हाताऱ्यांबरोबर चालावयास मी लाजत नव्हतों. मी त्यांच्याबरोबर त्यांच्या चालीनें बोलत बोलत सावकाश जात होतों. गांवाची सीमा लवकर येऊं नये असें मला वाटत होतें. बाजार संपला. गांवांतील शेवटचीं घरें आलीं. गांवाबाहेरचा रस्ता लागला.

" श्याम ! आतां पुरे. जा माघारा. किती दूरवर येशील ? " आजीबाई म्हणाली.

मीं उत्तर दिलें नाहीं. मी मुकाट्यानें चाललों होतों. मी बोलणार तरी काय ? त्या प्रेमगंगेला मीं काय उत्तर देऊं ? त्या माउलीला मीं काय देऊं ?

" श्याम ! थांबतोस कीं नाहीं ? " असें म्हणून म्हातारबाय माझ्या पाठीमागें पळूं लागली. परंतु मी का तिला सांपडणार ? मी हरणासारखा उड्या मारीत दूर गेलों व हंसून पाठीमागें पाहूं लागलों. शेवटीं गांवाबाहेरचा एक मैलाचा दगड आला. तेथें झाडाखालीं मी थांबलों. भावनांनीं मी ओथंबलों होतों.

तीं दोघेंजणें हळूहळू आलीं.

" श्याम ! किती रे दूर यायचें ? " म्हातारी म्हणाली.

" तुमच्याबरोबर येणें म्हणजे मायबापांबरोबर येणें, देवाबरोबर येणें, " मीं म्हटलें.

" जा आतां, प्रकृतीस जप. दिवाळीची सुट्टी झाली म्हणजे विठ्याला ये. मग कार्तिकीस आपण पंढरीस जाऊं. तूं आमचा मिठू पाहा. त्याला तुझें नांव शिकवीन. श्याम—श्याम ! अशी तो हांक मारील. ये बरें का ? " म्हातारी म्हणाली.

मीं तिच्या पायांवर डोकें ठेवलें. म्हातारबाबांच्याहि पायां पडलों. त्यांनीं माझ्या पाठीवरून हात फिरविले. आजीबाईनें गांठोडें डोक्यावर घेतलें.

" येतों बरें, श्याम. सांभाळ. तुकारामाला भेटत जा, " म्हातारी म्हणाली.

तीं दोघें चालूं लागलीं. थोर, प्रेमळ, साधे, सरळ असे ते जीवनाचे दोन यात्रेकरू जाऊं लागले. मी त्यांच्याकडे पाहात उभा राहिलों. म्हातारीनें मागें वळून पाहिलें. " जा आतां, " ती म्हणाली. तरी मी तेथें उभाच. पुन्हां तिनें माघारें वळून पाहिलें. तिनें हातानें ' जा ' अशी खूण केली. कारण तिचा आवाज आतां ऐकूं येता ना.

वळलीं दोघेंजणें. मला तीं दिसेनाशीं झालीं. बाहेरच्या डोळ्यांना दिसेनाशीं झालीं. आंतील डोळ्यांना त्यांच्या त्या सुरकुतलेल्या सौम्य स्निग्ध मूर्ति सदैव दिसतच आहेत. मी तेथें झाडाखालीं बसलों. मी क्षणभर सारें विसरलों. तेथें हिरव्या गवतावर मी आडवा पडलों. माझा तेथें डोळा लागला.

मीं तेथें स्वप्न पाहिलें. स्वप्नांत आई पाहिली. परंतु आई अदृश्य होऊन म्हातारबाय दिसूं लागली. "जा आतां श्याम," असें म्हातारबाय पाठीमागें वळून सांगत आहे असें स्वप्नांत ऐकलें. झाडाची एक काटकी डोळ्यावर पडली. मी जागा झालों. मी उठलों. गांवाकडे माझीं पावलें वळलीं. हळूहळू मी चालत होतों. विचारांच्या तंद्रींत मी होतों. गत-स्मृतींच्या साम्राज्यांत होतों. शाळा आली. दोन तास झाले होते. छोटी सुट्टी झाली होती. मी लगबगा घरीं गेलों. पुस्तकें, वह्या घेऊन शाळेंत आलों.

पुन्हां शाळा सुरू झाली. मी माझ्या वहीवर, 'गेली, आजीबाई गेली; चिमणुलीबाय दूर उडून गेली,' असें लिहीत होतों. माझें कशांतहि लक्ष नव्हतें.

मधली सुट्टी झाली. मी खोलींत आलों. मी पडलों. मध्येंच मी डोळे मिटीत होतों, मध्येंच उघडीत होतों. तेथें दोरीवर एक फडका होता. एकदम मला तो दिसला. मी उत्कंठेनें, भावभक्तीनें उठलों. मीं तो फडका घेतला व माझ्या डोक्याला गुंडाळला. पुन्हां सोडून तो हृदयाशीं धरला. नंतर त्या फडक्यानें माझे हात मीं बांधले. त्या फडक्याशीं मी खेळत होतों. शेवटीं पुन्हां तो डोक्याला बांधून मी निजलों.

"श्याम! निजलाससा?" सखारामानें विचारलें.

"सहज," मीं म्हटलें.

"कपाळ का दुखतें? ही कसली घाणेरडी चिंधी बांधली आहेस? माझा मफलर आणून देऊं का?" त्यानें विचारलें.

"नको," मीं म्हटलें.

"सोड हें फडकें. हें वाईट दिसतें," असें म्हणून त्यानें तें फडकें ओढलें.

"राहूं दे रे सखाराम," मीं म्हटलें.

"घामट वास येतो आहे त्याला," तो म्हणाला.

"अत्तराचा वास आहे त्याला," मीं म्हटलें.

" किती डाग पडले आहेत, " तो म्हणाला.

" किती पवित्र आहे, " मीं म्हटलें.

" श्याम ! तूं बावळट आहेस. तूं आज कोठें गेला होतास तें डोक्यावर ओझें घेऊन ! " त्यानें विचारलें.

" थोर, पवित्र माणसांना निरोप द्यायला, " मीं म्हटलें.

" सारीं मुलें तुला हंसत होतीं, " तो म्हणाला.

" परंतु देव हंसत नव्हता, " मीं म्हटलें.

" तो कोठें तुला दिसला ? " त्यानें थट्टेनें विचारलें.

" माझ्या हृदयांत, " मीं शांतपणें म्हटलें.

" वेडा आहेस तूं. ऊठ, वेळ झाली. " असें म्हणून सखाराम निघून गेला. मीं ती चिंधी पुन्हां घेतली. माझ्या मस्तकाभोंवतीं गुंडाळली. म्हातारबायचें तें फडकें होतें. त्यांतच तिनें माझ्यासाठीं पहिल्या दिवशीं पीठ आणलें होतें. तें फडकें जगाला अपवित्र, घाणेरडें होतें. परंतु माझें प्रेम-सर्वस्व त्यांत होतें. माझ्या उशाखालीं तो मळका रुमाल मीं ठेवून दिला. मी शाळेंत गेलों. संध्याकाळीं घरीं आल्यावर साबण लावून लावून तो मळका रुमाल मीं धुतला. तो स्वच्छ झाला. परंतु फाटला. स्वच्छ होण्यासाठीं फाटावें लागतें. पवित्र होण्यासाठीं जळावें लागतें. अंकुरित होण्यासाठीं मातींत गाडून घ्यावें लागतें.

माझ्या ट्रंकेंत ती चिंधी मीं ठेवून दिली. कितीतरी दिवस ती चिंधी माझ्याजवळ होती.

गड्यांनो ! माझ्या जीवनांत असें सहज प्रेम मला ठायीं ठायीं मिळालें आहे. म्हणूनच माझ्या एका श्लोकांत मीं म्हटलें आहे:—

कशास चिंता करिशी उगीच  
जिथें तिथें माय असे उभीच ।  
जिवा कशाला करितोस खंत  
जिथें तिथें हा भरला अनंत ॥

## ३१

त्या दूरच्या गांवींहि मला मातृप्रेमांचा मधुर व पवित्र अनुभव देऊन ती आजीबाई निघून गेली. ती गेल्यानंतर मीं पांचसहा वेळां तुकारामाकडून पीठ आणलें. परंतु प्रत्येक वेळेस माझें मन मला खाई. मला मिंधेपणा वाटे. मला अपमान वाटे. हळूहळू तो प्रकार मीं बंद केला. पूर्वींप्रमाणेंच कसा तरी राहूं लागलों. आतां तुकारामाची व माझी वरचेवर गांठ पडत नसे. मी पीठ नेतनासा झाल्यावर एके दिवशीं तुकाराम माझ्याकडे आला व म्हणाला, "श्याम, अलिकडे तूं कां येत नाहींस?"

"तुकाराम! मला तें मरण वाटतें. मिंधेपणा म्हणजे मरणच नाहीं तर काय? तें पीठ मी घेतों खरा, परंतु माझ्या स्वाभिमानाचें पीठ होतें. नको, तुकाराम, अतःपर तें जगणें नको. तूं रागावूं नकोस. तुझामाझा लोभ आहेच. मी एखादे वेळीं तुझ्या चक्कीकडे येईन, प्रेमानें तुझ्याकडे पाहीन. अंगातोंडावर पीठ उडून भस्म फांसलेल्या शंकराप्रमाणें दिसणारी तुझी मूर्ति पाहीन, तुझा हात हातांत घेईन व निमूटपणें निघून येईन हो. असा खिन्न नको होऊं," मीं म्हटलें.

"तुमच्या मनाला इतके क्लेश होत असतील तर मी कसा आग्रह करूं? परंतु, श्याम, मधून मधून येत जा. या औंधाला कोणी तरी माझें आहे असें मला वाटूं दे. श्याम, अन्न नसल्यामुळें तुम्ही उपवासी राहातां आणि या औंधांत प्रेम मिळत नसल्यामुळें मी उपवासी आहें. तुमच्या शरीराची उपासमार होत आहे आणि आज तीन वर्षें माझ्या मनाची उपासमार होत आहे. श्याम! भेट बरें का. तुला मी मध्येंच 'तुम्ही' म्हणतों, मध्येंच 'तूं' म्हणतों. खरें सांगूं, तुला 'तूं' म्हणावें असेंच वाटतें," तुकाराम माझ्याकडे पाहून म्हणाला.

"होय. तुकाराम, 'तूं' शब्द अधिक प्रेमाचा आहे. 'तुम्ही' शब्द लांबलचक आहे व प्रेमहि त्याच्यापासून लांब जातें. मी तुला भेटायला

येत जाईन. प्रेम व सहानुभूति न मिळाली तर जिवाची कशी तगमग होते तें मी जाणूं शकतों. जा आतां तूं. तुला उशीर होईल," मीं म्हटलें.

तुकाराम गेला. मी शाळेंत गेलों. माझी स्थिति वर्गांतील पुष्कळ मुलांस माहीत होती. एखादे वेळेस रुमालांत बांधून कोणी भाकर घेऊन येई. तर एखादे वेळेस दुसरें कांहीं कोणी आणून देई.

"श्याम! आज शाळा सुटल्यावर आमच्याकडे ये बरें का," काळे नांवाचा विद्यार्थी म्हणाला.

"काय आहे काम?" मीं विचारलें.

"आतां नाहीं सांगत. मग सारी मजा जाईल," तो म्हणाला.

शाळा सुटली व मी काळेबरोबरच त्याच्या खोलींत गेलों. दुसरींहि कांहीं मुलें तेथें आलीं. काळेच्या घरून फराळाचा डबा आला होता. खादी-कार्यक्रम होता! कागद वगैरे पसरण्यांत आले. वाटली डाळ, चकल्या, कोडबें, लाडू वगैरे पुष्कळ पदार्थ होते.

"करा आरंभ," काळे म्हणाला.

"श्याम, घे ना," मोदी म्हणाला.

"श्याम, हा लाडू घे," दुसरा एक म्हणाला.

"लाडू नको. श्याम फार गोड आहे. त्यानें थोडें तिखट झालें पाहिजे. ही चटणी खा रे श्याम," एक मित्र प्रेमानें म्हणाला.

"श्याम, तूं उपाशीच असशील?" काळेनें प्रश्न केला.

"नाहीं कांहीं," मीं म्हटलें.

"मग आज कोणता होता बेत?"

"आज मक्याचे दाणे तव्यावर परतले व पोटभर खाल्ले."

"दुसरें काय होतें?"

"दुसरें कांहीं नाहीं. मी एकच पदार्थ करतों व तो भरपूर खातों," मीं म्हटलें. बोलत बोलत आम्ही त्या सर्व पदार्थांचा केव्हांच फन्ना उडविला. मग इतर गोष्टी बोलत बसलों.

"श्याम, तुझें संस्कृत चांगलें आहे. तूं काय काय वाचलें आहेस?" काळेनें विचारलें.

" तसें मीं पुष्कळ वाचलें आहे. शाकुंतल, विक्रमोर्वशीयम्, भर्तृहरीचीं नीति व वैराग्यशतकें, रघुवंशांतील कांहीं सर्ग, बाणभट्टाच्या कादंबरींतील बराचसा भाग, " मीं म्हटलें.

" बाणाची कादंबरी तर कठीण आहे म्हणतात, " एक मित्र म्हणाला.

" एकदां समासांची मोडणी समजली म्हणजे मग कठीण नाहीं. संस्कृत शब्द सहसा मला अडत नाहीं. शिवाय खालीं संस्कृत टीका असते. माझ्याजवळ सटीक कादंबरी आहे, " मीं म्हटलें.

" हीं पुस्तकें तुम्ही का विकत घेतलींत? " काळेनें विचारलें.

" नाहीं. शाकुंतल माझ्या चुलत भावानें दिलें. बाणाची कादंबरी मीं मामांकडून आणली. बाकीचीं पुस्तकें मावशीनें दिलीं, " मीं म्हटलें.

" तुमची मावशी शिकलेली आहे वाटतें? " मोदीनें विचारलें.

" हो. ती कॉलेजांतहि होती. परंतु परिस्थितीमुळें शिकणें बंद करावें लागलें. ती आतां इंग्रजी शाळेंत शिकविते. तिच्याजवळचीं कितीतरी पुस्तकें मीं आणलीं आहेत, " मीं म्हटलें.

" श्याम, तूं आमच्याबरोबर संस्कृत वाचशील? " काळेनें प्रश्न केला.

" हो. मोठ्या आनंदानें. बाणाची कादंबरी वाचूं. मला ती फार आवडते. छोट्या छोट्या वाक्यांचे जेथें उतारे आहेत तेथें तर फारच मौज वाटते, " मीं म्हटलें.

" श्याम, तुला आम्ही काय देऊं? " एकानें म्हटलें.

" प्रेम, दुसरें काय? " मीं म्हटलें.

" श्याम आहे कवि, " मोदी म्हणाला.

" म्हण रे एखादी कविता, " काळे म्हणाला.

मीं पुढील श्लोक म्हटला:—

'सखा जिवाचा सकळां असावा
तरीच लाभे हृदया विसावा।
सखा सुधासिंधु सखा समस्त
कधीं न त्याचा करि दूर हस्त ॥
सखा जयाला सगळें तयाला
खरें समाधान तदंतराला।

सख्याविणें जीवन हें भयाण
सख्यास जोडा सगळे म्हणून ॥'

"गोड आहेत श्लोक," मोदीनें अभिप्राय दिला.

"श्यामची कवितांची वही पाहिली पाहिजे," एकजणानें सुचविलें.

"आपण संस्कृत केव्हां वाचायचें?" मीं विचारलें.

"तें ठरवूं," काळे म्हणाला.

"मला तुम्ही बीजगणित थोडें सांगा. येथें बरेंच पुढें गेलेलें आहे," मीं भीतभीत म्हटलें.

"मोठ्या आनंदानें. आपण एकमेकां सहाय्य करूं," काळे म्हणाला.

"एकमेकां करूं साहाय्य, अवघे धरूं सुपंथ," मीं म्हटलें.

"तुला पुष्कळ पाठ येतें," मोदी म्हणाला.

"माझ्या पटकन् ध्यानांत राहातें. मी तिकडे कोंकणांत होतों. तेथें कीर्तनकार पुष्कळ वेळां येत. मी कथेला जावयाचा. एकदां एक असेच चांगले कीर्तनकार आले होते. पूर्वरंगांत त्या कीर्तनकारांनीं म्हटलेले कितीतरी श्लोक दुसरे दिवशीं मी शाळेंत म्हणून दाखवावयाचा. सोपीं सोपीं सुभाषितें असत तीं," मीं म्हटलें.

"म्हण त्यांतील एखादा श्लोक," काळे म्हणाला.

'पुण्यस्य फलमिच्छन्ति पुण्यं नेच्छन्ति मानवाः ।
न पापफलमिच्छन्ति पापं कुर्वन्ति यत्नतः ॥'

हा श्लोक मीं म्हणून दाखविला. तो सर्वांनाच आवडला. "आणखी म्हण श्याम, आणखी म्हण," मला आग्रह झाला.

'गतसारेऽत्र संसारे कुतः सौख्यं शरीरिणाम् ।
लालापानमिवांगुष्ठाद् बालानां स्तनवद् भ्रमः ॥'

मीं हा श्लोक म्हटला व त्याचा अर्थहि मीं समजावून दिला.

"श्याम! हे श्लोक तुझ्या कसे लक्ष्यांत राहातात?" एकानें विचारलें.

"ते कीर्तनकार ते श्लोक पुनःपुन्हां घोळून घोळून म्हणत. आणि त्यांचा आवाजहि फार गोड होता म्हणून लक्ष्यांत राहात," मीं म्हटलें.

"येथले आपले महाराजहि कीर्तन करतात," मोदी म्हणाला.

"परंतु त्यांची वाणी मधुर नाहीं वाटत. त्या वाणींत प्रसाद नाहीं वाटत. त्यांच्या वाणींत कठोरता वाटते," मीं म्हटलें.

"पीळदार शरीराप्रमाणें त्यांची वाणीहि पीळदार आहे," काळे म्हणाला.

खोलींत अंधार पडूं लागला. डांसांनीं रात्रींचीं गाणीं सुरू केलीं.

"मी आतां जातों," मीं म्हटलें.

"येत जा, श्याम," काळे म्हणाला.

इतर मुलें तेथेंच बसलीं होतीं. मी निघालों. मी एकटाच टेकडीकडे फिरावयास गेलों. मुलें मला सहानुभूति दाखवीत होतीं. मला आनंद झाला होता. अनेक विचार करीत करीत मी कितीतरी दूर गेलों. शेवटीं माघारा वळलों. माझ्या खोलींत मी आलों. दिवा लावला व वाचीत बसलों. इतक्यांत एकाएकीं सखाराम माझ्या खोलींत आला.

"काय श्याम, झालें का जेवणखाण?" त्यानें विचारलें.

"आज काळे याच्याकडे गेलों होतों. फराळ झाला. पोट भरलें आहे. 'शिवाय भुकी राखे चौथा कोन' अशी म्हणहि आहे," मीं हंसत म्हटलें.

"भुकी तो सुखी," सखाराम म्हणाला.

"त्या दृष्टीनें आपला देश सर्वांत सुखी आहे," मीं खिन्नपणें म्हटलें.

"श्याम! तुला एक विचारायचें आहे. किती दिवस विचारीन, विचारीन म्हणून म्हणत आहें. आज विचारतोंच," तो म्हणाला.

"विचार," मीं म्हटलें.

"तुझें संस्कृत चांगलें आहे," तो म्हणाला.

"मग का क्लास काढूं?" मीं हंसून विचारलें.

"हो," तो म्हणाला.

"सखाराम, संस्कृत साहित्याचा अर्थ मला समजतो, परंतु व्याकरण तितकें माझें चांगलें नाहीं," मीं म्हटलें.

"अरे, क्लास येथें नाहीं काढायचा," तो म्हणाला.

"मग कोठें?" मीं विचारलें.

"पुण्याला नारायण पेठेंत," त्यानें उत्तर दिलें.

"थट्टा रे काय करतोस?" मीं केविलवाणा होऊन म्हटलें.

" श्याम, थट्टा नाहीं. मी गंभीरपणेंच सारें सांगत आहें. पुण्यांत नारायण पेठेंत एक बडे सरकारी अधिकारी आहेत. त्यांच्या घरीं बरींच मुलें आहेत. त्या मुलांना संस्कृत, मराठी शिकवावयाला एक प्रौढ विद्यार्थी पाहिजे होता. तूं तेथें पत्र पाठवून विचारलेंस तर ? खडा मारून पाहावा, जमलें तर देव पावला, नाहीं तर येथें आहेच मक्याची उसळ व गोवारीची भाजी, " सखाराम म्हणाला.

" तुला त्यांची काय माहिती ? " मीं विचारलें.

" अशीच मागें मिळाली होती, " तो म्हणाला.

" ते गृहस्थ उदार आहेत का ? " मीं हलकेच प्रश्न केला.

" तें मला माहीत नाहीं. परंतु ते फार धार्मिक आहेत, " सखाराम म्हणाला.

" फार धार्मिक असणाऱ्या मनुष्याची मला भीति वाटते. साधारणपणें कर्मठ माणसें अनुदार असतात. गंध, भस्म, टिळे, माळा, हृदयाला मारतात, " मीं म्हटलें.

" अनुभव घेऊन बघ, " सखारामानें सुचविलें.

" अरे, माझे हे वाढलेले केस पाहूनच ते संतापतील. जुन्या मंडळीस गोटा पाहिजे, " मीं म्हटलें.

" हें बघ, येथें बसून तर्क करण्यांत अर्थ नाहीं, " सखाराम म्हणाला.

" बरें तर, मी विचार करतों, " मीं म्हटलें.

सखाराम निघून गेला. माझें वाचन संपलें. विचारांची तंद्री सुरू झाली. माझें मन व्यग्र झालें. मनांत आशानिराशांचा नाच सुरू झाला. खरोखर अशी व्यवस्था लागली तर किती छान होईल ? कोणाचा मग मिंधेपणा नाहीं. मुलांना मी किती तरी गोष्टी सांगेन, किती तरी स्तोत्रें शिकवीन. मी त्यांच्याकडे इतरहि काम करीन. स्वाभिमानानें, श्रमानें जगेन. लिहूं का पत्र ? नारायण पेठ ! माझे मामा त्याच पेठेंत आहेत. पळून जाणारा श्याम कष्टानें विद्या मिळवीत आहे हें पाहून त्यांना आनंद होईल. पुण्याजवळच हिंगण्यास मावशी व तेथें धाकटा भाऊ, त्यांना वरचेवर भेटावयास मिळेल. आणि राम ! पुण्यालाच माझा राम होता. पुन्हां आम्ही एका शाळेंत एकत्र बसूं, हंसूं, खेळूं. आणि तो

तुळशीबागेंतील नयनमनोहर राम ! त्याचेंहि मी रोज दर्शन घेईन. पाठवूं का पत्र ? येईल का होकार ? कवितामय पत्र पाठविलें तर ? आणि संस्कृतच श्लोक करून पाठविले तर ?

शेवटीं माझा निश्चय झाला. कागद पेन्सील मीं घेतलीं. मी संस्कृत श्लोक रचूं लागलों. पुष्कळ प्रयत्नांनीं मीं श्लोक तयार केले.

‘भवत्पदाब्जं शिरसा प्रणम्य
विनम्रवृत्त्या खलु प्रार्थयेऽहम्
अकिंचनोऽहं सुभृशं सुदीनः
परंतु विद्यार्जनकामकामी ॥
उदार किंचित् क्रियतां मदर्थे
भवत्कुमारान् वितरामि विद्याम्
कुटुंबसेवामितरां करिष्ये
भवान् यदाज्ञापयति प्रसंगे ॥
समुन्नतं तद् भवदन्तरंगं
ममोपरि प्रेमदयां करोतु
भवन्निवासे निवसन् करिष्ये
नियुक्तसेवां च लभेय विद्याम् ॥

मीं संस्कृत श्लोक तयार केले. ते निर्दोष आहेत असें वाटलें. त्यांत एक दोन चुका होत्या; परंतु त्या वेळेस त्या माझ्या लक्ष्यांत आल्या नाहींत. ते श्लोक मीं पुन्हां पुन्हां वाचले. एक पत्रहि लिहिलें. त्यांत ते श्लोक घातले. पत्र पाकिटांत घालून ठेवलें. वेळ किती झाला तें कळलें सुद्धां नाहीं. दोन वाजून गेले होते. मी बाहेर आलों. वारा नव्हता, तरी जरा गारवा होता. जवळच्या तुरुंगांत आलबेल झाली. मी पुन्हां खोलींत गेलों व दिवा मालवून अंथरुणावर पडलों. मी जणूं स्वप्नसृष्टींत होतों. पुण्याच्या पुण्यमय व प्रेममय वातावरणांत होतों.

शेवटीं एकदांचें उजाडलें. सखारामाकडे जाऊन त्याला तें पत्र दाखविलें. पत्र व कविता वाचून त्याला आनंद झाला. “तुझें काम नक्की होणार,” असें तो म्हणाला. त्यानें पत्ता लिहिला. मी कांपऱ्या हातानें तें पत्र पोष्टांत टाकून आलों.

संग्रहालय अनुक्रम विभाग क्रमांक नों. दि वाचनालय

त्या पत्राच्या उत्तराची मी किती उत्कंठेनें वाट पाहात होतों ! एकदांचें उत्तर आलें. पुण्याचा छाप होता. तें पत्र रामचें नव्हतें, मावशीचें नव्हतें. निराळें हस्ताक्षर होतें. मीं तें पत्र फोडलें, वाचून मुखावर आनंद झळकला.

'आमच्या मुलांना शिकवा, तुमची कांहीं तरी व्यवस्था करूं,' असा मजकूर होता. मोघम मजकूर. परंतु मला तो मोघम वाटला नाहीं. मीं तें पत्र सखारामाला दाखविलें. गोविंदासहि दाखविलें. गोविंदा अधिक व्यवहारज्ञ. तो म्हणाला, "शाळेंतून आधीं नांव काढूं नये. पुण्यास जाऊन कसें काय जमतें तें पाहावें. मागून दाखला मागवतां येईल. जाण्याची फार वाच्यताहि करूं नये, निमूटपणें जावें."

त्याच रात्रीं जावयाचें मीं ठरविलें. एकनाथ, वामन, मुजावर, दाजीबा या सर्वांचीं मीं प्रेमानें भेट घेतली. द्रुपदीच्या आईच्या पायां पडलों.

"श्याम, तुला यश येवो !" एकनाथ म्हणाला.

"नाहीं जमलें तर परत ये. आम्ही भाकर देत जाऊं," मुजावर म्हणाला.

"श्याम, तावडतोब पत्र पाठव," सखारामानें सांगितलें.

"वानवडीला पलटणींत जाऊन माझ्या मुलाला भेट हां, श्याम," द्रुपदीची आई म्हणाली.

"द्रुपदीच्या आई ! सध्यां महायुद्ध सुरू आहे. भेटूं देतील कीं नाहीं सांगतां येत नाहीं. मी प्रयत्न करीन," मीं म्हटलें.

"श्याम ! तूं होतास तर कशीं छान पत्रें लिहीत असस, आलेलीं वाचून दाखवीत असस. आमची आठवण ठेव," ती म्हणाली.

द्रुपदीच्या हातांत मीं एक आणा दिला. तिनें तो घट्ट धरून ठेवला. ट्रंक, वळकटी घेऊन मी व सखाराम निघालों. टपालाच्या गाडींत एक स्वारी सांगून ठेवली होती. गोविंदाहि आला. तो कांहीं बोलला नाहीं. एकमेकांनीं हात हातांत घेतले. सखारामाला खूप वाईट वाटत होतें. त्याच्याच पत्रावरून मी औंधला आलों होतों. माझ्या बोर्डिंगची व्यवस्था

झाली नाहीं म्हणून तो कष्टी असे. पुण्याची ही नवीन आशा त्यानेंच आणली होती.

" सखाराम ! मी आतां जातों. मी तुझ्याजवळ भांडलों, रागावलों, रुसलों. तुझें मन अनेकदां दुखविलें असेल. क्षमा कर. श्याम म्हणजे संयमहीन प्राणी. क्षणांत गोड बोलेल, क्षणांत रागावेल. क्षणांत हंसेल, क्षणांत रडेल. मी एकदम संतापतों, चिडतों, खिन्न होतों. सारें विसर व गोड तें आठव, " मी त्याचा हात हातांत घेऊन म्हटलें.

" श्याम, तूं कसाहि असलास तरी अंतरीं चांगलाच आहेस. सर्वांना तूं चटका लावतोस, मनें ओढतोस, हृदयें जोडतोस. द्रुपदीची आई तुझ्यासाठीं रडली. मी उद्यां येथून निघालों तर माझ्यासाठीं कोण रडेल? जा, श्याम, पुन्हां भेटूंच, " तो म्हणाला.

" श्याम, तुझी रोज आठवण येईल ! " गोविंदा म्हणाला.

" तेंच माझें जीवन," मीं म्हटलें.

वेळ झाली, शिट्टी झाली. इतक्यांत पाऊस पडूं लागला.

" पाऊस म्हणजे शुभ शकुन," सखाराम म्हणाला.

" संस्कृतांत त्याला दुर्दिन म्हणतात, " मीं म्हटलें.

" अरे, आतां सारी उलथापालथ व्हावयाची आहे. जुन्या लोकांना जें बरें वाटतें तें आपणांस बुरें वाटेल. त्यांना जें त्याज्य वाटतें तें आपणांस ग्राह्य वाटेल, " भविष्यज्ञ सखाराम म्हणाला.

" श्याम ! मनांत वेडेंवांकडें आणूं नकोस, " गोविंदा म्हणाला.

" मी आशेनें जातों, " मीं म्हटलें.

चाबूक वाजला. घोडे निघाले. मित्र माघारे गेले. रात्रींची वेळ होती. पाऊस चांगलाच पडूं लागला. झड सुरू झाली. मेणकापडाचे पडदे सोडण्यांत आले, तरी पाणी आंत येतच होतें. मी गारठून गेलों. देवानें सारें मंगल करावें म्हणून मी मनांत गणपति अथर्वशीर्ष म्हणूं लागलों. जणूं आपलें मंगल कार्य त्या सर्वज्ञ ईश्वराला कळतच नाहीं ! आपण सारे वेडे आहोंत. आमच्या प्रार्थनांनीं का देव आपले विचार बदलील? प्रत्येकाची प्रार्थना जर देव मान्य करूं पाहील तर अनवस्था प्रसंगच यायचा. कुत्रीं म्हणतील, 'देवा, हाडांचा पाऊस पाड;' डुकरें म्हणतील,

'विष्ठेचा पाऊस पाड;' हंस म्हणतील, 'मोत्यांचा पाऊस पाड;' बेडूक म्हणतील, 'चिखलाचा पाऊस पाड.' देवानें करावें तरी काय ?

शेवटीं रहिमतपूर स्टेशन आलें. पहांटेच्या सुमारास गाडी होती. तसाच ओलेत्यानें मी बसलों होतों. ओले कपडे मला कधीं बाधत नाहींत. पहांट झाली. आगगाडी आली. मी गाडींत बसलों. माझे ओले कपडे शेजारच्या गृहस्थांच्या अंगाला लागले. ते रागावले.

"जरा दूर बसा हो. ओले कपडे नि खेटून काय बसतां ?" ते म्हणाले.

"गर्दी आहे महाराज. खेटून बसण्याची माझी इच्छा नाहीं. तुमचे ते इस्तरीचे कपडे माझ्या अंगाला लागावेत अशी मला मुळींच इच्छा नाहीं," मीं म्हटलें.

"मग तेथें दारांत उभा राहा," ते पुन्हां म्हणाले.

"तेथेंहि गर्दी आहे," मीं म्हटलें.

"जाऊं द्या हो, काय त्या मुलाला दटावतां राव ?" कोणी तरी त्या पोषाखी सरदाराला म्हटलें. पोषाखी सरदार कांहीं तरी पुटपुटले. मी खिडकीच्या बाहेर तोंड काढून बसलों. लहानपणीं माझ्या डोळ्यांत कण गेला होता तें आठवलें. माझ्या डोळ्यांतील कण प्रेमानें काढणारा तो माधव आठवला. आगगाडींत भेटणारा तो माधुर्यमूर्ति माधव! त्यावेळेस माधव भेटला, आज हे पोषाखी सरदार भेटले. माधवाची आठवण येऊन मला भरून आलें. पूर्वेकडे तांबडें फुटत होतें. हळूहळू सूर्य वर येत होता. माझ्या स्मृतींतून माधव वर येत होता. माधव आठवला, अहंमद आठवला. औंधचे मित्र डोळ्यांसमोर आले. मी माझ्या मित्रांची प्रेमस्मरण भूपाळी प्रातःकाळीं म्हणत होतों.

मी औंधला गेलों होतों, त्यावेळेस रात्र होती. आतां सकाळ होती. मी प्रदेश पाहात होतों. जेजुरीचा खंडोबा गाडींतून दिसला. मीं प्रणाम केला.

'आठादिशीं आदितवार । नाहिं मला आठवला ।
देव भंडारा खेळला । जेजुरीचा ॥'

ही बायकांची ओवी पुण्याला मामांकडे असतांना मीं ऐकली होती. जेजुरीच्या जवळच मोरगांव हें गणपतीचें पवित्र स्थान. लहानपणचा श्लोक मला आठवला:—

‘ करेच्या तिरीं क्षेत्र तें मोरगांव
तिथें नांदतो मोरया देवराव ।
तयाचें जपे नाम जो नित्य वाचे
सदा पूर्ण होतात हेतू तयाचे ॥ ’

करा नदीच्या तीरावरचा तो मोरेश्वर माझे हेतु सफळ करील का असा विचार माझ्या मनांत आला. हेतु पूर्ण होवोत वा न होवोत, ‘ देव करतो तें बऱ्यासाठीं, ’ हे आईचे एका वेळचे श्रद्धामय शब्द माझ्या मनांत उभे राहिले. आईची आठवण आली. मी केव्हां बरें आईला भेटेन असें मनांत येऊन मी गहिंवरलों. मला रडूं येऊं लागलें.

“ कां रे रडतोस ? ” एकानें विचारलें.

“ आईची आठवण येऊन, ” मीं म्हटलें.

“ तुझी आई नाहीं का ? ” पुन्हां प्रश्न आला.

“ आहे. माझी आई आहे. ती लांब आहे. कोंकणांत आहे, ” मीं म्हटलें.

स्टेशनें येत होतीं, जात होतीं. माझ्या शेजारच्या इस्तरीवाल्यानें फराळाचा डबा काढला. त्यानें डबा सोडला. तो मला देऊं लागला.

“ नको, ” मीं म्हटलें.

“ कां ? ” त्यानें विचारलें.

“ तुम्ही मला भिकारी समजतां ? ” मीं म्हटलें.

“ नाहीं. मी तुला श्रीमंत समजत आहें, ” तो म्हणाला.

“ थट्टा आहे ही, ” मीं म्हटलें.

“ आईची आठवण येऊन रडणारा श्रीमंतच आहे. माझ्या आईचा फोटो मी नेहमीं खिशांत ठेवीत असतों, ” तो म्हणाला.

“ कांहीं वेळापूर्वी त्यालाच का तुम्हीं वंदन केलें ? ” मीं विचारलें.

“ हो, ” असें म्हणून त्यानें आपल्या आईचा तो फोटो मला दाखविला. मीं तो हातांत घेतला. मीं माझा माथा नमविला. क्षणभर डोळे मिटले. मीं तो फोटो भक्तिभावानें परत दिला. त्यानें भक्तिभावानें खिशांत ठेवला.

“ घ्या, आतां. खा, ” तो म्हणाला.

मी फराळ करूं लागलों. प्रत्येकाच्या हृदयांत पूज्यबुद्धि आहे, भक्तिभाव आहे. त्याशिवाय मनुष्य जगूंच शकणार नाहीं. आपण बाहेरून कितीहि ओबडधोबड, अहंकारी, उन्मत्त दिसलों तरी आपलें हृदय कोठेंतरी भक्तिभावानें लवत असतें, आपलें शिर कोठेंतरी नमत असतें.

पुणें जवळ येऊं लागलें. चोरांची आळंदी आली. एक देवाची आळंदी, एक चोरांची आळंदी! केवढा फरक! एक भक्तिभावासाठीं प्रसिद्ध, तर एक दुष्कृत्यांसाठीं प्रसिद्ध! परंतु त्या चोरांच्या आळंदीस अंजीर फारच छान होतात. 'येथील फळें प्रसिद्ध आहेत,' असें गाडींत कोणीतरी बोलला. मला अर्थात् कांहींच माहिती नव्हती.

माझें लक्ष आतां पुण्याकडे लागलें. स्टेशन आलें. मीं एक टांगा ठरविला. नारायण पेठेंत तें घर शोधीत आलों. मी सामान घेऊन वाड्यांत शिरलों. तेथें देवडीवर भय्या होता. त्यानें हटकलें.. मी उभा राहिलों. मला आलेलें पत्र मीं त्याला दाखविलें. तो भय्या तें पत्र घेऊन आंत गेला. एक धीरगंभीर मूर्ति बाहेर आली. त्यांनीं चौकशी सुरू केली.

"तुम्ही काय शिकवाल?" त्यांनीं प्रश्न केला.

"मराठी, संस्कृत, थोडें इंग्रजी," मीं म्हटलें.

"आमच्या मुलांबरोबर मराठी पुस्तकें वाचा. संस्कृत श्लोक, स्तोत्रें शिकवा. रोज सकाळीं तास दीड तास येत जा," ते म्हणाले.

"मी तुमच्याकडे राहूं ना?" मीं विचारलें.

"येथें राहावयाची सोय होणार नाहीं. तुम्हांला मुलांजवळ वाचण्याबद्दल, त्यांना कांहीं शिकविण्याबद्दल तीनचार रुपये देत जाऊं," ते म्हणाले.

"पुण्यासारख्या शहरांत मी कोठें राहाणार, कोठें जेवणार, कसें एवढ्यानें माझें होणार?" मीं म्हटलें.

"तें तुमचें तुम्ही पाहा." असें म्हणून ते वर निघून गेले.

इतक्यांत घरांतून एक पोक्त बाई बाहेर आली.

"जेवला आहेस का रे तूं?" तिनें विचारलें.

"मी स्टेशनवरून एकदम येथेंच आलों," मीं म्हटलें.

"त्या नळावर अंघोळ कर व जेव ये," ती म्हणाली.

मी रडवेला झालों होतों. त्या गृहस्थांनीं मला सर्व स्पष्ट खुलासा पत्रांत केला नाहीं म्हणून वाईट वाटलें. मला त्यांचा राग आला. केवढा होता तो वाडा! दगडी प्रचंड हवेली होती ती! त्या दगडी हवेलींत राहून त्यांचें मन का दगडाचें झालें होतें? तेथें का मला राहायला जागा देतां आली नसती? तेथें कुत्र्यांना जागा होत्या. परंतु माणसांना नव्हत्या. मीं माझे कपडे काढून तेथें एका खांबाजवळ टेवले. मीं नळावर स्नान केलें. धोतर धुऊन तेथें वाळत घातलें.

मी घरांत गेलों. आचमनें घेतलीं व जेवायला बसलों.

"औंधहून आलेत तुम्ही?" एका मुलीनें विचारलें.

"हो," मीं म्हटलें.

"तेथें कोण होतें तुमचें?" तिनें विचारलें.

"कोणी नाहीं," मीं म्हटलें.

"तुझे आईबाप नाहींत का?" त्या पोक्त बाईनें विचारलें.

"आहेत. ते कोंकणांत असतात," मीं म्हटलें.

"आणखी हवी का पोळी? पोटभर जेव," ती माउली म्हणाली.

माझें जेवण झालें. धोतर वाळलें नव्हतें. मी तेथें ओसरीवर फेऱ्या घालीत होतों. शेवटीं तेथील सतरंजीवर मी जरा पडलों. माझा डोळा लागला. परंतु फार वेळ झोंप लागणें शक्य नव्हतें. आणि झोंपलों असतों तर त्यांनीं मला नांवें ठेविलीं असतीं. मी जागा झालों. माझ्या कानावर घरांतील शब्द पडले.

"गरीब दिसतो मुलगा. येथें राहिला म्हणून काय झालें?" ती माउली म्हणाली.

"दूर असतील तेवढे बरे. माझा अशा मुलांवर विश्वास नसतो. चोरहि निघावयाचे," तो अधिकारी म्हणाला.

"तुम्हाला सारे चोरच दिसतात. तुमचें खातेंच चोरांचें. पोलीस खात्यांतील लोकांना जगांत सर्वत्र संशयच दिसावयाचे," ती म्हणाली.

"मला वेळ नाहीं. त्याला येथें ठेवूं नये असें मला वाटतें. सकाळीं तासभर म्हणावें येत जा. तीन चार रुपये देऊं," असें म्हणून पुन्हां तो गृहस्थ वर गेला. बूट–सूट, हॅट वगैरे पोषाख करून ते खालीं आले.

मोटारींत बसून गेले. मी तेथेंच उभा होतों. ते पुन्हां मजजवळ बोलले नाहींत. त्यांनीं आपलें आवडतें कुत्रें मोटारींत घेतलें होतें.

माझें धोतर वाळलें. मीं तें बांधून ठेवलें.

" माझें सामान येथें असूं दे. मी एका मित्राला भेटून येतों," मीं तेथील भय्याला म्हटलें.

" अच्छा, जाव," तो म्हणाला.

मी रामकडे जावयास निघालों. रामला भेटावयास मी अधीर झालों होतों. शनवारांत राम राहात होता. त्याच्या घरीं मी गेलों. सारीं भावंडें शाळेंत गेलीं होतीं. रामची आई फक्त घरीं होती. मीं नमस्कार केला.

" मला ओळखलेंत का ?" मीं विचारलें.

" श्याम ना तूं ?" त्या म्हणाल्या.

" हो," मीं म्हटलें.

" आतां कोठून आलास ? औंधला ना तूं असतोस ? तुझीं रामला पत्रें येतात, तीं तो वाचून दाखवतो. तुझीं पत्रें मला आवडतात. बस. असा उभा कां ?" रामची आई प्रेमानें बोलूं लागली.

इतक्यांत रामचा मोठा भाऊ कॉलेजांतून घरीं आला. मला पाहून तो आश्चर्यचकित झाला.

" तूं रे इकडे कोठें ? पुण्यांत तर प्लेग वाढतो आहे !" त्यानें विचारलें.

" पुण्यास शिकण्याची व्यवस्था होते का हें पाहाण्यासाठीं मी आलों आहें," मीं म्हटलें.

मी रामच्या भावाबरोबर माडीवर गेलों. तेथें आम्ही दोघे बोलत बसलों. मीं थोडक्यांत त्याला सर्व हकीगत सांगितली. मी मुकाट्यानें तेथें बसलों होतों.

" श्याम ! तूं अगदीं वेळेवर आलास बघ. मला कविता करून दे. मला एका मित्राला पाठवायच्या आहेत. त्याचें अभिनंदन करायचें आहे." एकाएकीं तो म्हणाला.

" सध्यां मी कविता करण्याच्या वृत्तींत नाहीं. मी सचिंत आहें, अनंता," मीं म्हटलें.

अनंता खालीं खाण्यासाठीं गेला. मी तेथेंच बसलों होतों. नंतर माझ्या रामच्या खोलींत मी गेलों. तेथलीं पुस्तकें चाळूं लागलों. माझीं पत्रें तेथें

होतीं. मींच लिहिलेलीं तीं प्रेमळ पत्रें मीच पुन्हां वाचीत होतों. मी घड्याळाकडे पाहात होतों. खिडकींतून शाळा सुटून मुलें येऊं लागलीं का तें पाहात होतों. मुलें दिसूं लागलीं. परंतु राम कोठें आहे? शेवटीं रामहि दिसला. मी खालीं बसलों.

रामनें आल्याबरोबर माझ्या पाठींत थापटी मारली. मी कांहीं बोललों नाहीं.

"केव्हां आलास? आधीं पत्र नाहीं, कांहीं नाहीं," राम म्हणाला.

"अकस्मात् येणार येऊन जातो. एकदम येण्यांत मौज आहे. अकल्पित घडण्यांत एक विशेष आनंद असतो," मीं म्हटलें.

"चल खालीं. आपण कांहींतरी खाऊं." असें म्हणून रामनें माझा हात धरून खालीं नेलें.

रामचे इतर तीन धाकटे भाऊ, एक पाठची बहीण, सारीं तेथें होतीं. आईनें सर्वांना खायला दिलें. राम व मी एका ताटांत बसलों. पोळी व भाजी खाणें झालें. नंतर राम व मी बराच वेळ बोलत होतों.

"आमच्या येथें राहा तूं. आम्ही इतके आहोंत त्यांत तूं एक," राम म्हणाला.

"खरेंच श्याम! तूं राहा आमच्याकडे," रामचा धाकटा भाऊ म्हणाला.

"मग पुण्याला राहावयाचें ठरवूं?" मीं विचारलें.

"हं. ठरव," राम म्हणाला.

माझ्या इतर अडचणी मी रामजवळ बोललों नाहीं. श्यामला कांहींतरी धरून मदत मिळेल. ही शिकवणी आहे. श्याम खानावळींत जेवील. येथें राहील. असें राम समजत होता. परंतु शिकवणीच्या तीनचार रुपयांत माझें सारें कसें भागणार? फी व खानावळ दोन्ही गोष्टी कशा निभणार? तें त्या भावंडांच्या लक्षांत आलें नाहीं.

"बरें मी जातों. त्यांच्याकडून सामान घेऊन येतों," मीं म्हटलें.

मी निघालों. परंतु परत न येण्यासाठीं जात होतों. श्याम आतां येणार असें रामला वाटत होतें. परंतु श्याम निघून जाणार होता. दूर जाणार होता. माझ्या मनाची प्रक्षुब्धता पराकोटीला गेली होती. मला पुढचें कांहीं एक दिसत नव्हतें. एका गृहस्थाला रस्त्यांत मीं धक्का दिला.

"अहो, जरा बघून चला कीं," ते गृहस्थ म्हणाले.

"तुम्हीहि तेंच करा," मींहि संतापानें म्हटलें.

मला थांबायला व भांडायला वेळ नव्हता. मी त्या दगडी वाड्यांत गेलों. वाड्यांत दिवे लागले होते. कुत्रें भुंकूं लागलें. भय्यानें त्याला गप्प केलें. कुत्र्याच्या भुंकण्यामुळें घरांतील ती माउली बाहेर आली.

"मी जातों सामान घेऊन," मीं म्हटलें.

"मग येशील ना मुलांना शिकवायला?" तिनें विचारलें.

"सकाळीं कळवीन," मीं म्हटलें.

"झाली का राहायची सोय? नाहींतर रात्रभर राहा येथें हो. मी त्यांना सांगेन बरें बाळ," ती पुन्हां म्हणाली.

तो 'बाळ' शब्द मला रडविता झाला. मीं माझी वळकटी खालीं ठेवली व त्या माउलीच्या पायां पडलों.

"ये हो उद्यां. तुझें नांव काय?" तिनें विचारलें.

"श्याम," मीं म्हटलें.

मीं एक टांगा करून आणला. त्यांत बसलों. परंतु कोठें जावयाचें!

"कोठें जायचें रावसाब?" टांगेवाल्यानें विचारलें.

"स्टेशन," मीं एकदम म्हटलें.

टांगा स्टेशनकडे निघाला. 'मी औंधला परत जातों' असें मीं स्पष्टपणें कोणासच सांगितलें नाहीं. रामला येथें राहातों म्हणून सांगितलें. त्या श्रीमंत घरीं उद्यां सकाळीं काय तें सांगेन म्हणून म्हटलें. मी भित्रा आहें. एकदम स्पष्टपणें सांगण्यास मी भितों. शिवाय माझे विचार इतक्या भराभरा बदलतात कीं त्यांचा कांहीं नेमच नसतो. माझ्या या स्वभावामुळें अनेकांची कुचंबणा होते. मी फसव्या आहें असा माझ्यावर आरोप करण्यांत येतो. परंतु मी हेतुपुरःसर फसवीत असतों असें नाहीं. परंतु कांहींना असें वाटलें तर त्यांत त्यांचा तरी काय दोष?

मी स्टेशनवर येऊन बसलों. पुन्हां औंधला जावयाचें! परत जाणें म्हणजे फजीति होती. मी पुण्यास गेलों हें सर्वांना कळलेंच असेल. सारे मला प्रश्न विचारूं लागतील. औंधला जाण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. मी तेथें स्टेशनांत बसून राहिलों. गाडीला बराच अवकाश होता. अद्याप

तिकिट सुरू झालें नव्हतें. खूप गर्दी होती. इतक्यांत एक मनुष्य माझ्याजवळ आला. तो शेजारीं बसला.

"कोठें जायचें तुम्हाला?" त्यानें विचारलें.

"कांहीं ठरलें नाहीं," मीं म्हटलें.

"ठरल्याशिवाय स्टेशनवर आलेत?" त्यानें आश्चर्यानें विचारलें.

"मला देवाकडे जायचें आहे," मीं म्हटलें.

"पंढरपूरला येतां? मी पंढरपूरचा आहें. चला माझ्याबरोबर," तो म्हणाला.

"तुम्ही का पंढरपूरला जाणार?" मीं विचारलें.

"माझेंहि कांहीं ठरलेलें नसतें. मी वाऱ्यासारखा आहें. माझें सामान वगैरे कांहीं नसतें. घेतलें धोतर कीं निघाला," तो म्हणाला.

"मला किती तरी वर्षांपूर्वी असाच एक मित्र आगगाडींत भेटला होता. तो असेंच म्हणे. तुम्ही दुसरे," मीं म्हटलें.

"मग येतां का पंढरपूरला?" त्यानें विचारलें.

"किती असेल तिकिट?" मीं प्रश्न केला.

"तीनचार रुपये पडतील," तो म्हणाला.

"येतों मी. केव्हां आहे ती गाडी?" मीं विचारलें.

"आतां तिकिट सुरूच आहे. द्या पैसे. मी काढतों दोघांचीं," तो म्हणाला.

मीं पांच रुपयांची नोट त्याच्याजवळ दिली. तो गृहस्थ गेला. गर्दींत घुसला. मी नळावर पाणी वगैरे प्यालों. पंढरपुरास जाऊं व रामराम म्हणत बसूं असें मनांत मी ठरवूं लागलों. चंद्रभागेचें स्नान करावें, भिक्षा मागावी, रामराम म्हणावें. अगदीं लहानपणचे विचार पुन्हां जोरानें उसळले. मी विचार करीत बसलों. मी तो मुशाफर वगैरे सारें विसरून गेलों. इतक्यांत घणघण घंटा झाली. मी भानावर आलों. तो तिकिट काढून आणणारा कोठें आहे? कधीं येणार तो? अजून कसा आला नाहीं? मी तिकिटाच्या खिडकीजवळ गेलों. तेथील घोळक्यांत तो मनुष्य दिसेना. मी इकडे तिकडे पाहूं लागलों. त्याचा पत्ता नाहीं. कां बरें देव मला असा रडवीत आहे? मी पंढरपूरच्या पांडुरंगाच्या विचारांत होतों.

परंतु पांडुरंग एकाकडून माझी प्रतारणा करवीत होता. माझी का जगांत सर्वत्र फजीतीच व्हावयाची आहे? कुठेंहि मला यश मिळावयाचें नाहीं असेंच का माझ्या नशिबीं आहे? मी माझ्या ट्रंकेजवळ आलों. मी रडूं लागलों. परंतु रडून काय होणार?

औंधच्या गाडीची वेळ होत आली. मजजवळ जेमतेम औंधला जाण्यापुरते पैसे होते. सखारामजवळून दहा रुपये उसने घेतले होते. कोठून देऊं आतां मी पैसे? उगीच जाणें येणें झालें. हे पांच रुपये पांडुरंगार्पण झाले. कसें होणार माझें? मी अगदीं अगतिक झालों. मीं रहिमतपूरचें तिकिट काढलें. सदर्न मराठा गाडींत जाऊन बसलों. निघाली गाडी. मी नेहमींप्रमाणें खिडकींतून तोंड बाहेर काढून बसलों होतों. गार वारा येत होता. गार वारा म्हणजे माझा परमानंद. तो वारा आपल्या शीतल स्पर्शानें माझ्या तप्त मस्तकाला शांत करीत होता.

माझ्याजवळ पलटणींतील दोन चार शिपाई बसले होते.

"खिडकी बंद कर," शिपाई मला म्हणाला.

"मी बंद करणार नाहीं," मीं म्हटलें.

"बंद कर," तो ओरडून म्हणाला.

"नाहीं करणार," मीहि गर्जलों.

तो शिपाई रागानें उठला व त्यानें खिडकी बंद केली. मीं ती पुन्हां उघडली.

"अरे भाई! बंद कर. माझी प्रकृति बरी नाहीं," तो म्हणाला.

मी त्याच्याकडे बघत होतों. मी क्रोधानें थरथरत होतों. सारें जग जणूं आपल्याविरुद्ध कट करीत आहे असें मला वाटलें. मी पुन्हां खिडकींतून बाहेर पाहूं लागलों. थोड्या वेळानें काय असेल तें असो मीं खिडकी बंद केली.

"आतां कां बंद केलीस?" त्यानें विचारलें.

"तुमचा हट्ट कमी झाला म्हणून," मीं म्हटलें.

"अरे, आम्ही सरकारचे शिपाई. आमची प्रकृति नीट राहिली पाहिजे. आम्हांला उद्यां लढायचें आहे. शिपायाची काळजी आधीं घेतली पाहिजे." तो म्हणाला.

" शिपायांशिवाय तुमचें कसें चालेल ? " दुसरा म्हणाला.

" तुम्ही लेखणीवाले काय उपयोगाचे ? " तिसरा म्हणाला.

" तरवारीपेक्षां लेखणी अधिक महत्त्वाची आहे. लेखणी आज्ञा करील तिकडे तुम्ही तरवारी घेऊन जाल. तरवार स्वतः निरुपयोगी आहे. विचार हा तरवारीपेक्षां थोर आहे, " मीं म्हटलें.

राग मावळून असें प्रेमाचें आमचें बोलणें चालणें सुरू झालें. त्या शिपायांनीं मलाहि निजावयास जागा दिली. मी जागा झालों तेव्हां ते शिपाई तेथें नव्हते. ते कोठें उतरले कळलें नाहीं. द्रुपदीच्या आईच्या मुलाची मला आठवण झाली. त्या शिपायांत तर तो नसेल ? तो असेल त्यांतला म्हणूनच त्यानें मला सहानुभूति दाखविली. मी त्यांचें नांव, गांव विचारलें नाहीं म्हणून मला वाईट वाटलें. मी पुन्हां झोंपलों तों रहिमतपूर स्टेशनवरच जागा झालों.

पुन्हां एक बैलगाडी करून मी औंधला आलों. शाळा सुरू होती. मी निमूटपणें माझ्या खोलींत गेलों.

" श्याम, आलाससा ? " द्रुपदीच्या आईनें विचारलें.

" पुण्यास जमेना, " मीं खिन्नपणें म्हटलें.

" येथेंच राहा. कशाला कुठें जातोस ? " ती म्हणाली.

मीं खोली झाडली. घोंगडी पसरली. मशिदींतील विहिरीचें पाणी आणलें. हातपाय धुतले. मी झोंपीं गेलों.

शाळा सुटल्यावर सखाराम, एकनाथ, मुजावर सारे माझ्या खोलींत आले. मीं थोडक्यांत सारें सांगितलें.

" श्याम, कांहीं हरकत नाहीं. वाईट नको वाटून घेऊं, " एकनाथ म्हणाला.

" आम्ही तुला होईल ती मदत करूं, " मुजावर म्हणाला.

" बाकी श्याम, तूं बावळटच. त्या लफंग्याजवळ पैसे कसे दिलेस ? " सखारामानें विचारलें.

" मला काय आधीं माहीत तो लफंग्या आहे म्हणून ? " मीं म्हटलें.

" या कलियुगांत जगावयास तुझ्यासारखे लोक नालायक आहेत, " तो म्हणाला.

"या कलियुगांतच माधव, अहमद, राम, मुजावर, तूं, गोविंदा, एकनाथ मला मिळत आहेत. या कलियुगांतच आजीबाई भेटली. कलियुगाला नांवें नको ठेवूं. इतर युगांइतकेंच कलियुग पवित्र आहे," मीं म्हटलें.

"श्याम, आज आमच्याबरोबर भाकर खायला ये. मी एक भाकर अधिक भाजतों," एकनाथ म्हणाला.

मित्र गेले. एकनाथ फारच सुंदर भाकर भाजी. एकनाथ व वामन दोघे भाऊ. दोघे माझ्याच वर्गांत होते. दोघे हातानें स्वयंपाक करीत. रहिमतपूर स्टेशनच्या जवळच त्यांचें गांव होतें. मी एकनाथाच्याकडे गेलों. बेसन भाकर खाल्ली.

"श्याम, तूं रोज आमच्याकडेच जेवायला येत जा ना," एकनाथ म्हणाला.

"मागें वडील आले होते, त्यांना आम्हीं विचारलें होतें," वामन म्हणाला.

"एकनाथ, एखादे वेळेस येत जाईन," मीं म्हटलें.

"पण संकोच कसला? तुझी एक भाकर टाकीत जाऊं," एकनाथ म्हणाला.

"मी विचार करीन," मीं म्हटलें.

"यांत विचार कसचा? ठरलें हां, श्याम," एकनाथ म्हणाला.

मी उठून गेलों. इतक्यांत दाजीबांनीं हांक मारली.

"श्याम! बस. सतार ऐक. आज तुझ्या आवडीचें घाईघाईचें वाजवतों हं." दाजीबा म्हणाले.

मी तेथें बसलों. दाजीबा सतार छेडूं लागले. माझें मन प्रसन्न करण्यासाठीं का दाजीबा वाजवीत होते? त्या दिवशींचें तें सतारवादन मी कधींहि विसरणार नाहीं.

रात्र बरीच झाली. मी खोलींत आलों. पुन्हां औंधची यात्रा सुरू झाली. मीं आंथरुण घातलें व झोंपीं गेलों. झोंपेंत एकनाथ माझ्या स्वप्नांत आला.

"श्याम! ये बरें का. तुला ओढून नेईन," असें तो माझा हात धरून म्हणत होता.

# मावशीला पत्र

## ३२

औंधची व माझी ताटातूट व्हायची नव्हती हेंच खरें. पुण्याहून परत आल्यानंतर माझी फारच त्रेधा उडाली. सखारामाचे पैसे परत करावयाचे होते. जेवण्याची थोडी फार व्यवस्था केली पाहिजे होती. काय करावें मला समजेना. एकनाथाकडे जेवावयास जाण्यास मला तितका मोकळे-पणा अजून वाटत नव्हता. परंतु कांहींतरी पोटांत गेल्याशिवाय मी किती दिवस राहाणार ?

शेवटीं मीं मावशीला पत्र लिहावयाचें ठरविलें. मावशीला फार पगार नव्हता. तिला पंचवीसच रुपये मिळत होते. तिच्याजवळ माझा सर्वात धाकटा भाऊ शिकत होता. ती मला कितीशी मदत करणार ? परंतु मी तरी कोणाला लिहिणार, कोणाला कळविणार ? घरीं वडिलांना लिहून फार उपयोग होणार नव्हता. मुंबईस दादाला लिहीन तर त्याला फक्त १९ रुपये पगार ! तो एखादी शिकवणी करी व पांच रुपये घरीं वडिलांना पाठवी. येऊन जाऊन मावशीच राहिली. तिच्यापुढें स्वतःची सारी करुण कहाणी मांडण्याचें मीं मनांत आणिलें.

प्रिय मावशीस सप्रेम नमस्कार,

मावशी, तुला काय लिहूं, काय सांगूं ? तुझ्या मनाला दुःख होईल हें पत्र वाचून. तुझा श्याम सध्यां निराधार आहे. मी औंधला आलों. परंतु एक प्रकारें फसलों. येथें कसलीच व्यवस्था होत नाहीं. मीं निरनिराळे प्रयोग केले. मधुकरीहि मागितली. परंतु पंधरा दिवसांनीं मधुकरी बंद केली. मधुकरी मागणें मरणच वाटे, शिवाय इतकीं घरें भटकून सुद्धां पोट नीट भरत नसे. पुढें मी हातानें स्वयंपाक करीत होतों. कधीं नुसती भाजीच करावी, कधीं मक्याचे दाणेच खावे असें चालविलें. पिठाची गिरणी चालविणारा एक मित्र मला पीठ देई. कांहीं दिवस दुसऱ्यांच्या दळणांतलें हें

चोरून काढून ठेवलेलें पीठ तुझा हा श्याम घेत असे. मावशी, श्यामचा का तूं तिरस्कार करशील ? नाहीं, तूं माझा तिटकारा करणार नाहींस. श्यामनें तें पीठ घेण्याचें बंद केलें. तुझ्या श्यामचा आत्मा जागृत झाला. दुसऱ्याचें पीठ मी काय म्हणून घ्यावें असें माझ्या मनांत येऊं लागलें. मी नंतर कसा तरी जगत होतों. कोणी मित्र भाकर आणून देई, कोणी कधीं फराळास बोलवी. एखादे वेळेस मला वाटे कीं बकऱ्या पाला खाऊन जगतात तसें आपणास नाहीं का जगतां येणार ? मी निंबाचा पाला खाऊं लागें. परंतु तो कडू, कडू ! चिंचेचीं व करवंदीचीं कोंवळीं कोंवळीं पानें कोंकणांत आम्ही खात असूं, परंतु येथें कोठें धुंडाळूं ? मावशी, मध्यंतरीं मी पुण्यास येऊन गेलों. एका मोठ्या घरीं मी मुलांना शिकविण्यासाठीं राहावयाचें असें ठरलें. परंतु तेथें गेलों आणि निराशा पदरांत आली. मी तसाच माघारा आलों. स्टेशनवर एका गृहस्थानें फसविलें व मजजवळचे पांच रुपये गेले. मी कसाबसा येथें परत आलों. परंतु येथें कसा राहाणार, कसा जगणार ? माझ्या मित्राचे दहा रुपये उसने घेतले आहेत, ते परत करावयाचे आहेत. तो समोर दिसला कीं माझी मान खालीं होते.

मी तुला हें सारें लिहिणार नव्हतों. परंतु माझ्या मनावरचें दडपण कमी होण्यासाठीं हें लिहीत आहें. तुझ्यासमोर मी मन मोकळें करीत आहें. मावशी, औंधला आलों त्याच्या दुसऱ्या दिवशींच मी तळ्यांत बुडत होतों. कां बरें मी बुडालों नाहीं ? मी कशासाठीं जगलों ! सर्वांना दुःख देण्यासाठीं का माझा जन्म आहे ? माझा काय उपयोग ? मी केव्हां शिकणार व आईच्या कधीं उपयोगीं येणार ! माझ्या डोळ्यासमोर सारखी आई येते. मी शिकेन व आईला सुखवीन, मी शिकेन व आईला हंसवीन असें माझ्या मनांत मी नेहमीं म्हणत असतों. परंतु या श्यामच्या नशिबीं शिकणें दिसत नाहीं. आईला सुख देण्याइतकी माझी पुण्याईच नसेल.

दोन दिवस झाले. मीं कांहीं खाल्लें नाहीं. पंख असते तर तुझ्याजवळ उडून आलों असतों व तुला बिलगून रडलों असतों.

लहानपणीं मी तुझ्याजवळ निजण्यासाठीं रडत असें. आजहि तुझ्यासमोर पुन्हां रडत आहें. मी काय करूं तें कळव. कोठें जाऊं तें सांग. परंतु तूं तरी काय करशील?

मावशी, एखादी शिकवणी कर व पाठव ना मला पांच रुपये. पांच रुपये मला पुरे होतील. तेवढ्यांत मी स्वर्ग निर्माण करीन. तुझा श्याम आनंदानें राहील. गरिबींत राहाण्याची मला संवय आहे. चैनीची मला चटक नाहीं. ऐटीचा मला वीट आहे. तुला हें माहीतच आहे. श्याम साधा आहे.

सदानंदाची मला आठवण येते. त्याचा अभ्यास तर चांगलाच चालला असेल. सुंदर सुंदर पुस्तकें तूं त्याला देत असशील. तो काळ्याच्या कांठानें फिरायला जात असेल. मजा करीत असेल. तूं मागें एकदां लिहिलें होतेंस कीं सदानंद रोज डायरी लिहितो. डायरींत काय काय लिहितो तें पाहाण्याची मला इच्छा आहे. परंतु मी तुला भेटेन तेव्हां ती इच्छा सफळ होईल. मीं शिकविलेलीं स्तोत्रें व श्लोक तो म्हणतो का? तेथें नवीन सुंदर गाणीं तो शिकला असेल, व कोंकणांतील विहिरीच्या कांठीं बसून शिकविलेलीं तीं स्तोत्रें तो विसरला असेल. स्तोत्रें व श्लोक म्हणावें विसर, परंतु अण्णाला विसरूं नकोस! अण्णाची आठवण आहे का त्याच्या डायरींत? त्याच्या डायरींतील कांहीं उतारे पाठव ना मला. मला ते वाचून खूप आनंद होईल. आम्हां सर्व भावांत सदानंद हुषार होईल, नाहीं? आम्हां सर्वांपेक्षां तो सुंदर आहे, गोरागोमटा आहे. त्याचे ते चिमणे दांत किती गोड दिसतात, नाहीं? कसा हंसतो, कसा बोलतो. सदानंद नांव त्याला खरोखरच साजतें.

आतां मी झोंपतों. तुमची सर्वांची आठवण करीत करीत झोंपतों. तुम्ही झोंपलां असाल. घरीं आईला मात्र झोंप लागली नसेल. ती या श्यामची आठवण करीत असेल, व म्हणत असेल, 'देवा, श्यामला माझ्या सांभाळ हो.' नाहीं?

तुझा
श्याम

मावशीला लिहिलेलें पत्र सकाळीं मीं पेटींत टाकलें. दोन दिवसांनीं उत्तर आलें. किती करुण तें उत्तर होतें !

सप्रेम आशीर्वाद.

श्याम, तुझें पत्र वाचून मला काय वाटलें तें कसें लिहूं ? पत्र वाचतां वाचतां मला रडूं आलें. सदानंद विचारूं लागला, " मावशी, काय ग आहे पत्रांत ? " मला बोलवेना. तोहि रडूं लागला. मीं त्याला म्हटलें, " तुला वाचतां येतें ? हें अण्णाचें पत्र वाच. " त्यानें वाचलें. तें पत्र हातांत घेऊन तो गेला. कोठें गेला ? तो कालव्याच्या कांठीं जाऊन बसला. पाण्यानें भरलेल्या त्या कालव्याच्या कांठीं तो रडत होता. मी त्याला खोलींत घेऊन आल्यें. " उगी. रडूं नको, " मीं त्याला म्हटलें.

" मावशी, तूं मला दूध देतेस तें आजपासून बंद कर. ते पैसे अण्णाला पाठवतां येतील, " सदानंद म्हणाला.

त्या तुझ्या लहान भावाचे ते शब्द ऐकून मला धन्य वाटलें. त्याला अजून आठ वर्षेंहि पुरीं झालीं नाहींत. आठ कोठलीं ? हें सातवेंच अजून चालू आहे. परंतु किती त्याला समजूत ! कसें आहे त्याचें मन ! किती तुझ्यावर प्रेम ! तूंच त्याला वाढवला आहेस. तुझा त्याला फार लळा. त्याच्या डायरींतील तुला उतारे हवेत ना ? हे घे दोन तीन—

' मला पडसें आलें आहे. मावशीच्या मैत्रिणी मला हंसल्या. मी पळून गेलों. मी सूं सूं कधीं करणार नाहीं. '

' आजची भाजी चांगली झाली होती. अण्णाला आवडते. अण्णा तर औंधला. त्याला कोण देणार ? अण्णा दिवाळींत येईल. हो येईलच. मी बोलावीनच त्याला. '

' आज नवीन पुस्तक वाचलें. चित्रें कशीं होतीं छान ! मी पाटीवर तसें चित्र काढीत होतों. मावशी हंसली माझें चित्र पाहून. मी रागावलों. आज घरचें पत्र आलें. घरीं खूप काकड्या आहेत. आईला माझ्याशिवाय करमत नाहीं. '

'खेळतांना सदरा फाटला. मावशीनें शिवून दिला. मी आज पावसांत नाचत होतों. मावशी म्हणाली, "आजारी पडशील." मीं म्हटलें, "फुलें नाहीं आजारी पडत तीं?" मावशी एकदम हंसली व मीं तिला मिठी मारली.'

'गीतेचा अध्याय पाठ म्हटला म्हणून मला बक्षीस मिळालें. माझें पहिलें बक्षीस अण्णा, दादा, अप्पा, सर्वांना दाखवीन.'

श्याम, सदानंदाची डायरी खरोखरच चांगली आहे. लहान मुलानें ही लिहिली आहे हें कोणास खरेंहि वाटणार नाहीं. सदानंद कोणीतरी मोठा होईल असें आपलें कधीं कधीं मला वाटतें. म्हणून त्याला एखादे वेळेस जर मी रागावलें तर मागून मला वाईट वाटतें. मला लगेच रडूं येतें. "मावशी, तूंशी रडतेस?" असें मग तो विचारतो. मी त्याला सांगतें, "तुला रागावल्यें म्हणून." "परंतु मीं तर रडलोंच नाहीं," असें म्हणून तो मला हंसवतो; आणि म्हणतो कसा, "मी चांगलाच वागेन म्हणजे तूं रागावणार नाहींस व रडणार पण नाहींस."

श्याम, तूं सांगितल्याप्रमाणें शिकवणी करण्याचें मीं ठरविलें आहे. तुला पांच रुपये मी आनंदानें पाठवीन. मित्राचे दहा रुपये तुला द्यावयाचे आहेत. तेहि तुला पाठवल्यें. फार काळजी करूं नकोस. सारें कळवीत जा. कळवलेलें बरें. तूं हें सारें न कळवतास तर मला कसें कळतें? आज जेवतांना सदानंद म्हणाला, "मावशी, आपण पोळी खात आहोंत. अण्णा तर उपाशीच असेल!" तुझें नीट सुरळीत चाललें आहे असें ऐकल्यावरच आतां मला समाधान मिळेल. तोंपर्यंत तुझी रोज काळजीच वाटणार. तुझी आठवण पदोपदीं येऊन वाईट वाटणार. म्हणून सारें वर्तमान लिहीत जा.

प्रकृतीस जप. शरीर वाढवण्याचे हे दिवस. या वयांतच शरीराची वाढ होणार. अशा वेळीं जर नीट पोषण झालें नाहीं तर शरीर कायमचें अशक्त व दुबळें राहील. फार आबाळ करूं नकोस. थोडे अधिक पैसे लागले तरी कळव. 'मावशीला आपल्यासाठीं कशाला

त्रास' असें मनांत आणूं नकोस. उगीच मनाला लावून घेऊं नकोस. देव सारें चांगलें करील.

तुझी

मावशी.

मावशीचें पत्र मीं कितीदां तरी वाचलें. पत्रें हीच माझी ठेव होती. मी किती तरी पत्रें लिहीत असें. दापोलीच्या शाळेंतील मित्रांना कधीं कधीं लिहीत असें. रामला लिहीत असें. दादाला लिहीत असें. घरीं लिहीत असें. आमच्या शाळेंत सर्वांत जास्त कोणाला पत्रें येत असतील तर तीं मला.

ज्या दिवशीं मी उदास असें, त्या दिवशीं माझी ट्रंक उघडून मी सारीं पत्रें वाचीत बसें. तें माझें नवजीवन होतें. अमृतरसायन होतें. रामचीं पत्रें, मावशीचीं पत्रें अशीं मीं सारीं अलग अलग बांधून ठेवलीं होतीं. पुष्कळ मुलांना माझ्या टपालाचा हेवा वाटे. दरिद्री श्याम पत्र-प्राप्तीच्या बाबतींत चक्रवर्ती होता. मुलांनाच माझ्या पत्रांबद्दल कुतूहल असे असें नाहीं, तर पोस्टांतील पोस्टमास्तरांसहि जिज्ञासा उत्पन्न झाली. हा श्याम कोण? इतकीं पत्रें त्याला कशीं येतात? मावशीचें पत्र म्हणजे बहुधा पाकीट असे. त्यावर पत्ता असे तो बायकी हस्ताक्षरांत असे. बायकी हस्ताक्षराचें कोडें उलगडलें पाहिजे असें त्या पोस्टमास्तरांस वाटलें.

एके दिवशीं मी पोस्टांत कांहीं कामासाठीं गेलों होतों.

"तुम्ही का ते श्याम?" मास्तरांनीं विचारलें.

"ते श्याम म्हणजे कोणते?" मीं प्रश्न केला.

"ज्यांना पुष्कळ पत्रें येतात ते?" पोस्टमास्तर हंसत म्हणाले.

"माझे मित्र पुष्कळ आहेत म्हणून पुष्कळ पत्रें येतात," मीं म्हटलें.

"मित्र उभयजातीचे आहेत वाटतें?" त्यांनीं विचारलें.

"हो. हिंदूहि आहेत, मुसलमानहि आहेत," मीं म्हटलें.

"तसें नव्हे. पुरुष–मित्र व स्त्री–मित्र दोन्ही आहेत वाटतें?" त्यांनीं उलगडा केला.

"म्हणजे काय?" मी बुचकळ्यांत पडलों.

"अहो, तुम्हांला पत्रें येतात, त्यांत स्त्री–हस्ताक्षराचींहि असतात, म्हणून विचारलें," पोस्टमास्तर म्हणाले.

"माझ्या मावशीचीं असतात तीं पत्रें. ती शिकलेली आहे," मीं म्हटलें.

"माफ करा हां मिस्टर," पोस्टमास्तर ओशाळून म्हणाले.

माझ्या जीवनांत अमृत वर्षाव करणाऱ्या मावशीच्या पत्रांबद्दल पोस्ट-मास्तरांच्या मनांत कसा विचित्र संशय आला याचें राहून राहून मला आश्चर्य वाटे!

# तो दिवस

## ३३

ते नवरात्राचे दिवस होते. औंधच्या यमाईच्या मंदिरांत उत्सव होता. नऊ दिवस सर्वांना मुक्तद्वार होतें. यावें नि जेवून जावें. नऊ दिवस तरी मला जेवण्याची काळजी नव्हती. किती जाड जाड पोळ्या असत त्या! दोन चतकोर खाल्ले कीं माझें पोट भरत असे.

त्या दिवशीं मंगळवार होता. सकाळची शाळा होती. मंगळवारीं औंधचा बाजार असे. त्या दिवशीं माझ्या नांवें तीन पत्रें आलीं होतीं. दोन कार्डें होतीं. एक पाकिट होतें. त्या दोन्ही कार्डांत मरणाचीच वार्ता होती. माझ्या रामचा धाकटा भाऊ तापानें मरण पावला होता. दापोलीच्या शाळेतील माझा एक मित्र शंकर—त्याची मरणवार्ता दुसऱ्या कार्डांत होती. आतां तिसऱ्या पत्रांत काय निघतें असें मनांत आलें. भीत भीत तें पाकिट फोडलें. त्यांतहि निधनवार्ताच होती! माझा भाऊ सदानंद प्लेगला पुण्यास बळी पडल्याची दुःखद वार्ता होती. तें मावशीचें पत्र होतें.

सप्रेम आशीर्वाद.

श्याम, लिहूं नये तें लिहिण्याची पाळी मजवर आली आहे. सर्वांचा आवडता सदानंद देवाकडे निघून गेला. पुण्यास प्लेगची

सांथ होती. सदानंदास घेऊन मी आप्पाकडे गेल्यें होत्यें. पुण्यास गणपतीचा उत्सव होता. तो उत्सव पाहाण्यासाठीं म्हणून सदानंद तेथें राहिला. मी एकटीच हिंगण्याला आल्यें. परंतु चार दिवसांनीं निरोप आला कीं, 'सदानंद आजारी आहे, ताबडतोब ये.' मी तशीच पुण्यास गेल्यें. सदानंद तापानें फणफणत होता. त्याला मोठा गोळा आला होता. गोळा चिरण्यांत आला. सदानंद वांचणार असें मला वाटलें. आप्पाची मुलगी शांती, तिलाहि ताप आला. शेजारच्या यमुताई, त्यांचीहि मुलगी तापानें बेफाम झाली. शांतीचा व यमूताईच्या लिलीचा—दोघींचा ताप प्लेगचाच होता. मोठाले गोळे आले होते. शांतीच्या गोळ्यावर शस्त्रक्रिया करण्यांत आली. शांती व सदानंद बरीं होतील असें वाटत होतें. परंतु दुर्दैव! सदानंदाला दुसरा गोळा आला! आतां मात्र उपाय नव्हता. एकदम त्याला वातच झाला. तो वातांत बोले. सारखें 'दत्तगुरू, दत्तगुरू' म्हणत होता. मध्येंच तुझी आठवण काढी. 'अण्णा, दिवाळींत ये हां. मग पोटभर जेव,' असें म्हणे. 'ते पाहा चारजण मला बोलावीत आहेत! खुणा करीत आहेत. मी जातों. शांती कांहीं येत नाहीं. लिली व मी दोघंजणं जातों. चल लिल्ये,' असें बोले. आमची सारी आशा सुटली. शेवटीं देवाचें नामस्मरण करीत तो निघून गेला.

मी देवाला म्हणत होत्यें सदानंदाचें दुखणें मला दे. किती मनापासून मीं प्रार्थना केली! परंतु देवानें माझें म्हणणें ऐकलें नाहीं. सदानंदाला किती आशेनें मीं कोंकणांतून आणलें? आतां तुझ्या घरीं कोंकणांत काय लिहूं? अक्काचें समाधान कसें करूं? मीं सदानंदाला पुण्यास ठेवलाच कां? माझीच चूक. परंतु मेळे वगैरे पाहाण्यासाठीं ठेवला. त्यानेंहि हट्ट धरला होता. पुढचें कोणाला ठाऊक? मी कमनशिबी, दुसरें काय?

श्याम, सदानंदावर तुझें फार प्रेम होतें. अक्का नेहमीं आजारी असल्यामुळें तूंच त्याला अगदीं लहानपणापासून वाढवलेंस. तूं त्याला खेळवलेंस, बोलायला शिकविलेंस. तुझाच त्याला लळा होता. तुझीच आठवण तो काढीत होता. त्याच्या मरणानें सर्वांत अधिक

नों. दि. वाचनालय

दुःख तुलाच होईल. तुझें सांत्वन मी कसें करूं? शक्य ते सारे उपाय आम्हीं केले. मीं स्वतःचे प्राणहि देऊं केले. आणखी काय करणार? मानवी आशा विरुद्ध देवाची इच्छा—असा ऐहिक जीवनाचा कायदाच जणूं आहे. शेवटीं त्याची इच्छा प्रमाण असेंच आपण म्हटलें पाहिजे.

श्याम, तूं सुज्ञ आहेस. पोथ्या पुराणें वाचलेला आहेस. तूं मनाला आवर. तेथें तूं एकटा आहेस. संयम राख. दुसऱ्याच्या दुःखाकडे पाहून स्वतःचें दुःख विसरतां येतें. येथें शेजारीं एक बाई आहे. तिचीं तीन मुलें प्लेगांत गेलीं. तिनें काय करावें? तुम्ही अजून तिघे तुमच्या आईबापांना आहांत. जगांत आपल्यापेक्षांहि अधिक आपत्ति इतरांवर आहे. तिकडे लक्ष द्यावें व समाधान मानावें. विवेकानेंच समाधान निर्मावें लागतें.

तूं घरीं अक्काला चांगलेंसें पत्र लिही. तुझ्या लिहिण्याचा तिच्यावर परिणाम होईल. नाहीं तर ती हाय घेऊन बसेल. सांत्वनपर असें सुंदर पत्र लिही. 'आई आमच्याकडे बघ व दुःख आवर,' असें लिही.

सदानंदाच्या मला सारख्या आठवणी येतात. येतां जातां त्याची हंसरी मूर्ति डोळ्यासमोर येते. अलिकडे तो किती स्वच्छ राहात असे. नखाला लागलेली इवलीहि माती त्याला खपत नसे. नमस्कार घालीत असे. सारी गीता पाठ करीन असें म्हणत होता. त्याची डायरी. किती सुंदर अक्षरांत आहे ती लिहिलेली! सदानंदानें लिहिलेला तो छोटासा ग्रंथच आहे. ती डायरी मी हातांत घेतें व रडतें त्या डायरींत सदानंद आहे.

सदानंद गेला असें मला वाटतच नाहीं. वाटतें कीं अजून येईल. परवां एक त्याच्यासारखा मुलगा रस्त्यांत मीं पाहिला. मला वाटलें सदानंद आला. मीं हांक मारली. तो मुलगा हंसून पळून गेला. सदानंद परत न येण्यासाठीं गेला असें मग मन म्हणालें. परंतु स्मृतिरूप सदानंद तर सदैव आपल्या हृदयसदनांत आहेच. त्याला हांक मारतांच हृदयांतून तो वर येईल व अंतः-

चक्षूसमोर हंसत उभा राहील. मृण्मय शरीर जातें, परंतु चिन्मय शरीर कोण नेणार ?

श्याम, तुला मोठा धक्का बसेल यांत संशय नाहीं. परंतु तुझ्या मावशीसाठीं तरी शांत राहा. प्रकृतीस जप.

तुझी अभागी
मावशी

मी तीं तिन्हीं पत्रें घेऊन घरीं गेलों. वर्गात माझीं पुस्तकें होतीं. परंतु त्यांची मला आठवण राहिली नाहीं. मी माझ्या खोलींत ओक्साबोक्शीं रडत होतों. मला पैसे पाठवतां यावेत म्हणून दूध नको म्हणणारा सदानंद, भाजी खातांना माझी आठवण करणारा सदानंद, अण्णा, शिकव रे नवीन श्लोक, असा माझ्या पाठीस लागणारा सदानंद, कोठें गेला तो ? कांहीं कल्पना नाहीं, असें कसें अकस्मात् मरण आलें ? तो मरणार असें मला माहीत असतें तर पुण्यास गेलों तेव्हां त्याला भेटून नसतों का आलों ? मला कांहीं सुचेना. मी सारखा रडत होतों.

शाळेतून मुलें आलीं. सखाराम माझीं पुस्तकें घेऊन आला.

" श्याम, काय रे झालें ? " त्यानें विचारलें.

" माझा धाकटा भाऊ प्लेगनें गेला, " मीं म्हटलें.

तो समजूत काय घालणार ? इतरहि मित्र आले. गोविंदा आला, एकनाथ आला, मुजावर आला. ' उगी, श्याम रडूं नकोस. आपला काय इलाज ' वगैरे ते बोलत होते. मी शांत झालों. माझे मित्र जेवायला गेले. ते गेल्यावर मी उठलों व बाहेर पडलों. अनवाणी व बोडका मी बाहेर पडलों.

मी फिरत फिरत दूर गेलों. एखाद्या झाडाखालीं बसून, ' सदानंद, सदानंद ' मी हांका मारीत सुटे. पक्षी उडाले कीं मी ' सदानंद, सदानंद ' हांक मारी. सदानंद कोठून तरी येईल असें मला वाटे. मी चोहोंबाजूस पाहात होतों. मी झाडावर डोकें आपटी, दगडावर डोकें आपटी, परंतु फुटून जाईल इतक्या जोरानें कांहीं आपटीत नव्हतों. मी हळूच आपटीत होतों. स्वतः मरून जावें असें कांहीं मला वाटत नव्हतें. माझें दुःख कृत्रिम होतें असें नाहीं. परंतु तळ्यांत उडी घ्यावी असें कांहीं वाटलें नाहीं. मी भटक

३९६३



भटक भटकलों. रड रड रडलों. शेवटीं दमून एके ठिकाणीं मी बसलों. इतक्यांत अकस्मात् कोठूनसें माझ्यासमोर एक सुंदर पांखरूं येऊन बसलें. किती तरी वेळ तें पांखरूं हलेना, चालेना, बोलेना. मी त्या पांखराकडे पाहात राहिलों. तें पांखरूं छातीशीं लावावें असें मला वाटलें. मी उठलों. परंतु पुन्हां बसलों. तें पांखरूं उडून जाऊं नये असें मला वाटत होतें.

सूर्य अस्तास जाण्याची वेळ होत आली. पांखरें घरट्यांत जाण्याची वेळ झाली. हें पांखरूं कां जात नाहीं ? हें पांखरूं सदानंदाचा निरोप घेऊन का आलें आहे ? " बोल, पांखरा बोल. सदानंदाचा संदेश सांग," मीं त्या पांखराला म्हटलें.

काय आश्चर्य ! इतका वेळ स्तब्ध बसलेलें तें पांखरूं चिवचिव करूं लागलें. नाचूं लागलें. जणूं त्याला सूर्योदय होत आहे असेंच वाटत होतें. मला आनंद झाला. मीं त्या पवित्र पांखराला नमस्कार केला. तें पांखरूं उडून गेलें. किती तरी वेळ मी पाहात होतों. गेलें, दूर गेलें.

मी माघारा वळलों. तों मला शोधीत सखाराम वगैरे येत होते.

" श्याम, कोठें रे भटकत होतास ? आम्हीं तुला कितीतरी शोधलें, " सखाराम म्हणाला.

" आमच्या मनांत भलभलत्या शंका येऊं लागल्या," गोविंदा म्हणाला.

" तळ्यांत उडी टाकलीस कीं काय असेंहि वाटलें. आम्ही कावरेबावरे झालों होतों. वाटे, तुझ्या मावशीस तार करावी, " सखाराम म्हणाला.

" सखाराम, तळ्यांत उडी टाकून मरावें इतकें प्रेम कोठें आहे मज-जवळ ? प्रेमाचा किती अल्प अंश आपणांजवळ असतो तें अशा प्रसंगीं कळून येतें. आपण प्रेम प्रेम म्हणून बसल्या उठल्या बोलत असतों. परंतु मरणप्रसंगींच प्रेमाची परीक्षा होते, " मीं म्हटलें.

" चल आतां. कांहीं थोडें खा, " गोविंदा म्हणाला.

" आम्हीं दुपारीं आग्रह केला नाहीं. परंतु आतां मात्र आग्रह करूं, " सखाराम म्हणाला.

" सखाराम, अरे, रोज जेवायचेंच आहे. आजचा दिवस तरी नको हो जेवण. जेवायला बसलों तर जेवण जाणार का नाहीं ? परंतु मनाला नाहीं बरें वाटत. आजचा दिवस सदानंदाच्या स्मृतीचाच चारा मला

खाऊं दे. त्याचे शब्द आठवूं दे. त्याच्या गोष्टी आठवूं दे. जेवलों तर जड अन्नाच्या दडपणाखालीं त्या स्मृति दडपल्या जातील. उद्यां तुम्हीं न सांगतांहि मी जेवीन," मीं म्हटलें.

"श्याम, आजचा दिवस तूं कधींहि विसरणार नाहींस," गोविंदा म्हणाला.

"मृत्युवार्ता आणणारीं तीन पत्रें एकाच दिवशीं मिळालीं!" सखाराम म्हणाला.

"होय. दुःखद घटना आहे ही. रामचा भाऊ गेला. माझा भाऊ गेला. रामचाहि सर्वांत धाकटा भाऊ. माझाहि सर्वांत धाकटा भाऊ. आम्ही समदुःखी आहोंत. मी माझ्या दुःखांत चूर आहें. रामची मला आठवणहि नाहीं. रामहि भावासाठीं असाच रडत असेल का? माझ्या-इतका तो असंयमी नाहीं. तो दुःख आवरील. फार रडत बसणार नाहीं. आदळआपट करणार नाहीं. रानावनांत भटकणार नाहीं," मीं म्हटलें.

"दुःखाचा बाह्य आविर्भाव हें रानटीपणाचें लक्षण आहे. रडारड मनुष्याला शोभत नाहीं," सखाराम म्हणाला.

"सखाराम, तुझें हृदय जरा कठीण आहे. त्या दिवशीं माझ्या पायांत घुसलेली कांच चरचर पाय कापून तूं काढून टाकलीस. चाकू चालवा-वयास असें धैर्य मला झालें नसतें," मीं म्हटलें.

"तो कठोरपणा नसून ती दया होती. त्या वेळेस पाय न कापणें म्हणजे निर्दयपणा झाला असता," गोविंदा म्हणाला.

"रडतो तो कोंवळ्या मनाचा, न रडणारा तो दगड, असें का श्याम तुला वाटतें? ती चूक आहे. रडणारे नाडतात व न रडणारे तारतात. अशा किती तरी अनुभवाच्या गोष्टी आहेत. जसें दिसतें तसें नसतें," सखाराम म्हणाला.

मी आकाशांत पाहात होतों. चंद्राची सुंदर कोर दिसत होती. आई माझ्या सदानंदाला ओंवी म्हणत असे ती मला आठवली.

'मोठे मोठे डोळे भिंवया चंद्रज्योती
सुंदर तुझी मूर्ति तान्हे बाळा ॥'

ते डोळे, त्या सुंदर भिंवया, त्यांची आतां माती झाली. त्यांची फक्त स्मृतीच राहिली.

" काय पाहातोस, श्याम ? " गोविंदानें विचारलें.

" चंद्राची कोर बघ कशी गोड आहे, " मीं म्हटलें.

" एका पर्शियन कवीनें म्हटलें आहे, 'माझ्या प्रियेचें नख काढलें, त्याची आकाशांत चंद्रकोर झाली,' " सखाराम म्हणाला.

" माझ्या भावाच्या भिवया अशाच कमानदार दिसत ! आई त्यांना चंद्रज्योतीची उपमा देत असे. अशी चंद्रकोर पाहिली कीं नेहमीं मला माझ्या भावाचें स्मरण होईल, " मीं म्हटलें.

" भावाचें अमर स्मारकच म्हणावयाचें ! आकाशांतील तारामंडळांत स्मारक ! " गोविंदा म्हणाला.

# दुसरे कांहीं अनुभव

## ३४

सदानंद मेल्यापासून माझा आनंद कित्येक दिवस मावळला होता. आधींच आनंदाची माझ्या घरीं वाण, आणि त्यांत पुन्हां प्रिय भावाचें मरण ! मी नेहमीं उदास व दुःखीकष्टी असा असें. आधींच मला बोलायला हवें कमी; आतां तर मी जणूं मुकाच झालों. शाळेंतून घरीं येतांच मी एकटाच कोठें तरी दूर दूर फिरावयास जात असें. परत घरीं यावें तों रात्रींचे दहा वाजूनहि जात. कोणी म्हणत श्याम भ्रमिष्ट होणार, कोणी म्हणत तो जीव देणार ! कोणी म्हणत हीं कवीचीं लक्षणें आहेत, कोणी म्हणत हीं वेड लागण्याचीं चिन्हें आहेत !

इतक्यांत दिवाळी जवळ येऊं लागली. सुट्टी लागणार होती. मुलें नाना प्रकारचे विचार करूं लागलीं. मी कोठें जाणार ? कोंकणांत घरीं जाणें शक्यच नव्हतें. पैसे कोठें होते ? मजजवळ फक्त दोन रुपये होते. तेवढ्यांत जर कोठें भटकून येतां आलें तर मी पाहात होतों. शाळेंतील कांहीं

विद्यार्थ्यांनीं सांगली, मिरज, नरसोबाची वाडी वगैरे ठिकाणीं जावयाचें ठरविलें. रेल्वेचे सवलतीचे दर होते. त्या मित्रांमध्यें मींहि सामील होण्याचें ठरविलें.

स्टेशनपर्यंत आम्ही पायींच चालत गेलों. शक्य तों काटकसर करावयाची असें सर्वांनीं ठरविलें होतें. आम्ही रहिमतपूर येथें गाडींत बसलों ते मिरजला उतरलों. मिरजला कोणाकडे जावयाचें? चर्चा सुरू झाली.

"माझ्या गांवची येथें ओळख आहे. तुम्ही याल का तेथें?" शंकरनें प्रश्न केला.

"तुझ्या गांवचें येथें कोण आहे?" त्याला विचारण्यांत आलें.

"माझ्या गांवच्या ओळखीच्या एका शेतकऱ्याची मुलगी येथें राहाते. तिचा नवरा टांगेवाला आहे. आपण जाऊं तिच्याकडे. तिला खूप आनंद होईल. ती लहानपणीं आजारी होती, तर माझ्या आईच्या औषधानें तिला गुण आला. ती माहेरीं आली म्हणजे आमच्याकडे येते. मी तिला माझी बहीण मानतों. मी भाऊबीजेला तिच्याचकडे राहीन. येतां का मग?" शंकरनें विचारलें.

"त्यांच्याकडे झोंपायला जागा असेल का?" एकानें शंका विचारली.

"तेथें घोड्याच्या शेणामुतांत निजावें लागेल," दुसरा म्हणाला.

"परंतु तेथें सर्व गोष्टींना सुंदरता देणारें प्रेमहि मिळेल," मीं म्हटलें.

"आधीं जेवायचें कोठें तें ठरवा. आकाशाखालींहि झोंपतां येईल," एकजण म्हणाला.

"तुम्हांला तेथें जेवायला मिळेल, प्रेमाची भाजीभाकर मिळेल. चला," शंकर म्हणाला.

"कुणब्याकडे जेवायचें?" एकानें तोंड वांकडें करून विचारलें.

"त्यांत काय झालें? भाजी भाकर कोठलीहि असली म्हणून काय बिघडलें?" मीं म्हटलें.

"प्रवासांत सारें पवित्र आहे. हा आपद्धर्म आहे," तिसरा एक म्हणाला.

शेवटीं शंकरच्या त्या मानलेल्या बहिणीकडे आम्ही गेलों. आम्ही सहाजण होतों. शंकर आंत गेला. त्याच्या बहिणीला अपरंपार आनंद झाला. जणूं देव आले असें तिला वाटलें. तिचें लहान मूल शंकरनें घेतलें,

तिनें झाडलें. बसायला तिनें एक घोंगडी पसरली. आम्ही सारे तेथें प्रेमानें बसलों.

"ताई, भाजी कसली करतेस?" शंकरनें विचारलें.

"वांग्यांची, कृष्णाकांठचीं वांगीं. त्याला ठेव तुझ्या मित्रांजवळ व तूं वांगीं दे चिरून," ती बहीण म्हणाली.

शंकरनें त्या मुलाला आमच्याजवळ ठेवलें. शंकर बहिणीस मदत करूं लागला. तें मूल प्रथम हंसत खेळत होतें. परंतु आमचे अनोळखी चेहरे पाहून तें घाबरलें. आमचे चेहरे का त्याला राकट दिसले? तें मूल रडूं लागलें. मीं त्याला उचलून घेतलें. मी त्याला बाहेर घेऊन गेलों. रस्त्यावरचे दिवे त्याला दाखवूं लागलों. तें मूल रडायचें राहिलें. तें झोंपेस आलें होतें. हळूहळू त्यानें माझ्या खांद्यावर मान टाकली. बाळ झोंपलें. मी त्याला थोपटीत होतों. लहानपणीं सदानंदाला खांद्याशीं धरून मी असाच फेऱ्या घालीत असें. तोंडानें रामरक्षा म्हणत असें. या मुलालाहि मीं रामरक्षा म्हटली. मी मध्येंच प्रेमानें त्या मुलाला घट्ट धरीत होतों. इतक्या लौकर कशाला झोंपलें तें? मीं त्याला हंसवलें असतें, त्याचे मुके घेतले असते असें मनांत आलें.

शंकरनें पाणी काढलें, बादल्या भरून ठेवल्या. पत्रावळी मांडण्यांत आल्या. मी आंत आलों.

"शंकर, हा निजला रे," मीं म्हटलें.

"तुम्ही का त्याला हिंडवीत होतेत इतका वेळ?" त्याच्या बहिणीनें विचारलें.

"हो," मीं म्हटलें.

"तुम्हाला उगीच त्रास," ती म्हणाली.

"असें नका म्हणूं. मग तुम्हालाहि हा सारा स्वयंपाकाचा त्रास होत आहे असें म्हणावें लागेल. तुम्ही प्रेमानें भाकरी भाजीत आहांत, मीं प्रेमानेंच त्याला घेतलें होतें. त्याला कोठें ठेवूं?" मीं विचारलें.

"शंकर, तिथें तें फटकुर घाल. त्यावर ठेवा त्याला," ती म्हणाली.

एक फाटकें धोतर शंकरनें पसरलें. तें मूल त्यावर मीं निजविलें. हळूहळू थोपटलें. आम्हीं हातपाय धुतले. सारे जेवावयास बसलों.

" मालक केव्हां येतील ? " मीं विचारलें.

" त्यांचा काय नेम ? बारासुद्धां वाजतील. फार त्रास दादा. गाडीच्या वेळेला जावें लागतें. पहांट असो, दुपार असो; पाऊस असो, थंडी असो; भाडें मिळो वा ना मिळो; जावें लागतें, " शंकरची बहीण म्हणाली.

" म्हणूनच मग टांगेवाल्यांना व्यसनें लागतात. दारूपायीं धुळींत मिळतात, " एकजण म्हणाला.

" त्यांना नाहीं रे कांहीं दादा व्यसन. सुपारीसुद्धां खात नाहींत. शंकरच्या आईच्या आशीर्वादानें माझा संसार सुखाचा आहे," ती म्हणाली.

" शंकर तर ब्राह्मण. तुम्हीं त्याला बाटवलात. त्याच्या गांवीं कळलें, तर लोक बहिष्कार घालतील, " एकजण म्हणाला.

" भाऊ बहिणीकडे नाहीं जेवणार तर कुठें ? शंकर, मीं का तुला बाटविलें ? " तिनें विचारलें.

" तूं तर पवित्र केलेंस ! औंधचें प्रेमहीन अन्न खाऊन आलेली अपवित्रता तुझ्याकडच्या अन्नानें नाहींशी होईल. पोटभर जेवा रे सारे, " शंकर म्हणाला.

आमचीं जेवणें होतात न होतात तोंच एकाएकीं आकाश मेघांनीं भरून आलें. पाऊस पडूं लागला. प्रचंड वादळ उठलें. पाऊस, वारा, विजा, सर्वांची मिळणी झाली.

" आकाशाखालीं झोंपणार होतेत ना रे ? " एकजण म्हणाला.

" देव म्हणतो या घरांतच झोंपा. येथें अधिक पवित्रता आहे," मीं म्हटलें.

" शंकर, तेथें मीं झाडलें आहे. तेथें निजूं देत तुझे मित्र, " त्याची बहीण म्हणाली.

हळूहळू आम्हीं आपल्या पथाऱ्या पसरल्या व तेथें झोंपीं गेलों. मला मात्र झोंप आली नाहीं. शंकर व त्याची ताई बोलत बसलीं होतीं.

" शंकर, तूं किती रे वाळलास ? आजारी होतास ? " तिनें विचारलें.

" हिंवतापानें आजारी होतों, " तो म्हणाला.

" मग येथें कां आला नाहींस ? तुला बरा करून धाडला असता. आणि अलीकडे किती दिवसांत तरी तुझा कागद नाहीं आला. ते म्हणत,

'शंकर आतां इंग्रजी शिकतो. टांगेवाल्याला पत्र कसें लिहील?' "
ताई म्हणाली.

" परंतु आतां तर तसें कांहीं नाहीं ना? मी माझ्या सर्व मित्रांना तुझ्याकडे घेऊन आलों. तुझी झोंपडी मला राजवाड्यापेक्षां मोठी आहे, " शंकर म्हणाला.

इतक्यांत दारांत टांगा आला.

" आले रे पावसांत भिजून. शंकर, कंदील घेऊन पुढें हो," ताई म्हणाली.

शंकरनें कंदील दाखविला.

" कोण? शंकरभाऊ? केव्हां आलेत? म्हटलें विसरले गरिबाला, " हरि म्हणाला.

हरीनें घोडा सोडला. टांगा एका बाजूला केला. हरि घरांत आला. त्यानें ओले कपडे काढले. ताईनें ते पिळून वाळत टाकले. दुसरे कपडे तिनें दिले.

" हें घ्या कढत पाणी, " ती म्हणाली.

हरीनें पाय धुतले. तो भाकर खायला बसला.

" तूंहि बस कीं माझ्याबरोबर आतां, मागून कशाला?" हरि म्हणाला.

" आज शंकर मित्र घेऊन आला आहे. त्याचे मित्र पलीकडे झोंपले आहेत, " ती म्हणाली.

" त्यांचें जेवणखाण झालें का?" त्यानें विचारलें.

" हो, " शंकर म्हणाला.

" दूधबीध आणलेंस कीं नाहीं?" त्यानें विचारलें.

" दूध कांहीं आणलें नाहीं, " ती म्हणाली.

" आपल्याकडे कधीं न येणारे पाहुणे, त्यांना दूध वाढावें कीं नाहीं?" हरि म्हणाला.

" सकाळीं देऊं, " ती म्हणाली.

त्या प्रेमळ श्रमजीवी जोडप्याचें जेवण झालें. गरिबींतहि किती समाधान, प्रेम, आदरातिथ्य, माणुसकी! किती श्रीमंत व सुशिक्षित कुटुंबांत हें पवित्र समाधान असेल? हें गोड प्रेम असेल? असें आदरातिथ्य असेल?

" शंकर, नीज आतां. तुला पाणी काढावयास लावलें रात्रींचें, " ताई म्हणाली.

"मग उद्यां दिवसा लाव," शंकर हंसत म्हणाला.

सारी मंडळी झोंपली. शंकरची ताई सर्वांच्या आधीं पहांटे उठली. पाऊस थांबला होता. ती जात्यावर दळीत होती, गोड ओंव्या म्हणत होती. जणूं तें, वेदोच्चारणच होतें. मला वाटे आपण जाऊन हात लावावा. घरीं मी आईला दळूं लागत असें, तें मला आठवलें. परंतु जाण्याचें धैर्य होईना. इतक्यांत शंकर उठला व ताईबरोबर दळूं लागला. निर्मळ प्रेम निर्भय असतें. मी मनांत चर्चा करीत होतों. शंकर बहिणभावंडांचें प्रेम अनुभवीत होता.

हळूहळू आमची सारी मंडळी उठली. सर्वांचीं शौचमुखमार्जनें झालीं. हरि दूध घेऊन आला. स्वच्छ अशा फुलपात्रांतून सारेजण दूध प्यालों. आम्ही वाडीस जाण्यास तयार झालों. पायींच जाणार होतों. आम्हीं ताईस व हरीस नमस्कार केला. शंकरला वाईट वाटलें. कडेवर मूल घेऊन ताई उभी होती.

"शंकर, भाऊबीजेला ये हो. नाहीं तर जाशील कोठें," ताई म्हणाली.

"येईन," तो म्हणाला. त्यानें मुलाचा मुका घेतला.

आम्ही निघालों. ताई दारांत उभी होती. आम्ही दृष्टीआड होईपर्यंत ती तेथें होती. माझी खरी यात्रा येथेंच झाली. नरसोबाच्या वाडीला आम्ही जात होतों. परंतु माझी खरी वाडी त्या टांगेवाल्याच्या घरींच होती. आम्ही झपझप जात होतों. गुरुद्वादशीचा तो दिवस होता. वाडीला मोठा उत्सव असतो. हजारों ब्राह्मण त्या दिवशीं तेथें जेवतात. रस्त्यांत चिखल होता. पाय गाऱ्यांत फसत होते. अंगावर चिखल उडत होता. वाटेंत नाव लागली. नदीला पूर येऊन गेला होता. तीरावर गाळ सांचला होता. ढोंपर ढोंपर चिखलांतून नावेजवळ जावें लागत होतें. नावेवर सारी बरबट झालेली होती. पाय रपरप सरत होते. पाय कुणाचा सरकला कीं तो नदींतच पडायचा. नावेवर कोण गर्दी! यात्रेची गर्दी.

आम्ही दहा अकराच्या सुमारास वाडीस आलों. वाडीला कृष्णा व पंचगंगा यांचा संगम आहे. त्या दिवशीं दोन नावांच्या मध्यें सांपडून दोन लोक चुरडले गेले होते. आम्ही गेलों तों हीच गोष्ट ज्याच्या त्याच्या तोंडीं होती. नदीचें पाणी लाल लाल दिसत होतें. किती रे तुमचें पाप धुऊं असें

का रागावून कृष्णाबाई म्हणत होती ? माझ्यांत डोकीं बुडवितां आणि देवाजवळ सर्वांना जाऊं देत नाहीं, हा काय चावटपणा आहे, असें का रागानें लाल होऊन कृष्णामाई सांगत होती ? मी त्या लाल लाल पाण्याकडे पाहात राहिलों. माझे मित्र पट्टीचे पोहणारे. त्यांनीं उड्या घेतल्या. मला माझी लाज वाटली. मीं घाटावरच डोकें बुचकळलें. स्नानें झालीं. आम्ही कोरडें नेसून देवदर्शनास निघालों. परंतु देवाच्या गाभाऱ्यांत ओलेत्यानें जावयाचें असा दंडक होता. आम्ही पुन्हां ओलीं धोतरें नेसलों. पाळीपाळीनें पादुकांचें दर्शन घेऊन आलों. मंदिर म्हणजे एक लहानशी खोली आहे. आम्ही पुन्हां कोरडें नेसून बाहेर पडलों.

मोठमोठे चर खणून तेथें स्वयंपाक चालला होता. आदल्या दिवशीं अकस्मात् पाऊस पडल्यानें सारें सर्पण भिजून गेलें होतें. सर्पण पेटतां पेटेना. राकेलचे डबेच्या डबे लांकडांच्या ओंड्यांवर ओतण्यांत आले. तेव्हां कोठें ते ओंडे दहा वाजायला धडधड पेटूं लागले. प्रचंड पातेलीं व प्रचंड सतेलीं तेथें चरावर होतीं. भात, वरण, आमटी व शिरा असें जेवण होतें. दहावीस हजार ब्राह्मण जेवतात. ब्राह्मणांशिवाय इतरांना भोजन नसतें. तीन चारच्या सुमारास पंक्ती बसल्या. प्रत्येक पंक्तींत एकेक भाताचें मोठें सतेलें आणि वरणाचें पातेलें ठेवण्यांत आलें. वाढप सुरू झालें. आमटींत वांगीं टाकलेलीं होतीं. चातुर्मास्यांत वर्ज्य केलेलें वांगें गुरुद्वादशीपासून पुन्हां खाण्यास येथें सुरवात होते. तें वांगें मिळावें म्हणून कोण झोंबाझोंबी व मारामारी !

मंडळी जेवावयास बसली. हातातोंडाची लढाई सुरू झाली. इतक्यांत प्रचंड जयघोष कानावर आले. कोणाचा हल्ला आला कीं काय असें मला वाटलें. हजारों ब्राह्मण जेवत होते. हजारों ब्राह्मणेतर जेवावयास बसलेल्या ब्राह्मणांना प्रदक्षिणा घालीत होते ! एकदम दहावीस हजार भूदेवांना प्रदक्षिणा घालण्याचें पुण्य त्यांना मिळत होतें ! आम्ही जेवत होतों आणि ते आम्हांला प्रदक्षिणा घालीत धांवत होते. ते देव का आम्ही देव ? आम्ही दगड होतों. जगापेक्षां स्वतःला पवित्र व श्रेष्ठ मानून आम्ही आमचीं पोटें जाळीत होतों. आणि ते भुकेल्या पोटीं आम्हांस प्रदक्षिणा घालीत होते.

मला वाईट वाटलें. माझी भूक नाहींशी झाली. त्या प्रदक्षिणा घालणाऱ्या हजारों श्रद्धामय जीवांकडे मी बघत होतों.

"श्याम, जेव कीं. पुन्हां पायीं जायचें आहे शिरोळ स्टेशनपर्यंत," एक मित्र म्हणाला.

"पायांत भरपूर शक्ति आहे. जेवल्यानेंच मी मरगळेन," मीं म्हटलें.

शेवटीं सारे उदरंभर लोक उठले. ब्रह्मवृंद जेवून उठतांच ते प्रदक्षिणा घालणारे हजारों जीव आंत घुसले. ते का बंड पुकारीत होते ? छेः, छेः, बंड पुकारायची वेळ अद्यापहि आली नाहीं. मग त्या वेळेस कोठून असणार ? उच्छिष्टाचा प्रसाद मिळावा म्हणून ते सारे मुमुक्षू धडपडत होते. एक शितकणहि मंडपांत राहिला नाहीं. कोणीं पत्रावळी चाटल्या, कोणीं पदरांत बांधून घेतल्या. मी पाहातच राहिलों.

मित्रांनो ! बावीस वर्षांपूर्वींचा तो उद्वेगजनक देखावा अजून माझ्या डोळ्यांसमोर आहे. धर्माच्या नांवाखालीं माणसांचे आम्ही पशू कसे केले आहेत, तें यावरून दिसून येईल. भोजनभाऊ देवस्थानांचीं उत्पन्नें खालसा केलीं पाहिजेत. भोजनें व सत्यनारायण घालीत काय बसतां ? त्या नारायण महाराजांनीं म्हणे हजारों सत्यनारायण केले ! आम्हांला चीड आली पाहिजे होती. पुण्यामुंबईचे सारे तरुण तेथें धांवून गेले पाहिजे होते. त्यांनीं सत्याग्रह केला पाहिजे होता. राष्ट्रांतील जनतेला ज्ञानाची भाकर द्यावयास एक दिडकी नाहीं आणि हे सत्यनारायण कसले पुजतां ? महाराष्ट्रांतील तरुणांनीं शांतिमय बंड तेथें केलें पाहिजे होतें. निरनिराळ्या संस्थानिकांनीं दुधाच्या व तुपाच्या लॉऱ्याच्या लॉऱ्या भरून तेथें प्रत्यहीं पाठविल्या. संस्थानांत वाटेल तो जुलूम करतात आणि सत्यनारायणाला दुधें तुपें पाठवतात ! हे खादाड धर्म अतःपर बंद झाले पाहिजेत. साऱ्या गाद्या, सारीं पीठें कायद्यानें बंद करण्यांत आलीं पाहिजेत. शेंकडों वर्षें शंकराचार्यांच्या गाद्या आहेत, तरी अज्ञान कां ? तरी अजून देशांत रानटी लोक कां ? या रानटी लोकांत ज्ञानाचा दिवा नेण्यासाठीं या गाद्या झटल्या का ? मिशनरी लोक येऊन रानटी लोकांत ज्ञान नेतात आणि आमचे गादीबहाद्दर काय करीत आहेत ?

धर्म म्हणजे माणुसकी. मानवाची मान उंच करणें म्हणजे धर्म. तरुणांनीं या मानव्याचे उपासक व्हावें. कोणाची मान ताठलेली नको. कोणाची वांकलेली नको. जगांत दीनवाणेपणा नको. जगांत मगरूरपणा नको. जगांत सरळपणा पाहिजे आहे. मानवाचा संसार सुंदर करण्यासाठीं प्रत्येक कृतीचा अवतार असला पाहिजे. विचाराच्या प्रकाशांत प्रत्येक कृत्य झालें पाहिजे. तुझा धर्म काय असें विचारतांच ' माणुसकी ' असें सांगावें. हिंदुधर्म, मुसलमानधर्म हीं नांवें विसरून ' माणुसकी ' धर्म रूढ केला पाहिजे.

देवाधर्माच्या नांवाखालीं मानवांना दडपीत असाल तर तो देवधर्म मरणेंच बरें. देव मेल्याशिवाय मानवाची मान उंच होणार नाहीं. पदोपदीं देवाचा दगड गरिबांच्या मानेवर ठेवून त्यांचा आत्मा कां चिरडून टाकतां ? ज्या ज्या गोष्टींनीं समाजांत उत्साह, प्रेम, सहानुभूति, विचार, उद्योग, बळ, सहकार्य वाढेल त्याला धर्म म्हणावें. ज्या ज्या गोष्टींनीं समाजांत आंधळेपणा, बावळटपणा, दंभ, आळस, व्यभिचार, दुबळेपणा, कर्मशून्यता हीं वाढतील, त्यांना अधर्म समजावें. समाजांत सर्वांना स्वच्छपणें विचार करावयास लावणें याहून महान् धर्म कोणताहि नाहीं.

जेवणें झालीं तों जवळ जवळ पांच वाजायला आले. आम्ही तसेच निघालों. शिरोळ स्टेशनवर आलों. तेथून आम्ही पुन्हां मिरजेला आलों. मिरज स्टेशनवरच रात्रीं झोंपलों. सकाळीं आम्ही सांगलीला गेलों. तेथील पाण्याची ती उंच प्रचंड टाकी पाहिली. त्या टाकींतील पाणी सबंध सांगली शहराला तीन दिवस पुरेल असें म्हणतात. सांगली शहराचे जुनी सांगली व नवी सांगली असे दोन भाग आहेत. नव्या सांगलींत मोठमोठे रस्ते वगैरे आहेत. नवीन हवेल्या, नवीन व्यापार, सारें नवीन सांगलींत आहे. जुन्या सांगलींत सारे अरुंद बोळ. गंगेकडे आम्ही जुन्या सांगलींतून गेलों. आधींच अरुंद बोळ व त्यांत दोन्ही बाजूंना मलमूत्र विसर्जन केलेलें ! रस्त्यावर शौचास बसणें म्हणजे पाप हें आम्ही जोंपर्यंत मानीत नाहीं, तोंपर्यंत आम्ही माणसें नाहीं. तोंपर्यंत आम्हांस धर्म वगैरे कांहीं एक नाहीं. तोंपर्यंत आम्ही केवळ पशू आहोंत.

सांगलीस कृष्णेच्या पाण्यास भयंकर ओढ आहे. गुडघाभर पाण्यांतूनसुद्धां प्रवाहाच्या विरुद्ध दिशेला जाणें जड जातें. आम्हीं स्नानें केलीं. नंतर कांहीं प्रसिद्ध मंदिरें पाहिलीं. तेथील प्रसिद्ध गणपतीमंदिर पाहिलें. काळे काळे दगड फारच सुंदर वाटले. आरशासारखे ते दगड आहेत. त्यांत प्रतिबिंब दिसे. एकेक दगड किती तरी लांब रुंद आहे. आम्ही बारा वाजेपर्यंत भटकलों. खंदक वगैरे पाहिला. नंतर आम्ही स्टेशनवर आलों. आमच्यांत आतां ताटातुटी व्हायच्या होत्या. जो तो आपापल्या घरीं दिवाळीस जाणार होता. परंतु मी कोठें जाणार ?

" श्याम, तूं माझ्याबरोबर चल. उद्यां दिवाळी आहे. आमच्याकडे तुझी दिवाळी होऊं दे, " नावडी गांवचा मित्र म्हणाला.

मीं बरें म्हटलें. आम्ही कऱ्हाड स्टेशनवर उतरलों. तेथून तो व मी नावडीस गेलों. त्या मित्राची तेथें पेरूची बाग होती. आम्ही त्या बागेंत हिंडलों. पोपटांनीं पोखरलेले गुलाबी पेरू झाडांवर दिसत होते. पेरूंचा वास सुटला होता. ताजे ताजे पेरू त्या दिवशीं मीं पोटभर खाल्ले.

दिवाळी झाल्यावर दुसऱ्या दिवशीं मी तेथून निघालों. मी परत पायीं निघालों. मी एकटाच होतों. अनेक विचार करीत निघालों. मल्हारपेठ नावडीच्या जवळच आहे. एखादा रामोशी येऊन मला लुटणार तर नाहीं अशी मला भीति वाटली. परंतु मला लुटून काय मिळालें असतें ? फार तर माझे दोन कपडे; दुसरें काय ? रस्त्यावर एके ठिकाणीं मल्हारपेठेकडे अशी पाटी वाचली. मी भरभर चालूं लागलों. मल्हारपेठेपासून दूर जाऊं दे लौकर असें मी मनांत म्हणत होतों.

शेवटीं मीं कऱ्हाड स्टेशन गांठलें. गाडीला अर्धा पाऊण तास अवकाश होता. गाडी आली. मी बसलों. रहिमतपूर स्टेशनवर साधारण साडेतीन चारच्या सुमारास मी उतरलों. औंध तेथून सात आठ कोस होतें. मीं मनांत ठरविलें कीं पायीं निघावयाचें. आठच्या सुमारास मी औंधला पोंचेन असें वाटलें. मी निघालों. रहिमतपूरच्या नदीच्या फर्शीवरून पाणी वाहात होतें. नुकताच मोठा पूर येऊन गेला होता. तसें फर्शीवर फार पाणी नव्हतें. परंतु ओढ मनस्वी होती. मी कसाबसा बाहेर आलों. प्रत्येक

क्षणाला मी वाहून जातों कीं काय असें वाटत होतें! मी मरणाच्या प्रसंगांतूनच वांचलों म्हणायचा!

पावसाचीं चिन्हें दिसूं लागलीं. मी झपझप जात होतों. मध्येंच धांवपळ करीत होतों. शेवटीं पाऊस आलाच. वादळ सुरू झालें. खरोखरचा तो मुसळधार पाऊस होता. श्यामवर महान् अभिषेक होत होता. वाटेंतील नाले खळखळ वाहूं लागले होते. आतां वाटेंत नदी वगैरे नव्हती हें माझें नशीब. अंधार पडूं लागला. संध्याकाळ होत आली आणि त्यांत पावसाची अंधेरी. अमावास्येची ती रात्र होती. काळीकुट्ट रात्र. कडकड कडकड वीज चमके. माझ्या कानठळ्या बसत. आपल्यावर वीज तर नाहींना पडणार असें वाटे. रस्त्यावरचे खडे पायांना सुयांसारखे बोंचत होते. आणि आतां तो पीर आला. मला भीति वाटूं लागली. त्या पिराजवळ म्हणे भुतें असतात! मी सारा भिजून गेलों होतों. माझ्या डोक्यावर जटा वाढलेल्या होत्या. औंधची टेंकडीवरची देवी केव्हां एकदां दृष्टीस पडते असें वाटत होतें. पाऊस बिलकुल थांबेना. पाण्यांतून जाणाऱ्या मगराप्रमाणें मी चपळाईनें जात होतों. केव्हां एकदां रस्ता संपतो असें झालें. रहिमतपूरजवळच एकनाथचें गांव होतें. तेथें कां बरें मी थांबलों नाहीं? एकनाथ, वामन यांना किती आनंद झाला असता! त्यांच्याकडे भाऊबीज झाली असती. त्यांच्या बहिणीनें ओंवाळलें असतें. परंतु माझा संकोच आड आला! कशाला कोणाकडे जा! आपला कशाला कोणाला त्रास! मी म्हणजे विचित्र प्राणी आहें. आजूबाजूला अनेक प्रेमाचे आधार असतांनाहि मी निराधारच राहावयाचा. आजूबाजूस अपार पाणी असूनहि मी तहानेलेला राहावयाचा. उतरावयास अनेक आतमित्रांचीं प्रेमळ घरें असूनहि मी स्टेशनांत पडून राहावयाचा! देव देतो, पण कर्म नेतें म्हणतात, तें माझ्या जीवनांत अक्षरशः खरें आहे.

मी अगदीं दमून गेलों. पावसाच्या मारानें थकून गेलों. पाय जोरानें चालत ना. हळूहळू मी जात होतों. औंधचे दिवे केव्हां एकदां दिसूं लागतात असें वाटत होतें. शेवटीं एकदांचे दिवे दिसूं लागले. मला आनंद झाला. निधान मिळालें असें वाटलें. रस्त्यांत पाणीच पाणी झालें होतें. गटारें भरून जात होतीं. मी गांवांत शिरलों. चिटपांखरूंहि कोणी

भेटलें नाहीं. पावसांत रस्त्यावरचे कंदील मात्र संतांप्रमाणें शांतपणें प्रकाश देत होते. धीर देत होते. मी माझ्या खोलींत आलों.

"श्याम, आतां आलास ?" द्रुपदीच्या आईनें विचारलें.

"हो," मीं म्हटलें.

"पावसांतून आलास, रात्र तरी किती झाली ?" ती म्हणाली.

"एकदांचा घरीं आलों ना ! वाटे केव्हां येतें घर," मी म्हणालों.

"काढ ते कपडे, कढत पाणी देत्यें. आंग धू," ती म्हणाली.

मीं कपडे काढले. द्रुपदीच्या आईनें कढत पाणी दिलें. मीं आंघोळ केली. पायांवरून कढत पाणी घेतांना किती बरें वाटत होतें ! दापोलीस शिकत असतांना मी घरीं चालत जात असें. त्यावेळेस आई असेंच कढत पाणी पायांवर घेण्यासाठीं देत असे. आईच्या प्रेमाची आठवण द्रुपदीच्या आईनें दिली.

मीं खोली झाडली. कपडे वाळत घातले. इतक्यांत दाजीबाची बहीण मला जेवायला बोलविण्यासाठीं आली.

"चल रे श्याम, भाकर आहे व दूध आहे. खा. ते केस पूस तरी जरा नीट. आजारी पडशील हो अशानें," ती मायाळूपणानें म्हणाली.

मी दाजीबांकडे जेवायला गेलों. पोटभर भाकर खाल्ली. एका तव्यावर निखारे घालून दाजीबाच्या बहिणीनें शेकायसाठीं दिले होते. दाजीबांचा प्रेमळ भाचा कोठें दिसेना. मीं म्हटलें, "आज बापू कोठें गेला ?"

"कोणाकडे गाणें आहे. तेथें गेला आहे," त्याची आई म्हणाली.

"तुमचा बापू मला फार आवडतो. नेहमीं हंसतमुख असतो," मीं म्हटलें.

"परंतु तो दाजीबांना चिडवतो. मग दाजीबा रागावतात व म्हणतात, 'कांहीं शिकवणार नाहीं वाजवायला. हो चालता,' श्याम, तूं बापूला चार शब्द सांग," ती म्हणाली.

"मी आज एका फरशीवरून वाहून जाणार होतों," मीं म्हटलें.

"श्याम, फरशी धोक्याची असते बरं का," ती म्हणाली.

"श्यामची इच्छा असली तरी श्याम वाहून जाणार नाहीं. मी देवाला आवडत नाहीं," मीं म्हटलें.

" परंतु आम्हांला आवडतोस. तूं दोन चार दिवस येथें नव्हतास तर घडीघडी तुझी याद यायची. येथें आजूबाजूला दुसरे विद्यार्थी नसतात का ? परंतु तूं जसा येतोस, बसतोस, खातोसपितोस, तसें कोण येतें जातें ? तूं येथल्या आमच्या सर्वांच्या घरचा झाला आहेस," बापूची आई म्हणाली.

माझें जेवण झालें. मीं खोलींत आलों. आंथरुण घालून झोंपलों.

इतक्यांत बापूची आई येऊन म्हणाली, " श्याम, तुझी घोंगडी तर भिजली आहे. पांघरायला रे काय आहे ? ही वाकळ घे. ऊठ."

मीं दार उघडलें. ती वाकळ घेतली. आईच्या चौघडींत जसा मी भक्तिभावानें गुरंगुटी करून निजत असें, तितक्याच भक्तिप्रेमानें ती वाकळ अंगावर घेऊन मी झोंपीं गेलों !

# वाचन व प्रदर्शन

## ३८

दिपवाळीची सुट्टी अद्याप होती. मुलें गांवीं गेलीं होतीं. माझा वेळ कसा जाणार ? पुस्तकांत मी रमूं लागलों. लहानपणापासून मला वाचनाचें वेड होतें. परंतु वाचायलाच कांहीं मिळत नसे. दापोलीच्या शाळेंत असतांना दाभोळकर ग्रंथमालेचीं तीं दुर्बोध पुस्तकें मला मिळालीं होतीं. त्यांत ना रस ना प्रसाद. त्यांतील पुष्कळसे ग्रंथ शास्त्रीय स्वरूपाचे होते. परंतु शास्त्रीय ग्रंथहि सुगम व रसाळ करतां येतात. शंकर बाळकृष्ण जोशी यांचें ज्योतिर्विलास पुस्तक किती गोड आहे ! दापोलीस असतांना दोनच मराठी कादंबऱ्या मीं वाचल्या होत्या. हरिभाऊ आपटे यांची ती अमर कादंबरी ' उषःकाल ' मी तेथेंच वाचली होती. सबंध रात्रभर जागत बसून वाचली होती. दुसरी कादंबरी म्हणजे ' लालन बैरागीण. '

औंघला करमणुकीच्या फायली मला वाचायला मिळाल्या. 'पण लक्ष्यांत कोण घेतो' ही कादंबरी मीं त्यांतूनच वाचली. ही कादंबरी वाचतांना मी कितीदां तरी रडलों असेन. सामाजिक कादंबऱ्यांत 'पण लक्ष्यांत कोण घेतो' व ऐतिहासिक कादंबऱ्यांत 'उषःकाल' शिरोभागीं शोभण्यासारख्या आहेत. विषयाशीं तद्रूपता या दोन्ही पुस्तकांतून उत्कटत्वानें दृष्टीस पडते. हरिभाऊंच्या कादंबऱ्या खूप मोठमोठ्या आहेत. त्यांत वर्णनें विस्तृत असतात. वाचक हीं वर्णनें बहुधा सोडून देतो. माझा एक बंगाली मित्र एकदां माझ्याबरोबर हरिभाऊंची एक कादंबरी वाचूं लागला. परंतु तें वाड्याचें वर्णनच संपेना. तो मित्र कंटाळला. म्हणे 'या वाड्यांतून केव्हां बाहेर पडणार ?'

हरिभाऊंच्या कादंबऱ्या सुगम आहेत. घरगुती भाषेंत लिहिलेल्या आहेत. त्यांत प्रसाद आहे. परंतु प्रतिभा कमी वाटते. हरिभाऊ पृथ्वीवरून धांवतील, परंतु चंडोल होणार नाहींत. मनुष्याच्या हृदयांतील अनेक गुंतागुंती त्यांना तितक्या स्पष्टपणें दाखवतां येत नाहींत. ते वस्तुस्थिति उत्कृष्टपणें वर्णितील, परंतु व्यक्तींच्या अंतरंगांतील घडामोडी त्यांना उत्कटपणें वर्णितां येणार नाहींत. मानवी हृदयांत ते खोल बुड्या घेत नाहींत असें वाटतें. परंतु जाऊं दे. हरिभाऊंची 'पण लक्ष्यांत कोण घेतो' ही कादंबरी माझ्या हृदयांत जाऊन बसली ही गोष्ट खरी.

भवभूतीचें 'उत्तररामचरित' नाटक मीं या सुट्टींत वाचून टाकलें. एका मराठी भाषांतराच्या मदतीनें मीं तें वाचलें. संस्कृतमधील तीन नाटकें त्रिभुवनमोलाचीं आहेत. शाकुंतल, उत्तररामचरित व मृच्छकटिक. उत्तररामचरितांत रामानें जनापवादावरून सीतेचा त्याग केल्याची कथा रंगविली आहे. भवभूतीची प्रतिभा व संविधानकुशलता या नाटकांत कळसाला पोंचलीं आहेत. महात्मा रामाला या नाटकांत रडविलें आहे. पंचवटींत बारा वर्षांनीं परत आलेल्या रामाला परित्यक्त सीतेची पदोपदीं आठवण होते. वनदेवता वासंती रामाला हृदयाला घरं पाडणारे प्रश्न विचारते. करुण उदात्त असा प्रसंग आहे.

रडणारा प्रभु राम म्हणतो, "पौरजनहो! मी रडतों त्याची क्षमा करा. सीतेच्या आसक्तीनें मीं रडत नाहीं. परंतु करुणेनें रडत आहे."

'करुण म्हणुनि, न स्त्रीकामकामीं झुकेला'

भवभूति महाकवि आहे हें या नाटकावरून निःसंशय अनुभवास येतें. किती गोड गोड श्लोक या नाटकांत आहेत! निरनिराळ्या पात्रांचा स्वभावपरिपोष तरी किती उत्कृष्टपणें केलेला आहे. राजर्षि जनक राम-सीता वनांत गेल्यापासून निवृत्तमांस झाला आहे. हा उल्लेख किती सहृदय आहे. महात्माजींच्या चळवळींत मुलेंबाळें तुरुंगांत असतांना कित्येक आईबापांनीं गोड खाण्याचें सोडून दिलें होतें हें तुम्हांला माहितच आहे.

उत्तररामचरिताची महती मी तुम्हांला किती सांगूं? त्यांतील सारे प्रसंग थोडक्यांत कसे सांगूं? पुढें केव्हां तरी आपण त्यासंबंधीं बोलूं. शाकुंतल मीं वाचलेंच होतें. परंतु त्याला असलेल्या इंग्रजी प्रस्तावनेच्या आधारानें मीं त्यावर एक मराठींत निबंध लिहून काढला. आमच्या वक्तृत्वोत्तेजक मंडळातर्फे त्यावर बोलण्याचें मीं मनांत ठरविलें होतें. त्यासाठींहि तयारी केली होती.

कांहीं इंग्रजी पुस्तकेंहि येथें वाचलीं. स्माइल्स या निबंधकाराचीं पुस्तकें वाचलीं. त्याचें एक पुस्तक तर मला फारच आवडलें. त्यांतील उतारे मी पाठ करीत बसें. त्या पुस्तकाचें भाषांतर करीत बसें. Character हें त्या पुस्तकाचें नांव. मराठींत त्याचा सारांशरूप अनुवाद झालेला आहे. तसेंच 'हरि आणि त्रिंबक' हें सुंदर मराठी पुस्तक ज्या इंग्रजी पुस्तकाचें रूपांतर आहे, तें इंग्रजी पुस्तक मीं वाचलें. 'हिंदुस्तानचा नागरिक' हें इंग्रजी पुस्तक वाचून काढलें.

मला जे जे उतारे आवडत, ते ते मी लिहून काढीत असें. इंग्रजी खूप लिहून काढावें असें मीं ठरविलें. आम्हांला इतिहासाचें इंग्रजी पुस्तक होतें. त्यांतील किती तरी भाग मी लिहून काढीत असें. माझें इंग्रजी यामुळें पुष्कळच सुधारलें. प्रास—अनुप्रासयुक्त इंग्रजी शब्दांच्या जोड्या जमविण्याचा मला त्यावेळीं फारच नाद लागला. नाचणारी नदी, प्रचंड पर्वत, तेजस्वी तारे, झुळझुळ झरा, गंभीर गर्जना हे जसे मराठी शब्द, तसेच मी इंग्रजींत जमवीत बसें. त्यामुळें माझा वेळ केव्हांच निघून जाई.

मी याप्रमाणें सुट्टी दवडीत होतों. सुट्टी संपली व शाळा सुरू झाली. लौकरच माझें शाकुंतलावर व्याख्यान झालें. मुलांची खूप गर्दी होती. मीं चांगलें बोललों.

" श्याम, तूं धीटपणें बोलशील असें आम्हांला नव्हतें वाटलें, " एकनाथ म्हणाला.

" अरे, पुष्कळ तर तुझी फजीति पाहावयास आले होते, " चावरे म्हणाले.

आम्हांला संस्कृत शिकविणाऱ्या शिक्षकांस मात्र त्याचें तितकेंसें कौतुक वाटलें नाहीं. औंधच्या इंग्रजी शाळेंतहि मोडी पुस्ती काढावी लागत असे. माझें मोडी अक्षर तितकेंसें चांगलें नव्हतें. लहानपणीं पहांटे उठून जरी मीं खर्डे गिरविले होते, तरी फारसें अक्षर सुधारलें नव्हतें. आमचे संस्कृत शिकविणारे शिक्षकच आमची मोडी पुस्ती पाहात असत. मीं माझी मोडी पुस्ती त्यांच्यापुढें केली. त्यांनीं माझ्याकडे पाहिलें.

" शाकुंतलावर व्याख्यान द्यायला हवें आणि मोडी अक्षर कोणीं सुधारावयाचें ! वर्गांतील करायचें नाहीं आणि मोठाल्या उड्या. शाकुंतल दूर ठेवून जरा खर्डे घांसा, " असें ते म्हणाले.

मला वाईट वाटलें. ढेंकळाप्रमाणें मी विरघळलों. गुरूच्या उत्तेजनपर एका शब्दानेंहि मूठभर मांस अंगावर चढतें. परंतु त्याचा किती दुष्काळ असतो ! विद्यार्थ्यांचीं मनें आपल्या शब्दांनीं मारलीं जात आहेत कीं फुलविलीं जात आहेत या गोष्टीकडे शिक्षकाचें लक्ष नसतें. वांद्याच्या कत्तलखान्यांत लाखों गुरें मारलीं जात असतात. शाळांतून लाखों मुलांचीं मनें मारलीं जात असतात. शाळा म्हणजे सुद्धां भयंकर कत्तलखानेच असतात. ज्याप्रमाणें डोंबारी आपल्या चिमुकल्या मुलांच्या शरीरांचे लहानपणापासून हाल सुरू करतो, त्या शरीरांच्या स्वतःच्या इच्छेप्रमाणें वाटेल तशा घड्या घालूं बघतो, तसेंच शिक्षकांचें असतें. मुलांच्या मनांना एका ठराविक सांचांत ते घालूं पाहात असतात. आदळआपट करतील व त्या सांचांत त्यांना बसवतील. परमेश्वराचा हा सर्वांत घोर अपराध होय !

मी संस्कृत, मराठी, इंग्रजी वाचीत होतों. परंतु मजजवळ कोणतीहि हस्तकला नव्हती. विद्यार्थ्यांच्या वस्तूंचें प्रदर्शन भरणार होतें. माझा मित्र

एकनाथ सुंदर होल्डर करून नेणार होता. कोणीं सुंदर चित्रें काढलीं होतीं, कोणीं कागदी फुलें केलीं होतीं, कोणीं मातीचीं चित्रें बनविलीं, कोणीं पत्र्याच्या लहान लहान मोटारी तयार केल्या. परंतु मी काय करणार? मला वाईट वाटत होतें. मला माझी कींव आली.

"श्याम, मध्यें कांहीं दिवस तूं आनंदी दिसत होतास. पुन्हां अलीकडे तुझा चेहरा कां बरें काळवंडला? कांहीं बोलत नाहींस, कांहीं नाहीं," एकनाथ म्हणाला.

"एकनाथ, तुम्ही सारीं मुलें प्रदर्शनासाठीं कांहीं ना कांहीं करून नेणार आहांत. मी काय नेऊं? तुझे रंगीत होल्डर किती छान झाले आहेत! गोविंदानें हस्ताक्षरांचे नमुने तयार केले आहेत. त्याच्या अक्षरांकडे पाहात राहावेंसें वाटतें. मोत्यासारखें तें आहे. मला माझी लाज वाटते. मी निरुपयोगी आहें. मला कांहींच का करतां येऊं नये? माझ्या बोटांत कोणतेंच कसब नाहीं, कोणतीच कला नाहीं. फुकट आहेत हीं बोटें," मी दुःखानें बोललों.

"श्याम, तूं एक वस्तु तयार कर. मी सांगूं?" एकनाथानें विचारलें.

"सांग! काय बरें मला करतां येईल?" मी उत्सुकतेनें विचारलें.

"तूं एक सुंदरशी कविता कर. तुझ्याजवळ पुष्कळ आहेतसुद्धां," तो म्हणाला.

"एकनाथ, कविता म्हणजे का हस्तकला? कविता म्हणजे हृदयाची कला," मीं म्हटलें.

"आपल्याला जें येत आहे तें आपण प्रदर्शनांत ठेवावें. त्यांत काय बिघडलें?" तो म्हणाला.

"परंतु या प्रदर्शनाची मर्यादा ठरलेली आहे," मीं म्हटलें,

मी जरी तसें बोलून गेलों, तरी माझ्या मनांत एकनाथाचा विचार मी घोळवूं लागलों. करावी आपण एखादी सुंदर कविता असें मीं मनांत ठरविलें. वृक्षांच्या महिम्यावर कविता करावी असें मनांत आलें. कविता तर केली. 'वृक्ष हे थोर संत' हें त्या कवितेला नांव दिलें. कविता मला आवडली. माझ्यापेक्षां एकनाथाला अधिक आवडली.

एका मित्रानें एका कागदावर चोहोंबाजूंनीं मला नक्षी काढून दिली. दुसऱ्या एका मित्रानें ती कविता सुंदर हस्ताक्षरानें त्या कागदावर लिहून दिली. हिरव्या मेहरपीमध्यें ती काळ्या शाईतील कविता फारच खुलून दिसत होती. तो कवितेचा कागद हातांत घेऊन मी किती वेळ तरी बघत बसत असें. प्रदर्शन मंडळाकडे ती कविता नेऊन द्यावयाची होती. एका सुंदर वेष्टनांत घालून ती कविता मी घेऊन गेलों. परंतु ती कविता तेथें देण्याचा मला धीर झाला नाहीं. मी तेथें घुटमळत उभा राहिलों.

माझी कविता नाकारण्यांत आली तर, हस्तकलेंत कविता येत नाहीं, एवढेंहि तुला समजूं नये का, असें कोणीं मला म्हटलें तर! माझ्या कवितेचें असें प्रदर्शन होण्यापेक्षां ती माझ्या हृदयांतच असलेली बरी. मी पुन्हां माघारा वळलों. घरीं आलों.

"श्याम, दिलीस का कविता? तुला खात्रीनें बक्षीस मिळेल," एकनाथ म्हणाला.

"आपल्या महाराजांना कविता आवडेल! म्हणतील, कोण हा कवि?" सखाराम म्हणाला.

"मग काय? श्याम राजकवि होणार!" तिसरा थट्टेनें म्हणाला.

"श्याम तर बोलतच नाहीं," एकनाथ म्हणाला.

"कवींचीं हृदयें भरलेलीं असतात!" मुजावर म्हणाला.

"भरलेलें हृदय थोडें ओताना आमच्यावर," तो विनोदी मित्र म्हणाला.

"मीं कविता नेऊन दिली नाहीं," विषण्णपणें मीं सांगितलें.

"म्हणजे!" एकदम सारे उद्गारले.

"माझ्या कवितेचा स्वीकार करण्यांत आला नसता, तर मला मेल्याहून मेलें झालें असतें. मी न देतांच परत आलों," मीं खुलासा केला.

"खराच कवि दिसतोस!" कोणींतरी म्हटलें.

मी तेथून निघून गेलों. दुसऱ्या दिवशीं पहांटे मी उठलों. ती माझी सुंदर कविता घेऊन मी झऱ्यावर गेलों. ती माझी कविता मी झऱ्याच्या पाण्यावर सोडून दिली! अखंड गाणीं गाणाऱ्या त्या प्रतिभावान् निर्झरालाच माझी कविता हृदयाशीं धरावी असें वाटलें असतें.

मी झऱ्यावरून परत येत होतों. वाटेंत वामन भेटला.

"काय श्याम, आज इतक्या लौकर! आमच्या आधीं आटोपलेंस वाटतें स्नान?" त्यानें विचारलें.

"स्नान अजून व्हावयाचें आहे," मीं म्हटलें.

"मग इकडे कोठें गेला होतास? बादली आणायला विसरलास वाटतें?" त्यानें हंसून प्रश्न केला.

"मी आंघोळीसाठीं आलोंच नव्हतों. मी पूजा करावयास गेलों होतों," मीं म्हटलें.

"आंघोळीच्या आधीं पारोशानें पूजा? आणि इकडे कोणता देव नवीन शोधून काढलास? आम्हांला तरी दाखव, म्हणजे रोज आंघोळ करून येतांना आम्हीहि थोडें पाणी ओतीत जाऊं," तो म्हणाला.

"झरा माझा देव!" मीं म्हटलें.

"श्याम, काव्य पुरें झालें," वामन म्हणाला.

"हें काव्य आहे व सत्यहि आहे. काव्य कांहीं खोटें नसतें. झऱ्याहून दुसरा मोठा देव कोणता आणूं? आपल्या सर्वांना रोज तो स्वच्छ करतो, आपली घाण तो दूर करतो, जगाला ओलावा देतो. कोणाला नाहीं म्हणत नाहीं, कोणावर रागवत रुसत नाहीं. सर्व जगाला जीवन देतो; परंतु आपल्याच संगीत समाधींत पुन्हां तल्लीन! अहंकार नाहीं, दवंडी नाहीं. वामन, हा समदृष्टि संगीतसम्राट् झरा म्हणजे माझा देव. त्या झऱ्याची मी आज पूजा करून आलों," मीं म्हटलें.

"कशानें पूजा केलीस?" त्यानें विचारलें.

"हृदयपुष्पानें! माझ्या कवितेचें फूल त्या निर्झरदेवाला मीं वाहिलें, डोळ्यांतील अश्रूंचें अर्घ्य दिलें. गंभीर, प्रेमळ, भावभक्तीची पूजा!" मीं म्हटलें.

"ती कविता का पाण्यांत फेंकलीस?" वामननें आश्चर्यानें विचारलें.

"झऱ्यापेक्षां खरा थोर सहृदय रसिक कोण आहे? ती कविता जगासमोर नेणें म्हणजेच फेंकणें झालें असतें. त्या कवितेचा तो अपमान झाला असता. झऱ्याजवळ नेल्यानेंच त्या कवितेचें खरें सार्थक झालें," मीं म्हटलें.

"वेडा आहेस श्याम तूं," असें म्हणून वामन निघून गेला.

माझें हें वेडेपण माझ्याजवळून कधींहि न जावो असें म्हणत मी माझ्या खोलींत आलों.

# शाळेंतील रात्रींचा आश्रम

## ३६

मी ज्या खोलींत राहात होतों, ती फारच कोंदट होती. मी तेथें आजारी कसा पडलों नाहीं याचेंच मला आश्चर्य वाटतें. दिवसा सूर्याचे किरण माझ्या खोलींत क्वचितच येत असत. खोलींत खूप डांस होते. डांसांचें माहेरघरच जणूं तेथें होतें. डोक्यावरून पांघरूण घेऊन निजण्याची मला मुळींच संवय नव्हती. डोक्यावरून पांघरूण घेतांच मला गुदमरून गेल्याप्रमाणें होई. डांसांच्या त्रासामुळें झोंप येत नसे. मग मी रात्रींचा लिहीत वाचीत बसें. पहांटेच्या सुमारास झोंपत असें. त्यावेळेस डांसहि जरा झोंपीं जात.

पुढें माझ्या खोलींत ढेंकूणहि मनस्वी झाले. पिसवाहि झाल्या. ढेंकूण, पिसवा व डांस या तिघांच्या माऱ्यामुळें श्याम अगदीं रडकुंडीस आला. आठ आण्यांत चांगली खोली कुठें मिळणार? रात्रीं झोंप यावयाची नाहीं. त्यामुळें वर्गांत मला डुलकी येई. वर्गांत मी कधींच झोंपत नसें. माझ्या वर्गांत पुष्कळ मुलें झोंपा काढीत असत. विशेषतः पाठीमागच्या बांकावर हे झोंपाळू विद्यार्थी बसत. आम्हांला इतिहास शिकविणारे जे शिक्षक होते, त्यांना बरेंच कमी दिसे. वाचून वाचून त्यांची दृष्टि मंद झाली होती. ते सुंदर शिकवीत. ते इंग्रजी सुंदर बोलत. मला त्यांचें इंग्रजी आवडे. मी भराभरा त्यांचीं वाक्यें टिपून घेत असें. एकदां ते अकबराचें वर्णन करीत होते. त्यांनीं इतकीं विविध विशेषणें त्यावेळेस योजिलीं कीं मला

आश्चर्य वाटलें. तीं विशेषणें त्यांना भराभर सुचलीं कशीं, इंग्रजी शब्द भराभर सुचले कसे ? मला त्यांचा तास फार आवडे. परंतु त्यांच्या तासाला पुढच्या बांकावरील मुलें फक्त जागृत असत, बाकी मुलें झोंपीं जात!

कधीं न झोंपीं जाणारा जो मी, त्या मलाहि आतां क्वचित् डुलकी येऊं लागली. एकदां कोणत्या तरी तासाला अशीच मला जरा झोंप लागली! मुलें हंसत होतीं व शिक्षक माझ्याकडे मधून मधून बघत होते.

"अहो, त्यांना जरा जागें करा," शिक्षक म्हणाले.

शेजारच्या विद्यार्थ्यानें मला हलवून जागें केलें. मी लाजलों, शरमलों. मुलें मोठ्यानें हंसलीं. नेहमीं झोंपा काढणाऱ्या त्या मुलांना मला हंसायची वास्तविक जरूर नव्हती.

"तुम्ही कांहीं वेळ उभे रहा म्हणजे झांपड उडेल," शिक्षक म्हणाले.

मी उभा राहिलों. मला रडूं आलें. शिक्षकांनीं मला शिक्षा करण्यापूर्वी विचार केला पाहिजे होता. आपल्या तासाला मुलें कां झोंपतात ? एक तर आपलें शिकविणें मुलांना समजत नसेल, किंवा त्यांना आवडत नसेल, अथवा मुलांना घरीं खूप काम असल्यामुळें तीं दमलीं असतील, अथवा रात्रीं त्यांना झोंप आली नसेल, अथवा जेवलीं नसल्यामुळें त्यांना थकवा आला असेल, अथवा पुष्कळ व्यायाम केल्यामुळें त्यांना झोंप लागली असेल, अथवा या निर्जीव बौद्धिक शिक्षणाकडे त्यांच्या मनाचा कल नसेल, अथवा या उष्ण देशांत दुपारीं थोडी वामकुक्षी निसर्गतःच आवश्यक असेल. परंतु या बहुविध कारणांचा कोण शोध बोध घेणार! मुलांच्या घरच्या परिस्थितीचें ज्ञान किती शिक्षकांना असतें ? ते इतिहास शिकवितात, परंतु समोरच्या जिवंत मुलांचा इतिहास त्यांना अज्ञात असतो. ते अर्थशास्त्र शिकवितात, परंतु समोरच्या मुलांची आर्थिक स्थिति त्यांना माहीत नसते. आपण एकमेकांच्या जीवनांत शिरतच नाहीं. मुलांच्या जीवनांत शिरल्याशिवाय काय माती शिकवितां येणार ?

मधल्या सुट्टींत गोविंदा मला म्हणाला, "श्याम ! आज तुलासुद्धां झोंप लागली ?"

"अरे, रात्रीं झोंप येत नाहीं. ढेंकूण, डांस, पिसवा यांनीं सध्यां खोलीचा कबजा घेतला आहे," मीं म्हटलें.

" आमच्याहि खोलींत तीच स्थिति आहे. श्याम, माझ्या मनांत एक विचार आला आहे. तुला सांगूं ?" गोविंदानें विचारलें.

" सांग, " मीं म्हटलें.

" आपण शाळेंतच झोंपायला येत जाऊं, " तो म्हणाला.

" तें कसें काय जमणार ?" मीं कुतूहलानें विचारलें.

" आपले काळेमास्तर आहेत ना, त्यांच्याजवळ किल्ल्या असतात, " तो म्हणाला.

काळेमास्तर हे त्या वर्षीं आलेले नवीनच शिक्षक होते. ते अगदीं तरुण होते. वीस वर्षांचे असतील. ते गरिबींतून स्वकष्टानें शिकले होते. पुण्याला उन्हाळ्याच्या सुट्टींत लग्नसराईंत पाणी वगैरे भरण्याचें काम ते करीत व फीपुरते पैसे जमवीत ! त्यांचें शिक्षण अद्याप पुरें झालें नव्हतें. परंतु एक दोन वर्षें नोकरी करून कांहीं पैसे शिलकीं ठेवून ते पुन्हां पुढें शिकणार होते. ते उत्कृष्ट शिक्षक होते. कोणताहि विषय ते शिकवूं शकत. त्यांचें ड्रॉइंगहि सुंदर होतें. ते शरीरानें उंच होते. आम्हां विद्यार्थ्यांना ते प्रिय असत. शाळेच्या इमारतींतच एका खोलींत त्यांचें बिऱ्हाड असे. एका गरीब विद्यार्थ्यालाहि त्यांनीं आपल्या खोलींत आश्रय दिला होता. त्यांच्या खोलीच्या कुलपाची किल्ली आमच्या वर्गाच्या खोलीच्या कुलपासहि लागली असती. ऑफिसचें कुलूप निराळें होतें. खोल्यांचीं कुलपें सारखींच असत.

गोविंदाचें म्हणणें मला पटलें. तो व मी त्या दिवशीं काळेमास्तरांकडे गेलों. त्यांना आमचा विचार सांगितला.

" मला तर कांहीं अडचण दिसत नाहीं, " ते म्हणाले.

" आम्ही आमचीं अंथरुणें तुमच्या खोलींत ठेवीत जाऊं," मी म्हणालों.

" सकाळीं लौकर उठत जाऊं. वर्गांत घाण वगैरे करणार नाहीं. कांहीं लिहून वगैरे ठेवणार नाहीं, " गोविंदा म्हणाला.

त्या दिवशीं रात्रीं आठचे सुमारास मी माझी लहानशी वळकटी घेऊन शाळेंत आलों. गोविंदा व त्याचा भाऊ बंड्या हेहि आले. त्यांचा कंदील होताच. आम्ही आमच्या वर्गाची खोली उघडली. आणि तेथें अभ्यास करीत बसलों. थोडे दिवसांनीं इंगळे म्हणून एक गांवांतलाच सातवी

इयत्तेंतील विद्यार्थी, तोहि आमच्या या योजनेंत सामील झाला. आम्ही चौघेजण झालों. बंड्या लहान होता. तो लौकर झोंपीं जाई. आम्ही बराच वेळ वाचीत बसत असूं.

एखादे दिवशीं इंगळे भुईमुगाच्या शिजवलेल्या शेंगा बरोबर घेऊन येत असे. मग आम्ही गॅलरींत बसत असूं. दिवा वगैरे त्या वेळेस ठेवीत नसूं. शेंगा खात खात कधीं कधीं कवितांच्या भेंड्याहि लावीत असूं. आमच्या भेंड्या लावण्याच्या कार्यक्रमांत एखादे वेळेस काळेमास्तरहि सामील होत. मोठ्या आनंदांत वेळ जात असे. काळेमास्तरांचा अभ्यासाच्या दृष्टीनेंहि उपयोग होई. इंग्रजी, गणित वगैरे विषयांतील आमच्या अडचणी ते दूर करीत. कधीं कधीं ते स्वतःचे निरनिराळे अनुभव सांगत. कधीं सुंदर संस्कृत कविता वगैरे ते म्हणून दाखवीत. अभ्यास कसा करावा याबद्दलहि ते विचार मांडीत. वाचनीय पुस्तकांची एखादे वेळेस यादी द्यावयाचे. आमचा जणूं तो आश्रमच झाला. शाळामातेच्या मांडीवर बसून आम्ही शिकत होतों. तिच्या मांडीवरच झोंपत होतों. सकाळीं काय तीन चार तास आमचे घरीं जात असतील तेवढेच. बाकी दिवसरात्र आम्ही शाळेंतच असूं.

खरोखर कितीतरी शाळांतून असें करतां येईल. गरीब विद्यार्थ्यांना राहायला जागा मिळत नसते. आणि शाळामहाशाळांच्या प्रचंड इमारती उभ्या असतात! शेंकडों विद्यार्थी शाळामहाशाळांच्या अभ्यासाच्या वेळांव्यतिरिक्त वेळांत या इमारतींतून राहूं शकतील, रात्रीं निजूं शकतील, अभ्यास करूं शकतील. अर्थात् व्यवस्थितपणें वागण्याची, नासधूस न करण्याची, घाण न करण्याची, कांहीं वेडेंवांकडें न करण्याची, भांडाभांडी, मारामारी न करण्याची, कांहीं चावट मजकूर न लिहिण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांनीं शिरावर घेतली पाहिजे.

पुण्याला विद्यार्थ्यांची स्थिति पाहा. खानावळींतून आणलेल्या एकेका डब्यामध्यें दोघे दोघे विद्यार्थी जेवतात. त्यांचें पोटहि पुरें भरत नाहीं. परंतु त्यांना खोलीला महिना प्रत्येकीं चार चार रुपये द्यावे लागतात! या विद्यार्थ्यांच्या राहाण्याची सोय त्या प्रचंड इमारतींत सहज करतां

येईल. परंतु इच्छा हवी, तळमळ हवी, कळकळ हवी; गरिबांच्या जीवनाची स्वच्छ व स्पष्ट कल्पना हवी !

आम्ही साधारण साडेदहा वाजले म्हणजे दिवा मालवून निजत असूं. दिवा मालवल्यावरहि अंथरुणावर पडल्या पडल्या आम्ही बोलत असूं. परंतु बोलतां बोलतां गोविंदा एकदम घोरूं लागे. इंगळेहि घोरूं लागत. मी एकटाच जागा असें. मी दार उघडून मग गच्चींत येऊन बसत असें. आकाशाची शोभा पाहात असें.

एके दिवशीं असा बराच वेळ मी बसलों होतों. मला तहान लागली. आमच्या खोलींत पाणी नव्हतें. काळेमास्तरांना तरी रात्रीं कसें उठवावयाचें ? तळ्यावर पाणी पिऊन यावें असें मीं मनांत ठरविलें. हो, तळ्यावरच जावें. रात्रींच्या वेळीं तळें कसें शांत दिसत असेल ! आकाशाच्या अनंत ताऱ्यांचें प्रतिबिंब कसें स्वच्छ पडलें असेल ! मी उठलों. रात्रींचे बारा वाजून गेले असतील. मंद, मंद पावलें टाकीत मी तळ्यावर गेलों. तळ्याच्या घाटावरून खालीं उतरलों. मी पोटभर पाणी प्यालों. तेथून जावें असें मला वाटेना. एके दिवशीं तो तलाव मला बुडवीत होता. परंतु त्यानें मला बुडविलें नाहीं. त्याचे मीं आभार मानिले. तलावा, माझी आई तुला किती धन्यवाद देईल असें मीं हात जोडून म्हटलें. इतक्यांत रस्त्यांत मला गस्त ऐकूं आली. मी घाबरलों. पोलीसानें मला पाहिलें तर ! तलावाच्या कांठीं रात्रींचे बारा वाजतां ! आत्महत्येचा आरोप तर नाहीं ना माझ्यावर ठेवणार ? आपण दिसूं नये म्हणून त्या थंडगार पायरीवर मी निजलों.

दहा पंधरा मिनिटें अशीं गेलीं. मी हलकेच उठलों. शाळेमध्यें परत येऊं लागलों. मला वाटेंत कोणी भेटलें नाहीं. परंतु शाळेंत आलों तों खोलीचें दार लावलेलें ! कोणीतरी लघवीला उठलें असावें व उघडें राहिलेलें दार लावलें असावें ! आतां हांका माराव्या लागणार ! मीं हांक मारली नाहीं. कशाला उठवा ! मी बाहेरच राहिलों. आकाशांतील ताऱ्यांच्या संगतींत राहिलों. त्या रात्रीं मला झोंप आलीच नाहीं. त्या शालागृहांत मी रामनामाचा जप करीत फिरत होतों.

पहांटेची वेळ झाली. गोविंदा जागा झाला. त्यानें दार उघडलें. मी दुसऱ्या बाजूला जाऊन उभा राहिलों. गोविंदा खालीं गेला. मी पटकन् खोलींत शिरून आपल्या अंथरुणावर पडलों. गोविंदा वर आला.

" काय इंगळे, आज उठत नाहीं का ? श्याम, उठायचें नाहीं का ? " तो विचारूं लागला.

" आज फार थंडी आहे. झोंपूं जरा, " मीं म्हटलें.

" माझी आहे मॅट्रिकची परीक्षा; तुमचें काय, " असें म्हणत इंगळे उठले. त्यांनीं दिवा लावला. गोविंदाहि उठला. परंतु मी कांहीं उठलों नाहीं.

" श्याम, ऊठ रे. नाहींतर आम्हांलाहि निजावेंसें वाटेल. ऊठ, " गोविंदा म्हणाला.

" शाळामाउलीच्या मांडीवर निजूं दे आणखी थोडा वेळ. आज मला निजावेंसें वाटत आहे. तुझेंहि पांघरूण घाल माझ्या अंगावर, " मीं म्हटलें.

" निजूं दे रे त्याला. माझेंहि पांघरूण घाल," इंगळे म्हणाला.

माझ्या अंगावर सर्वांचीं पांघरुणें पडलीं. त्यामुळें शेवटीं निजून राहाण्याऐवजीं मी उठलों. परंतु माझे डोळे पेंगत होते.

" श्याम, नीज तूं. तुला बरें वाटत नाहीं बहुत करून, " गोविंदा म्हणाला.

त्या सहानुभूतीच्या शब्दांनीं मला निजण्याची पुन्हां स्फूर्ति आली व मी निजलों. चांगलें दिसायला लागलें तेव्हांच मग मी उठलों.

असा आमचा हा शाळागृहाचा आश्रम मोठ्या सुंदर रीतीनें चालला होता. अभ्यासहि चांगला होई, झोंपहि चांगली लागे. त्यामुळें मनहि प्रसन्न राही. परंतु अकस्मात् हा आश्रम बंद होणार होता. कायमचाच बंद होणार होता !

# औंधला रामराम

## ३७

मी आतां औंधला रुळल्यासारखा झालों होतों. कधीं एकनाथाकडे भाकर खावी, कधीं खानावळींतून भाकर भाजी आणावी, कधीं हातानें जेवण करावें, कधीं कांहींच करूं नये असें चाललें होतें. मिळेल तें खायला व शाळा झोंपायला असा कार्यक्रम सुरू होता. हळूहळू भावाच्या मरणाचें दुःखहि कमी झालें. दुःखावर काळासारखा कोणताहि उपाय नाहीं. जसजसा काळ जातो, तसतसा दुःखाचा वेगहि कमी होतो.

आमच्या सहामाही परीक्षेंत मला मार्कहि चांगले मिळाले. संस्कृतमध्यें ९० मार्क मिळाले. मराठीची माझी प्रश्नोत्तरपत्रिका काळेमास्तरांनीं वर्गांत वाचून दाखविली. कांहीं प्रश्नांचीं उत्तरें त्यांना फारच आवडलीं. ते म्हणाले, "या उत्तराला किती मार्क द्यावे मला समजेना ! परंतु जास्त मार्क देतां येत नव्हते." मला समाधान वाटलें. कांहीं मित्रांनीं मोफत बोर्डिंगसाठीं पुन्हां अर्ज करण्याबद्दल सुचविलें. ते म्हणाले, " तुमचे मार्क त्या अर्जांत लिहा. खात्रीनें तुम्हांला मोफत बोर्डिंग मिळेल. " परंतु माझी तयारी नव्हती. " सध्यांचा स्वतंत्र प्रयोग ठीक आहे," असें मीं म्हटलें. संस्थानिकांच्या मर्जीवर विसंबून राहाण्यापेक्षां आपल्या मित्रांच्या प्रेमावर विसंबणें अधिक प्रशस्त होय. एकनाथानें प्रेमानें दिलेली भाकर, मुजावरनें प्रेमानें दिलेलें वरण यांतील गोडी कांहीं और होती. ती गोडी त्या मोफत बोर्डिंगच्या अन्नांत मला मिळाली नसती.

परंतु माझ्या या जीवनक्रमांत एकाएकीं विघ्न आलें. औंधला प्लेग सुरू झाला. आधीं माकडें पटापट मरूं लागलीं. औंधला वानर पुष्कळ. परंतु हे वानर मरून पडूं लागले. प्लेगमध्यें उंदीर मरतात, तसेच वानरहि मरतात. रोज आम्ही मरणाच्या वार्ता ऐकूं लागलों. प्लेगनें लागलेल्या एका गृहस्थाला भेटावयास आलेला एक मनुष्य येतांक्षणीं प्लेगनें स्वतः लागून तडकाफडकीं मरण पावला ! शुद्ध हवेंतून जो मनुष्य दूषित हवेंत

येतो, तो अधिक लवकर अशा सांथीला बळी पडतो. आमची शाळा बंद होणार अशी वार्ता कानीं आली. पुष्कळ परगांवचीं मुलें भीतीनें आधींच निघून गेलीं.

परगांवच्या विद्यार्थ्यांनीं ताबडतोब निघून जावें असें फर्मान सुटलें. शाळा बंद झाली. मुलें आवराआवर करूं लागलीं. मी कोठें जाणार ? मावशीकडची मनीऑर्डर येणार होती. परंतु ताबडतोब निघणें प्राप्त होतें. शेवटीं वडिलांनीं मोठ्या प्रेमानें दिलेली पांढरी घोंगडी मीं विकली. कांहीं सुंदर पुस्तकें विकलीं. जाण्यापुरते पैसे मीं उभे केले, मींहि माझी आवराआवर केली.

एका बैलगाडींत आम्हीं सर्वांचें सामान घातलें. सखाराम, मी, एकनाथ, वामन, गोविंदा, बंड्या सारे निघालों. बंड्या गाडीबरोबर गेला. बाकीचे आम्ही पायीं निघालों. एकनाथ व वामन आपल्या घरीं जाणार होते. रहिमतपूर स्टेशनच्या जवळच त्यांचें गांव होतें. औंधहून निघालों तरी औंधला प्लेग संपतांच मी परत येणार होतों. औंध मी कायमचें सोडतों आहे असें त्यावेळेस माझ्या ध्यानींमनींहि नव्हतें. तें तळें, तो झरा, तें यमाईचें देऊळ, ती आमची आश्रयदाती शाळा यांना मी का कायमचा मुकत होतों ? दाजीबांची सतार का पुन्हां कानांवर पडायची नव्हती ? बापूच्या आईकडची भाकर का पुन्हां खायला नसती मिळाली ? द्रुपदीच्या आईकडचें गाईचें फेंसाळ ताजें दूध पुन्हां नसतें प्यायला मिळालें ? पुन्हां का मुजावरचें धीरगंभीर मुखमंडल पाहावयाचें नव्हतें ? एकनाथची दिलदार व प्रेमळ संगत का संपली ?

मी औंधला पुन्हां येणार, औंधहूनच मॅट्रिक होणार असाच विचार करीत मी जात होतों. आम्ही मित्र नाना प्रकारच्या गप्पा मारीत जात होतों. शब्दांच्या भेंड्या लावण्यांत फारच मजा आली.

वाटेंत मला शौचास जावें लागलें. एका नाल्याच्या कांठीं गेलों. परंतु मला मोठा कांटा त्या चिखलांत माझ्या पायांत मोडला. त्यावेळेस तर मी अगदीं कळवळलों. जशी एखादी चूक पायांत घुसावी, तसा तो कांटा पायांत घुसून बसला. माझे मित्र पुढें गेले होते. मी रस्त्यांतून

लंगडी घालीत पळत होतों. किती कष्टानें मी जात होतों, तें माझें मला ठावें. शेवटीं माझे मित्र मीं गांठले.

" एकनाथ, फार मोठा कांटा पायांत मोडला गड्या. पाय फार दुखतो, " मीं म्हटलें.

" घरीं गेलों म्हणजे काढीन, " तो म्हणाला.

सखाराम व एकनाथ या दोघांच्या खांद्यावर हात ठेवून मी एका पायानें जात होतों. परंतु असें किती वेळ चालणार ? मी शेवटीं लंगडत लंगडत निघालों.

" आतां सारे तुम्ही आमच्या गांवीं चला. आमच्याकडे जेवा, आणि मग जा, " एकनाथ म्हणाला.

" गाडीला उशीर होईल, " गोविंदा म्हणाला.

" तुम्हांला बैलगाडी देऊं. वेळेवर पोंचवूं, " एकनाथ म्हणाला.

" चल रे गोविंदा, " मीं म्हटलें.

एकनाथाच्या घरीं जावयास मी उत्सुक होतों. ज्यानें औंधला मला मोठा आधार दिला, त्याचें घर नको का पहायला ? त्याच्या वडिलांच्या पायां नको का पडायला ? एकनाथाच्या वडिलांचें माझ्यावर प्रेम होतें. औंधला त्यांची माझी भेटच अशा वेळेस झाली कीं ती विसरणें शक्य नव्हतें. त्या दिवशीं मी सायंकाळीं झऱ्यावरून स्नान करून येत होतों. मुखानें रामनाम जपत येत होतों. आणि एकनाथ व त्याचे वडील फिरायला जात होते.

" काय श्याम, झालें स्नान ? " एकनाथानें विचारलें.

" हो, " मीं म्हटलें.

" हे आमचे वडील बरें का, " एकनाथानें ओळख करून दिली.

मीं त्यांना प्रणाम केला. ते गेले व मी खोलींत आलों. कधीं एखादे वेळेस ते औंधला आले तर मला भेटत. " आमच्या मुलांबरोबर तुम्ही जेवत जा. संकोच नका करूं, " असें ते सांगत. असे ते एकनाथाचे वडील. काय त्यांचा व माझा संबंध ? परंतु मनोमय संबंध कांहींतरी होता खरा.

गोविंदा आजपर्यंत ब्राह्मणेतराकडे कधीं जेवला नव्हता. एकनाथ जातीनें गुरव; परंतु माझ्यापुढें गोविंदाचें काय चालणार? गोविंदानें शेवटीं येण्याचें कबूल केलें. आमच्या जेवणाची ताबडतोब तयारी सुरू झाली. सारे एकनाथाच्या घरीं आलों. त्याच्या वडिलांना खूप आनंद झाला.

" श्याम, तुझा आधीं कांटा काढतों चल, " एकनाथ म्हणाला.

एकनाथ कांटा काढूं लागला. मला लहान मुलासारखें रडूं येऊं लागलें. कांटा फारच खोल गेला होता. एकनाथानें पाय घट्ट धरून ठेवला होता. सुईनें पाय पोखरण्याचें काम धीम्मेपणानें त्यानें चालविलें होतें.

" नको, नको. राहूं दे," मीं म्हटलें. सुईचा धक्का कांट्याला एकदम लागल्यामुळें मी कळवळलों. माझ्या अंगाला घाम सुटला.

" अरे निघाला आतां. एक कळ सोस. एक हां, " असें म्हणून एकनाथानें जोरानें टांका घेतला. कांटा वर आला. त्यावेळेस किती हलकें वाटलें. पायावर त्यानें गूळ–चुना लाविला. नंतर आम्ही जेवायला बसलों. दहींभात पोटभर जेवलों.

" श्यामला भात वाढा. भाकर खाऊन कंटाळला आहे, " एकनाथ म्हणाला.

" आतां कोंकणांतच जावयाचें आहे. भाताच्या माहेरघरीं, " मीं म्हटलें.

" पुन्हां ये बरें, श्याम. प्लेग संपून शाळा सुरू होतांच तुला मी कळवीन, " एकनाथ म्हणाला.

मी नको नको म्हणत होतों तरी एकनाथ दहीं वाढीतच होता. तें दहीं नव्हतें. त्याच्या हृदयांतील तें प्रेम होतें. तें प्रेम ओतायला दह्याचें बाह्यचिन्ह मिळालें झालें. आमचीं जेवणें झालीं. बंड्या स्टेशनवर परभारा बैलगाडीबरोबर गेला होता. त्याच्यासाठीं आम्ही फराळाचें घेतलें. एकनाथानें बैलगाडी जोडली. त्याच्या वडिलांच्या आम्ही पायां पडलों. सर्वांचा निरोप घेऊन निघालों. एकनाथ गाडी पळवीत होता. बैलांना

हांकलण्यांत त्याला आनंद वाटत होता. एकनाथाच्या रुमालाचा शेंवला माझ्या तोंडावर उडत होता.

स्टेशन आलें. बंड्या फराळास बसला. आम्हीं आपापलें सामान घेतलें.

"श्याम, तुझ्याजवळचें एखादें पुस्तक दे ना वाचायला. वडिलांना पण होईल," एकनाथ म्हणाला.

"सेतुबंधनी टीका देऊं? विष्णुबुवा ब्रह्मचारीकृत आहे. तुझ्या वडिलांना होईल. आणि तुला कोणतें देऊं? कर्व्यांचें आत्मवृत्त देऊं? छान आहे," मीं म्हटलें.

एकनाथाला दोन्हीं पुस्तकें दिलीं. त्यानें माझ्या ट्रंकेंतून आणखीहि एकदोन निवडून घेतलीं. चंदावरकरांचीं व्याख्यानें हें इंग्रजी पुस्तक मीं वरतींच ठेवलें. गाडींत वाचायला होईल असें वाटलें. एकनाथाला गाडी घेऊन लौकर परत जायचें होतें. तो निघाला. मला खूप वाईट वाटलें. दिलदार मनाचा व पीळदार शरीराचा एकनाथहि जरा सद्गदित झाला. शेवटीं तो गेला. किती तरी वेळ त्याच्या गाडीकडे मी बघत होतों.

माझा पाय अजून दुखत होता, जोरानें टेंकवत नव्हता. आम्ही सारे प्लॅटफॉर्मवर येऊन बसलों. आली एकदांची गाडी. गाडींत चिक्कार गर्दी होती. गाडी पांच मिनिटें थांबे! मीं हमाल केला नव्हता. खांद्यावर ट्रंक व हातांत वळकटी घेऊन मी लंगडत लंगडत घांवत होतों. कोणी डबा उघडूं देईना. परंतु एका गृहस्थाला दया आली. त्यानें डबा उघडला. शिरलों आम्ही आंत. गोविंदा, बंड्याहि आले. सखाराम दुसरीकडे बसला. गाडी सुरू झाली.

माझें चंदावरकरांचे लेख व व्याख्यानें हें इंग्रजी भलें मोठें पुस्तक वर होतें. तें काढून मी वाचूं लागलों. त्या दार उघडणाऱ्या सद्गृहस्थांस जरा कौतुक वाटलें.

"तुम्ही विद्यार्थी आहांत वाटतें?" त्यांनीं विचारलें.

"हो! आम्ही औंधला शिकतों," मीं म्हटलें.

"कोणत्या वर्गांत आहांत तुम्ही?"

"सहाव्या इयत्तेंत."

"हें इंग्रजी पुस्तक तुम्हाला समजतें का?"

" पुष्कळसें समजतें. न समजेल तेथें अंदाजानें अर्थ करतों."

अशीं आमचीं प्रश्नोत्तरें चाललीं होतीं. थोड्या वेळानें धैर्य करून मींच त्यांना प्रश्न केला.

" तुम्ही कोठें असतां ? "

" हिंगण्याला, कर्व्यांच्या संस्थेंत, " ते म्हणाले.

" हिंगण्याला ? " मीं आश्चर्यानें विचारलें.

" हो. कां ? तुम्हाला आश्चर्यसें वाटलें ? " त्यांनीं विचारलें.

" माझी मावशी तेथें आहे, " मीं म्हटलें.

" काय नांव ? " त्यांनीं विचारलें.

" सखूबाई, " मीं सांगितलें.

" हो, माहीत आहेत त्या मला. संस्थेंतच त्या शिकल्या," ते म्हणाले.

" तुम्ही का त्या संस्थेंत शिकवितां ? " मीं विचारलें.

" नाहीं, मी प्रचारक आहें. मदत गोळा करून आणतों, " ते म्हणाले. थोड्या वेळानें त्यांनीं मला विचारलें,

" मॅट्रिक झाल्यावर काय करणार ? "

" मला एम्. ए. व्हायचें आहे, " मीं म्हटलें.

" एम्. ए. होऊन काय करणार ? " पुन्हां त्यांचा प्रश्न आला.

" तुमच्या संस्थेसारख्या एखाद्या संस्थेंत काम करीन, " मीं म्हटलें.

" या. आम्ही तुमचें स्वागत करूं ! " ते आनंदानें म्हणाले.

त्यांनीं आम्हांला फराळाचें वगैरे दिलें. डाळिंब, पेरू वगैरे फळें दिलीं. त्यांचा स्वभाव गोड व मनमिळाऊ वाटला.

" तुमच्या मावशीला कांहीं निरोप आहे ? " त्यांनीं विचारलें.

" मी कोंकणांत गेलों म्हणून सांगा, " मीं म्हटलें.

पुण्याच्या स्टेशनवर आम्ही सारे उतरलों. सखाराम व मी लगेच मुंबईस जाणार होतों. गोविंदा व त्याचा भाऊ पुणें शहरांत जाणार होते. गोविंदाची पुन्हां औंधला भेट होईल असें मी मनांत म्हणत होतों. आमचा निरोप घेऊन ते दोघे भाऊ गेले. आम्ही मुंबईच्या गाडींत बसलों. मुंबईस पोंचल्यावर मी बोटींत बसून कोंकणांत गेलों. पुन्हां आईजवळ गेलों.

अनुक्रम २८८५ विभाग ... क्रमांक ९०८ नों. दि. ३९/ ... वाचनालय

## कांहीं दिवस घरीं

## ३८

मी कोंकणांत गेलों, परंतु एकदम घरीं नाहीं. प्लेगमुळें मी औंध सोडून येत आहें, असें घरीं पत्र पाठविलें होतें. त्यामुळें माझी काळजी घरीं करणार नाहींत, असें वाटलें. पालगडला घरीं जाण्याआधीं दापोलीला माझ्या मित्रांचा पाहुणचार घेत मी दोन दिवस राहिलों. दापोलीला राम नसला तरी दुसरे पुष्कळ मित्र होते. त्यांना भेटल्याशिवाय मी परभारा कसा जाऊं?

दापोलीच्या बोर्डिंगांत माझा एक शिवराम नांवाचा मित्र राहात होता. त्यानें तेथें बिऱ्हाड केलें होतें. त्याची आई व दोन लहान मामेभाऊ तेथें होते. मी त्याच्या बिऱ्हाडीं गेलों. त्याला खूप आनंद झाला. त्या दिवशीं हातानें स्वयंपाक करण्याची पाळी होती. शिवरामची आई दुरून सारें सांगत होती.

"शिवराम, आज मी आलों आहें, तर मलाच करूं दे स्वयंपाक. देवानें चांगली संधि आणली आहे," मीं म्हटलें.

"अरे, तूं लांबून पाहुणा आलेला. इतर मुलें हंसतील," शिवराम म्हणाला.

"तूं हंसूं नको म्हणजे झालें. निदान पोळ्या तरी मी करीन. अरे, औंधला जाऊन इतर कांहीं शिकलों नसलों, तरी स्वयंपाकांत तरी मीं निःसंशय प्रगति केली आहे," मीं म्हटलें.

"करूं दे हो श्यामला पोळ्या," शिवरामची आई म्हणाली.

शिवरामच्या आईच्या तोंडावर जी सात्त्विकता होती, तशी सात्त्विकता मीं क्वचितच कोठें पाहिली असेल! राहून राहून ती पवित्र मूर्ति कधीं कधीं माझ्या डोळ्यासमोर येते. पति अंमळ वेडसर होऊन कोठें निघून गेलेला! त्याचा कधीं पत्ता लागत नसे! भावाच्या आधारानें ही थोर सती आपला एकुलता एक मुलगा शिवराम घेऊन राहिली होती. भावाचीहि

पत्नी निवर्तली होती. भावाच्या लहान मुलांना तिनेंच वाढविलें. भाऊ जरा रागीट होता; परंतु ती साध्वी सारें सहन करी व सर्वांना सांभाळी.

आईनें सांगितल्यावर शिवरामचा इलाज नव्हता. मी चुलीजवळ बसलों. मीं चांगल्या पोळ्या केल्या. कशा फुगत होत्या! मला शाबासकी मिळाली. ताक करावयाचें होतें. मीं ताकहि केलें व कढत पाणी घेऊन लोणीहि काढलें.

" श्याम, अगदीं सारें तुला करतां येतें रे !" शिवरामची आई म्हणाली.

" निदान आचारी म्हणून तरी कोठें राहातां येईल," मीं म्हटलें.

आमचीं जेवणें झालीं. शिवरामबरोबर मी इंग्रजी शाळेंत जाणार होतों. सर्व वर्गबंधूंना भेटावयास मी उत्सुक होतों. मला सारखें हंसूं येत होतें. ज्या वेळेस मला फार आनंद झालेला असतो, त्यावेळेस मला सारखें हंसूं येतें. तें कांहीं केल्या थांबत नाहीं. झऱ्याचें पाणी जसें बुडबुड बाहेर येतें, तसें माझें होतें.

मी एकदां गुजराथमध्यें एका गांवीं गेलों होतों. तेथें राष्ट्रीय शाळा होती. ती राष्ट्रीय शाळा चालविणारे तुरुंगांत माझे मित्र झाले होते. त्यांना भेटावयास म्हणून मी गेलों. शाळेंतील मुलेंमुली पाहून मी सारखा मंदमधुर हंसत होतों. तीं मुलें म्हणालीं, " हे हंसरे आहेत." मीं त्यांना म्हटलें, " परंतु लोक मला रडके म्हणतात." तें लोकांचें म्हणणें त्या सरळ मुलांना पटलें नाहीं. मुलांचें म्हणणें बरोबर होतें. स्वभावतः मी अत्यंत आशावंत व आनंदी आहें. माझ्या निराशेंतहि अपार आशा असते व माझ्या अश्रूंतहि अनंत स्मितें असतात. म्हणून रडतां रडतां मी एकदम खुदकन् मुलाप्रमाणें हंसतोंहि. कारण तें रडणें सहज आकस्मिक आलेलें क्षणभंगुर पटल असतें. गुजराथेंतील त्या खेड्यांतील मुलें तरी 'हंसरा श्याम' म्हणून मला संबोधीत !

शिवराम व मी शाळेंत गेलों. शाळेची घंटा होण्याला अद्याप अवकाश होता. मी सहाव्या यत्तेंत गेलों. सारीं मुलें माझ्याभोंवतीं जमलीं. एका मित्रानें कोटावर सोनचाफ्याचें फूल लाविलें. कोटावर फुलें लावून एका शिक्षकांची आपण कशी मागें गंमत केली होती, तें आम्हां सर्वांना आठवून आम्ही मोठ्यानें हंसलों.

" श्याम, औंधला कोणाच्या पिशव्यांना गांठी नाहीं ना बांधल्यास ?" एका मित्रानें विचारलें.

" औंधला श्याम अगदीं गरीब पारवा झाला होता. गरीब गाय झाला होता, " मीं म्हटलें.

" तूं असा कसा मध्येंच आलास ?" परशुरामानें विचारलें.

" तेथें प्लेग झाला म्हणून शाळा बंद, " मीं म्हटलें.

" येथें दापोलीला कधीं प्लेग येत नाहीं. येथें ठरलेल्या सुट्टया. देशावर प्लेगचीहि सुट्टी मिळते, " कृष्णा म्हणाला.

" तुझा भाऊ प्लेगनें गेला ना रे ?" जगन्नाथानें विचारलें.

" हो आणि रामचा भाऊहि गेला, " मीं म्हटलें.

" प्लेगनेंच का ?"

" नाहीं. विषमानें. आणि आपल्या शंकरला रे काय झालें ?" मीं आमच्या जुन्या वर्गमित्राबद्दल दुःखानें विचारलें.

" त्याला उदर झाला. उदराचे रोगी पावसाळ्यांत दगावयाचेच. कांहीं एक कल्पना नव्हती. वर्गांत त्याच्याशिवाय आम्हांला सुनें वाटतें. भूमितीच्या तासाला तो शिक्षकांना भंडावून सोडावयाचा," केशव म्हणाला.

इतक्यांत घंटा झाली. पहिली घंटा होतांच वर्गांत येणारे ते शिक्षक, त्यांचाच सहावीवर पहिला तास होता. मी परशुरामाच्या जवळ बसलों होतों. वर्गांत शिक्षक आले. आज दुसरी घंटा झाली नाहीं, तरी सारीं मुलें वर्गांत कशीं याचें त्यांना आश्चर्य वाटलें. मुलांमध्यें मंद हास्याच्या झुळका सुटल्या. शिक्षकांची तीक्ष्ण नजर चौफेर फिरली. त्यांची माझी दृष्टादृष्ट झाली. त्यांना जुना शिष्य पाहून आनंद झाला. ते एकदम उठले. त्यांनीं फळ्यावर एक श्लोक लिहिला. तो संस्कृत श्लोक होता. तो श्लोक त्यांनीं कां लिहिला तें माझ्या पटकन् ध्यानांत आलें. मी हंसूं लागलों.

" काय श्याम, हंसूंसें येत आहे ? श्लोक समजला वाटतें ?" त्यांनीं विचारलें.

" हो, " मीं म्हटलें.

" कोठला आहे हा श्लोक ?" त्यांनीं प्रश्न केला.

" मेघदूतांतला, " मीं म्हटलें.

त्या श्लोकांतील अर्थ पुढीलप्रमाणें होता:—

'आपल्या प्रचंड वृष्टीनें पर्वतांवरचे वणवे विझविणारा जो तूं, त्या तुला प्रवासांत शीण आलेला पाहून, तो अनेक शिखरांचा आम्रकूट पर्वत, आपल्या सुंदर डोक्यावर तुला घेईल; कारण पूर्वीच्या प्रेमळ स्मृतींच्या आशेनें आलेल्या आपल्या मित्राला पाहून क्षुद्र मनुष्यहि विन्मुख होणार नाहीं. मग जे मनानें थोर आहेत, त्यांच्याबद्दल काय सांगावें ?'

त्या श्लोकांतील शेवटचे दोन चरण त्या दिवसापासून माझ्या मनांत अमर झाले आहेत. ज्ञान हें प्रसंगानें ठसतें. अनुभवानें सिद्ध होतें. जीवनांत मुरतें.

"म्हणाना ते दोन चरण," आश्रमांतील वासुदेव म्हणाला.

"मी सर्वच श्लोक आठवतों आहें. परंतु सर्व कांहीं आठवत नाहीं," श्याम म्हणाला.

"जे चरण अमर आहेत, तेच म्हणा," गोविंदा म्हणाला.

'न क्षुद्रोऽपि प्रथमसुकृतापेक्षया संश्रयाय
प्राप्ते मित्रे भवति विमुखः किं पुनर्यस्तथोच्चैः ॥'

हे ते दोन चरण. पूर्वीच्या प्रेमळ श्यामला वर्गांतील मुलांनीं प्रेम दिलें, कोटावर फूल लाविलें. त्या श्यामला तीं मुलें विसरलीं नाहींत, हें त्या शिक्षकांना त्या श्लोकाच्या द्वारां सांगावयाचें होतें. त्या शिक्षकांच्या समयसूचकतेबद्दल व सहृदयतेबद्दल आम्हांला कौतुक वाटलें. आम्हांला त्या श्लोकानें आनंद झाला. आनंदाच्या भरांत माझ्याजवळच्या मित्रानें माझा हातहि आपल्या हातांत घेतला! अरे, ते पहिले दोन चरणहि आठवले हो. ऐका.

'त्वामासारप्रशमितवनोपप्लवं साधुमूर्ध्ना
वक्ष्यत्यध्वश्रमपरिगतं सानुमान् आम्रकूटः ॥'

दापोलीच्या मुलांना मीं माझे अनेक अनुभव सांगितले. परंतु जेवणाखाण्याच्या संबंधानें मी कांहीं एक बोललों नाहीं. दापोलीला मी पूर्वी आत्याकडे राहात होतों. तेथेंहि एकदां जेवावयास गेलों. सर्वांना भेटलों. त्यांनाहि बरें वाटलें. मी दापोलीस दोन तीन दिवस होतों. एके दिवशीं माझ्या गांवचे एक गृहस्थ मला अकस्मात् भेटले.

" काय रे श्याम, कधीं आलास ? " त्यांनीं विचारलें.

" झाले दोन तीन दिवस, " मीं म्हटलें.

" अरे, घरीं तुझी सारखी काळजी करीत आहेत. औंधला प्लेग आहे, एवढेंच तूं कळवलेंस. तुझा एक भाऊ प्लेगनें गेला, म्हणून तुझ्याबद्दल सारीं फिकिरींत आहेत, " ते गृहस्थ म्हणाले.

" मीं तर भाऊंना पत्र पाठविलें होतें. पहिल्या पत्रानंतर दुसरें औंध सोडल्याचेंहि पत्र टाकलें होतें, " मी म्हणालों.

" तें मिळालें नाहीं. तूं येथें मजा करीत आहेस व ते तुझ्या फिकिरींत आहेत. त्यांना अन्न गोड लागत नाहीं, झोंप लागत नाहीं. आधीं घरीं जा, " ते म्हणाले.

" परंतु मला काय माहीत ? " मी म्हणालों.

" भावाच्या मरणानें आईबाप दुःखी आहेत हें नाहीं तुला माहीत ? तुझ्याकडच्या प्लेगच्या वार्तेनें ते आणखी चिंतेंत असतील हें नको होतें का तुला कळायला ? इंग्रजी शिकतां, परंतु साध्या गोष्टी कळत नाहींत. आई-बापांना विसरणें म्हणजे इंग्रजी शिक्षण, " असें म्हणून ते गृहस्थ गेले.

मला वाईट वाटलें. मी का आईबापांना विसरलों होतों ? ज्यांचें स्मरण होतांच मला गहिंवरून येत असे, त्यांना का मी विसरलों होतों ? मी का मायभुल्या व बापभुल्या—मायबापांना विसरणारा असा झालों होतों ? माझ्या हृदयावर तो महान् प्रहार होता. मीं पत्र पाठविलें होतें, पोंचलें नसेल बहुधा. तरी पण सदानंदाच्या मरणानें माझ्या आईला जबर धक्का बसला होता. तिच्याकडे मीं आधीं गेलें पाहिजे होतें, असें आतां मला वाटूं लागलें. मीं ताबडतोब रात्रीच्या बैलगाडीनें जाण्याचें ठरविलें.

" शिवरामच्या आई, रात्रीं मला जाऊं देच. आग्रह करूं नका, " मीं म्हटलें.

" उद्यां मी अंग धुतें, मग जेवून जा. तुला थालिपीठ आवडतें. तें करीन, " ती माउली म्हणाली.

" पुन्हां मी औंधला जातांना येथें येईन, त्या वेळेस करा थालीपीठ. आज गेलें पाहिजे. माझी चातकासारखी घरीं वाट पाहात आहेत, " मीं म्हटलें.

मातेनें मातेची मनस्थिति ओळखली. शिवरामच्या आईनें आढेवेढे घेतले नाहींत. रात्रीं मीं बैलगाडी केली व पालगडला जावयास निघालों. आतां सारें लक्ष घरीं लागलें. घरच्या आठवणी येऊं लागल्या. गाडींत गाडीवान झोंपला, परंतु मी जागाच होतों.

पहांटेच्या वेळेस मी घरीं आलों. खेड्यांतील लोक पहांटे उठतात. ब्राह्मणवाडींत माझें घर. कोठें वेदपठण चाललें होतें, कोठें दळणाच्या ओंव्या ऐकूं येत होत्या. मी माझ्या घरीं आलों. 'आई' अशी सद्गदित हांक मारली. आई ताक करीत होती. ती एकदम आली. मी तिला बिलगलों. ती पाठीवरून सारखा हात फिरवीत होती. देवांना तिनें गूळ ठेवला.

"आलास सुखरूप. तुझ्या वाटेकडे बाळ, सारखे डोळे होते. त्याला नेलें देवानें. म्हटलें तूं दृष्टीस पडतोस कीं नाहीं. 'आज आतां श्याम नाहीं येत, बोटीच्या गाड्यांची वेळ झाली' असें म्हणून ते आतांच फुलें दुर्वा आणण्यासाठीं गेले. बस हो बाळ." आईच्यानें बोलवेना.

मी आईच्या अंथरुणांत निजलों. धाकटा भाऊ पुरुषोत्तम माझ्याजवळ आला. आम्ही एकमेकांच्या अंगावर हात ठेवून झोंपलों. सदानंदाची आठवण येऊन न बोलतां आमच्या डोळ्यांना पाणी आलें.

शेतावरून वडील आले. त्यांच्या मी पायां पडलों. त्यांनाहि भरून आलें.

"श्याम, पत्र लिहूं नये का रे?" ते म्हणाले.

"भाऊ, मीं पत्र पाठवलें होतें. पोंचलें नाहीं," मीं म्हटलें.

आईच्या प्रकृतीवर सदानंदाच्या मरणाचा खोल परिणाम झालेला मला दिसत होता. आमच्यासाठीं ती हंसे, समाधान दाखवी. परंतु तिचें हृदय होरपळलें होतें. सदानंद म्हणजे खरोखर एक रत्न होतें. सर्वांना चटका लावून तो गेला.

आई अशक्त झाली होती. तरी माझ्यासाठीं ती कांहींना कांहीं करी. गेलेल्या मुलाचें दुःख गिळून आलेल्या मुलासाठीं ती गोडधोड करी. एखादे वेळेस ती औंधच्या हकीगती विचारी. मी सर्व सांगें.

"आई, तुझ्या श्यामला तूं सर्वत्र आईच देतेस. औंधला द्रुपदीची आई, बापूची आई माझी काळजी घेतात. पंढरपूरजवळच्या विटे गांवच्या आजीबाईचें तर माझ्यावर किती प्रेम! मधल्या सुट्टींत मला

खडीसाखरेचा खडा द्यायची हो ती. शिवाय कितीतरी प्रेमळ मित्र नवीन नवीन मला मिळाले. एकनाथ, गोविंदा, तुला किती नांवें सांगूं ?" मीं म्हटलें.

" सारी देवाची कृपा. ' श्यामला सांभाळ हो, ' असें मी कितीदां देवाला म्हणत असत्यें ! " आई म्हणाली.

आईची ती प्रार्थना तेंच श्यामचें बळ होतें. नाहींतर या दुबळ्या, नेभळ्या श्यामचा जगांत निभाव लागता ना. मला मिळणाऱ्या स्नेह-प्रेमामृताच्या मुळाशीं ती माझ्या आईची आंतरिक प्रार्थना होती. तिची ती प्रार्थना अजूनहि मला पुरत आहे व भरपूर प्रेम मिळत आहे. त्या प्रार्थनेमुळेंच श्याम उघडा पडत नाहीं.

मी पालगडला येऊन जवळजवळ दोन तीन आठवडे झाले. औंधचा प्लेग हटला नव्हता. प्रिय एकनाथाचें पत्र आलें होतें. परंतु माझ्या वडिलांना हळूहळू माझ्याबद्दल संशय येऊं लागला. मी घरीं राहायला आलों असें त्यांना वाटलें. एके दिवशीं त्या अर्थाचे त्यांचे शब्द माझ्या कानावर पडले. मी दुःखी झालों. मी का वडिलांना खोटें सांगून फसवीन ? शाळा सुरू असूनहि सुरू झाली नाहीं असें सांगेन ? जेथें अविश्वास आहे तेथें कशाला राहा, असें माझ्या स्वाभिमानी मनांत आलें.

" आई, मी आतां येथें राहात नाहीं. जाऊं दे मला. तुझी प्रार्थना माझें संरक्षण करील, " मीं म्हटलें.

" बाळ, आमच्या दुबळ्या प्रार्थना कोठवर पुरतील ? सदानंदासाठीं का मी प्रार्थना करीत नव्हतें ? मुद्दाम आगींत उडी घेऊं नये. अरे, निराशेमुळें त्यांना तसें वाटतें. त्यांच्यावर रे काय रागावतोस ? आई-बापांजवळ रे कसला आहे स्वाभिमान ? मी त्यांना सांगेन, " आई माझी समजूत घालीत होती.

परंतु मीं ऐकलें नाहीं. मीं हट्ट धरला. मी माझे कपडे धुण्यासाठीं घेऊन निघालों.

" श्याम, जाणारच का मग ? जा हो. परंतु रागावून नको जाऊं. ठेव ते सद्रे. मी आणीन हो धुऊन. आईच्या हातचे धुतलेले घेऊन जा, " ती म्हणाली.

मला त्यावेळेस रडूं आवरलें नाहीं. मी भिंतीशीं रडत उभा राहिलों. आईनें मला उगी केलें. परंतु तिचे डोळे तरी कुठें कोरडे होते ?

आईनें सद्रे धुतले. वाळल्यावर त्यांच्या मीं घड्या घातल्या. पुस्तकांची ट्रंक मुंबईला भावाकडेच ठेविली होती. माझी वळकटी मीं तयार केली. मीं पांढरी घोंगडी विकली होती.

आई म्हणाली, "श्याम, हा पुसाचा महिना. थंडीचा कडाका असेल तिकडे. ती दुलई घेऊन जा. जरा फाटली आहे. परंतु थंडी राहील."

मीं दुलई घेतली. संक्रांत जवळ आली होती. तरीहि मी राहिलों नाहीं. संक्रांतीला आपण तोंडें गोड करतों. परंतु आईचें तोंड कडू करून मी जात होतों. तरी एके दिवशीं भरीत व खिचडी तिनें केलीच केली.

"श्यामच्या आई, श्याम संक्रांतीपर्यंतसुद्धां नाहीं का राहात ?" जानकीबाईनीं विचारलें.

"नाहीं म्हणतो. मुलें मोठीं झालीं म्हणजे त्यांच्या कलानें घ्यावें. तिळगूळ त्याला बरोबर बांधून दिला आहे. स्वतः घेईल व सर्वांना देईल," आई म्हणाली.

मी तें बोलणें ऐकत होतों. परंतु जाण्याचा निश्चय अभंगच राहिला.

मीं पुरुषोत्तमाचा व माझ्या मायबापांचा निरोप घेऊन घर सोडलें. माझ्या आईचें तें शेवटचें दर्शन होतें, ती शेवटची भेट होती, तें शेवटचें बोलणें होतें. परंतु या दुर्दैवी श्यामला तें कोठें माहीत होतें ?

# मुंबई

## ३९

आईचें न ऐकतां मी मुंबईस आलों. तिच्या थोर हृदयाला दुखवून आलों. आज मला त्याचें वाईट वाटत आहे. परंतु मागून वाईट वाटणें काय किंमतीचें ? आधींच पोळलेल्या मातृहृदयाला आणखी कष्टी करून

मी आलों. कबूल केल्याप्रमाणें वाटेंत दापोलीला शिवरामच्या आईकडेहि मी गेलों नाहीं. मी माझ्याच विचारांत गर्क होतों.

मुंबईस मामांकडे आलों. त्यांच्याकडेच माझा मोठा भाऊ राहात होता. त्याची स्वतंत्र खोली नव्हती. मीं मामीला आईनें दिलेली तिळगुळाची पुडी दिली. तिनें हळदकुंकू कपाळाला लाविलें. सर्वांची खुशाली मीं सांगितली.

" श्याम, तूं इतक्यांत कशाला आलास ? अद्याप प्लेग आहे ना ? " दादानें विचारलें.

" भाऊंना खरें वाटेना म्हणून आलों. आई नको जाऊं म्हणत होती. परंतु मी हट्टासच पेटलों. आलों निघून, " मीं म्हटलें.

" पुढें काय करायचें ? " त्यानें विचारलें.

" मी पुण्याला जातों. तेथें राहीन पांचसहा दिवस. तों प्लेग कमी होईल. येथें चार पांच दिवस राहीन, " मीं म्हटलें.

दादा, मामा दुपारीं आपापल्या उद्योगाला जात. मामांकडे मराठी पुस्तकें पुष्कळ होतीं. त्यांतलीं मी वाचीत बसें. १९०८ मधील लोकमान्यांवरील खटल्याचें पुस्तक तेथें मला वाचावयास मिळालें. काळांतील कांहीं निबंध वाचावयास मिळाले. हीं जप्त पुस्तकें तेथें होतीं. तीं पुस्तकें वाचण्यांत मी तल्लीन झालों. माझें हृदय भरून आलें. अंगावर मधून मधून रोमांच उठत. हृदयांत नवीन प्रकाश व नवीन जीवन आलें. एके दिवशीं मी दादाबरोबर व्याख्यानास गेलों होतों. मला वाटतें तें खाडिलकरांचें व्याख्यान होतें. औंधला मीं कांहीं व्याख्यानें ऐकलीं होतीं. औंधचे महाराज पुण्याचे कांहीं प्रोफेसर बोलवीत व त्यांचीं व्याख्यानें करवीत. प्रो. भानू, प्रो. हरिभाऊ लिमये, प्रो. पोतदार, प्रो. भाटे, प्रो. गोडबोले वगैरेंचीं व्याख्यानें मीं औंधला ऐकिलीं होतीं. परंतु मुंबईला जें व्याख्यान ऐकलें तें औरच होतें. तें कॉंग्रेसचा संदेश यावर होतें. नुकतीच लखनौची कॉंग्रेस होऊन गेली होती. अंबिकाचरण मुजुमदार अध्यक्ष होते. हिंदु-मुसलमानांचा करार झाला होता. लोकमान्य टिळक सुटून आल्यावर ते पुन्हां कॉंग्रेसमध्यें शिरले होते. अशा त्या अपूर्व कॉंग्रेसचा संदेश नाट्याचार्य खाडिलकर सांगत होते.

कॉंग्रेससंबंधीं ऐकलेलें तें पहिलें भाषण! देशभक्तीसंबंधीं ऐकलेलें पहिलें व्याख्यान! स्वराज्याचा मीं ऐकलेला पहिला उद्गार! सुरेंद्रनाथ बानर्जी वगैरे देशभक्तांचीं नांवें ऐकण्याचा तो पहिला दिवस! त्या कॉंग्रेसच्या झेंड्याखालीं संपूर्ण हृदयानें मी एक दिवस येऊन उभा राहीन, कॉंग्रेसचा संदेश खेड्यापाड्यांत सांगत घुमेन, त्या कॉंग्रेससाठीं मी मनांत ईश्वराला जीवेंभावें रात्रंदिवस आळवीन, असें त्या वेळेस माझ्या स्वप्नांत तरी होतें का?

मुंबईचे ते सात आठ दिवस देशभक्तीच्या वाचनांत व श्रवणांत गेले. त्या वेळेस आणखीहि एक मीं मजा केली. मजा म्हणूं का कुकर्म म्हणूं? माझा मित्र सखाराम गिरगांवांत राहात असे. त्याला भेटण्यासाठीं म्हणून मी गेलों होतों. तो घरीं नव्हता. मी त्याची वाट पाहात होतों. तेथील कोनाड्यांत कांहीं वाचायला आहे का पाहात होतों. तों तेथील अनेक सटरफटर पुस्तकांत "हिंदुधर्म व सुधारणा" हें भलें मोठें पुस्तक सांपडलें. प्रिन्सिपाल गोळे यांचें तें पुस्तक मी वाचूं लागलों. किती सुंदर व सोज्ज्वल ती भाषा. मला गुदगुल्या होऊं लागल्या. मीं तें पुस्तक माझ्या रुमालांत गुंडाळलें व घरीं घेऊन आलों! पुस्तकाची मीं चोरी केली. कोनाड्यांत पडून राहिलें आहे, नेलें आपण म्हणून काय झालें? अशी मनांत चर्चा केली. तें पुस्तक पुढें पांचसहा वर्षांनीं माझ्याजवळून-सुद्धां असेंच कोणीं नेलें! त्या वेळेस तें पुस्तक दुर्मिळ होतें. जीर्ण शीर्ण झालेलें तें पुस्तक मीं किती जपून ठेवलें होतें!

तें पुस्तक चोरतांना मी माझी प्रतिज्ञा विसरलों. लहानपणीं पुस्तकें विकत घेण्यासाठीं पैसे चोरले होते. त्यावेळेस आई म्हणाली होती, "श्याम, दुसऱ्याच्या वस्तूला लागलेला हा पहिला व शेवटचा तुझा हात होऊं दे." आईची ती श्रद्धा मीं मारली. किती झालें तरी मी दुबळा जीवच होतों. श्याम स्खलनशीलच होता. आईची पुण्याई त्याला तारूं पाहात होती.

मुंबईला नवीन विचारांचा आनंद मी लुटीत होतों. परंतु भविष्यकाळ माझ्यासमोर तोंड वासून उभा होता. मीं मुंबईहून रामला एक पत्र पाठविलें. औंधला प्लेग झाल्यामुळें मी पुण्यास न उतरतां परभारा एकदम मुंबईला येऊन कोंकणांत गेलों व कोंकणांतून आतां परत आलों वगैरे

लिहिलें होतें. 'माझें हें पत्र म्हणजेच संक्रांतीचा तिळगूळ समज' असेंहि एक वाक्य पत्राच्या शेवटीं होतें. रामचें उत्तर आलें. त्या कार्डावर 'तिळगूळ' हे शब्द मोठमोठे, चांगल्या नक्षीचे त्यानें लिहिले होते. हलव्याला जसा कांटा असतो, तसे बारीक बारीक कांटे त्या अक्षरांच्या सर्वांगावर दाखविण्यांत आले होते. तीं अक्षरें म्हणजे पुलकित असें रामचें जणूं हृदय होतें. तें कार्ड मीं हृदयाशीं धरलें. खरोखरचा तिळगूळ पटकन् मटकावला असता. परंतु हा अक्षररूप तिळगूळ अक्षय होता, टिकणारा होता. तो मी येतां जातां रोज डोळ्यांनीं खात होतों, मनानें खात होतों व हृष्ट होत होतों.

"श्याम, काय रे आहे त्या कार्डांत एवढें ?" शेजारच्या मथुराबाईनीं विचारलें.

"तिळगूळ आहे तिळगूळ. तुमच्या हलव्यापेक्षां गोड आहे व सुंदर आहे," मीं म्हटलें.

"कार्डांत रे कसा तिळगूळ येईल ? हलव्याची पिशवी येते," त्या म्हणाल्या.

"परंतु माझ्या मित्राची युक्तीच आहे तशी. तुम्हाला दाखवूं ?" मीं विचारलें.

"बघूं दे," त्या म्हणाल्या.

मीं तीं सुंदर कांटेरी अक्षरें त्यांना दाखविलीं.

"इश्श, हा रे कसला तिळगूळ ? नुसतीं अक्षरें. तीं का चाटायचीं आहेत ?" त्या म्हणाल्या.

"चाटून बाटणें म्हणजे कांहीं प्रेम नव्हे," मीं म्हटलें.

"श्याम, तुझ्या सांग ना आणखी औंधच्या आठवणी," मथुराबाई म्हणाल्या.

"मी नाहीं सांगत. माझ्या मित्रांना हंसतां तुम्ही. तुमच्या मित्रांना हंसलें तर चालेल का ?" मीं विचारलें.

"श्याम, पुरुषांना मित्र असतात. स्त्रियांना मित्र नसतात," त्या म्हणाल्या.

"मित्र म्हणजे मैत्रिणी हो," मीं म्हटलें.

"अरे, आम्हांला मैत्रिणीहि नाहींत. तुम्ही पत्रें लिहितां. आम्हांला थोडींच पत्रें लिहितां येतील ? लहानपणच्या माझ्या मैत्रिणी आतां कोठें असतील देवाला माहीत. श्याम, तुमचें आपलें बरें असतें. आमची मैत्री वगैरे सारें मनांतल्या मनांत. तुला एक दोन ओंव्या म्हणून दाखवूं ?" त्यांनीं विचारलें.

"म्हणा. मला बायकांच्या ओंव्या फार आवडतात," मीं म्हटलें.

"आपण मैत्रिणी पुन्हां भेटूं कधीं
आठवूं मनामधीं एकीमेकीं ॥
आपण मैत्रिणी जाऊं ग बारा वाटे
जसे नशिबाचे फांटे फुटतील ॥
वारियाच्या संगें आपण पाठवूं निरोप
पोंचतील आपोआप मैत्रिणींना ॥"

मथुराबाईनीं ओंव्या म्हटल्या.

"मथुराबाई, ओंव्या हो कुणाला म्हणून दाखवतां ?" मामीनें तिकडून विचारलें.

"तुमच्या श्यामला हो," त्या म्हणाल्या.

"बायकांच्या ओंव्या श्यामला कशाला ?" मामी म्हणाली.

"त्याला आवडतात," त्या म्हणाल्या.

"बायकांच्या ओंव्या ऐकून आतां विद्या करायची आहे वाटतें ?" मामी म्हणाली.

मामी सहज बोलली. परंतु तें सहज बोलणें मला लागलें. मी एकदम उठून गेलों.

"श्याम, बस ना रे. ये. हलवा देत्यें खरोखरचा," मथुराबाई म्हणाल्या.

परंतु श्याम निघून गेला. मी टोपी घालून बाहेर गेलों. बाहेर तरी कोठें जाणार ? दुपारच्या वेळीं कोठें जाणार ? मी समुद्रावर जावयास निघालों. लोक संध्याकाळीं फिरावयास जातात. श्याम दुपारच्या वेळीं फिरावयास निघाला. ज्या वेळेस डोकें तापलें असेल, त्यावेळेस फिरावयास जावें. मी चौपाटीवर गेलों. तेथें गर्दी नव्हती. समुद्राला भरती होती. समुद्राच्या पाण्यांत मी उभा होतों. माझे पाय तो अनंत सिंधु धूत होता.

त्या समुद्रदर्शनानें माझा अनंत हृदयासिंधूहि हेलावला. माझ्या हृदयांतील लाटा खालच्या लाटांत मिसळल्या. अंतःसमुद्र व बहिःसमुद्र यांचा महान् संगम तेथें निर्माण झाला होता व त्यांत श्यामचें स्नान होत होतें.

ऊन होतें, तरी गार वारा होता. त्यामुळें तेथें उन्हाचा त्रास मला होत नव्हता. कांहीं वेळानें मी माघारा वळलों. मनांत कांहीं तरी निश्चित करून मी माघारा वळलों. मी घरीं आलों. मीं रामला पुढीलप्रमाणें पत्र लिहिलें.

"प्रिय राम यास सप्रेम प्रणाम.

तुझा अक्षर तिळगूळ मिळाला. तो भरपूर खात आहें. राम, पुण्याला येऊन मी तुझ्याकडे राहूं का? सध्यां औंधला प्लेग आहे. मी तुमच्या शाळेंत जाईन. जमलें तर कायमचा पुण्यासच राहीन. रामजवळ श्याम पुन्हां येईल. मागें मी पुण्याला आलों होतों, त्या वेळेस तुम्हीं सर्वांनीं ये म्हणून सांगितलें होतें. परंतु त्यावेळेस योग आला नाहीं. मला ताबडतोब उत्तर लिही.

मला तुझ्याकडे फक्त राहावयास हवें. जेवण्याची मी माझी कांहीं तरी व्यवस्था करीन. त्याची काळजी नको. डोकें टेंकायला कोठें तरी जागा हवी ना? ती तुळशीबागेंतल्या राममंदिरांत मिळत नसते. त्या राममंदिराचा सात वर्षांपूर्वी मी अनुभव घेऊन चुकलों. आतां जिवंत राममंदिरांत प्रवेश मिळतो का पाहावयाचें. राम, तुझ्या सर्व भावंडांचें मत असेल, तरच मी येईन. तुझ्या मनाचा कोंडमारा तूं करून घेऊं नकोस. तुझ्या एकट्याच्या इच्छेचा तो प्रश्न नाहीं.

राम, श्यामला सर्व प्रकारच्या कामाची आतां संवय आहे. तुमच्याकडे मी राहिलों तर जड होणार नाहीं. चार धंदे माझे हात करतील. मी सर्वांना हवा हवासा होईन. तुला पश्चात्ताप होण्याची पाळी मी येऊं देणार नाहीं. सध्यां मी चमत्कारिक मनःपरिस्थितींत आहें. आतांच मी समुद्रावरून आलों. भर दुपारीं समुद्रावर एकटाच गेलों होतों. तो निळा निळा समुद्र मला पाहून उचंबळला. समुद्राला भरती होती, माझ्या जीवनालाहि भरती आली. भरलेल्या जीवनानें

मी घरीं परत येऊन तुला हें पत्र लिहीत आहें. जास्त काय लिहूं ? आईस अनंत प्रणाम, भावंडांस सप्रेम नमस्कार.

तुझा,

श्याम ”

रामचें तावडतोब उत्तर आलें.

“ प्रिय श्याम !

निःशंकपणें निघून ये. पुढें ठरवूं.

राम ”

रामचें पत्र म्हटलें म्हणजे तार असावयाची. त्यांत वाचाळता नसावयाची. श्यामचीं पत्रें म्हणजे निबंध ! रामचीं पत्रें म्हणजे सूत्रें ! तें पत्र दादाच्या हातांत पडलें. “ श्याम, अरे एका ओळीचें पत्र बघ, तुला आलें आहे ! ” दादा म्हणाला.

त्याच्या हातांतून तें पत्र मीं एकदम ओढून घेतलें. मित्राच्या पत्राची टिंगल झालेली मला खपली नाहीं.

“ श्याम, पुण्याला का जाणार ? ” दादानें विचारलें.

“ हो. आजच जातों, ” मीं म्हटलें.

“ औंधला अद्याप प्लेग आहे ना ? ” त्यानें विचारलें.

“ आतां कमी झाला असेल. पुण्याला दोन दिवस राहून पुढें जाईन. मामांकडे उतरेन, मावशीला भेटेन, रामकडे जाईन आणि नंतर औंधला जाईन म्हणतों. असें माशा मारीत येथें तरी किती दिवस बसावयाचें ? सर्वांना ओझें. मला दे गाडींत बसवून, ” मीं म्हटलें.

मीं पुण्यास जाण्याची तयारी केली. माझी ट्रंक घेतली, वळकटी बांधली. जेवणें झालीं. सर्वांना नमस्कार केला.

“ श्याम, प्रकृतीला जप, पत्र पाठव, ” मामा म्हणाले.

“ श्याम, प्लेग तिकडे असेल तर राहा हो येथें, ” मामी म्हणाली.

“ आतां प्लेग थांबला आहे, ” मीं म्हटलें.

“ श्याम, निघालास ? तुझ्या मित्राला घे हा हलवा. घेऊन जा, ” शेजारच्या मथुराबाई म्हणाल्या.

“ श्याम, वन्संना व बाईंना दे हो तो तिळगूळ, ” मामी म्हणाली.

दादानें खालीं व्हिक्टोरिया आणली होती. सामान खालीं नेण्यांत आलें. आम्ही दोघे भाऊ गाडींत बसलों. बोरीबंदरावर गाडी गेली.

" ट्रंक जड आहे, वजन केली पाहिजे. इतकें काय त्या ट्रंकेंत भरलें आहेस ? " दादानें विचारलें.

" दादा, श्यामजवळ पुस्तकांशिवाय दुसरें काय असणार ? " मीं म्हटलें.

" औंधला ट्रंक ठेवून यायचें. उगीच ने आण सामानाची. हमाल करा, वजन करा. त्यांतच पैसे कितीतरी जातात, " दादा म्हणाला.

मी कांहीं बोललों नाहीं. माझ्या जाण्याचा खर्च दादालाच करावा लागत होता. त्याला कितीसा पगार ! कष्टमूर्ति दादाची मला कृतार्थता वाटली.

" दादा, ट्रंक मी घेईन खांद्यावर. औंधहून येतांना रहिमतपूर स्टेशन-वर कोठें केला होता मीं हमाल ? श्याम कांहीं उधळ्या नाहीं हो, " मीं म्हटलें.

" श्याम, राहूं दे. हमालच घेईल. कितीतरी लांब जायचें आहे ! " दादा कनवाळूपणानें म्हणाला.

ट्रंकेचें वजन झालें. कांहीं पैसे द्यावे लागले. हमालानें सामान उचललें. आम्ही गाडींत बसण्यासाठीं निघालों. वेळ होत आली होती. नीटशी जागा पाहून मी बसलों. हमाल गेला. दादा व मी तेथें उभे होतों. काय बोलणार आम्ही ?

" श्याम, आणखी पैसे पाहिजेत का ? " त्यानें विचारलें.

" सध्यां नकोत. भाऊंनीं दिले आहेत. तूं तिकिट काढून दिलेंच आहेस, " मीं म्हटलें.

" जरूर लागेल तेव्हां मला कळवीत जा. मी गरीब आहें, परंतु श्यामला उणीव भासूं देणार नाहीं. माझें शिक्षण नाहीं झालें, तूं तरी शीक. मी एकदां जेवीन, पण तुला होईल ती मदत करीन. पत्र पाठव, " दादा म्हणाला.

गाडी निघाली. मी खिडकींतून बघत होतों. दादा अदृश्य झाला. थोर मनाचा ममताळू व कष्टाळू दादा निघून गेला. श्याम आपलें नशीब बरोबर घेऊन व सर्वांचे आशीर्वाद व सर्वांचें प्रेम बरोबर घेऊन निघाला. आईची प्रार्थना माझ्याबरोबर येत होती, श्यामला सांभाळीत येत होती !

# देवा, मला निर्दोष कर

## ४०

मी रात्रीं आठच्या सुमारास पुण्याला आलों. मामांकडे उतरावयास गेलों. ज्या वाड्यांतून लहानपणीं मी पळालों होतों, तोच तो वाडा. माझ्या माणकताईचा वाडा. मामीच्या मुली अंगणांतच होत्या. लहानपणीं जिला मी खेळवीत असें व चिमटे घेऊन रडवीत असें, ती एशी तेथेंच होती. प्लेगमधून वांचलेली अशक्त शांतीहि तेथें होती. मामीनें माझें स्वागत केलें. मामा अद्याप बाहेरून आले नव्हते.

" श्याम, तूं जेवून घे. त्यांचा कांहीं नेम नाहीं, " मामी म्हणाली.

मीं जेवण केलें. एशी शांतीला मीं गोष्टी सांगितल्या. त्यांना गोष्टी सांगत होतों तों मामा बाहेरून आले.

" केव्हां रे आलास ? " त्यांनीं विचारलें.

" मघाशीं आलों, " मीं म्हटलें.

" औंधची शाळा झाली का सुरू ? " त्यांनीं प्रश्न केला.

" बहुतेक झाली असेल. बंद होऊन महिना झाला. आतां जावें झालें तेथें, " मीं म्हटलें.

" सदानंद तुझी आठवण काढायचा हो. तुला तार करणार होतों, परंतु एकदम मुळीं वात झाला, " मामा खिन्नपणें म्हणाले.

" लिली आणि तो, दोघं एकदम गेलीं, " शेजारच्या बाई म्हणाल्या.

मी एकदम उठून गेलों. वरच्या खोलींत गेलों. ज्या खोलींत सदानंद मरतांना होता, त्या खोलींत गेलों.

" श्याम, दिवा ने. शांते, अण्णाला दिवा दे जा, " मामांनीं सांगितलें.

मला दिवा नको होता. माझ्या भावाच्या आत्म्याची मला भेट घ्यावयाची होती. ती का दिव्याच्या बाह्य प्रकाशांत घेतां आली असती ! शांतीच्या हातांतून मीं दिवा घेतला. मीं तो मालवला. तसाच अंधारांतून मी खोलींत गेलों. त्या खोलींत प्रेमळ व पवित्र स्मृतींनीं ओथंबून येऊन

मी उभा राहिलों. मीं माझे हात पसरले. सदानंदला भेटण्यासाठीं मी वेडा झालों होतों. माझ्या हाताला कोणी लागतें का तें खोलींत हिंडून मी बघत होतों! मीं साष्टांग प्रणाम केला. देवाचें स्मरण करीत जाणारा तो माझा भाऊ म्हणजे देवदूत होता. मर्त्यलोकींची दूषित हवा त्या निर्मळ पुण्यात्म्याला मानवली नाहीं. तें पांखरूं मर्त्यलोकींच्या कोंदट पिंजऱ्यांत तडफडूं लागलें. पिंजऱ्यांतून तें उडून गेलें. मी खोलींतील अनंत अंधारांत स्मृतींचा नंदादीप पाजळून बसलों होतों. त्या प्रकाशांत भावाला बघत होतों.

"श्याम, दिवा विझला वाटतें? अरे, पुन्हां लावावा कीं नाहीं? ही घे पेटी. असें अंधारांत बसूं नये," मामा वर येऊन म्हणाले.

माझ्या भावसमाधीचा भंग झाला. मीं दिवा लाविला. खोलींत प्रकाश आला, परंतु माझ्या डोळ्यांसमोर अंधार आला. तो दिवा मला सहन होईना.

"मी झोंपतों हं मामा. येथें गॅलरींत झोंपतों," मीं म्हटलें.

"अरे, थंडी फार पडते हो. येथें आंतच झोंप," ते म्हणाले.

मीं आंत अंथरूण घातलें. मी कधींहि डोक्यावरून पांघरूण घ्यावयाचा नाहीं. परंतु मीं डोक्यावरून पांघरूण घेतलें. पांघरुणांत अंधाराचा दिवा मीं पुन्हां लाविला. माझ्या भावाला भेटण्यासाठीं अंधाराच्याच प्रकाशाची आवश्यकता होती. मी पांघरुणांत सदानंदाशीं बोलत होतों. बोलतां बोलतां एकदम म्हटलें, "सदानंद, मलाहि घेऊन जा ना रे. मलाहि होऊं दे प्लेग." परंतु मनांतील हे शब्द मनांतच गुदमरले. मला आई आठवली. आईचें कसें होईल? तिला किती दुःख होईल? आईसाठीं मला जगलेंच पाहिजे. आई जिवंत आहे तोंपर्यंत मीं मरणाचा विचार मनांत आणणें म्हणजे पाप होतें. आईचें न ऐकतां मी आलों. संक्रांतीला राहिलों नाहीं. मला आतां खूप वाईट वाटलें. मी मुसमुसूं लागलों.

"श्याम, पेरू फोडला आहे. ऊठ, हा घे," मामी म्हणाली.

"गोड निघाला आहे. आणखी फोड ग," मामा म्हणाले.

उठणें भाग होतें. मी डोळे पुसून उठलों. पेरूची फोड खाऊं लागलों. मामांशीं बोलूं लागलों.

"औंधला आहेत रे पेरू?" त्यांनीं विचारलें.

" औंधला फारशा बागा दिसल्या नाहींत. परंतु माझ्या मित्राकडे नावडी गांवीं मीं पेरूच्या मोठमोठ्या बागा पाहिल्या. ताजे ताजे पेरू खाल्ले, " मीं म्हटलें.

" तूं औदुंबरला गेला होतास रे ? " त्यांनीं विचारलें.

" नाहीं. फक्त नरसोबाची वाडी पाहून आलों, " मीं म्हटलें.

" औदुंबरला एकदां जाऊन राहायचें आहे माझ्या मनांत. सखुताई, तूं, मी जाऊं. मंडळी असली म्हणजे बरें. केवढा डोह आहे औदुंबरला ! रम्य स्थान. जाऊं हं, अण्णा, " मामा म्हणाले.

मी कांहींच बोललों नाहीं.

" निजूं दे त्याला आतां. नीज रे तूं श्याम, " मामी म्हणाली.

" नीज. उद्यांच नाहीं ना जात ? " मामानें विचारलें.

" बघूं, " मीं म्हटलें.

मी माझ्या अंथरुणावर पुन्हां पडलों. मला झोंप लागली. गाढ झोंप. जाग आली ती एकदम सकाळींच आली.

मी हौदावरून आंघोळ करून आलों. रामकडे केव्हां जावयाचें त्याचा मी विचार करीत होतों. सायंकाळींच जावें म्हणजे पोटभर बोलूं असें मनांत ठरविलें. मामांकडची ज्ञानेश्वरी मी वाचीत बसलों. मामांना ज्ञानेश्वरी बहुतेक सारी मुखोद्गतच होती. शांती, एशी जेवून शाळेंत गेल्या. मामा कचेरींत गेले. मी एकटाच घरीं होतों. थोड्या वेळानें शांती व एशी घरीं परत आल्या.

" कां ग परतशा आल्यात ? " मामीनें विचारलें.

" सुट्टी आहे. कोणी तरी मोठें मेलें, " शांती म्हणाली.

" अण्णासाहेब पटवर्धन वारले हो, " वाड्यांत कोणीं तरी सांगितलें.

" हो का ? मोठी मिरवणूक निघेल त्यांची, " बाई म्हणाल्या.

" मामा मागें ज्यांचें औषध घेत होते, तेच का हे अण्णासाहेब ? " मीं विचारलें.

" हो. दर गुरुवारीं औषध सांगायचे. हजारों लोकांची त्यांच्या वाड्याशीं गर्दी असावयाची. साधु पुरुष होते, " बाई म्हणाल्या.

माझ्या मित्रांनो! अण्णासाहेब लोकोत्तर पुरुष होऊन गेले. त्यांचें चरित्र फारच हृदयंगम आहे. अलौकिक बुद्धिमत्ता, अलोट देशाभिमान, महनीय महत्त्वाकांक्षा, थोर विरक्ति—सारें कांहीं त्यांच्या चरित्रांत आहे. तरुणपणीं त्यांचें शरीर भीमासारखें होतें! प्रोफेसर केरूनाना छत्रे त्यांचे आचार्य. एकदां केरूनानांचे डिंकाचे सारे लाडू अण्णासाहेबांनीं मटकावले! केरूनानांना आश्चर्य वाटलें. कोणा विद्यार्थ्याचा हा खान-विक्रम असावा बरें? केरूनानांनीं एक युक्ति केली. एक भलें मोठें दोरखंड त्यांनीं विद्यार्थ्यांसमोर टाकलें व ते म्हणाले, "हें मला कोणी हातानें तोडून दाखवा." तें दोरखंड कोण तोडणार? अण्णासाहेब अस्तन्या सारून पुढें आले. त्यांनीं तें दोरखंड तोडलें.

"तूंच माझे डिंकाचे लाडू खाल्लेस! शाबास," केरूनाना म्हणाले.

एकाच वर्षीं अण्णासाहेबांनीं म्हणे तीन परीक्षा दिल्या. एम्. ए., एल्‌एल्. बी. व डॉक्टर ते एकाच वर्षीं झाले. त्यांच्या बुद्धीला सीमा नव्हती. मेडिकल कॉलेजचें छापील नियतकालिक सर्व लेख स्वतः लिहून त्यांनीं सुरू केलें. आणि हिंदी विद्यार्थ्यांच्या बुद्धीला हंसणाऱ्या युरोपियन प्रोफेसराला लाजविलें. निजामाच्या राज्यांतून मोठा भाग विकत घ्यावा व तेथें स्वराज्य स्थापावें, असे त्यांचे उद्योग होते. एक कोट रुपये निजामाला देण्याचें ठरलें. योजना बहुतेक ठरली. परंतु आयत्या वेळीं कांहीं तरी दगा झाला. जीवनांतील एक थोर महत्त्वाकांक्षा मारली गेली. अण्णासाहेब विरक्त झाले. त्यांचा स्वाभिमान पराकोटीचा होता. एकदां मुंबईला ग्वाल्हेरच्या शिंदे सरकारचे जुने दिवाण आले होते. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाच्या वेळेस शिंद्यांचे हेच दिवाण होते. यांनींच शिंदेसरकारला त्या युद्धांत पडूं दिलें नाहीं. त्यावेळचा व्हाइसरॉय कॅनिंग यानें लिहून ठेविलें होतें कीं, 'शिंदे बंडांत सामील होतील तर साराच ग्रंथ आटोपेल.' शिंदे सरकार बंडांत सामील झाले असते तर एकजात सारीं रजपूत संस्थानेंहि उठणार होतीं. शिंद्यांची वाट सारे राजे रजवाडे पाहात होते. परंतु शिंदे शांत राहिले. शिंदे तर तेव्हां बालवयी होते. सूत्रें दिवाणांच्या हातांत होतीं! या दिवाणानें हिंदुस्थानला दास्यांत लोटलें!

अण्णासाहेबांना कळलें कीं ते देशद्रोही दिवाण आले आहेत. अण्णासाहेबांच्या हातांत सोटा असे. तो सोटा घेऊन ते त्या दिवाणांकडे गेले व म्हणतात कीं सोटा उगारून "हरामखोरा, तूं देशाचें वाटोळें केलेंस. तूं हे परके पाय येथें पक्के केलेस," असें क्रोधानें म्हणून आग पाखडणाऱ्या दृष्टीनें बघून अण्णासाहेब निघून गेले! दिवाणसाहेब व इतर मंडळी जागच्या जागीं थिजून केली.

अण्णासाहेब पाश्चिमात्य वैद्यक पूर्णपणें जाणत होते. परंतु आयुर्वेदाचा त्यांनीं उद्धार केला. आयुर्वेदांतील उपाय ते मोफत सांगावयाचे. रोग्याला बरे करण्याचे कामीं ते संगीताचाहि उपयोग करीत. ते स्वतः संगीताचे मोठे भोक्ते होते. मोठमोटे गवई त्यांच्याकडे यावयाचे. एकदां एक दाक्षिणात्य संगीतज्ञ त्यांच्याकडे आला होता. एका रोग्याला झोंप लागत नव्हती. अण्णासाहेबांनीं एक विशिष्ट राग आळविण्यास त्या गवयाला सांगितलें. तो राग ऐकतां ऐकतां रोग्याला गाढ झोंप लागली.

पुण्याच्या म्युनिसिपालिटींत अण्णासाहेब नेहमीं निवडले जावयाचे. लोक आपण होऊन त्यांना निवडून पाठवावयाचे. पुण्याच्या गणेशोत्सवाचा विसर्जनसमारंभ जिवंत असेपर्यंत अण्णासाहेबांकडूनच व्हावयाचा. अण्णासाहेब म्हणजे पुण्याची, या महाराष्ट्राची पुण्याई होती. लोकमान्यांवर त्यांचें निरतिशय प्रेम! त्यांची सारी तपश्चर्या लोकमान्यांसाठीं होती. श्रीरामकृष्ण परमहंस एकदां विवेकानंदांना म्हणाले, "माझी सारी साधना तुला देतों, घे." अण्णासाहेबांचें तसेंच होतें. ते विरक्त झाले होते. ते ईश्वरांत रममाण झाले होते. परंतु ती सारी साधना लोकसेवेंत अहोरात्र झिजणाऱ्या लोकमान्यांना त्यांनीं दिली.

ओंकारेश्वराच्या स्मशानभूमींत ते रात्रींबेरात्रीं हिंडत राहावयाचे! स्मशानभूमी म्हणजे मृत्युंजयाचें निवासस्थान! मृत्युभूमींत बसून ते मृत्युंजयाजवळ एकरूप होत. घरीं कोनाड्यांत त्यांच्यासाठीं कांहीं खाण्यापिण्याचें ठेवण्यांत येत असे, त्यांतील थोडेंसें खात. झोंप ते जवळजवळ घेतच नसत. ते म्हणत, "आमच्या शरीराला नेहमीं झोंपच आहे!" देहाचा विसर पडलेल्या जीवन्मुक्ताच्या मुखांतच हे थोर शब्द शोभतात! शरीराची विस्मृति व आत्मारामाची स्मृति!

अण्णासाहेब शेवटीं शेवटीं कांहींच खातनासे झाले. अमृतत्वाचा चारा त्यांचा प्राणहंस खाऊं लागला. अण्णासाहेबांचीं मुलें लोकमान्यांकडे गेलीं व म्हणालीं, " तुम्ही तरी दोन घांस खाण्याबद्दल सांगा. " त्यावेळेस लोकमान्य म्हणाले, " त्यांच्यापेक्षां का जास्त आपणांला समजतें ? ते करतात तेंच बरोबर आहे. त्यांना त्रास नका देऊं. "

अण्णासाहेबांच्या किती गोष्टी मी सांगूं ? आज मला त्यांच्या अनेक गोष्टी माहीत आहेत. परंतु त्यावेळेस कोठें माहीत होत्या ? मी घरांतून बाहेर पडलों. मिरवणूक कोठें दिसते का पाहूं लागलों. बुधवारांतून मिरवणूक येत होती. शेंकडों दिंड्या भजन करीत चालल्या होत्या. पालखींत महर्षींचा देह पुष्पहारांनीं सुशोभित करून ठेवला होता. मीं दर्शन घेतलें. त्या जनसागरांत मीहि मिळून गेलों. मीहि भजन म्हणूं लागलों. पुण्याच्या विश्रामबाग वाड्यांत त्यावेळचें सरकारी हायस्कूल होतें. तें बंद करण्यांत आलें नव्हतें. कोणी शाळेवर दगड फेंकले. शाळेचा तेथें निषेध करण्यांत आला. पुष्करणीच्या हौदावरून प्रेतयात्रा गेली. पुढें ती नारायण पेठेकडे वळली व ओंकारेश्वरावर आली. सारें नदीतीर माणसांनीं फुललें होतें.

त्यावेळेस मीं प्रथम लोकमान्यांना पाहिलें. ज्यांचें नांव लहानपणापासून मी ऐकत होतों, त्यांना पाहिलें. लोकमान्य बोलण्यासाठीं उभे राहिले. मी हात जोडून भक्तिभावानें उभा होतों. लोकमान्यांना पीत होतों, राष्ट्रसिंहाला हृदयांत सांठवीत होतों. अण्णासाहेबांचा महिमा लोकमान्य गात होते. सद्‌गुरूची कीर्ति महान् शिष्य वर्णीत होता. सायंकाळ झाली होती. सूर्य अस्ताला गेला होता. अस्तास गेलेल्या पुरुषसूर्याची पुण्यकथा लोकमान्यांच्या वेदोमुखांतून आम्ही ऐकत होतों. त्या दिवशीं मी कृतार्थ झालों. आईच्या सांगण्याप्रमाणें घरीं राहिलों असतों तर हें दिव्यदर्शन मला झालें नसतें. महापुरुषाचें हें महाप्रस्थान पाहावयास सांपडलें नसतें. मला इकडे ओढून आणण्यांत देवाची अपरंपार कृपाच होती म्हणावयाची !

चंदन, तुळशीकाष्ठें, कापूर यांची ती चिता भडकली. पुण्यदेहाला स्पर्श करून अग्नि पवित्र झाला. ती चिता धडधड पेटत होती. मी तेथें वाळवंटांत थरथरत उभा होतों. मीं माझे हात जोडले व म्हटलें, " या

जळलेल्या चितेंत माझे सारे दोष जळून जावोत. देवा ! मला निर्दोष कर, मला शुद्ध कर. मला दुसरें कांहीं एक नको.'' मी पुन्हां पुन्हां हे शब्द मनांत म्हणत होतों. एका बाजूला सद्गदित होऊन मी तिष्ठत होतों.

लोकमान्य वगैरे निघाले. त्यांच्या पाठोपाठ मीहि निघालों. मोठे लोक काय बोलतात, कसे चालतात तें पाहाण्याची मला इच्छा होती.

'स्थिरावला समाधींत स्थितप्रज्ञ कसा असे ।
कृष्णा ! सांग कसा बोले, कसा राहे, फिरे कसा ॥'

महापुरुषांचें वर्णन ऐकण्यापेक्षां त्यांचें जीवन प्रत्यक्ष पाहावयास मिळणें म्हणजे केवढी कृतार्थता ! लोकमान्यांच्या बरोबर दहावीस मंडळी होती. ओंकारेश्वराच्या घाटाच्या पायऱ्या चढून मंडळी जात होती.

"बळवंतरावजी, पायऱ्या जपून चढा हां,'' कोणी तरी म्हणालें.

"मी अजून उड्या मारीत जाईन. मला घाबरवूं नका,'' लोकमान्य म्हणाले.

मी ऐकत होतों. लोकमान्यांच्या पाठोपाठ आल्याचें सार्थक झालें. त्यांची तेजस्वी वृत्ति पाहायला सांपडली. उड्या मारणाऱ्या महान् सिंहाची वीरवाणी ऐकली. मला त्यावेळचें इतर बोलणें चालणें आठवत नाहीं; परंतु हीं दोन वाक्यें माझ्या कानांत अद्याप घुमत आहेत. उड्या मारणाऱ्या लोकमान्यांना राष्ट्र केव्हां उड्या मारूं लागेल हीच एक चिंता होती. पडलेलें राष्ट्र उड्या कधीं मारील हाच एक त्यांना ध्यास होता !

मी एकटा घरीं आलों. बरीच रात्र झाली होती. मामी माझी वाट पाहात होती. श्याम पुन्हां कोठें पळून तर नाहीं ना गेला असेंहि तिच्या मनांत येऊन गेलें.

"किती रे तुझी वाट बघायची ? म्हटलं येतोस की गेलास कुठें ? तुझा काय नेम सांगावा ?'' मामी म्हणाली.

"अण्णासाहेबांच्या प्रेतयात्रेला गेलों होतों. लोकमान्यांचें भाषण ऐकलें. हजारों लोक जमले होते,'' मीं म्हटलें.

"दर्शन घेतलेंस का रे ?'' शेजारच्या बाईनीं विचारलें.

"हो,'' मीं म्हटलें.

अनुक्रम विभाग क्रमांक नों. दि.

मामीनें पान मांडलें. परंतु माझी तहानभूक नाहींशी झाली होती. मला ती पेटलेली प्रचंड चिता दिसत होती. 'देवा, मला निर्दोष कर. माझे दोष जाळ,' असेंच मी पुन्हां पुन्हां मनांत म्हणत होतों. तो दिवस, ती सायंकाळ, तो चितेजवळचा क्षण माझ्या जीवनांत तेजस्वी ताऱ्या-प्रमाणें चमकत आहेत !

# अज्ञात श्याम

## ४१

महर्षींच्या महाप्रस्थानयात्रेस गेल्यामुळें त्या दिवशीं सायंकाळीं रामकडे मला जातां आलें नाहीं. दुसऱ्या दिवशीं सकाळींच मी रामकडे गेलों. राम वाचीत होता.

"अरे राम, तुझा श्याम आला रे," रामच्या भावानें वर्दी दिली.

राम उठणार तोंच मी समोर उभा राहिलों. त्यानें हात धरून बसविलें.

"कसें काय?" त्यानें विचारलें.

"काय सांगूं?" मीं म्हटलें.

"मग येथें राहाणार का? परंतु एक अडचण आहे. येथील वार्षिक परीक्षा जवळ आली आहे. आठ दिवसांनीं परीक्षा सुरू होणार आहे." राम म्हणाला.

"मी परीक्षेस बसेन. पास झालों तर येथें राहीन. नाहीं तर औंधला जाईन. तेथली परीक्षा पुढें आहेच. वर्ष कांहीं फुकट जाणार नाहीं," मीं म्हटलें.

"तुला फक्त इंग्रजी करावें लागेल. बाकीचा अभ्यास तोच असतो. आठ दिवस इंग्रजीच वाच. इंग्रजीचीं तीन पुस्तकें आहेत," राम म्हणाला.

"पाहूं या. मी पास होईन असें वाटतें. नांव घालूं देतील ना?" मीं विचारलें.

"त्यांना परिस्थिति सांगितली म्हणजे नाहीं म्हणणार नाहींत. त्यांचें काय नुकसान आहे?" राम म्हणाला.

"मग मी तुझ्याकडे सायंकाळीं येतों," मीं म्हटलें.

"हो ये. परंतु त्या शाळेचा दाखला लागेल," रामनें शंका काढली.

"खरेंच. मी आज तार करतों, म्हणजे उद्यांला दाखला येईल," मीं म्हटलें.

"हो तारच करणें बरें. जा तर आधीं. लौकर तार कर," रामनें संमति दिली.

मी पोस्टांत गेलों. औंधच्या शाळाचालकांस तार दिली. नूतन मराठीच्या शाळाचालकांच्या नांवावर दाखला मागितला. तार करून मी मामांकडे आलों. मामांजवळ मी कांहींच बोललों नाहीं. मामा कचेरींत गेले. मुली शाळेंत गेल्या. मी वरतीं वाचीत बसलों होतों. इतिहास वाचीत होतों. अभ्यासाला मीं सुरवात केली. तिसरे प्रहरीं मीं मामीला सांगितलें, "मामी, आज मी औंधला जाणार आहें. रात्रीं आठची गाडी. गर्दी असते. लौकर गेलें पाहिजे."

मामीनें स्वयंपाक लौकर केला. मी सहा वाजतांच जेवलों. एक टांगा करून आणला. मामीला नमस्कार केला.

"अण्णा, चाललास? राहा ना रे आणखी," येसू म्हणाली.

"मला गेलें पाहिजे. अभ्यास बुडतो," मीं सांगितलें.

"पत्र पाठव हो पोंचल्याचें. तिकडे मावशीला पाठवशीलच, परंतु येथेंहि पाठवावें एखादें," मामी म्हणाली.

"अण्णा, मोठें अक्षर लिही, म्हणजे मीहि वाचीन," शांती म्हणाली.

"माझ्या नांवानें पाठव रे अण्णा," येसू म्हणाली.

मी टांग्यांत बसलों. टांगा निघाला. टांगा कोठें आला? शनिवार पेठेंत रामच्या घरीं आला. रामचें घर म्हणजे माझें औंध होतें! मीं माझें सामान खालीं काढलें. राम व त्याचे भाऊ वरून खालीं आले.

"ट्रंक जड आहे, मी घेतों," मीं म्हटलें.

" ये. आपण दोघे मिळून घेऊं, " राम म्हणाला.

रामचा पाठचा भाऊ बाळू यानें वळकटी केव्हांच नेली होती!

" जेवण झालें का रे ? " रामच्या आईनें विचारलें.

" हो. मी स्टेशनवर जातों असें सांगून आलों आहें, " मीं म्हटलें.

" कां बरें ? " आईनें विचारलें.

" मी पास झालों म्हणजे सर्वांना कळवीन कीं मी येथेंच आहें म्हणून. जर नापास झालों तर हे मधले प्रयोग कोणालाहि कळविणार नाहीं. मी औंधला गेलों असेंच सारे समजतील. नापास झालों तर मग मी औंधला जाईन व तेथून सर्वांना पत्रें लिहीन. सध्यां माझा अज्ञातवास आहे, " मीं म्हटलें.

राम रात्रीं कधीं अभ्यास करीत नसे. त्याला करण्याची जरूरच नसे. तो अंथरुणावर पडला. मी त्याच्याजवळ बोलत होतों. बोलतां बोलतां तो झोंपी गेला. मीहि शेवटीं अंथरुणावर पडलों. मला मात्र झोंप लागेना. पहांटे सर्व मंडळी लौकर उठली. मीहि उठलों. नळावर गर्दी होत असे.

" श्याम, आंघोळ करतोस ना ? " रामनें विचारलें.

" मला कढत पाणी नको. कढत पाणी मला सोसत नाहीं, " मीं म्हटलें.

" गप्पा मार, " तो म्हणाला.

" अरे खरेंच सांगतों. कढत पाण्यानें माझ्या अंगावर पुरीळ उठतो. लहानपणीं डोळे बिघडले होते. तेव्हांपासून मी थंड पाण्यानेंच नेहमीं स्नान करतों, " मीं म्हटलें.

" नळाखालीं बादली आहे. आटप लौकर, " तो म्हणाला.

मीं स्नान केलें. धोतर धुतलें. गीतेचे अध्याय म्हणत मी गॅलरींत हिंडत होतों.

" श्याम, तुला गीता येते वाटतें ? " रामनें विचारलें.

" कांहीं अध्याय येतात, " मीं म्हटलें.

" आपण दोघे पाठ करूं हां, " तो म्हणाला.

रामजवळचीं इंग्रजी विषयाचीं पुस्तकें मी वाचूं लागलों. अडेल तेथें विचारूं लागलों. रामकडे त्याच्या वर्गांतील कांहीं मित्र अभ्यासासाठीं आले होते. रामनें माझी ओळख करून दिली.

" हा श्याम हो. माझा अगदीं मित्र. याचें संस्कृत, मराठी चांगलें आहे. विशेषतः मराठी तर कांहीं विचारूंच नका. मराठीचा प्रोफेसर आहे हो तो. कवि आहे. खरें ना रे ? " असें म्हणून रामनें माझा हात हातांत घेऊन जोरानें हलविला. मी कांहींच बोललों नाहीं.

" मराठींतील शंका यांना विचारल्या पाहिजेत, " एकजण म्हणाला.

" हो विचारा. साऱ्या शंका फेडल्या जातील, " राम म्हणाला.

ते मित्र गेले. रामचे धाकटे भाऊ शाळेंत जाण्याची गडबड करूं लागले. आईच्या पाठीमागें " वाढ. उशीर झाला. " अशी गर्दी करूं लागले.

" राम, मी जेवून येतों, " मीं म्हटलें.

" कोठें जाणार जेवायला ? " त्यानें विचारिलें.

" खाणावळींत, " मीं म्हटलें.

" आजच्या दिवस आमच्याकडेच जेव, " तो म्हणाला.

" अरे, आज काय नि उद्यां काय, " मीं म्हटलें.

" बरें तर. लौकर ये जेवून, " तो म्हणाला.

मी घराबाहेर पडलों. खिशांत पैसे नांव घालण्यापुरतेच होते. कोठली खानावळ नि कोठलें काय ! मी मनांत हिशोब करूं लागलों. अर्ध्या आण्याचे डाळेमुरमुरे सकाळीं व अर्ध्या आण्याचे संध्याकाळीं. असें केलें तर महिन्याला दोन रुपये पुरतील. असेंच करावें. मीं अर्ध्या आण्याचे डाळेमुरमुरे घेतले. जोगेश्वरीच्या देवळांत मी खात बसलों. तेथील नळाचें थंडगार पाणी प्यालों. थोडा वेळ इकडे तिकडे भटकून हंसतमुख असा मी घरीं आलों.

" चल, श्याम. दाखला आज आला तर ठीक. नाहींतर वर्गांत बसण्याची परवानगी तरी मिळवूं, " राम म्हणाला.

आम्ही दोघे शाळेंत गेलों. मी चालकांना भेटलों. त्यांना सर्व परिस्थिति सांगितली.

" तुमचें सर्टिफिकेट येतांच नांव घालूं. 'ब' वर्गांत बसा, " ते म्हणाले.

" 'अ' वर्गांत नाहीं का घालणार नांव ? " मीं विचारलें.

" त्या वर्गांत निवडक मुलें असतात. वार्षिक परीक्षेंत तुम्ही चांगले मार्क मिळवा म्हणजे पुढें सातवींत तुम्हाला 'अ' वर्गांत घालूं हां," ते म्हणाले.

मी बाहेर गेलों. राम बाहेर उभा होता. राम 'अ' वर्गांत होता. मला वाईट वाटलें. एका शाळेंत, एका यत्तेंत असूनहि एका वर्गांत आम्हांला एकत्र बसतां येत नव्हतें. आणि सातवींत गेलों तरी मला भरपूर मार्क थोडेच मिळाले असते? गणित कच्चें आणि इंग्रजीचीं सारीं पुस्तकें येथें नवीन! सातव्या यत्तेंतहि आम्ही निरनिराळ्या वर्गांतच राहाणार! जवळ असून दूर, दूर असून जवळ!

मी त्या वर्गांत जाऊन बसलों. मुलें माझ्याकडे बघूं लागलीं. शाळेंत अभ्यासाची उजळणी सुरू होती. मुलें शंका विचारीत, अडलेलें विचारीत. मास्तर शंका निरसन करीत. मी निःशंक होतों! कारण एक तर नवीन होतों; शिवाय येथील नियुक्त पुस्तकेंहि निराळीं. श्रवणभक्ति करीत मी बसें.

मधल्या सुट्टींत राम व मी भेटलों. मला भूक लागली होती. ते उंच तीन मजले चढण्याउतरण्याची मला इच्छा नव्हती.

" राम, मी येथेंच वाचीत बसतों. तूं ये हिंडून," मीं म्हटलें.

" वाच. पास झालें पाहिजे," तो म्हणाला.

" रामजवळ राहावयाचें तर नापास होऊन कसें चालेल? पास झालेलाच रामजवळ राहूं शकतो," मीं म्हटलें.

राम गेला. मी वाचीत बसलों.

" तुम्ही कोणत्या शाळेंतून आलांत?" एका मुलानें विचारलें.

" औंधच्या," मीं सांगितलें.

" परीक्षा तर जवळ आली. तुमचें कसें होईल?" त्यानें प्रश्न केला.

" मी पास होईन असें वाटतें," मीं म्हटलें.

मधली सुट्टी संपली. पुन्हां तास सुरू झाले. मी त्या सर्व तासांना इंग्रजीच वाचीत होतों. सायंकाळीं शाळा सुटली. आम्ही घरीं आलों.

" श्याम, खायला ये," रामनें हांक मारली.

त्या भावंडांबरोबर मींहि थोडें खाल्लें. पाण्याला आधार झाला. ते सारे भाऊ बाहेर खेळायला हिंडायला गेले. मी घरींच होतों. पडल्या पडल्या वाचीत होतों.

"मी जेवून येतों हां," असें सांगून रात्रीं मी बाहेर पडलों. अर्ध्या आण्याचे डाळेमुरमुरे घेतले. बुधवारच्या बागेंत खात बसलों. तीं लोखंडी बाकें थंडगार झालीं होतीं. शीतल स्पर्श मला आवडतो. मी सदरा काढून त्या बांकावर निजलों. बागेंत आतां विशेषशी गर्दी नव्हती. मीं फराळ केला. नळाचें पाणी प्यालों. हळूहळू घरीं आलों.

राम झोंपीं गेला होता.. मी थोडा वेळ वाचीत बसलों. नंतर झोंपलों. दुसऱ्या दिवशीं रामच्या मित्रांना सुभद्राहरणांतील आर्या समजावून दिल्या. समास सांगितले. मी त्या मित्रांजवळ थोडें थोडें बोललों. माझ्या मुक्या कंठाला थोडी वाचा फुटली. मी जरा माणसाळलों.

तीन दिवस मी डाळेमुरमुऱ्यांवर काढले. परंतु चौथ्या दिवशीं मात्र मी गळाठून गेलों. शाळेचे तीन जिने मोठ्या कष्टानें मी चढलों. घेरी येईल असें वाटे. डोळ्यासमोर अंधार येई. त्या दिवशीं शनिवार होता. शाळा दोन अडीच वाजतां सुटली.

"राम, तूं घरीं जा. मला एके ठिकाणीं जाऊन यावयाचें आहे," असें मीं सांगितलें. राम गेला. त्याच्याबरोबर मीं माझीं पुस्तकेंहि दिलीं. मी रस्त्यांतून कसा तरी जात होतों. कोठें जाणार? कोणाकडे जाणार? मी तुळशीबागेच्या राममंदिरांत गेलों. रामाच्यासमोर उभा राहिलों. ती सुंदर मूर्ति पोटभर पाहिली. नंतर एका खांबाजवळ मी बसून राहिलों. सभामंडपांतील घड्याळांत चार वाजले. तेव्हां मी उठलों. आमच्या शाळेजवळच एक खाणावळ होती. त्या खाणावळींत मी शिरलों. भाजी चिरण्याचें काम तेथें चाललें होतें.

"काय पाहिजे?" प्रश्न करण्यांत आला.

"जेवण पाहिजे. कांहीं करा, परंतु मला आधीं जेवायला वाढा," मीं म्हटलें.

"अजून दोन तास अवकाश आहे," मालक म्हणाले.

"मी येथेंच बसूं का?" मीं विचारलें.

"बसा," ते म्हणाले.

तेथील चटईवर मी बसलों. परंतु माझ्यानें बसवेना. मी तेथें झोंपलों. त्या दयाळू मालकानें तेथें मला झोंपूं दिलें.

" उठा हो. ताट वाढलें आहे, " एक नोकर म्हणाला.

मीं हातपाय धुतले, चूळ भरली. मी पाटावर बसलों. तीन दिवसांचा मी उपाशी होतों. परंतु जेवण तर जाईना. पाण्यानेंच पोट भरलें. मीं भातच खाल्ला. मागून थोडा दहींभात घेतला.

" तुमच्या खाणावळीचा दर काय ? " मीं विचारलें.

" नऊ रुपये, दहा रुपये, अकरा रुपये, " मालक म्हणाले.

" मी एकच वेळ जेवलों तर साडेचार रुपयेच घ्याल ना ? " मीं माहिती विचारली.

" एक वेळ जेवलेत तर पांच रुपये, " त्यानें सांगितलें.

" मग मी एक वेळ येत जाईन. पैसे मागून दिले तरी चालतील ना ? " मीं विचारलें.

" निम्मे पैसे आधीं पाहिजेत, " तो म्हणाला.

" उद्यां देईन, " मीं म्हटलें.

" आजचे चार आणे देऊन जा. उद्यां तुम्हीं पैसे दिलेत तर त्यांत मग हे धरूं. समजलें ना ? " तो म्हणाला.

" बरें, " मीं म्हटलें.

मीं चार आणे दिले. बुधवारच्या बागेंत बसून मी घरीं आलों. रात्रीं अभ्यास केला. अशा रीतीनें माझा कार्यक्रम सुरू झाला. मी फक्त दुपारीं जेवत असें. माझ्याजवळचीं कांहीं पुस्तकें मीं विकलीं आणि खाणावळवाल्यास निम्मे पैसे दिले. रात्रींच्या वेळेस बुधवारच्या बागेंत हवा खाणें हेंच माझें जेवण होतें !

मीं तीं इंग्रजीचीं पुस्तकें तीन तीन वेळां वाचलीं. इतर विषयांचीहि थोडी थोडी उजळणी केली. परीक्षा सुरू झाली. माझीं उत्तरें बरीं गेलीं. पास होईन अशी मला आशा होती. वर्गातील प्रत्येक मुलाला वर्ग-नायकानें एकेक कार्ड दिलें. पालकांचा पत्ता वर लिहून तें द्यावयाचें होतें. परीक्षेचा निकाल मुलांच्या घरीं कळविण्यासाठीं ती योजना होती. मी वर्गात नवीन आलेला. वर्गनायकाच्या मी लक्ष्यांतहि नव्हतों. त्यानें मला कार्ड दिलें नाहीं. मीं मागितलेंहि नाहीं. वर्गांत एक नवीन

मुलगा आला आहे, याची फारशी जाणीवहि कोणाला नव्हती. कारण निमूटपणें मी एका बाजूस बसत असें.

मी रामच्या घरीं याप्रमाणें दिवस नेत होतों. घरीं सर्वांना काळजी वाटूं लागली. मीं पत्र कोणालाच लिहिलें नाहीं. मी औंधला गेलों असेंच सारे समजत होते. मुंबईहून दादानें कोंकणांत भाऊंना पत्र लिहिलें.

"श्यामचें लक्षण कांहीं ठीक नाहीं. तो कोणाचें ऐकत नाहीं. आपल्या लहरीप्रमाणें वागतो. कोठें गेला त्याचा पत्ता नाहीं. त्याचा पुण्याला एक मित्र आहे. त्याला पत्र लिहून कांहीं माहिती कळली तर आपणांला लगेच कळवीन. उगीच चिंता करूं नये. आपण चिंता करून काय होणार ? श्यामला कांहींच वाटत नाहीं. आईला काळजी न करण्याबद्दल सांगावें."

अशा आशयाचें तें पत्र होतें. आणि एके दिवशीं अकस्मात् रामलाहि दादाचें पत्र आलें.

"सप्रेम नमस्कार,

माझा भाऊ तुमचा मित्र आहे. त्याचा पत्ता आपणांस माहीत आहे का ? घरीं सर्व फिकिरींत आहेत. आपणांस त्याचा ठावठिकाणा माहीत असल्यास कृपा करून त्वरित कळविणें. तसदीबद्दल क्षमा करावी.

श्यामचा भाऊ."

रामनें तें पत्र मला दाखविलें. काय उत्तर लिहावयाचें ? आमचा दुसऱ्या दिवशीं परीक्षेचा निकाल लागणार होता. निकाल लागल्यानंतरच पत्र लिहावें असें मला वाटलें. परंतु 'काळजी करूं नका. श्याम सुखरूप आहे. लौकरच सविस्तर पत्र त्याचें तुम्हांला येईल,' असें पत्र लिहावें असें रामचें मत पडलें.

रामनें त्याप्रमाणें कार्ड लिहिलें. त्यानंतर दोन दिवसांनीं आमचा निकाल जाहीर झाला. मी उत्तीर्ण झालों. मला आनंद झाला. सर्वांनाच आनंद झाला. मी सातव्या यत्तेंत बसलों. रामला किती तरी मार्क होते. माझे मार्क बेताचे होते. तो व मी एका वर्गांत बसूं शकलों नाहीं. मी 'ब' वर्गांत होतों. राम 'अ' वर्गांत गेला.

"माझी पुण्यास व्यवस्था लागली आहे. फक्त फीपुरते पैसे पाहिजेत. महिना पांच रुपये असले म्हणजे झालें. मी मॅट्रिकच्या वर्गांत गेलों आहें."

अशा मजकुराचीं दादाला व वडिलांना मीं पत्रें पाठविलीं. वडिलांचें आशीर्वादपर पत्र आलें. दादाचेंहि अभिनंदनपर पत्र आलें. मी हिंगण्याला मावशीलाहि भेटून आलों. मावशीला सारें सांगितलें. परंतु जेवणाचें कांहीं बोललों नाहीं.

"श्याम, जेवायचें काय करतोस?" तिनें विचारलें.

"अग, माझ्या मित्राकडेच मी जेवतों. पूजा करावयाची, कांहीं काम करावयाचें व तेथेंच जेवायचें," मीं म्हटलें.

"बरेंच झालें. फीला मी पण मदत करीत जाईन. कधीं दादा पाठवील, कधीं मी. कधीं भाऊहि कोंकणांतून पांच रुपये पाठवतील," मावशी म्हणाली.

"आतां गाडा सुरळीत चालेल असें वाटतें," मीं म्हटलें.

"बरें झालें. तें औंध सुटलें एकदांचें. भारी हाल हाल झाले तेथें तुझे," मावशी म्हणाली.

"मावशी, तुमच्या सर्वांच्या प्रेमामुळें मीं सारें सहन केलें. औंधला माझे थोडे फार जेवणाखाण्याचे हाल झाले, परंतु तेथें प्रेमहि भरपूर मिळालें. त्या सर्वांची मला आठवण येते. एकनाथाच्या हातची भाकर आतां थोडीच मिळणार आहे? गोविंदाचें गोड बोलणें थोडेंच ऐकायला मिळणार आहे?" मीं म्हटलें.

"तूं जाशील तेथें प्रेम मिळवशील," मावशी म्हणाली.

"ही देवाची कृपा. आईच्या प्रार्थनेचें हें गोड फळ," मीं म्हटलें.

"अक्काला आतां बरें वाटेल. श्यामबद्दलची तिची काळजी थोडी कमी होईल," मावशी म्हणाली.

मी सातवींत गेलों. माझें सारें सुरळीत सुरू झालें. परंतु खाणावळ कोठून भरावयाची? दर महिन्याला पुस्तकें कोठून विकायचीं? पुन्हां डोळ्यासमोर प्रश्न उभा राहिला. अन्नब्रह्म आ पसरून उभें राहिलें. 'वितीएवढें पोट। परी केवढा त्याचा बोभाट!'

मी एक वेळ जेवत होतों. रात्रींच्या वेळेस जेवणाचें निमित्त करून मी बुधवारच्या बागेंत जाऊन बसत असें. कांहीं दिवस ही गोष्ट कोणासहि कळली नाहीं. परंतु एक दिवस माझी सारी सत्यकथा प्रकट झाली. त्या दिवशीं नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें सात साडेसात वाजतां मी जेवणासाठीं म्हणून बाहेर पडलों. परंतु त्या दिवशीं जोगेश्वरीपर्यंत जाऊनच मी परत आलों. बुधवारच्या बागेकडे गेलों नाहीं. इतक्या लौकर श्याम जेवून कसा आला? राम व इतर सर्वजण चर्चा करूं लागलीं. त्यांचीं जेवणें खालीं होतच होतीं. मी मुकाट्यानें वरतीं खोलींत बसलों होतों.

जेवणें आटोपल्यावर ते सारे भाऊ माझ्याभोंवतीं जमले. मी खिन्न झालों.

"श्याम! तूं जेवून आलास?" अनंतानें विचारलें.

"हो," मीं उत्तर दिलें.

"कोठल्या रे खानावळींत जेवलास? मला ती दाखवशील? येतोस माझ्याबरोबर?" रामनें सूचक प्रश्न केला.

"श्याम, तुझा हात बघूं," बाळू म्हणाला.

बाळूनें माझा उजवा हात घेतला. त्यानें वास घेऊन पाहिला. सर्व भावांनीं माझ्या करकमलाचें आघ्राण केलें.

"मुळींच जेवला नाहींस. हाताला अन्नाचा वास येत नाहीं. जेवलेल्या माणसाचा हा हात नव्हे," बाळू म्हणाला.

"जेवलेल्या माणसाचें हें तोंडहि नव्हे," अनंता म्हणाला.

"जेवलेला श्याम अद्याप घरीं यावयाचा आहे. हें श्यामचें भूत आहे!" राम म्हणाला.

"खानावळीमध्यें जेवल्यावर साबण लावून हात धुतात. त्याला वास कसा येईल? उगीच माझी थट्टा कां करतां?" मीं ओशाळून म्हटलें.

" श्याम, आतां लपवालपवी नको. अगदीं खरें खरें काय तें सांग. रामबद्दल तुला जर कांहीं थोडें फार वाटत असेल तर खरें तें सांगशील. स्नेहाला असत्याचें वावडें आहे. सांग, " राम म्हणाला.

" राम, तुझा श्याम दुपारीं एक वेळ फक्त जेवतो. रात्रीं जेवणाच्या मिषानें बाहेर जातो. इकडे तिकडे हिंडून परत येतो, " मीं सांगितलें.

" मग चल खालीं जेवायला. ऊठ, " राम म्हणाला.

" मला जरूर नाहीं. एक वेळ जेवून कांहीं त्रास होत नाहीं," मीं म्हटलें.

इतक्यांत रामची आईच वर आली.

" चल रे, भातभाकरी उरली आहे, " ती म्हणाली.

मी निमूटपणें उठलों. मातेच्या शब्दांत एक प्रकारचा सहज अधिकार असतो. ते शब्द तोडवत नाहींत, मोडवत नाहींत. मी नळावरून हातपाय धुऊन आलों. जेवलों.

" उद्यांपासून तुझी खानावळ बंदच कर, " रामची आई म्हणाली.

" किती पैसे त्याला दिले आहेस ? " रामनें विचारलें.

" त्याला महिन्याचे निम्मे पैसे दिले होते. आतां एखादा रुपया द्यावा लागेल," मीं म्हटलें.

" मग उद्यां त्याचे पैसे देऊन ये, " आइ म्हणाली.

" तुझ्याजवळ नसतील तर आईजवळ माग, " राम म्हणाला.

दुसऱ्या दिवसापासून माझी खानावळ बंद झाली. रामच्या आई-जवळचे पैसे घेऊन मी देऊन आलों. आतां रामकडेच मी दोन्ही वेळां जेवूं लागलों. परंतु मला अत्यंत संकोच होई. मला प्रसन्न वाटेना. मनाला प्रशस्त वाटेना. परंतु काय करणार ? दोनचार दिवस असेच गेले.

एके दिवशीं रामची आई मला म्हणाली, " श्याम, आज आपल्या वाड्यांतील त्या तात्यांकडे जेवायला जा हो. त्यांनीं तुला बोलावलें आहे." त्या दिवशीं दशमी, द्वादशी, अमावास्या वगैरे कांहीं नव्हतें. कां बरें त्यांनीं मला बोलावलें ? मी जेवायला गेलों. जेवून आलों. दक्षिणा वगैरे मिळाली नाहीं. म्हणजे मी भटजी म्हणून कांहीं गेलों नव्हतों. माझा हा वार तर नसेल लावला ? पुण्याला मुलें वार लावून जेवतात असें मीं

ऐकलें होतें. माझ्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला. रामची आई वाड्यांत माझे वार लावीत होती!

आपणच आपले वार लावावे असें माझ्या मनांत आलें. एके दिवशीं मी सकाळीं बाहेर पडलों. अप्पाबळवंताच्या चौकाजवळ कोठल्यातरी एका मोठ्या वाड्यांत मी शिरलों. ओटीवर बैठक होती. तक्के, लोड सारें कांहीं होतें.

"कोण पाहिजे?" तेथील एका रुबाबदार गृहस्थानें विचारलें.

"मी एक गरीब विद्यार्थी आहें. माझा एक वार घ्याल का?" मीं विचारलें.

"आधीं बाहेर हो. या वारकऱ्यांनीं सतावलें आहे. हो बाहेर," तो गृहस्थ वाघासारखा गुरगुरत अंगावर आला.

माझ्या डोळ्यांतून गंगायमुना बाहेर आल्या. पुरे झाला हा प्रयोग. असे अपमान करून घेण्यापेक्षां उपाशी राहून मरणें काय वाईट? तेंच पहिलें व शेवटचें घर. पुन्हां कोणाकडे विचारावयास मी गेलों नाहीं. मी माघारा घरीं आलों. आपल्या कांहीं नवीन मित्रांना विचारावें असा एक आशेचा किरण मनांत आला. एका मित्राला मीं विचारलें. त्यानें एकदम होकार दिला. मला मोक्षसुखाचा आनंद झाला. रामच्या घरचा वार व या नवीन मित्राकडचा वार, हे माझे सनातन वार होते. हे वार शेवटपर्यंत बदलले नाहींत. या दोन वारांशिवाय दुसरे माझे दोन वार होते. कधीं ते वाड्यांत असत, कधीं बाहेर कोणाकडे असत. सर्वसाधारण-पणें माझे चार वार नेहमीं असत. तेवढे वार मला पुरे असत. आठवड्यांतील चार दिवस पोटभर जेवण मिळालें म्हणजे मी संतुष्ट असें. माझे चार वार लागल्यावर मीं रामच्या घरीं सांगितलें कीं माझ्या सर्व वारांची सोय लागली. पुन्हां मीं खोटेंच सांगितलें. मी जर कोणत्या एका गोष्टीसाठीं पुष्कळ वेळां असत्य बोललों असेन तर तें खाण्याच्या बाबतींत. जर कोणत्या एका गोष्टीचा मला संकोच वाटत असेल तर तो दुसऱ्याकडे जेवण्याचा. जर कोणत्या एका गोष्टीचा मला विशेष कंटाळा असेल तर तोहि जेवण्याचाच. जेवण्याशिवाय जगतांच येत नाहीं म्हणून जेवावयाचें. मी मोकळेपणानें क्वचित् कोणाकडे जेवलों असेन. कोणतेंहि काम केल्या-

शिवाय जेवणें मला पाप वाटतें, आणि आपल्याकडून कांहींहि होत नाहीं याची मला अत्यंत जाणीव असते. ज्या दिवशीं कांहीं तरी काम माझ्याकडून झालेलें असतें त्या दिवशीं जेवतांना मला आनंद होत असतो.

एकदां मी मावशीकडे बडोद्यास गेलों होतों. दोन तीन दिवस मी आनंदानें जेवलों. परंतु मग मला स्वतःची लाज वाटे. शेवटीं वाड्यांतील लहान मुलें बरोबर घेऊन मी बागेंत जावयाचा. बागेंत त्यांच्याबरोबर खेळावयाचा. सारीं मुलें माझ्याबरोबर येण्यास उत्सुक असत. त्यांना फिरवून आणण्यांत मला आनंद वाटे. एके दिवशीं मला माझा मामेभाऊ म्हणाला, "अण्णा, कशाला सारीं तीं पोरें घेऊन जातोस ? तुला त्रास देत असतील. तूं आपला एकटा फिरायला जा." मीं त्याला म्हटलें, "गोपू, अरे या मुलांना फिरायला नेतों, म्हणून तर मला थोडातरी आनंद आहे. आपण कांहीं तरी काम करतों आहोंत असें वाटतें. घरांत कोंडलेल्या मुलांना बाहेर हिंडवून आणलें, चार भिन्हाडांतील मुलांना एकत्र, बरोबर, खेळीमेळीनें खेळावयास लावलें, त्या मुलांच्या जीवनांत थोडा आनंद मीं ओतला, आतां आज जेवलों तरी हरकत नाहीं असें मला वाटतें."

म्हणून मी कोठेंहि गेलों तर निदान तेथील मुलांना चार गोष्टी सांगेन. त्यांना दोन गाणीं शिकवीन. हें करण्यांत माझें समाधान मी निर्मीत असतों. आपला कांहीं तरी उपयोग झाला, अशी मनाची समजूत मी करून घेत असतों. माझ्या निराशेंत थोडी आशा मी आणतों. खाण्यापिण्यासंबंधींचें माझें खोटें बोलणें जगन्माउलीनें क्षमावें अशी मी सदैव प्रार्थना करीत असतों.

मी रोज मुकटा घेऊन बाहेर पडत असें. वार असो वा वार नसो. कधीं कधीं मी माझ्या विचारांत इतका मग्न असें कीं माझ्या हातांतील मुकटा वाटेंत पडून जाई! "अहो, तुमचें गाठोडें पडलें हो," कोणी तरी वाटेंतील जाणारायेणारा मला सांगे. मी भानावर येऊन ती मुकट्याची पुरचुंडी उचलून घेत असें.

ज्या दिवशीं माझा वार नसे, त्या दिवशीं मी तुळशीबागेंत किंवा जोगेश्वरीच्या देवळांत जाऊन बसत असें. लागोपाठ दोन उपवास येणार नाहींत अशा रीतीनें मीं वारांची व्यवस्था केली होती. दुपारीं तुळशीबाग

व रात्रीं बुधवारची बाग. दुपारीं राम बघावा, रात्रीं बुधवारच्या बागेंत बसून आकाशांतील तारे बघावे. बुधवारच्या बागेंत रात्रीं आठ नऊ वाजेपर्यंत बसून मी पुन्हां रामच्या आईसाठीं तुळशीबागेंतील दत्ताला जात असें.

जोगेश्वरीच्या देवळांत पाणी पिण्याची सोय होती. थंडगार पाणी. अंबाबाईच्या घरचें पाणी पिऊन श्याम शिकायला जाई. एखादे वेळेस खिशांत आणा, दोन आणे असले तर मी डाळेमुरमुरे किंवा पेरू घेऊन खात असें. अर्ध्या आण्यांत पोट भरल्यासारखें वाटे.

एके दिवशीं मी जोगेश्वरीच्या देवळांत बसलों होतों. एक सभ्य गृहस्थ देवदर्शन करून माझ्याजवळ आले. लांब पांढरा कोट, त्याच्यावर घडी घातलेलें उपरणें, डोक्यावर पागोटें, असे ते पोक्त गृहस्थ आले. ते माझ्याकडे चमत्कारिक दृष्टीनें बघत होते. त्यांना मी कोणी तरी लफंग्या आहें असें वाटलें. तमासगीर आहें असें वाटलें. कारण माझे केंस वाढलेले होते. सहासहा महिन्यांत मी हजामत करीत नसें. आमची बोलाचाली झाली. मी एक विद्यार्थी आहें असें शेवटीं त्यांना कळून आलें.

"तुम्ही विद्यार्थी आहांत, मग येथें कां?" त्यांनीं विचारलें.

"येथें जेवायला आलों आहें," मीं म्हटलें.

"येथें कोण जेवायला वाढणार?" त्यांनीं हंसून प्रश्न केला.

"जगदंबा, जोगेश्वरी," मीं म्हटलें.

"स्वच्छ काय तें सांगा ना," ते जरा त्रासिक स्वरांत बोलले.

"मी वारकरी आहें. ज्या दिवशीं माझे वार नसतात, त्या दिवशीं मी देवाच्या दारीं येऊन बसतों. जगानें लोटलेला गरीब मुलगा देवाकडे नाहीं जाणार तर कोठें जाणार?" मीं सांगितलें.

"चला. आजचा वार माझ्याकडे. या दिवशीं माझ्याकडे येत जा," तो गृहस्थ सद्भावानें म्हणाला.

त्या भल्या माणसानें हात धरून मला उठविलें. मी त्यांच्याकडे गेलों व पोटभर जेवलों. त्या दिवसापासून मी त्यांच्याकडे जाऊं लागलों. जर कधीं तापानें आजारी असल्यामुळें मी त्यांच्याकडे जेवावयास जाऊं शकलों नाहीं, तर ते रामच्या घरीं येऊन माझी चौकशी करावयाचे. ते

निरनिराळ्या देवळांत जाऊन रोज देवदर्शन घ्यावयाचें. अशाच एका देवदर्शनाच्या त्यांच्या रस्त्यावर राम वगैरे राहात असत. त्या गृहस्थांबद्दल मला आदर वाटे. नाहीं तर वारकऱ्याचें घर जरी आपल्या रस्त्यावर असलें तरी त्याची कोण चौकशी करणार ? वारकऱ्याबद्दल इतकी सहृदय भावना कोणता अन्नदाता दाखविणार ?

मला वाराच्या घरीं सर्वत्र सौजन्यानें वागवीत. कोणीं कधीं हिडिसफिडीस केलें नाहीं. क्वचित् कोठें जरा कटु अनुभव आले. परंतु ते यावयाचेच ! ते कटु अनुभव कांहीं अडाणी माणसांच्या अडाणी व संकुचित वृत्तीमुळें येत. परंतु तेथील दुसऱ्या माणसांची उदारता पाहून मी तें सारें विसरून जात असें. पुष्कळ वेळां यजमान उदार असतो. परंतु घरांतील इतर माणसें अनुदार असतात. आणि तो अनुदारपणा यजमानाच्या दृष्टीस पडणार नाहीं अशी खबरदारी घेण्यांत येत असते.

मला किती तरी गंमतीच्या आठवणी येत आहेत. परंतु एक सांगतों. एका घरीं मी नित्याप्रमाणें जेवायला गेलों. घरांतील लहानथोर सारीं शाळेंत जाणारीं मुलें जेवायला बसलीं होतीं. त्या मुलांतील एक मुलगा नुकताच मराठी चौथ्या यत्तेंत गेला होता. त्याला अपूर्णांकांची ओळख करून देण्याला शाळेंत सुरवात झाली होती. त्याची आई वाढीत होती.

" भाकरी हवी का ? " आईनें त्याला विचारलें.

" हवी, " त्यानें सांगितलें.

" किती वाढूं ? " आईनें विचारलें.

" तीन अष्टमांश वाढ, " तो म्हणाला.

आम्ही सारीं हंसूं लागलों. मला तर हंसूं आवरेना. मिळालेलें नवीन ज्ञान दाखविण्याला आपण किती उत्सुक असतों !

माझ्या त्या नव्या मित्रानें जो एक वार कबूल केला होता, त्याच्या घरीं यमूताई म्हणून वृद्ध आजी होत्या. त्या आजी एकट्याच होत्या. माझा मित्र त्यांच्याकडे राहिला होता. त्यांचें नातें होतें. यमूताई अत्यंत धार्मिक होत्या. त्यांचें देवदेवतार्चन फार. त्या प्रत्यहीं पहांटे उठून ओंकारेश्वरावरून स्नान करून यावयाच्या. त्यांचें माझ्यावर प्रेम जडलें. त्यांच्यासंबंधीं पुढें एके दिवशीं मी केव्हां तरी सांगेन.

अशा रीतीनें माझा वारकरी सांप्रदाय सुरू झाला. पंढरपूरचे वारकरी खांद्यावर पताका घेऊन श्रीपांडुरंगाचे पुजारी होतात. मी माझा मुकटा खांकोटीस मारून पोटोबाचा पूजक झालों होतों. एक देवाचा वारकरी, एक देहाचा वारकरी ! एका अक्षराचा फरक, परंतु केवढा जमीनअस्मानाचा फरक ! श्याम पोटोबाची उपासना करण्यांत दंग होता. ज्या दिवशीं पोटोबाची पूजा करतां येत नसे, त्या दिवशीं मात्र दिवसा तो रामाचा मुखचंद्र पाही व रात्रीं आकाशांतील दिवाळी बघे !

# प्रेमळ सेवेकरी

## ४३

रामच्या घरीं आपण होऊन मी अनेक कामें करूं लागलों. कृतज्ञता प्रकट करण्यासाठीं मी अधीर असें. कोणतेंहि काम आनंदानें करावयास मी सज्ज असें. मला सांगावें लागत नसे, हांक मारावी लागत नसे. मी आपण होऊन येऊन उभा राहात असें. तीं अनेक कर्मे करतांना मला अपार आनंद होई. मी पहांटे उठत असें. पाणी तापविण्याच्या चुलींत मी विस्तव पेटवी. पहांटे स्नान झालें कीं मी देवाची पूजा करीं. मंडईतून भाजी किंवा चक्कींतून दळण दळून आणावयाचें असलें तरी मी तयार असें. घरीं कांहीं दळणसडण असलें तर मी आनंदानें हात लावायचा. संध्याकाळीं बाहेरचीं सर्वांचीं धोतरें वगैरे काढून त्यांच्या मी घड्या घालून ठेवीत असें. वरच्या खोल्यांचा स्वच्छ केर काढून सर्वांचीं अंथरुणें घालून ठेवीत असें. अशाप्रकारें मी कर्मांत रमूं लागलों. कधीं त्रागा नाहीं, आदळआपट नाहीं, रुसवा नाहीं, राग नाहीं. श्याम शांत झाला होता.

रामची आई असडिक तांदूळ एकदम घेऊन ठेवी. ते घरीं सडावे लागत. रामची आई सडूं लागली व मुसळाचा घांव माझ्या कानावर पडला, कीं मी एकदम धांवत जाई. रामच्या आईला मी हात लावीं. राम व रामचा धाकटा भाऊ हेहि मदत करावयास येत. परंतु मी त्यांना नको म्हणत असें. माझ्या हातांना फोड येत. आत्याकडे पाणी खेंचून बोटांना करकोचे पडत, त्याची आठवण येई. त्या फोडांचें मला कौतुक वाटे. माझ्या हाताला आतां जेवण्याचा अधिकार आहे, असें मला वाटे.

"श्याम, बघूं तुझे हात," राम माझ्या पाठीस लागे.

"हात रे काय सारखे बघतोस? आतां कांहीं मी उपाशी नसतों. वास का घ्यायचा आहे पुन्हां माझ्या हाताचा?" मी हंसत विचारीं.

"पण दाखवलास हात म्हणून काय झालें?" तो पुन्हां म्हणे.

शेवटीं मी माझे फोड आलेले हात त्याला दाखवीत असें. माझे हात आपले हातांत घेऊन राम म्हणे, "हें सारें आमच्यासाठीं. श्याम, हाताला फोड आले तुझ्या." मी म्हणे, "त्यांत काय झालें? मला तुमच्याकडे मुळींच परकेपणा वाटत नाहीं, मानहानी वाटत नाहीं. तुमच्या घरीं काम करण्यांत मला आनंद वाटतो. माझ्या आईला नसें का मी दळूं लागत? राम, श्याम कामाला कधींहि कंटाळत नाहीं. फक्त कामाबरोबर त्याला प्रेमाची प्राप्ति झाली म्हणजे झालें. तुमच्याकडे मला प्रेम मिळतें, आपलेपणा मिळतो. त्याचा उतराई मी कशानें होऊं? प्रेमाच्या मिळालेल्या एका शब्दाच मोल करतां येत नसतें, समजलास?" तरीहि राम माझे फोड कुरवाळीत म्हणाला, "आमच्यासाठीं तुला त्रास. रामसाटीं तूं सारें करतोस!"

मी मंडईत ज्या दिवशीं एकटा जात असें, त्या दिवशीं माझें वर्तन जरा चमत्कारिक होत असे. मंडईतून भाजी आणतांना मला संकोच वाटत असे. आपल्याबद्दल संशय तर नाहीं ना घेणार, असें माझ्या मनांत येई. म्हणून मी उत्तमांतील उत्तम भाजी घेऊन जात असें व दर कमी सांगत असें. चांगलीं वांगीं न्यावयाचीं, परंतु शिळ्या रद्दड वांग्यांचा भाव घरीं सांगावयाचा. यामुळें माझें नुकसान होत असे. खिशांत असलेले आणा, दोन आणे ह्या आंतबट्टयाच्या व्यवहारांत मला घालावे लागत.

"श्याम मंडई चांगली करतो," रामची आई म्हणे.

"आमची पण भाजी आणीत जा रे श्याम," मथुताई म्हणत.

खिशांतील पैसे देऊन ही स्तुति मला मिळवावी लागे. आणि शेजाऱ्च्या मथुताईच्या भाजीसाठींहि आणखी पदरमोड करावी लागे. वार नसला म्हणजे जे पैसे मला कांहीं तरी घेऊन खाण्यासाठीं उपयोगीं पडत, त्यांतील कांहीं अशा रीतीनें जात! भीड भिकेची बहीण म्हणतात तें खोटें नाहीं. महाग आणलीस, वाईट आणलीस, फसलास असें कोणीं म्हणूं नये म्हणून ही सारी खटपट!

एकदां मंडईत मी गेलों होतों, त्यावेळेस एक भविष्य सांगणारा कुडबुड्या जोशी माझ्याजवळ आला. "दादाचें नशीब थोर आहे, जीवाचे मित्र भेटतील, सुखाचे सांगाती लाभतील. मायबापांचा भारी लोभ आहे तुमच्यावर. तरी पण रायाच्या मनाला चिंता आहे. अन्न गोड लागत नाहीं, झोंप येत नाहीं. चिंता नको करूं राजा. सारें भलें होईल. देवाची कृपा आहे. फार कृपा आहे. मी मागेन तें मला द्याल? बोला. कचरूं नका. माझा दावा नाहीं. मनाला वाटलें तर होय म्हणा. पायांतला जोडा द्याल? माझे पाय अनवाणी भाजतात. राम तुमच्यावर दया करील. गरिबाला देतां जोडा?"

त्या कुडबुड्याची ती वाग्वैजयंति ऐकून मी तल्लीन झालों. तो मला आशा देत होता. त्याच्या पायांत कांहीं नव्हतें. मीं त्याला माझ्या पायांतील जोडा दिला! मी फसत नव्हतों. जाणूनबुजून मीं जोडा दिला, विचार करून दिला.

"शाबास! असा धर्मात्मा पाहिला नाहीं. तुझें संकट पळेल. तुझे वाईट दिवस जातील. देवाची कृपा आहे, गरिबाची दया आहे राजा तुला. एवढा आंगांतला कोट द्याल मला गरिबाला? माझा हट्ट नाहीं, माझा दावा नाहीं. मनाला वाटलें तर द्या, मनांतला राम सांगेल तर द्या."

मीं माझा कोट काढला व त्याला दिला! मी आतां तेथें थांबलों नाहीं. तो आणखी काय मागेल याची मला भीति वाटली. शेवटीं तोंडानें नाहीं म्हणण्याची पाळी येईल, मी सत्त्वच्युत होईन अशी मला भीति वाटली. माझ्या तोंडांतून नकार येऊं नये, असें मला वाटत होतें.

'मुखास माझ्या न शिवो नकार
निघो मुखांतून सदा रुकार ॥'

मी भाजी घेऊन घरीं आलों. अंगांत कोट नाहीं, पायांत जोडा नाहीं.

"श्याम, तुझा कोट कोठें आहे ?" रामनें विचारलें.

"एकानें मागितला, मीं दिला!" मीं म्हटलें.

"आणि पायांतील जोडा ?" पुन्हां प्रश्न आला.

"अनवाणी हिंडणाऱ्या भिकाऱ्याला दिला," मीं शांतपणें सांगितलें.

"मीं तर अशाला खरोखरचे जोडे दिले असते," अनंता म्हणाला.

"अगदींच तूं भोळा सांब," राम म्हणाला.

"मी भोळा नाहीं. मी जाणूनबुजून देत होतों. आपल्याला देववतें कीं नाहीं हें मी पाहात होतों. मी माझी परीक्षा घेत होतों," मीं सांगितलें.

मित्रांनो, त्यागाचीहि संवय करावी लागते. तोहि एक अभ्यास आहे. चिंधीचा तुकडा का असेना, त्यांतहि आपली अपरंपार आसक्ति ओतलेली असते. मनाला कांहींहि न वाटतां हे अंगावरचे कपडेच काय, हे दाग-दागिनेच काय, परंतु हें शरीरहि वाटेल तेव्हां हंसत हंसत फेंकून देतां आलें पाहिजे. श्रीरामकृष्ण परमहंस एका हातांत रुपया घेत, एका हातांत माती घेत. माती काय, रुपया काय, असें मनांत आणून गंगेंत फेंकून देत! आत्म्याला प्रकट करण्याकरितां आत्म्याच्या भोंवतीं सदैव उभीं असलेलीं सहस्र बंधनें फेंकून देण्याची तयारी करावी लागते. आप-ल्याला एक चिंधी देववत नाहीं, मग ही देहाची खोळ ध्येयासाठीं देणें दूरच राहिलें. चिंध्यांना जपणारे देहाला किती जपत असतील ? देहाची चिंधी फेंकून देण्याची मला हिंमत नाहीं. देहाचें वस्त्र वेळ येतांच टरटर फाडून मी फेंकून देईन, अशी मला शक्ति नाहीं. परंतु देहाला सज-विणारीं वस्त्रें फेंकून देण्याची माझी सदैव तयारी असते. ही गोष्ट मीं मनाला शिकविली आहे. एक पाऊल तरी मीं टाकलें आहे. ध्येयाकडे जाणाऱ्या अनंत पायऱ्यांच्या सोपानाची एक पायरी मी चढलों आहें.

वाड्यांत मला सारे हंसूं लागले. परंतु मला त्याचें कांहीं वाटलें नाहीं. माझी भूमिका ते समजूं शकत नव्हते. "नेसूंचें दिलेंस नाहीं हें भाग्य" शेजारच्या मथुताई म्हणाल्या. मी कांहीं बोललों नाहीं.

रामची आई रात्रीं जेवणें झालीं म्हणजे तुळशीबागेंतील दत्ताला जात असे. तिच्याबरोबर कोणीतरी जावें लागे. बहुधा बाळू जाई. आणि मीहि बहुतेक रोज रात्रीं जाऊं लागलों. वारावरून जेवून परभारा मी तुळशीबागेंत जात असें. तेथें रामची आई आलेली असे. रामची बहीण गंगू तीहि पुष्कळदां आईबरोबर येई. गंगूला घरांतील सारीं प्रेमानें ' मालण ' म्हणत असत.

मी रामाच्या देवळांत बसें. रामची आई दत्तमंदिरांत बसे. रामाची आरती वगैरे झाल्यावर गर्दी नसे. मी अगदीं आंतल्या दरवाजाजवळ जाऊन बसत असें. रामाची सांवळी मूर्ति प्राशीत असें. त्या मूर्तीकडे कितीहि पाहिलें तरी माझें समाधान होत नसे. तिकडे दत्ताच्या देवळांत भजन असे. बराच वेळ रामाजवळ बसून मग मी दत्ताच्या देवळांत जात असें आणि तेथल्या भजनांत मिळत असें. ती दत्ताची मूर्तीहि फार गोड होती.

आरती वगैरे झाल्यावर बायका मग तेथें निरनिराळीं गाणीं म्हणत. रामची बहीण मालण, रामची आई, याहि गाणीं म्हणत. रामच्या आईला शेंकडों लहानमोठीं गाणीं येत होतीं. नवनीतांतील कितीतरी आख्यानें रामच्या आईला पाठ येत. तिची स्मरणशक्ति अपूर्व होती. तिच्या मुलांतहि ही स्मरणशक्ति उतरली होती. बायकांच्या गाण्यांचा लहानपणापासून मला नाद. तीं गाणीं ऐकतांना मी तन्मय होत असें. दत्ताच्या देवळांत भजनाला येणारी एक गौळण होती. ही गौळणबाईहि सुंदर गाणीं म्हणे. एक रामदासी बाई होती. तिलाहि खूप छान छान गाणीं येत असत. धरणीमातेचें एक गाणें ती म्हणे. तें केवळ अपूर्व होतें.

देवळांतून आम्ही घरीं परत येत असूं, तों साडेदहा अकरा होत असत. दत्ताच्या देवळांत मिळालेला प्रसाद मी स्वतः कधीं खाल्ला नाहीं. मग त्या प्रसादाचें मी काय करीत असें ? तो का टाकून देत असें ? नाहीं. तो प्रसाद मी रामला आणून देत असें. आम्ही भजनाहून परत आलों म्हणजे रामला हांक मारीत असूं. कारण वाड्याची कडी लागलेली असे. रामला हांक मारतांच तो खालीं येई व दार उघडी. दार उघडणाऱ्या हातावर मी तो प्रसाद ठेवीत असें. एखादा खडीसाखरेचा खडा किंवा लहानसा खोबऱ्याचा तुकडा तो काय ! परंतु तो देतांना मला कृतार्थता

वाटे व रामला घेण्यांत गोडी वाटे. प्रेमानें दिलेल्या वस्तूचें मोजमाप करायचें नसतें, बाह्य स्वरूप पाहायचें नसतें.

मला कोठें कांहीहि मिळालें तरी तें रामसाठीं मी घेऊन यावयाचा. एकदां यमूताईनीं मला अनरसे दिले होते. त्यांतील हळूंच दोन मीं खिशांत घालून रामसाठीं आणले.

" राम, आज तुला मी एक गंमत देणार आहे, " मीं म्हटलें.

" काय बरें ? " त्यानें स्मित करीत विचारलें.

" ओळख तूंच, " मीं म्हटलें.

" असेल उरलेला रात्रींचा प्रसाद. तुझ्याजवळ दुसरें काय असणार ? " राम म्हणाला.

" तुला ओळखतां येणारच नाहीं, " मीं म्हटलें.

" आतां दे लौकर, " अधीर होऊन राम म्हणाला.

मीं त्याच्या हातांत अनरसे ठेवले.

" श्याम, अनरसे काय घेऊन आलास ? उद्यां भातहि घेऊन येशील ! तूं वेडा आहेस. लोक तुला हंसतात हो श्याम, " राम म्हणाला.

" लोकांना हंसूं दे. परंतु माझा राम नाहीं ना हंसणार ? " मीं विचारलें.

" श्याम, प्रेमाचा हा बाह्य पसारा कशाला ? प्रेमाचें प्रदर्शन मला आवडत नाहीं. प्रेम हें मनोमय असावें. आई एक ओंवी म्हणते ती मला फार आवडते, " राम थांबला.

" म्हण ती ओंवी. बायकांच्या कांहीं कांहीं ओंव्या माणिकमोत्यांप्रमाणें अमोल असतात. म्हण राम, " मीं म्हटलें.

' तुझा माझा मैत्रपणा जगजाहीर नसावा ।
लोभ अंतरीं असावा श्यामराया ॥ '

रामनें शेवटीं माझें नांव घालून ओंवी म्हणून दाखविली.

"राम, तूं एक ओंवी म्हटलीस तर मी दोन म्हणून दाखवतों. एक:—

' आपण मैत्रिणी मैत्रीला काय देऊं ?
एक लवंग दोघी खाऊं शांताताई ॥
आपण मैत्रिणी मैत्रीला काय देऊं ?
एका घोटें पाणी पिऊं शांताताई ॥ '

राम, प्रेमाचें प्रदर्शन करण्यासाठीं का तुला मी हें देतों ? मला प्रदर्शनच करायचें असतें तर सर्वांच्या देखत तुला मीं दिलें असतें. परंतु कोणी जवळ नाहीं हें पाहूनच मी देतों ना ? केवळ माझ्या मनाच्या समाधानासाठीं मी देतों; प्रेम हें आंत मावतनासें झालें म्हणजे तें बाहेर प्रकट होण्यासाठीं धडपडत असतें, तें कृतिरूप होऊं पाहात असतें, असें नाहीं तुला वाटत ? आणि हें बघ, तुला जर असें करणें आवडत नसेल तर मी करणार नाहीं. शेवटीं तुझा आनंद त्यांतच माझा आनंद. मला स्वतंत्र आनंद नाहीं. " असें म्हणून मी गच्चींवरून उठून गेलों.

ज्या प्रेमाचा प्रत्यक्ष सृष्टींत साक्षात्कार होत नाहीं, तें प्रेम कसें समाधान देणार ? अमूर्त प्रेम कोणाचें समाधान करील ? देशभक्ताची देशभक्ति प्रत्यक्ष सेवेंत प्रकट होईल, तेव्हांच ना तिला अर्थ प्राप्त होईल ? परंतु कोणी म्हणेल कीं प्रेम सेवेंत प्रकट होऊं दे. सेवा म्हणजे तरी काय ? आपल्याजवळ जें असेल तें देणें म्हणजेच सेवा. रामची सेवा करतां यावी म्हणून का त्यानें आजारीच पडलें पाहिजे ? म्हणून का त्यानें संकटांतच पडलें पाहिजे ? प्रेमाची आपत्काळींच आवश्यकता, एरव्हीं नाहीं का ? प्रेमाची सदैव आवश्यकता आहे. तें सदैव सूर्याच्या प्रकाशाप्रमाणें प्रकट होत राहिलें पाहिजे. जें फूल सुगंध देत नाहीं, जी नदी ओलावा देत नाहीं, जी सतार संगीत स्रवत नाहीं, त्यांचा काय उपयोग ? प्रेम सदैव देत असतें. देण्यासाठीं तें अधीर असतें. तें न दिलें तर पोटांत कळा लागतात !

राम एक प्रकारें निर्गुणोपासक होता. श्याम सगुणोपासक होता. रामला निराकार प्रेमपरमेश्वर पाहिजे होता. श्यामला साकार प्रेमदेव पाहिजे होता. परंतु देण्याघेण्याचें प्रेम हें शेवटीं स्थूलच समजलें पाहिजे. चैतन्यमय आत्म्याला चिन्मय प्रेमाचीच भूक असणार. अतींद्रिय प्रेमाचीच तहान असणार. एकाद्या वेलीचें सत्त्व आपण गाळून गाळून अत्यंत शुद्ध करून घेऊं लागलों, तर शेवटीं कदाचित् शून्यच हातीं लागणार ! आणि अत्यंत निर्मळ ब्रह्माचें शून्य हेंच यथार्थ वर्णन आहे. बाह्य आकार आल्याबरोबर थोडी तरी मलिनता ही राहाणारच राहाणार !

रामची बहीण मालण एकाएकीं आजारी पडली. तो विषमज्वरच होता. शुश्रूषा करण्याचें शास्त्रीय ज्ञान रामच्या आईच्या देखरेखीखालीं

मला त्यावेळेस मिळालें. बेडपॅन वगैरे वस्तु तोंपर्यंत मीं पाहिल्या नव्हत्या. बर्फाची पिशवी पाहिली नव्हती. एके दिवशीं रामची आई मला म्हणाली, " श्याम, तेवढें बेडपॅन टाकून ये हो मग. " मीं 'होय' म्हटलें. मीं बेडपॅन एकदम उचललें आणि मोरींत नेऊन ओतलें. मोरींत मळाचे खडे पडले! बेडपॅन शौचासाठीं देतात हें मला कोठें माहीत होतें? मोरी घाण झाली. मीं तो सारा मळ पुन्हां बेडपॅनमध्यें भरला आणि संडासांत नेऊन टाकला. मोरी धुऊन टाकली. माझ्या अज्ञानाची मला लाज वाटली. भंगीदादाचें मीं केलेलें तें पहिलें काम! तें करतांना मला कांहीं एक वाटलें नाहीं. हात कसे भरूं, हें काम कसें करूं असें मनांतहि आलें नाहीं. मोठ्या आनंदानें तें काम मीं केलें. ज्याप्रमाणें भेदाभेद माझ्या जीवनांतच कमी, त्याचप्रमाणें कोणतेंहि काम करण्यांत मला कधींच कांहीं अवघड वाटलें नाहीं. सेवेचें कोणतेंहि काम करतांना मला कधीं कमीपणा वाटला नाहीं. माझ्यामध्यें अनंत दुर्गुण आहेत. परंतु दोनचार गुणहि सहजधर्म म्हणून जणूं माझ्यांत आले आहेत. मला पैशाचा मोह नाहीं, खाण्यापिण्याची, नटण्यामुरडण्याची फारशी लालसा नाहीं. कोणतेंहि काम करण्यांत कमीपणा वाटत नाहीं. उच्चनीचपणाची भावना नाहीं. या सर्वांच्या मुळाशीं जाऊन पाहिलें तर माझ्या जीवनांत व्यापक सहानुभूति आहे. ही व्यापक सहानुभूति म्हणजे माझा प्राण. या एका गुणाच्या आधारावर मी जगत आहें. या एका किरणाच्या योगानें माझें अंधारमय जीवन थोडेंफार सुसह्य झालें आहे.

" श्याम, बेडपॅन उचलायला तुला वाईट वाटत असेल ! " अनंतानें विचारलें.

" कां बरें ? मी तें सहज नेऊन टाकतों व स्वच्छ करून आणतों. मला कांहीं वाटत नाहीं. उलट तें नीट स्वच्छ करून आणण्यांत मला आनंद वाटतो, " मीं म्हटलें.

" आपण नाहीं बुवा उचलणार. होतांहोईतों आपण टाळूं, " तो म्हणाला.

मालणच्या आजारीपणांत मीं चांगली सेवा केली. मला समाधान वाटत होतें. ज्या घरांत मला अपरंपार सहानुभूति मिळत होती, तेथें मीहि उपयोगीं पडत होतों. मी निरुपयोगी ठरलों नाहीं. माझी किंमत वाढली.

मालण बरी झाली. राम मला आतां 'देव' म्हणून हांक मारी. मालण व रामचे धाकटे भाऊ मला स्वामी म्हणत! आमच्या वाड्याचे मालकहि मला स्वामी म्हणत.

"मला श्याम म्हणा. स्वामी नका म्हणूं," मालकाला मीं म्हटलें.

"कां बरें? मुलें तुम्हांला स्वामी म्हणतात, आम्हीहि म्हणूं," ते थट्टेनें म्हणाले.

"मुलांना म्हणूं दे. परंतु मोठ्या माणसांनीं म्हणूं नये," मीं पुन्हां म्हटलें.

"आम्ही म्हणणार बुवा," ते म्हणाले व हंसत निघून गेले.

रामचे धाकटे भाऊ व मालण मला पकडीत. शेजारचीं दुसरीं लहान मुलेंहि त्यांच्या मदतीस येत. तीं सारीं मुलें मला धरून ठेवीत व म्हणत, "स्वामींच्या पायां पडा." "पडा सारींजणं स्वामींच्या पायां." पाळी-पाळीनें तीं सारीं माझ्या पायां पडत व म्हणत, "सोडा रे त्यांना आतां." त्या मुलांचा होई खेळ व माझा जाई जीव!

आम्ही राहात होतों, त्या जागेला दुसऱ्या मजल्याच्यावर एक लहानसा पोटमाळा होता. त्या पोटमाळ्याच्या जिन्यांत मी कधीं कधीं एकटा जाऊन बसें. माझें तें अश्रुमंदिर होतें. माझे डोळे तेथें मोकळे होत, हृदय तेथें मोकळें होई. एके दिवशीं असाच मी तेथें जाऊन बसलों होतों. पावसाळ्याचे दिवस होते. पाऊस पडत होता. समोरच्या पारिजातकाच्या झाडावरून टपटप पाणी गळत होतें. पत्र्यांवर पावसाचा सडसड आवाज होत होता. माझ्याहि डोळ्यांतून पाणी गळत होतें. परंतु त्याचा आवाज नव्हता. तो मुका पाऊस होता.

मला सारीं मुलें शोधीत होतीं. रामहि मला शोधूं लागला. शेवटीं त्या जिन्यांत बसलेला श्याम रामला आढळला.

"काय रे श्याम, तेथें बसून काय करीत आहेस?" रामनें विचारलें.

परंतु मीं कांहींच उत्तर दिलें नाहीं. माझे डोळे अधिकच भरून आले. निराधार झाल्याप्रमाणें जणूं मला झालें होतें. राम माझ्याजवळ आला व म्हणाला, "श्याम, काय रे झालें? आईची का आठवण आली? तुला कोणी बोललें? तुझा कोणीं अपमान केला? सांग ना रे."

" काय सांगूं राम ? माझा मान मला रडवीत आहे. माझी पूजा-अर्चा मला रडवीत आहे. अपमानानें मी कधीं रडलों नाहीं इतका या मानानें मी रडत आहें, " मीं म्हटलें.

" काय म्हणतोस तें मला कांहीं एक समजत नाहीं, " राम म्हणाला.

" राम, तूं मला ' देव ' कां म्हणतोस ? तूंच ना म्हणत असस कीं प्रेम हें हृदयांत ठेवावें ? श्यामबद्दलच्या तुझ्या साऱ्या भावना हृदयांत ठेव. तूं मला ' देव, ' म्हणतोस म्हणून मी रडत आहें. दगडाला देव कां म्हणतात तें आज मला समजलें. मी दगड आहें. अनंत दोष माझ्या-मध्यें आहेत. कां उगीच मला ' देव, देव ' म्हणतोस ? मला साधी श्याम हांक मार. तूं देव म्हणूं लागलास, दुसरीं स्वामी म्हणूं लागलीं ! मी कशाचा आहें स्वामी ? ना धनाचा ना ज्ञानाचा; ना मनाचा ना इंद्रि-यांचा; ना वासनांचा ना विकारांचा. श्याम एक किडा आहे. या किड्यां-तून अनंत रंगांचें फुलपांखरूं कधीं बाहेर पडेल तें पडेल. परंतु अनंत आकाशांत उडण्याचे मला पंख फुटण्यापूर्वीं अनंत वेळां मला टोंचून घ्यावें लागेल, यमयातनांतून जावें लागेल ! श्याम सरपटणारा सरडा आहे. क्षणांत माझे रंग बदलतात, बेत बदलतात. असल्या चंचल श्यामला देव म्हणणें म्हणजे त्या शब्दाचा अपमान आहे. तो माझा अपमान आहे. राम, मला रडवूं नका. माझ्याजवळ भरपूर अश्रू आधींच आहेत. तुम्ही आणखी त्यांत भर नका घालूं. " असें म्हणून रामच्या हातावर मीं माझें डोकें ठेवलें. त्याच्या करकमळावर मीं माझ्या अश्रूंचें अर्घ्य घातलें. त्याच्या हातावर माझे अश्रू ओतून मीं भीक मागितली.

राम गंभीरपणें निघून गेला. मी तेथेंच गळून गेल्यासारखा बसलों होतों. रामनें आपल्या भावंडांसहि समजावून सांगितलें असें दिसलें. कारण मग तीं माझ्या पाठीस फार लागेनाशीं झालीं.

" स्वामींना फार नाहीं रे त्रास द्यायचा. दिवसांतून फक्त दोन वेळां त्यांच्या पायां पडायचें, " मालण हंसत म्हणाली.

" फार त्रास दिला तर रडतील हो ते, " बाळू म्हणाला.

" मग ते जिन्यांत जाऊन बसतील हो, " बापू म्हणाला.

" तेथें त्यांना मग विंचूबिंचू चावायचा हो, " शेजारचा राजा म्हणाला.

मला पाहून असें त्यांचें हास्यगर्भ बोलणें चालावयाचें आणि माझ्या खिन्न चेहऱ्यावरहि हंसूं उमटावयाचें !

रामच्या आईचें कधीं कधीं फारच पोट दुखे. शेवटीं एकदां ससून हॉस्पिटलमध्यें परीक्षा करण्यांत आली. तेथील औषध सुरू झालें. तें औषध मी घेऊन येत असें. दहाच्या आधीं तेथें औषध मिळत नसे. सव्वादहा साडेदहाच्या सुमारास औषध मिळे. मी पळत पळत औषध घेऊन घरीं येत असें. औषध देऊन मग वारावर जावयाचें. माझे वारच फारसे नव्हते म्हणून बरें असे. तें औषध आणण्याचें काम मी आनंदानें करीत असें. ती कृतज्ञता होती. कृतज्ञतापूर्वक केलेल्या कामाचा कधीं शीण वाटत नाहीं, त्रास वाटत नाहीं, ओझें वाटत नाहीं. कृतज्ञतेचा स्पर्श होतांच प्रचंड भार फुलांसारखे वाटतात, कांट्याची मखमल होते, रखरखलेल्या वाळवंटाची सुंदर हिरवी हिरवळ होते. कृतज्ञता म्हणजे एक जादू आहे. कृतज्ञता म्हणजे कृष्णाची वेणु आहे.

प्रेम द्यावें नी प्रेम घ्यावें हा सनातन नियम आहे. रामचीं सारीं भावंडें, त्याची आई मला प्रेम देत होतीं. मी त्यांचा प्रेमळ सेवक झालों होतों. माझे दिवस आनंदांत जात होते. प्रेमसेवेंत जात होते. माझें जीवन रसमय होत होतें. माझ्या जीवनाचा थोडाबहुत आंतरिक विकास होत होता.

# भिकारी

## ४४

हिंदुस्थानांत भिकारी व बैरागी मिळून जवळ जवळ एक कोटीपर्यंत संख्या जाईल. डोक्यावर जटाभार वाढलेले, अंगाला भस्म फांसलेले, गळ्यांत व हातांत माळा असलेले, कमंडलू बाळगणारे, सर्व हिंदुस्थानची तीर्थयात्रा बिनपैशानें करणारे, मानापमान गिळून बसलेले, आगगाडींतून

उतरा असें सांगतांच उतरणारे असे ते बैरागी, हा भिकाऱ्यांचा एक प्रकार. हे चल भिकारी. दुसरे अचल भिकारी. आंधळे, पांगळे, लुळे, थोटे, मुके यांचे त्या त्या गांवाला संघ असतात. हे हिंदुस्थानभर भटकत नाहींत. त्या त्या गांवांतच हे भिक्षा मागत हिंडतात. हिंदुस्थानांत मनुष्येतर प्राण्यांसाठीं पांजरपोळ आहेत. परंतु माणसांसाठीं पांजरपोळ नाहींत. अपंग चतुष्पादांची काळजी घेणाऱ्या संस्था आहेत. परंतु अपंग द्विपादांची व्यवस्था लावणाऱ्या संस्था नाहींत. या द्विपादांची व्यवस्था मग मिशनरी थोडीफार लावतात.

आमच्या दारावरून रात्रीं आठ वाजल्यापासून कितीतरी भिकारी जावयाचे. "शिळें पाकें वाढा हो आई, गरिबाला भात वाढा हो माई," असें ओरडत ते जावयाचे. एका भिकाऱ्याकडे आमचें लक्ष वेधलें. "कोणी आहे का रे अनाथाचा, दीनाचा, गरिबाचा दयाळू? कोणी आहे का रे धर्मी राजा?" असें तो बोलावयाचा. त्याच्या शब्दांत एक प्रकारची विशेष आतुरता असे. आवाजाआवाजांतहि फरक असतो. पुष्कळ वेळां "ए भिकाऱ्या, थांब." असें म्हणून आम्ही त्याला थांबवावयाचे व जें उरलेलें असेल तें द्यावयाचें.

"आपण त्या भिकाऱ्याला त्याचें नांव गांव विचारूं," असें एके दिवशीं राम म्हणाला.

"त्याचें नांव गांव काय विचारायचें?" अनंता म्हणाला.

"त्याला 'ए भिकाऱ्या' असें आपण म्हणतों. त्याच्याऐवजीं त्याच्या नांवानें त्याला आपण हांक मारीत जाऊं," राम म्हणाला.

"खरेंच, किती चांगलें होईल!" मीं म्हटलें.

आमचें त्याप्रमाणें ठरलें. रात्रीं तो धर्मीराजा त्याच्या शिरस्त्याप्रमाणें आला. आमच्या खिडकीखालीं उभा राहिला.

"काय हो, तुमचें नांव काय?" रामनें त्याला प्रश्न केला.

"माझें नांव पुसतां होय रावसाब?" त्यानें विचारलें.

"हो," राम म्हणाला.

"माझें नांव बाबूराव आहे, दादा." तो म्हणाला.

"चांगलें आहे तुमचें नांव," मीं म्हटलें.

" आम्ही तुम्हांला बाबूराव म्हणूनच हांक मारीत जाऊं," राम म्हणाला.

" असें कशाला महाराज ? " तो म्हणाला.

" तुम्हांला आवडेल ना ? " रामनें विचारलें.

" न आवडायला काय झालें दादा ? परंतु आंधळ्या भिकाऱ्याला कोण म्हणेल बाबूराव ? " तो खिन्नतेनें म्हणाला.

" आम्ही म्हणूं, " मीं म्हटलें.

" देव तुमचें भलें करो, " असें तो म्हणाला.

आम्हीं त्याला भाकर दिली. बाबूराव निघून गेले. आम्ही त्याला त्या दिवसापासून ' ए भिकाऱ्या ' अशी हांक पुन्हां कधींहि मारली नाहीं. " बाबूराव, थांबा हं जरा, " असें आम्ही त्याला म्हणावयाचे. भिकाऱ्याला ' बाबूराव ' म्हणून हांक मारणारे माझ्या रामसारखे कितीसे लोक असतील ? भिकाऱ्याला आदरानें भिक्षा घालणारे, त्याच्या पदरांत भाकरीतुकडा प्रेमानें नीटपणें वाढणारे असे किती लोक असतील ? भिकाऱ्याचा मान कोण राखणार ? त्याला गोड हांक कोण मारणार ? भिकाऱ्याला मन, बुद्धि, हृदय हीं आहेत याची कितीकांना जाणीव असते ? भिकाऱ्यांनाहि कांहीं थोड्याफार भावना असतात हें कितीकांना समजतें ? त्या भावना दुखविल्या जाऊं नयेत म्हणून कोण जपतो ? समाजांत भिकारी आढळणें हा सामाजिक रचनेचा दोष आहे. सरकारी राज्यपद्धतीचा दोष आहे. अपंग लोकांकडूनहि सहानुभूतिपूर्वक कांहीं काम करून घेतां येईल. त्यांचा स्वाभिमान जागृत ठेवतां येईल. परंतु ज्या देशांत धट्टयाकट्टया लोकांसहि काम मिळत नाहीं, तेथें आंधळ्यापांगळ्यांपासून कोण काम घेणार ? जेथें धडधाकट लोकांचा स्वाभिमान टिकत नाहीं, तेथें या अनाथांचा स्वाभिमान कसा टिकणार ?

त्या दिवशीं बाहेर गार वारा सुटला होता. पांघरुणें घेऊन आम्ही बसलों होतों. रामची आई शेगडीपाशीं शेकत होती. आम्ही बोलत होतों.

" आज बाबूराव नाहीं आले ? " आई म्हणाली.

" इतक्या थंडींतून ते कसे येतील ? " मीं म्हटलें.

" गरिबांना थंडी नाहीं, ऊन नाहीं, " राम म्हणाला.

"ते रस्त्यांत झोंपतील. पृथ्वी त्यांचें अंथरुण, आकाश त्यांचें पांघरुण," मीं म्हटलें.

आमचें असें बोलणें चाललें आहे तोंच 'आहे का रे कोणी धर्मी राजा,' हे शब्द आमच्या कानावर आले.

"अरे बाबूराव आले. त्यांना थांबवा," आई म्हणाली.

"बाबूराव, थांबा हां," रामनें खिडकींतून सांगितलें.

"आज तुम्ही थंडींतून कशाला आलेत बाबूराव?" मीं विचारिलें.

"मी एकटा असतों तर नसतों आलों," तो म्हणाला.

"मग तुमचें कोण आहे?" रामनें विचारलें.

"माझी म्हातारी आहे. तिला आतां चालवत नाहीं. तिला दोन घांस नकोत का द्यायला?" तो म्हणाला.

"बाबूराव, थांबा. तुम्हांला एक कोट देतों हां," असें म्हणून रामनें एक जुना कोट काढून त्याला दिला. बाबूरावांनीं तो अंगांत घातला. कुडकुडणाऱ्या बाबूरावांना कोटाची ऊब मिळाली. प्रेमाची ऊब मिळाली. माणुसकीची ऊब मिळाली. आंधळे बाबूराव! त्यांना आंधळे कोण म्हणेल? स्वतःच्या वृद्ध मातेसाठीं ते भीक मागत होते! कडाक्याची थंडी बाहेर पडली असतांनाहि ते काठी टेकीत टेकीत जात होते! बाबूराव डोळस होते. कर्तव्याचे डोळे त्यांच्याजवळ होते. मातृप्रेमाची पवित्र दृष्टि त्यांच्याजवळ होती. ती हालूंचालूं न शकणारी वृद्ध माता आपल्या आंधळ्या मुलाला किती आशीर्वाद देत असेल! तिचे ते आशीर्वाद म्हणजेच बाबूरावांचीं कवचकुंडलें होतीं. आम्हीं दिलेले जीर्णशीर्ण कोट बाबूरावांना कितीसे पुरते, कितीसे सांभाळते!

बाबूराव निघून गेले. आम्हीं त्यांना भीक घातली. त्यांनीं आम्हांला मातृप्रेमाची महती सांगितली. आम्हीं त्यांना कोट दिला, त्यांनीं आम्हांला कर्तव्य शिकविलें. बाबूराव आमचे गुरु झाले.

दुसऱ्या दिवशीं रात्रीं बाबूराव आमच्या खिडकीखालीं येऊन उभे राहिले. घरांत कांहीं उरलें नव्हतें. कारण घरांतील राम वगैरेंचीं जेवणें होत असतांच मी त्या दिवशीं बाहेरून आलों होतों. त्या दिवशीं माझा तुळशीबागेंतील वार होता. मी कधीं कधीं उपाशी असतों अशी अंधुक

शंका त्या भ्रातृमंडळाला आली होती. परंतु माझा स्वाभिमान दुखविला जाऊं नये म्हणून मला ते आतां कांहींएक प्रत्यक्ष विचारीत नसत. त्यांचें जेवण होत आहे अशा सुमारासच जर मी कधीं बाहेरून आलों, तर ते मला थोडेंतरी खायला बोलवायचेच.

" श्याम, भात थोडा उरतो आहे, ये, " त्यांची आई म्हणायची.

माझ्यानें नाहीं म्हणवत नसे. ते माझे मित्र मुद्दाम थोडें थोडें कमी खावयाचे. कोणी भात नको म्हणे, कोणी भाकर नको म्हणे. आणि अशा-मुळें अन्न उरावयाचेंच. त्या प्रेमावशिष्ट अन्नाचा श्याम अधिकारी असे. भिकारी श्याम जेवून उरलें तर त्या दिवशीं भिकारी बाबूरावांना मिळावयाचें!

तो दिवस असाच होता. " बाबूराव, आज नाहीं कांहीं, " रामनें वरून सांगितलें. " तुम्ही जरा खालीं या धर्मी राजे, " बाबूरावानें सांगितलें. आम्हांला कुतूहल उत्पन्न झालें. राम खालीं गेला.

" काय बाबूराव ? " त्यानें विचारलें.

" कांहीं नाहीं. हें घ्या, " असें म्हणून रामच्या हातांत त्यांनीं कांहीं तरी दिलें.

ती एक मण्याची माळ होती. ती त्या कोटाच्या खिशांत राहिलेली होती. कधींचा पडलेला कोट. त्यांत कांहीं असेल अशी शंकाहि आम्हांला नव्हती.

" बाबूराव, ही कशाला आणलीत ? " रामनें विचारलें.

" तुमची चुकून राहिलेली मला कशाला दादा ? आंधळ्याला तुळशीच्या मण्यांची माळ पुरे. ही चकचकीत मण्यांची कशाला ? मला डोळे नाहींत पण देवाला डोळे आहेत. मी का चोर ठरूं ? माझी म्हातारी म्हणाली, ' ही चकचकीत माळ त्यांची त्यांना नेऊन दे.' मागच्या जन्मींच्या पापानें डोळे गेले. या जन्मीं आणखी दादांनो कशाला पाप ? " बाबूराव बोलत होते.

" बरं हां, " असें म्हणून राम वरतीं निघून आला.

प्रामाणिक बाबूराव ' धर्मीराजा ' करीत पुढें निघून गेले. भिकारी असून निर्लोभ, भिकारी असून मातृभक्त, भिकारी असून पापभीरु असे ते बाबूराव होते. त्या भिकारी बाबूरावांचे पाय धरावे असें या भिकारी श्यामला वाटलें. परंतु तसें करण्याचें नीतिधैर्य माझ्याजवळ नव्हतें.

पुढें पुढें बाबूराव येतनासे झाले. आम्हांला त्यांची आठवण येई. आम्ही त्यांची वाट बघत असूं. त्यांच्या शब्दांसाठीं आम्ही आतुर होत असूं; परंतु त्या घर्मीराजाचे शब्द आमच्या कानावर पडतनासे झाले. कोठें गेले बाबूराव ? त्यांची वृद्ध माता मरण तर नसेल पावली ? आईच्या मरणानें आंधळे बाबूराव वेडे तर नसतील ना झाले ? आईच्या मरणानें तेहि नसतील ना मेले ? आईच्या प्रेमाचा तंतु तुटतांच त्यांचेंहि निराधार जीवन गळून नसेल ना पडलें ? आम्हांला काय कळणार ? काय समजणार ? तें दरिद्री, दुर्दैवी, सुगंधी फूल कोठें सुकलें ? कोठें चुरडलें गेलें ? कोठें पडलें ? कोठें धुळींत मिळालें ? तें आम्हांला काय माहीत ?

मी व माझे मित्र जर पुन्हां कधीं भेटलों तर आम्हांला बाबूरावांची आठवण येते. बाबूराव आमच्या जीवनांतील एक स्मरणीय वस्तु होऊन राहिले आहेत. भिकाऱ्यांतहि जीवनाची श्रीमंती आढळते. हृदयाची थोरवी, मनाची उदात्तता त्या उपाशीपोटीं असणाऱ्यांतहि आढळते. ही अशी खोलपोटी मंडळी गोलपोट्या मंडळीपेक्षांहि मनानें मोठी असते. परंतु ही श्रीमंती कोणाला दिसणार ? कोणाला कळणार ? जो नम्र होऊन या भिकाऱ्यांच्या जीवनांत शिरेल त्यालाच !

# वारकरी असून वर्गणीदार !

## ४२

मी श्रीमंत नव्हतों. दरिद्र्यांतील दरिद्री मी होतों. आठवड्यांतून तीन दिवस माझें उपोषण होत असे. देहाला उपवास घडले तरी मनाला उपवास घडूं नयेत, बुद्धीला उपवास पडूं नयेत, असें मला वाटे. माझा दादा व मावशी मला मधून मधून पैसे देत असत. फी देऊन एक दोन रुपये उरत असत. पेरू वगैरे घेऊन खाण्यांत त्यांतील कांहीं पैसे जात. जे शिल्लक राहात ते मी पुस्तकांत वगैरे खर्चीत असें.

पुण्याला जुना बाजार आठवड्यांतून दोन दिवस भरतो. बुधवारीं व रविवारीं हा बाजार भरत असतो. त्या जुन्या बाजारांत श्याम हिंडत असे. श्यामला काय घ्यावयाचें असे? त्या बाजारांत शेंकडों वस्तु असत. लष्करांतील लोकांचे जुने कपडे राशीवेरी तेथें विकावयासाठीं येत. तांब्या–पितळेच्या भांड्यांच्या राशी तेथें असत. पुष्कळवेळां चोरीस गेलेला माल जुन्या बाजारांत मिळत असे! मला कपडे घ्यावयाचे नसत, भांडीं घ्यायचीं नसत. मला धूळ खात पडलेल्या सुंदर व उदार पुस्तकांची भेट घ्यावयाची असे. जगांतील महान् महान् ग्रंथकारांचीं पृथ्वीमोलांचीं पुस्तकें तेथें धुळींत पडलेलीं असत. माणसाचा उद्धार करणारीं पुस्तकें तेथें मातींत लोळत असत. येईल का कोणी, धरील का आम्हांला हातांत, नेईल का घरीं, घालील का कव्हर, पूजील का प्रेमानें, धरील का शिरीं, धरील का हृदयीं असें तीं पुस्तकें मनांत म्हणत असत. आशेनें तीं वाट बघत असत. अत्यंत उदात्त विचारांचीं पुस्तकें अत्यंत गचाळ विकारांच्या चोपड्यांच्या शेजारीं पडलेलीं दिसत. परमेश्वर पतितपावन आहे. तो पतितांचा तिरस्कार करणार नाहीं. संत असंताला पाहून पळून जाणार नाहींत. त्याच्या उद्धारार्थ ते झटतील. तीं थोर पुस्तकें तीच संतांची रीति आचरीत होतीं. त्या रद्दी पुस्तकांना आपला पवित्र स्पर्श तीं करीत होतीं. कपाळाला आंठ्या घालीत नव्हतीं.

जुनीं पुस्तकें विकणारे माझे देव होते. ते मला जगांतील विचारवंतांची भेट घडवीत. मी त्या पुस्तकांच्याजवळ प्रेमानें बसें. येणाऱ्या-जाणाऱ्यांनीं वाटेल तशीं पाहून कशीं तरी फेंकून दिलेलीं तीं पुस्तकें मी प्रेमानें नीट लावीत बसें. त्यांच्यावरची धूळ झाडून मी तीं पुस्तकें आदरानें चाळीत असें. चांगलें पुस्तक दिसलें कीं, मी तें वाचीत असें. थोडा वेळ वाचावें, पुन्हां ठेवावें. दुसरें एखादें घ्यावें, तें चाखावें. अनेक फुलांतील रस फुलपांखरूं चाखतें, त्याप्रमाणें मी बहुविध रस तेथें चाखीत असें. माझा मनोमिलिंद त्या पुस्तककमलाभोंवतीं रुंझी घाली; रस पिऊन पुष्ट होई.

एकदां पुस्तकें चाळतांना ‘ बाळमित्र भाग पहिला ’ हें पुस्तक मला मिळालें. लहानपणीं जुन्या क्रमिक मराठी पुस्तकांत ‘ मैना घ्या हो मैना ’

वगैरे सुंदर घडे होते. ते मीं वाचलेले होते. ते घडे 'बाळमित्र' पुस्तकांतील होते. मी तें पुस्तक तेथेंच बसून वाचूं लागलों. किती गोड, सहृदय आहे तें पुस्तक! तें मूळ फ्रेंच भाषेंत आहे. सर्व भाषांतून त्या पुस्तकाचीं भाषांतरें झालेलीं आहेत. मुलांच्या मनाचा व बुद्धीचा विकास करूं पाहाणारें तें पुस्तक म्हणजे एक अप्रतिम रत्न आहे. त्यांतील किनरीवाल्याची गोष्ट मी वाचीत होतों. मी आजूबाजूचें सारें विसरून गेलों. त्या पुस्तकविक्र्यानें मला हटकलें, "अहो, वाचीत काय बसतां? घ्यायचें असेल तर घ्या; नाहीं तर खालीं ठेवा." मीं म्हटलें, "वाचल्याशिवाय कसें घेऊं?" तो म्हणाला, "वाचल्यावर कोण कशाला घेईल?" मी त्याच्याजवळ वादविवाद करीत बसलों नाहीं. तें पुस्तक त्यानें सांगितलेल्या किंमतीस मीं विकत घेतलें.

बाळमित्र पुस्तक कितीदां वाचलें तरी कंटाळा येत नाहीं. धुळ्याच्या तुरुंगांतील ग्रंथालयांत पुन्हां पंधरा वर्षांनीं बाळमित्र पुस्तक मीं वाचलें. मीं वाचलें व इतरांनाहि तें वाचावयास लाविलें. जें पुस्तक कितीदांहि वाचलें तरी फिरून वाचावेंसेंच वाटतें, तेंच खरें पुस्तक. ज्याचा कधीं वीट येत नाहीं, जें नेहमीं नवीनच वाटतें, तेंच खरोखर सुंदर! 'क्षणं क्षणं यन्नवतामुपैति। तदेव रूपं रमणीयतायाः' अशी सौंदर्याची व्याख्या आहे. बाळमित्रासारखें सुंदर पुस्तक मराठींत कित्येक वर्षें दुर्मिळ आहे, हें मुलांचें दुर्भाग्य आहे. तें ज्या दिवशीं सुंदर रीतीनें छापलें जाऊन पुन्हां मुलांबाळांच्या हातीं खेळूं लागेल तो सुदिन!

• 'शालिग्राम आणि ॲक्वर्थ' यांनीं संपादलेलें 'ऐतिहासिक पोवाड्यांचें' पुस्तक जुन्या बाजारांतच मीं विकत घेतलें. तें जिवंत काव्य मी मनमुराद प्यालों. १८६० च्या पूर्वीचें "लोखंडी रस्ते" हें रेल्वेवरील मराठी पुस्तक या बाजारांतच मला मिळालें. इंग्रजी शब्दांना मोठे गंमतीचे मराठी शब्द त्या पुस्तकांत वापरलेले दिसले. प्लॅटफॉर्म याला 'ओटा,' तिकिटाला 'चकती' असे प्रतिशब्द तेथें बनविलेले होते. त्या प्रयत्नाचें मला कौतुक वाटलें.

'इतिहास आणि ऐतिहासिक' या नियतकालिकाचे असेच कितीतरी जुने अंक तेथें मीं खरेदी केले. वेदमूर्ति भाऊशास्त्री लेले यांच्या 'धर्म'

त्या मासिकांतील निवडक लेखांचीं पुस्तकें जुन्या बाजारांतून मीं खरेदी केलीं. भाऊशास्त्री म्हणजे प्राचीन विद्येचे चालते बोलते ज्ञानकोश होते. त्यांना अमुक एक शास्त्र येत नव्हतें असें नाहीं. मराठी लिहीतहि सुंदर व जोरदार. ते एक मोठे विक्षिप्त पुरुष होते. पुष्कळ वेळां विद्वान् पुरुष विक्षिप्त असतात. भाऊशास्त्री वांईचे. वांईच्या कृष्णाकांठच्या घाटावर ते जावयाचे व ब्राह्मणांकडून वेदमंत्र म्हणून घ्यावयाचे. असें सांगतात कीं जर कोणी चुकला तर ते थोबाडींतहि मारीत. एकदां वांईला हुताशनी पौर्णिमेवर ते बोलत होते. शिमग्याचे ते दिवस. ते भाषण करूं लागत व वात्रट मुलें बोंबा मारीत ! शेवटीं भाऊशास्त्री कंटाळले व संतापले. ते म्हणाले, " मारा रे पोरांनो बोंबा मारा. बोंब मारणें म्हणजेच शिमग्यावरचें व्याख्यान ! मी पण मारतों मोठ्यानें बोंब, " असें म्हणून स्वतः बोंब मारीत ते सभेंतून निघून गेले !

जुना बाजार म्हणजे माझें विद्यामंदिर होतें. जुना बाजार म्हणजे माझ्या मनाला मोठी मेजवानी. माझा वेळ त्या दिवशीं मोठ्या आनंदांत जावयाचा. रविवारीं शाळाहि नसल्यामुळें मला भरपूर वेळ पुस्तकांशीं खेळीमेळी करीत बसतां येई.

मंडईत जातांना विश्रामबाग वाड्यासमोर असलेलें मराठी ग्रंथ-संग्रहालय मी बघत असें. ग्रंथ-संग्रहालयाची ती पाटी वाचली म्हणजे तेथें जाण्याची मला स्फूर्ति येई. परंतु वर्गणीदार झाल्याशिवाय कसें जावयाचें ? शेवटीं महिन्याची चार आणे वर्गणी मीं भरली ! महिन्याची चार आणे वर्गणीहि कित्येक वर्गणीदार वेळेवर देत नसत ! त्यांचे चहाचिवड्याचे, पट्टी–सिगारेटचे थोडे का पैसे जात असतील ! परंतु सार्वजनिक संस्थांची कोण कदर करतो ? त्या चार आण्यांसाठीं तेथील चिटणीस वर्गणी-दारांना कितीदां तरी सांगावयाचे.

" अहो, तेवढी वर्गणी आणून द्या. तीन महिन्यांची बाकी थकली आहे तुमच्याकडे, " चिटणीस एका गृहस्थाला एके दिवशीं सांगत होते.

" माझी एकट्याचीच का राहिली आहे ? कां एवढें सतावतां ? मी कांहीं भिकारी नाहीं कीं तुमची वर्गणी बुडवीन. दीडशें रुपये पगार आहे मला. बुडीत कुळ नाहीं हें, " तो गृहस्थ रागानें म्हणाला.

त्याला दीडशें रुपये पगार होता. मग हे चार आणे प्रत्येक महिन्याला त्यानें वेळेवर कां दिले नाहींत? कर्तव्याची जाणीव नाहीं. सारा उर्मट-पणाचा कारभार. सार्वजनिक नीति आपल्या अंगांत येईल, त्या दिवशींच आपला उद्धार होईल.

तो संवाद ऐकून मला लाज वाटत होती. मला वाईट वाटत होतें. काय ही आमच्या लोकांची दानत असें मनांत आलें. त्या दीडशें रुपये पगारदाराकडे मी पाहात होतों. संतापानें व तिरस्कारानें पाहात होतों. वाटलें कीं त्याला धरून गदगदां हलवावें. परंतु त्या ज्ञानमंदिरांत तसें करणें योग्य झालें नसतें.

त्या ग्रंथालयांतून मी वाचण्यासाठीं पुस्तकें नेऊं लागलों. निरनिराळीं चरित्रें वाचूं लागलों. मी घरीं पुस्तकें नेत असें. सर्वांच्या त्यांच्यावर उड्या पडत. कर्व्यांचें आत्मवृत्त मीं वाचलें होतें. परंतु त्या सर्व भावंडांनीं वाचावें म्हणून एके दिवशीं मी मुद्दाम तें घेऊन आलों. रामला तें पुस्तक फारच आवडलें. स्त्रियांच्या दास्याची रामला फार चीड येई. स्त्रियांच्यावर जे सामाजिक अन्याय होत असतात, त्याबद्दल त्याला संताप येई. स्वातंत्र्याचा आनंद स्त्रियांना मिळाला पाहिजे असें तेव्हांपासून त्याला वाटे. कर्व्यांच्या त्या आत्मवृत्तानें त्याच्यावर खूपच परिणाम झाला. आपण जर कधीं लग्न केलें तर पुनर्विवाहच आपण करूं असें तो हंसत म्हणावयाचा. 'कांहींतरी बोलतोस,' असें त्याची आई म्हणे. रामच्या त्या वरच्या हंसण्याखालीं हृदयांत गंभीर भाव होता हें त्यावेळेस कोणाला माहीत होतें?

एकदां मी हिंगण्याला मावशीकडे गेलों होतों. तेथें कांहीं अध्यापकांकडे मी मावशीबरोबर गेलों. स्त्रियांच्या शिक्षणाचा अहोरात्र विचार करणारे व अकालीं निधन पावलेले ते ध्येयवादी गो. म. चिपळूणकर हे त्यावेळेस तेथें होते. ते अमेरिकेंतून नुकतेच आलेले. त्यांच्या खोलींत मावशीबरोबर मी गेलों. अमेरिकेंतून आणलेले शेंकडों फोटो त्यांच्याजवळ होते. मी फोटोसंग्रह पाहात बसलों.

हिंगण्याहून येतांना मी दोन तीन पुस्तकें घेऊन आलों. 'जीविताचा उपयोग' व 'वक्तृत्वासाठीं उतारे' हीं दोन इंग्रजी पुस्तकें आणि

'समर्थांचा दासबोध' अशीं तीन पुस्तकें मी घेऊन आलों. रामचा मोठा भाऊ अनंता दासबोध वाचूं लागला. मला आश्चर्य वाटलें. त्यानें सर्व दासबोध संपविला. त्याला आवडलेले त्यांतील भाग तो सर्वांना वाचून दाखवी. मींहि तो वाचून काढला. त्यांतील पंचीकरणाचीं प्रकरणें मला कंटाळवाणीं वाटत. परंतु जेथें ठसठशीत संसारबोध आहे तो भाग पुनःपुन्हां वाचावासा वाटे.

माझ्या वडिलांनीं एकदां मला पाकिटांतूनच अडीच रुपयांची नोट पाठविली! त्यावेळेस एक रुपयाची व अडीच रुपयांची अशा नोटा सरकारनें काढल्या होत्या. मीं पाकीट फोडलें तर आंतील पत्रांत एक नोट ! त्या पत्रांत आणखीहि एक वस्तु होती. त्या वस्तूची किंमत मला करतां येत नव्हती. कोणती होती ती वस्तू ? पत्रांतील प्रेम ? तें तर होतेंच. प्रेमापेक्षांहि थोर असें कांहींतरी मला वडिलांनीं पाठविलें होतें. त्यांनीं तीन दूर्वा पाठविल्या होत्या ! आमच्या पालगडच्या गणपतीच्या मूर्तीवरील त्या दूर्वा होत्या. गणपतीच्या उत्सवाचा प्रसाद मला पाठवतां येत नव्हता. परंतु तो दूर्वांचा प्रसाद वडिलांनीं आपल्या मुलाला पाठविला होता. वडिलांनीं आपली शुद्ध श्रद्धा त्या दूर्वादळांतून पाठविली होती. त्या दूर्वा मीं मस्तकीं धारण केल्या. त्या माझ्या अंगावरून फिरविल्या. जणूं मंगलमूर्तीचे मंगल हातच माझ्या अंगावरून फिरत होते. मी जसा ध्यानस्थ झालों. क्षणभर डोळे मिटले.

"श्याम, काय रे आहे पत्रांत ? तुझ्या आईची बरी आहे ना प्रकृति ?" रामनें विचारलें.

"'मधून मधून ताप येतच आहे. परंतु काळजी करण्याचें कारण नाहीं,' असें त्यांनीं लिहिलें आहे," मीं सांगितलें.

"मग तूं असा कां बसला आहेस ?" त्यानें पुन्हां प्रश्न केला.

"बघ, यांत काय आहे तें," मीं त्याच्या हातांत पत्र देऊन म्हटलें.

"अडीच रुपयांची नोट! आणि पाकिटांतून! हरवली असती तर, कोणीं काढून घेतली असती तर?" त्यानें आश्चर्यानें विचारलें.

"अडीच रुपयांची नोट गेली असती, तरी त्याचें कांहीं मला वाटलें नसतें. परंतु पत्रांतील दुसरी वस्तु जर त्यावेळेस गहाळ झाली असती,

नोट काढतांना खालीं पडली असती, तर मात्र माझें कमालीचें नुकसान झालें असतें, ” मीं म्हटलें.

“ कोणती दुसरी वस्तु ? ” त्यानें जिज्ञासेनें विचारलें.

“ अरे, या गणपतीच्या प्रसादाच्या दूर्वा. हें वाळलेलें गवत. हे सुरकुतलेले तृणांकुर. ही श्रद्धा॰ या पत्रांतून मला आली आहे. दरिद्री पिता, ‘ ईश्वरावर श्रद्धा ठेव, ’ यापलीकडे कोणता संदेश आपल्या मुलाला देणार, कोणती दुसरी मदत पाठवणार ? श्रद्धेचें भांडवल ते मला पुरवीत आहेत, ” असें म्हणून मी एकदम मुका झालों.

त्या तीन दूर्वा नेहमीं माझ्या खिशांत असत. कागदांत गुंडाळून त्या मीं ठेविल्या होत्या. मी श्रीमंत असतों तर चांदीच्या डबींत ठेवून त्यांचें स्मारक केलें असतें. परंतु श्रीमंत असतों तर अशा देवाच्या अंगावरील दूर्वा मला कोण पाठविता ! मी गरीब होतों म्हणून तर तें सौभाग्य लाभलें. माझ्या हृदयाला त्या दूर्वा ऊब देत, आशा देत. माझ्या हृदयांत थोडाफार जो सद्भाव आहे, थोडाफार जो सदंश आहे, तो त्या छातीजवळ बाळगलेल्या पवित्र दूर्वांनीं निर्माण केलेला आहे. वासनाविकारांनीं बरबटलेल्या माझ्या जीवनांत क्वचित् कधीं जो विचाराचा चंद्र दिसतो, तो त्या भालचंद्राच्या मस्तकावरील दूर्वांकुर हृदयाशीं धरल्याचा परिणाम आहे. माझ्या वडिलांच्या श्रद्धेचें तें फळ आहे.

अडीच रुपये अकस्मात् मला मिळाले. मला त्या पैशांची कल्पना नव्हती. हे पैसे देवाच्या दूर्वांबरोबर आले. देवाला आवडणाऱ्या कर्मांतच ते खर्च करावयाचे, असें मीं ठरविलें. गणपति म्हणजे ज्ञानाची देवता. सुंदर पुस्तकें घेण्यांत हे पैसे आपण दवडावे असें मनांत आलें. त्या पैशांत आणखीहि थोडी वाटलें तर भर घालावयाची असेंहि मीं नक्की केलें. ‘ भट आणि मंडळी ’ या पुस्तकें विकण्याच्या दुकानीं पुस्तकांचे गट विक्रीसाठीं होते. त्यांतील एक गट मीं खरेदी केला. त्या गटांत पुढील पुस्तकें आलीं.

१ रामकृष्ण वाक्सुधा ( दोन भाग )

२ सुख आणि शांति

३ धम्मपद

४ विवेकानंदांच्या मुलाखती व संभाषणें

एकंदर पांच पुस्तकें मी घेऊन आलों. मला अपार आनंद झाला होता. घरीं येऊन तीं पुस्तकें मी वाचीत बसलों. सारींच पुस्तकें उन्नत विचारांचीं होतीं. रामकृष्ण वाक्सुधा खरोखरच अमृतनदी होती. श्रीरामकृष्णांचे ते संवाद अपूर्व वाटले. गंगेचा घाट, कालीमातेचें मंदिर, सारें वातावरणच त्या पुस्तकांत पवित्र आहे. त्या वाक्सुधेच्या दोन भागांनीं श्रीरामकृष्णांचाच मला महिमा कळला असें नाहीं, तर इतर थोर बंगाली पुरुषांचीहि माहिती मिळाली. प्रतापचंद्र मुजुमदार, केशवचंद्र सेन, ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्याशींहि त्या पुस्तकांमुळें परिचय झाला. विवेकानंद वगैरे श्रीरामकृष्णांच्या चरणकमलाशीं बसणारे सच्छिष्य, त्यांच्या अंतरंगाचें दर्शन झालें. कवि अनंततनय यांनीं मूळच्या बंगाली गीतांचीं मराठींत केलेलीं भाषांतरें त्या वाक्सुधाखंडांत होतीं. त्या कविता मीं पाठ केल्या. तीं गीतें मी गुणगुणत बसें. त्या गाण्यांचें जणूं मला वेडच लागलें. तीं गाणीं गात मी मस्त होऊन नाचें.

'सुख आणि शांति' हें पुस्तकहि असेंच अत्यंत सुंदर आहे. त्यांतील रसमय भाषेला तुलना नाहीं. इंग्रजी पुस्तकाचा हा अनुवाद आहे. कितीदां वाचलें तरी त्या पुस्तकाचा मला कंटाळा येत नसे. तें भाषांतर वाटलें नाहीं. त्यांत प्रसाद होता. 'विवेकानंदांच्या मुलाखती व संभाषणें' म्हणजे मनाचें मोठेंच खाद्य होतें तें. विवेकानंदांचीं पत्रें तत्पूर्वी मीं वाचलीं होतीं. त्या पत्रांनीं मला पागल बनविलें होतें. पत्रांच्या त्या लहानशा पुस्तकांत केवढी प्रचंड स्फूर्ति होती! विवेकानंदांबद्दलचें सारें सारें वाचून काढण्याची इच्छा त्या पत्रांनींच मला झाली होती. छोट्या धम्मपदांत बुद्धधर्माचे स्फुट सूत्रमय विचार होते. पालींतील मूळ ग्रंथाचें तें मराठी भाषांतर होतें.

"श्याम, तूं इतकीं पुस्तकें कशाला आणतोस?" रामनें विचारलें.

"माझ्यानें राहावत नाहीं. उपाशी राहावें पण पुस्तक घ्यावें असें मला वाटतें," मी म्हणालों.

खरोखरच माझ्या खिशांत पैसे असले, तर ते पुस्तकें नाहीं तर सुंदर चित्रें घेण्यांतच जावयाचे. देशभक्तांचे कार्डांच्या आकाराचे कितीतरी

फोटो बाजारांत असत. ते सारे फोटो विकत घेण्याचें मीं ठरविलें. देशभक्तांचीं अनेक नांवें त्या बाजारांत असणाऱ्या चित्रांवरूनच मी प्रथम शिकलों. मागून त्यांची मी माहिती मिळवूं लागलों. त्या थोरांची आपणांस कांहींहि माहिती नाहीं याची मला लाज वाटे. अशा रीतीनें मी माझ्या मनोबुद्धीला खाद्य पुरवीत होतों. माझ्या भावना प्रगल्भ होत होत्या. मला नवीन नवीन विचार मिळत होते.

एके दिवशीं मी ग्रंथसंग्रहालयांतून बाहेर पडत होतों, तों एक ओळखीचे गृहस्थ भेटले. माझ्या हातांत पुस्तक होतें.

"कसलें आहे पुस्तक?" त्यांनीं विचारलें.

"'आमच्या आयुष्यांतील आठवणी,' रमाबाईनीं लिहिलेलें पुस्तक," मीं म्हटलें.

"येथें मोफत मिळतात वाटतें पुस्तकें?" त्यांनीं प्रश्न केला.

"मोफत कशीं मिळतील?" मीं म्हटलें.

"मग तुमची ओळख आहे वाटतें चिटणीसाशीं?" त्यांनीं पुन्हां प्रश्न केला.

"नाहीं बुवा," मीं उत्तर दिलें.

"मग कोणीं पुस्तक दिलें? शिक्का संग्रहालयाचा आहे. वर्गणीदारांशिवाय पुस्तक मिळत नसेल?" ते म्हणाले.

"मी वर्गणीदार आहें," मीं सांगितलें.

"अहो, तुम्ही वारकरी आहांत ना?" त्यांनीं आश्चर्यानें विचारलें.

"हो," मीं शांतपणें उत्तर दिलें.

"वारकरी असून वर्गणीदार होतां? वर्गणी भरायला तुमच्याजवळ पैसे आहेत वाटतें, जेवण्यासाठीं मात्र नाहींत! ही दुसऱ्यांची तुम्ही फसवणूक करीत आहांत," ते म्हणाले.

"उपाशी राहूनच मी वर्गणीदार झालों आहें. माझे सारे वार नाहींत. तरीहि महिन्याचे चार आणे पोटाला उपाशी राखून मी या ग्रंथसंग्रहा-

लयाला देत असतों व विचारांचें खाद्य मिळवीत असतों. मी कोणाची फसवणूक नाहीं करीत, फक्त माझ्या पोटाची फसवणूक आहे," मीं म्हटलें.

"पोटाला भरपूर खायचें नाहीं, आणि म्हणे पुस्तकें वाचा! तुम्ही एक विचित्रच वारकरी आहांत. स्पष्टच सांगायचें झालें तर तुम्ही वेडे आहांत. मूर्ख आहांत. आधीं खा पोटभर," ते सद्गृहस्थ म्हणाले व निघून गेले.

वारकरी असून वर्गणीदार होणें हें त्या गृहस्थांस पाप वाटलें. माझे सारे अन्नदाते असेंच म्हणतील का? रामच्या घरची मंडळीहि मला नांवें ठेवीत असतील का? श्याम गरीब आहे. मग ही पुस्तकांची ऐट त्याला कशाला असें का ते मला म्हणतील? मला कांहीं कळेना. 'लोक कांहीं म्हणोत. तूं विचारांचा उपासक हो,' असेंच माझ्या मनानें मला सांगितलें व तेंच मीं ऐकलें.

# आई गेली

## ४६

माझी आई कित्येक वर्षें आजारीच होती. बरें वाटलें कीं उठावें, ताप आला कीं निजावें, असें तिचें चाललें होतें. त्यांतच सदानंदाच्या मरणाचा तिला मोठा धक्का बसला. कर्जामुळें घराची जप्ती होण्याची दवंडी कानावर पडली! सदानंदाच्या मरणापेक्षांहि तो अब्रूला बसलेला धक्का तिला सहन झाला नाहीं. जगण्यांत आतां तिला अर्थ दिसेना. जीवनांत तिला राम वाटेना. हळूहळू आई अंथरुणाला खिळली.

तिच्या आजारीपणाची सत्यस्थिति वडिलांनीं मला हेतुपुरस्सर कळविली नाहीं. श्यामचा अभ्यास बुडूं नये, श्यामला चिंता नसावी, श्यामचें

शाळेंत नीट लक्ष लागावें असें त्यांना वाटे. आईचें दुखणें विकोपास जात होतें. तरी श्यामला त्याची वार्ता नव्हती. काळजी करूं नये, असें वाक्य वडिलांच्या पत्रांत नेहमीं असावयाचें.

माझी मावशी रजा घेऊन कोंकणांत गेली. बोटी बंद होत्या. ती कऱ्हाडपर्यंत रेल्वेनें गेली. पुढें कऱ्हाडहून चिपळूणला ती मोटारनें गेली. त्यावेळेस कऱ्हाड ते चिपळूण पावसाळ्यांत दहा रुपये तिकीट असे. चिपळूणपासून माझी मावशी पायीं गेली. बारा-तेरा कोसांचा प्रवास होता. ते पावसाळ्याचे दिवस. नदीनाले भरलेले असावयाचे. पावसाची झड लागलेली असायची. दिवसा अंधार व्हायचा व भीति वाटायची. परंतु माझी मावशी गेली. प्रेमाचा दिवा तिच्या हृदयांत होता. बहिणीबद्दलची भक्ति तिच्या हृदयांत होती. त्या भक्तिप्रेमामुळें मावशीला कांहीं कठीण वाटलें नाहीं.

मुंबईहून माझा भाऊ बोटी सुरू होतांच दोन दिवसांची रजा घेऊन घरीं जाऊन आला. आईनें त्याला परत पाठविलें. प्रेमानें परत पाठविलें. मला कांहीं कल्पनाहि नव्हती. त्यावेळेस दिवाळीची आम्हांला सुट्टी लागली होती. मी घरीं जाणार नव्हतों. परंतु एके दिवशीं अकस्मात् माझ्या मनांत आलें कीं घरीं जावयाचें. मी निघालों. मी मुंबईला आलों. बोटींत बसून मी हर्णै बंदरांत उतरलों. तों तेथें मावशीची भेट झाली. मीं मागें माझ्या आईच्या आठवणी सांगतांना तें सारें सांगितलें आहे. आई देवाघरीं गेल्यामुळें मावशी पुण्याला परत जात होती. स्नेहऋण, प्रेमऋण फेडून ती परत जात होती. आणि श्याम! अभागी श्याम रडूं लागला. आईचें न ऐकतां मी मागें निघून आलों होतों. 'श्याम, संक्रांत होऊन जा,' असें ती सांगत असतां अभिमानानें मी निघून आलों होतों. अभिमान व अहंकार जेथें ओतप्रोत भरलेले आहेत, तेथें देव कसा राहील? अभिमानी श्यामला आई शेवटची भेटली नाहीं. ती माझी सारखी आठवण काढीत होती. तिला मी दिसत होतों. आपल्या अहंकारी पोराला ती निरहंकारी माउली मरतांना आठवीत होती. थोर माता! देवानें थोर माता आम्हांला दिली. परंतु आम्ही त्या देणगीला लायक नव्हतों. देवानें देणगी परत नेली. ती देणगी अदृश्य होतांच आम्ही रडूं लागलों.

माझ्या जीवनांतील आशा गेली, प्रकाश गेला. माझ्या जीवनाचें सूत्र तुटलें. माझ्या जीवननौकेचें सुकाणूं नाहींसें झालें, माझे सारे मनोरथ धुळींत मिळाले. माझ्या आईला मी सुखवीन हें माझें ध्येय होतें. तें ध्येय मला मिळालें नाहीं. ती अतृप्त आशा मला सारखी दुःखी करीत असते. माझ्या जीवनांत एक प्रकारचा कायमचा अंधार त्या वेळेपासून आला. एक प्रकारची अगतिकता, निराधारता त्या वेळेपासून माझ्या जीवनांत शिरली आहे.

मातेचा महिमा मी किती सांगूं, किती गाऊं? प्रत्यक्ष परमेश्वरालाहि मातृमहिमा पुरेसा नीट गातां येणार नाहीं. मातृमहिमा मुक्यानेंच वर्णावा लागेल. मौन अनंत असतें. अनंत मातृमहिमा अनंत मौनानेंच गावा. मातेचें सारें मुलांसाठीं. मुलांसाठीं तिचा जीव. मुलांसाठीं ती वाटेल तें करील. मुलांची सेवाचाकरी करतां ती थकणार नाहीं, बसणार नाहीं. तिला कोठें कांहींहि मिळो, स्वतःच्या लेंकरासाठीं ती तें घेऊन येईल. मुलाचें जरा कांहीं दुखलें खुपलें कीं ती कावरीबावरी होते. तिला मग अन्न रुचत नाहीं, झोंप येत नाहीं. ती दिवस म्हणत नाहीं, रात्र म्हणत नाहीं; ती सारखी सेवाचाकरी करते. मुलाला वाईट म्हटलेलें तिला कधीं खपणार नाहीं. कितीहि वाईट मूल असो, तिला तें सोन्याचें वाटतें; तिला तें मंगल वाटतें, पवित्र वाटतें; गोड वाटतें, सुंदर वाटतें. सारें जग मुलाला लोटील, परंतु माता लोटणार नाहीं. आपल्या पंचप्राणांचें पांघरूण घालून ती त्याला सांभाळील. स्वतः उपाशी राहून ती मुलाला वाढवील. स्वतः उघडी राहून ती मुलाला पांघरूण घालील. स्वतः मरून ती मुलाला जगवील.

आई! या दोन अक्षरांत साऱ्या श्रुतिस्मृति आहेत. सारीं महाकाव्यें आहेत. या दोन अक्षरांत माधुर्याचा सागर आहे, पावित्र्याचें आगर आहे. फुलाची कोमलता, गंगेची निर्मलता, चंद्राची रमणीयता, सागराची अनंतता, पृथ्वीची क्षमता, पाण्याची रसता जर तुम्हांस पाहावयाची असेल तर आईजवळ क्षणभर बसा. सारें तुम्हांला मिळेल. सारीं दैवतें आईत येऊन गेलीं. आई हें दैवतांचें दैवत आहे. ईश्वरचंद्र विद्यासागर म्हणत, 'मी एकच देव ओळखतों, आई हा माझा देव.' 'आई!' अशी हांक मारून ते दुथडी भरलेल्या नदींत निःशंकपणें उडी घेत. आईच्या सेवे-

साठीं धांवून जातां यावें म्हणून वरिष्ठांचे हुकूम ते पायाखालीं तुडवीत. आईच्या सेवेसाठीं इतर सर्व सेवा दूर केल्या पाहिजेत.

आई! केवढी शक्ति आहे या दोन अक्षरांत! युरोपखंडाला नमविणारा नरसिंह नेपोलियन आईसमोर नमत असे. नेपोलियनसमोर साऱ्या सम्राटांचे मुकुट वांकत. परंतु नेपोलियन आईच्या चरणीं वांके. जगज्जेता अलेक्झांडर आईची आज्ञा वेदवाक्य मानी. हिंदुस्थानांतील साऱ्या पातशाही हलविणारे श्रीशिवछत्रपती मातृचरणांची पूजा करून प्रतापी झाले. जो आईची पूजा करील त्याची जग पूजा करील. आईबापांची सेवा करणाऱ्या पुंडलीकासमोर प्रत्यक्ष परब्रह्म येऊन उभें राहात असतें.

आई या शब्दांत अपरंपार त्याग आहे, अनंत सेवा आहे. मुलाचें वैभव हेंच मातेचें वैभव. मुलाच्या सुखदुःखाशिवाय निराळें सुखदुःख तिला नसतें. बायकांच्या एका ओवींतील आईचे उद्गार ऐका:—

" धन ग संपदा, आग लागो त्या वस्तेला।
माझ्या बाळाच्या ग संगें, उभी राहीन रस्त्याला॥ "

मुलाशिवाय वैभव हें मातेला वमनवत् आहे. मुलाबरोबर रानावनांतहि ती आनंदानें राहील. मुलाबरोबर दारिद्र्यांतहि स्वर्ग मानील.

फ्रेंच भाषेंत एक गोष्ट आहे. एका आईचा एकुलता एक मुलगा होता. त्या मुलावर तिचा सारा जीव, तिचा सारा लोभ. परंतु तो मुलगा दुष्ट निघाला. तो व्यभिचारी बनला. तो आपल्या प्रियकरणीच्या घरीं सदान्‌कदा पडलेला असावयाचा. त्यानें सारें घर जसें धुऊन काढलें! घरांतील सारें प्रियकरणीच्या घरांत त्यानें भरलें. तरीहि त्या प्रियकरणीचें समाधान झालें नाहीं.

" तुमचें माझ्यावर खरें प्रेम नाहीं, " ती म्हणाली.

" काय करूं म्हणजे तुला खात्री पटेल? " त्यानें विचारलें.

" तुमच्या आईचें काळीज कापून आणून द्याल तर, " ती म्हणाली.

त्यानें आपल्या आईला मारून तिचें काळीज कापून घेतलें. तें हातांत घेऊन तो मोठ्या धांवपळीनें जात होता. त्याला गर्दींत ठेंच लागली. तो

पडला. हातांतील तें काळीजहि पडलें. त्या पडलेल्या काळजांतून त्याला शब्द ऐकूं आले, ' बाळ, लागलें नाहींना रे तुला कुठें ? '

मातृप्रेमाची थोरवी याहून अधिक सुंदर रीतीनें क्वचितच कोठें वर्णिलेली असेल ! मुलगा कसाहि असो. त्याचें सदैव हितमंगल चिंतणें हेंच एक तिला ठाऊक. मातेला मुलाशिवाय अन्य दैवत नाहीं. त्याच्या सेवेशिवाय अन्य धर्म नाहीं. आईच्या हृदयांतील वात्सल्यसिंधूंत बुचकळून बाहेर पडणारा ' बाळ ' हा शब्द ज्यानें ऐकला नाहीं, मातेचा अमृतमय हात ज्याच्या पाठीवरून कधीं फिरला नाहीं, मातेजवळचा खाऊ ज्यानें कधीं घेतला नाहीं, मातेच्या हातचा घांस ज्यानें कधीं खाल्ला नाहीं, मातेची प्रेमस्निग्ध दृष्टि ज्याच्यावर कधीं पडली नाहीं, मातेच्या हातचें पांघरूण ज्याच्या अंगावर कधीं पडलें नाहीं, मातेच्या मांडीवर जो कधीं घोळला नाहीं, मातेच्या चरणांवर जो कधीं लोळला नाहीं, आणि सर्वांत गोड असा मातेच्या हातचा मार ज्याला कधीं मिळाला नाहीं, तो अभागी होय !

आई मुलाला जें अंगाई--गीत गाते, त्याला पाळण्यांत हलवितांना, मांडीवर निजवितांना, कुशींत थोपटतांना, खांद्याशीं धरून फिरवितांना, ज्या गोड गोड ओंव्या म्हणते, त्यांत सारा सामवेद असतो, सारा गांधर्ववेद असतो. मुलासाठीं जीं शेंकडों औषधें आई जमा करून ठेवते, तिची ती बाळकडवांच्या सामानाची सांक्षी, त्यांत सारा आयुर्वेद सामावलेला असतो. आई मुलाला ज्या कधीं काऊचिऊच्या गोष्टी सांगते, राजा-राणीच्या गोष्टी सांगते, आवडती नावडतीच्या गोष्टी सांगते, त्यांत सारें बालवाङ्मय असतें. आई मुलाला कधीं काळीं कळकळीनें उपदेशाचे जे चार शब्द सांगते, त्यांत सारीं उपनिषदें असतात. ती त्याला फुलें दाखविते, फुलपांखरें दाखविते, गाईगुरें दाखविते, कावळे चिमण्या दाखविते, झाडें-माडें दाखविते, चांदोबा दाखविते, त्यांत सारें सृष्टिशास्त्र येतें. आईच्या सभोंवतीं सारीं शास्त्रें व साऱ्या विद्या जणूं येऊन उभ्या राहातात. आईच्या वात्सल्यांतून साऱ्या कला निघाल्या, साऱ्या विद्या निघाल्या, सारीं शास्त्रें निघालीं. आई म्हणजे बोधजननी, वेदजननी. आई म्हणजे ओम् !

अशा या आईचें स्मरण कोणाला होत नाहीं? विशेषतः आजारांत, संकटांत, आपत्तींत मनुष्य कोणाची उत्कंठेनें वाट बघतो, कोणाचा धांवा करतो, कोणाला हांक मारतो? देवाला? नाहीं—आईला. आईचें बघणें, आईचें बोलणें, आईचें कुरवाळणें त्याला आठवतें. तो आदर्श आरोग्य-धामांत असेल; पलंगावर पहुडलेला असेल; मऊमऊ गाद्यांवर निजला असेल; उशा डोक्याखालीं असतील; फुलांचे गुच्छ तेथें ठेवलेले असतील; मोठमोठे डॉक्टर सभोंवतीं असतील; मोठमोठ्या दाया सेवा करीत असतील; तेथें पाहिजे तें फळ असेल; पाहिजे तें पेय असेल; तेथें सारें कांहीं असेल. परंतु तो आजारी मनुष्य त्या सर्व संभारांत एका वस्तूचें स्मरण करीत असतो. त्याचे डोळे कांहींतरी शोधीत असतात, त्याचे हात कांहींतरी पाहात असतात. त्या सर्व सभोंवतालच्या सृष्टींत आई नसते. तें सारें त्याला निस्सार वाटतें. आई असेल तर सारें आहे. आई नसेल तर सारें असून नसल्यासारखें. डॉक्टरांच्या शेंकडों सुया जें करूं शकणार नाहींत, तें मातेचा एक प्रेमळ दृष्टिक्षेप, एक प्रेमळ शब्द करूं शकतो. कॉड्लिव्हरच्या बाटल्या पिऊन पिऊन जी पुष्टि येणार नाहीं, ती आईनें पाठीवरून हात फिरविल्यानें लाभेल. आई म्हणजे आरोग्य, आई म्हणजे आनंद. आई म्हणजे पुष्टि, तुष्टि, दृष्टि. आई म्हणजे शांतिः शांतिः शांतिः!

माझी आई गेली. मी पोरका झालों. तिच्या शेंकडों स्मृति त्यावेळेस हृदयांत उसळल्या. मी दुःखीकष्टी होऊन पुण्याला परतलों. आईची सारी क्रिया करून मी पुण्याला आलों. आतां मी नेहमीं मलूल दिसें. जसें पडलेलें पान, गळलेलें फूल. माझ्या जीवनाची सतार तुटली, फुटली. आतां कोठलें संगीत, कोठला आनंद? कोठलें हास्य, कोठलें लास्य? मी त्या जिन्यांत दीनवाणा बसें, उदासपणें बसें. एकदम डोळे भरून येऊन मी तेथेंच जिन्याची पायरीच आईची मांडी समजून डोकें ठेवून रडें. माझ्यांतील जणूं सारी शक्ति गेली असें मला वाटे. पंख तुटलेल्या पांखराप्रमाणें माझी दशा झाली. आतां कोठचें उडणें? आतां अखंड रडणें! 'आई, आई' अशी मी हांक मारीं. कोण मला उत्तर देणार, कोण माझ्याजवळ येणार? आई कायमची अंतरली. श्यामला

सोडून आई गेली. सदानंदाकडे गेली. आम्ही का वाईट होतों? मी का वाईट होतों? श्याम का अगदीं वाईट होता? श्याम वाईट होता म्हणूनच आई गेली. वाईट, वाईट श्याम. टाकाऊ श्याम, भिकारडा श्याम. रड, आतां रड. फुकट माझें जीवन, व्यर्थ माझें शिक्षण. आजारीपणांत आईची सेवा मला करतां आली नाहीं. तिचे पाय मीं चेपले असते. तिचें डोकें मीं दाबलें असतें. तिचा मंगल हात माझ्या डोक्यावरून मीं शेवटचा फिरवून घेतला असता. परंतु दुर्दैवी श्याम! त्याला हें असें भाग्य कोठचें मिळायला?

माझ्या मित्रांना माझी भीति वाटूं लागली. श्यामचें कसें होईल असें त्यांना वाटे. आईच्या वियोगदुःखांतून मी पार जाईन कीं नाहीं याची त्यांना शंका येई. परंतु आईचे प्राण जातांच श्यामचे प्राण निघून जाण्याइतका श्याम भाग्यवान् नव्हता. त्याच्या कपाळींची रड संपायची नव्हती. त्याची घडपड संपायची नव्हती. हळूहळू मी पुन्हां माणसाळलों. दुःख ओसरलें. परंतु एखादे वेळेस अकस्मात् मला भरून येई. आईची आठवण मला कधीं, कोठें, केव्हां येईल याचा नेम नसे.

एके दिवशीं मी उपाशी होतों. आमच्या वाड्याजवळच शंकराचें देऊळ होतें. सायंकाळीं मी त्या मंदिरांत बसलों होतों. शंकरासमोर दोन-चार दिडक्या पडलेल्या होत्या. माझ्या पोटांत अन्न नव्हतें. त्या दिडक्या आपण उचलून घ्याव्या असें माझ्या मनांत आलें. गुरव तेथें नव्हता. मी एकदम शंकरासमोर गेलों व त्या चार दिडक्या उचलून घेतल्या. देवाला राग येणार नाहीं असें मला वाटलें. देव म्हणजे माताच ना? आपलें एक लेंकरूं उपाशी आहे हें त्या देवाला आवडेल का? जवळ एक मुलगा भुकेनें काळवंडला असतां, आपल्यासमोर दीडक्या पडत आहेत, याचें हालाहलप्राशनापेक्षांहि संकट शंकराला वाटलें असेल! मी माझ्या मनाचें असें समाधान करीत होतों. मी रस्त्यानें जात होतों. परंतु एकाएकीं मला आईचें स्मरण झालें. रस्त्यांतच मी उभा राहिलों. 'श्याम, दुसऱ्याच्या वस्तूला लागलेले हे पहिले व शेवटचे हात. पुन्हां कधीं कोणाच्या वस्तूला हात लावूं नकोस.' हे आईचे शब्द आठवले. मला लाज वाटली.

माझ्या आईला शोभेसा मी मुलगा नव्हतों, म्हणूनच ती गेली असें मला वाटलें. मला रडूं आलें. मी पुन्हां शिवालयांत आलों. त्या चारी दिडक्या मीं पुन्हां तेथें ठेवल्या. देवाला साष्टांग प्रणाम केला. नंतर मी त्या बुधवारच्या बागेंत जाऊन बसलों. आईची आठवण येऊन त्या बागेंतील बांकावर मीं अभिषेक केला. तीं थंडगार लोखंडी बांकेंहि माझ्या त्या कढत अश्रूंनीं मृदु होऊन गेलीं असतील !

एकदां मी मंडईंत गेलों होतों. फळांच्या राशी मीं तेथें पाहिल्या आणि एकदम माझी आई मला आठवली. मला एकदम रडूं कोसळलें. मंडई सोडून जवळच तुळशीबागेंत मी जाऊन बसलों. तेथें हृदय हलकें केल्यावर मग मी पुन्हां मंडईंत गेलों. माझ्या आईला कोंकणांत एकहि फळ आजारांत मिळालें नसेल असें मला राहून राहून वाटे आणि भडभडून येई. मी घरीं आलों तों उशीर झाला होता.

"श्याम, किती उशीर झाला तुला ?" रामची आई म्हणाली.

मला कां उशीर झाला तें मीं कसें सांगणार ? मी कांहीं बोललों नाहीं.

माझ्या आईला आजारांत फळ मिळालें नाहीं ! त्यावेळेस मला माझी आई दिसे. आज मला लाखों आया अशा दिसत आहेत; आजारांत दवा नाहीं, थंडींत पांघरायला पांघरूण नाहीं, पावसांत निवारा नाहीं, उन्हांत छाया नाहीं, पिण्याला पाणी नाहीं, खायला दाणा नाहीं, दुधाचा थेंब नाहीं, फळाचें दर्शन नाहीं, ज्ञानाचा गंध नाहीं, कलेचा स्पर्श नाहीं, सारें शून्य, अशीं लाखों कुटुंबें या देशांत आहेत. एकीकडे मोठमोठ्या हवेल्यांतून मोठमोठ्या बागांतील रसाळ फळांचे करंडेच्या करंडे येत आहेत, दुसरीकडे विषमज्वरांतहि शिळ्या भाकरीचे तुकडे कोणी खात आहेत; एकीकडे विजेचे पंखे फिरत आहेत, दुसरीकडे उन्हाच्या झळा लागून लोक मरत आहेत; एकीकडे रेडिओचें संगीत आहे, दुसरीकडे मरणाचा आक्रोश आहे; एकीकडे विलास आहे, दुसरीकडे विनाश आहे; एकीकडे स्वर्ग आहे, दुसरीकडे नरक आहे; असा हा भारतीय संसार आहे. माझ्या आईचें दुःख तें कोट्यवधि आयांचें दुःख आहे. मी माझ्या आईला सुखी करूं पाहात होतों. माझ्या आईला सुखी करणें म्हणजे कोट्यवधि आयांना सुखी करणें.

या लाखों कुटुंबांतील हायहाय दूर करावयाची असेल तर सारी समाजरचना बदलावी लागेल. माणसाची किंमत वाढवावी लागेल. माणुसकीचा धर्म आणावा लागेल. खोटे धर्म तुडवावे लागतील. सारे दंभ जाळावे लागतील. धर्म ! कोठें आहे धर्म ! ज्या दिवशीं जगांतील एकूणएक मनुष्याला पोटभर खातां येईल, आनंदानें नीटशा घरांत राहातां येईल, अंगभर नीट कपडा स्वाभिमानानें घालतां येईल, थोडें-फार ज्ञान मिळवतां येईल, थोडाफार कलाविलास करतां येईल, त्या दिवशीं जगांत धर्माचा उषःकाल होईल. त्या दिवशीं दुनियेंत धर्माचा अवतार झाला असें म्हणतां येईल. हा सोन्याचा दिवस जवळ आणण्या-साठीं जे झटतील, झिजतील, तेच खरे संस्कृतिरक्षक, तेच खरे धार्मिक.

आज जगांत कोणी उपाशी नाहीं, उघडा नाहीं, असें ज्या दिवशीं रेडिओवरून सांगतां येईल, तो सुदिन! केव्हां येईल तो? स्वतःच्या आईचें दुःख विसरून कोट्यवधि आयांच्या दुःखांत तुम्ही आम्ही सारे समभागी होऊं तेव्हां. श्याम स्वतःच्या आईचें दुःख आतां विसरला आहे. लाखों लोकांच्या दुःखांचा परिहार करूं पाहाणाऱ्या क्रांतींत अशक्त व आजारी असूनहि तो शिरूं पाहात आहे. लाखों लोकांच्या विकासाला विरोध करणारे सारे सैतानी पंथ व संघ पायाखालीं तुडविण्यासाठीं, आपल्या कृश, रुग्ण शरीरानें परंतु पेटलेल्या मनानें, श्याम उभा राहूं पाहात आहे. आईचें दुःख खरोखर मला समजलें असेल, माझ्या आईची खरी-खुरी पूजा करावी असें जर माझ्या मनांत पूर्वीं कधीं येत असेल तर या अशा विराट् क्रांतींतील सात्त्विक संतापानें पेटलेला एक सैनिक मी बनेन. शरीरानें नाहीं बनतां आलें तर मनानें तरी बनेन. खरा मातृभक्त तो, जो दुसऱ्या लाखों मातांचीं दुःखें दूर करण्यासाठीं उभा राहातो. मी खरा मातृभक्त असेन तर असा वागेन. असें माझ्या हातून होवो असा मला ध्यास लागेल. त्या महान् क्रांतींत प्रत्यक्ष पडतां न आलें तर निदान मी तिचें अभीष्ट तरी चिंतीन. त्या क्रांतीला यश चिंतीन. तिचीं गाणीं गाईन व इतरांना ऐकवीन. तिचा जप करीत मरेन. मातृदेव श्याम क्रांतिदेव झाला पाहिजे.

मी जर असें न करीन, तर खुशाल समजा कीं श्यामचें आईसाठीं तें मुळूमुळू रडणें म्हणजे केवळ दंभ होता. श्यामचें आईवरचें प्रेम म्हणजे एक वंचना होती. श्यामची आईवरची भक्ति म्हणजे एक भ्रांत कल्पना होती. श्याम व श्यामची आई, म्हणजे एक गोडसें मृगजळ होतें.

3963
IRBK-0103163
IRBK-0103163
राष्ट्रीय ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम 22256
विभाग
क्रमांक
नों. दि. 3/7/3/६